# ZmZm \ SZ[dg `mMr ~Ia




## कप्तान ए म्याक्डनाल्ड

## १८५२


हे पुस्तक प्रताधिकार मुक्त आहे. याचे विनामूल्य वितरण करणे कायदेशीर आहे..

हे पुस्तक गुगल बुक सर्च वरून श्री अरुण फ़डके यांनी शोधून काढले व मराठी वाचकांसाठी उपलब्ध करून दिले याबद्दल त्यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

दक्षणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी.



मुंबई.

# MEMOIR OF THE LIFE

OF

# NÁNÁ FARNAWÍS.

COMPILED FROM

FAMILY RECORDS AND PUBLISHED WORKS,

AND

TRANSLATED INTO MARÁTHÍ,

BY

CAPTAIN A. MACDONALD,

18TH REGT. B. N. I.

---

BOMBAY:

PRINTED FOR THE

DEKHAN VERNACULAR TRANSLATION SOCIETY,

BY APA RAMJI, AT GANPAT KRISHNAJI'S PRESS.

1852.

# नाना फडनवीस यांची बखर.

NANA KADANAYASI YAMCI BARVAR

खासगी दफ्तरावरून व प्रसिद्ध पुस्तकांवरून

ए म्याकडानल्ड साहिब मुंबई खात्याच्या १८ व्या

पलटणीचे कपतान

यांणीं

मराठी भाषेंत रचिली.

---

तीं

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आज्ञेवरून

आपा रामजी यानें गणपत कृष्णाजी याचे

छापखान्यांत छापिली.

---

मुकाम मुंबई इसवी सन १८५२.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | १५ | कर्मांनें | कर्मांनी |
| ७ | ८ | ह्योते | नह्योते |
| ७ | २२ | चमत्कारीक | चमत्कारिक |
| ७ | २४ | श्रंगारलेले | शृंगारलेले |
| ८ | १८ | जाह्ल्या | झाल्या |
| ९ | १ | मानकेश्वर | माणकेश्वर |
| ९ | १६ | किल्यांत | किल्ल्यांत |
| १० | ३ | सदाशीव | सदाशिव |
| १० | ७ | किल्यावर | किल्ल्यावर |
| १० | २६ | शींदे | शिंदे |
| १५ | १५ | सदाशीव | सदाशिव |
| १८ | १२ | उद्ध्वलाच | उद्ध्वलाचे |
| २० | १ | उद्ध्वला | उद्ध्वला |
| २० | १७ | शत्रू | शत्रु |
| २२ | २५ | करीनासे | करीतनासे |
| २६ | १८ | शत्रुंची | शत्रूंची |
| ३३ | ५ | शत्रू | शत्रु |
| ३५ | २३ | मराठ्यांच | मराठ्यांचे |
| ३६ | ७ | फडनवीसां | फडनाविसां |
| ३६ | १८ | आणन | आणून |
| ३८ | २२ | फडनवींसां | फडनविसां |
| ४० | २४ | घालन | घालून |
| ४४ | १३ | देउं | देऊं |
| ४७ | १७ | कळन | कळून |
| ४७ | २४ | पाठवन | पाठवून |

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४७ | २५ | लाकांशी | लोकांशीं |
| ५३ | २२ | जाइले | झाले |
| ५५ | १७ | ब | व |
| ६६ | २ | परशुवराम | परशुराम |
| ६७ | २३ | सकल्प | संकल्प |
| ७९ | २४ | फितर | फितूर |
| ७९ | २५ | जीतका | जितका |
| ८७ | २३ | करित | करितां |
| ९५ | २३ | अमक | अमुक |
| ९६ | ८ | टिपस | टिपूस |
| ९६ | १७ | टिपचा | टिपूचा |
| ९८ | २० | वकील | वकीले |
| ९९ | ३ | पुत्रातन | पुत्रांतून |
| १०० | ८ | ह्मणन | ह्मणून |
| १०३ | ६ | कडन | कडून |
| १०३ | १० | जण | जणांस |
| १०४ | १२ | सांपडं | सांपडूं |
| १०५ | १४ | रजपत | रजपूत |
| १०७ | २३ | बोलन | बोलून |
| १०७ | २५ | ह्मणन | ह्मणून |
| १०९ | ५ | मळ | मूळ |
| १०९ | २५ | हूकम | हुकूम |
| ११४ | २४ | कडन | कडून |
| ११८ | ९ | लुटन | लुटून |
| १२० | १५ | मनांतन | मनांतून |
| १३६ | १८ | जाहागारी | जहागीर |
| १३७ | २२ | जाउन | जाऊन |
| १४६ | २५ | शुभ्यावर | सुभ्यावर |
| १४७ | २१ | सोडन | सोडून |
| १४७ | २२ | गेलां अल्लीचें | गेला अल्लीचे |

| पृष्ठ | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १४८ | २० | ह्मणन | ह्मणून |
| १४९ | ८ | ह्मणाने | ह्मणून |
| १५२ | १० | स्वींनदा | स्वनिंदा |
| १५४ | १८ | कडन | कडून |
| १५६ | २१ | नव्हतें | नव्हतें |
| १५७ | १ | उठं | उठूं |
| १५९ | ४ | पाडन | पाडून |
| १६० | ७ | फितुरा | फितूरा |
| १६२ | ८ | काढन | काढून |
| १६२ | २५ | कबल | कबूल |
| १६८ | ५ | हेतुने | हेतूने |
| १७० | २ | हिंदु | हिंदू |
| १७४ | १० | आणन | आणून |
| १७५ | ६ | समजं | समजूं |
| १९६ | ६ | कील्ला | किल्ला |
| २०० | १२ | हत | हेत |
| २०१ | १ | राहुं | राहूं |

# बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना फडनवीस, यांची बखर.

**नाना फडनवीस** यांचा जन्म इसवी सन १७४१ मे महिन्याचे चवथे तारिखेस ह्मणजे शके १६६३ ज्येष्ट वद्य शुक्रवारीं सातार मुकामीं झाला; त्या समयीं त्यांचे तीर्थरूप **जनार्दन बल्लाळ भानू** हे **बाळाजी बाजीराव पेशवे** यांच्या हाताखालीं वंशपरंपरे त्यांचे पूर्वज फडनवीशीचें ह्मणजे हिशेब तपासणीचें काम करीत आले होते. **नानांचे** मातोश्रीचें नांव कळावें, असी कोणास उत्सुकता असेल ह्मणून लिहितों. तिचें नांव **रखमाबाई** ह्मणून होतें. ही **मेहेंदळे** ह्मणून संभावित आणि पुरातन कुळांतील गृहस्थ याची कन्या होती **बाळाजी जनार्दन** यांचे लाहानपणीचा कांहीं वृत्तांत समजण्यांत आला नाहीं, व त्यांचे वंशजांनीं त्यांचे लाहानपणीचा दाहावर्षेपर्यंत वृत्तांत लिहून ठेविला नाहीं. याजवरून असें सिद्ध होतें कीं, त्यांच्या लाहानपणीं वर्णन करण्याजोगा कांहीं विशेष वृत्तांत घडला नसेल.

**नानाचें** दहा वर्षाचें वय झाल्यानंतर पुण्यांत **सदाशीव रघुनाथ गद्रे** ह्मणून नामांकित सावकार होते त्यांची कन्या तिचे नाव **यशोदाबाई नानांस** दिल्ही. ( सुमारें बारावर्षांचें वय झाल्यानंतर **नानांस** कांहीं स्त्रीव्यसन लागलें; तें दिवसानुदिवस त्यांच्या वयाप्रमाणें वृद्धिगत होत गेलें. ) चौदा वर्षांचें वय झाल्यानंतर दैव-

वशात् नाना घोड्यावरून पडले. तेणेंकरून त्यांची इतकी अवस्था झाली कीं ते पराकाष्टेने वाचले.

पंधरा वर्षांचें वय झाल्यावर नानांचे तीर्थरूपांस देवाज्ञा झाली; त्यांचीं क्रिया कर्मे इत्यादि सर्व केल्यावर नानांस फडनविशीचीं वस्त्रें प्राप्त झालीं; यास्तव पुढल्या ग्रंथांत बाळाजी जनार्दन भानू हें नांव किंवा नाना फडनवीस हें नाव लिहितों.

नानांवर पेशव्यांचा फार लोभ होता, आणि नानांचे वडील मृत्यु पावल्यानंतर थोडे दिवसांनीं पेशवे श्रीरंगपट्टणास जाऊं लागले; तेव्हां त्यांनीं बरोबर येण्याविषयीं नानांस उत्तेजन दिल्हें. यास्वांरीहून परत आल्यावर नानांनीं स्वस्त्रीशीं समागम केला, नंतर तीस पुत्र झाला. मग कांहीं महिने झाल्यावर नाना परस्त्रीशीं गमन करूं लागले, तथापि न्याय, सत्य बोलणें, इत्यादि अनेक प्रकरणीं त्यांची चाल फार चांगली होती, सरते शेवटीं नानांचे प्रकृतीस फार विकार झाल्यामुळें ते गोदावरी तीरीं अनुष्ठानादि कर्मे करण्याकरितां गेले. अशा कर्मानें त्यांचें अंतःकरण इतकें कोमळ झालें कीं त्यांनीं गंगातीरीं माहाक्षेत्रीं आपले मित्र भाऊ साहेब यांबरोबर जाण्याचा निश्चय केला. मराठ्यांचे फौजेचा आफूगाणी लोकांनीं मोड केल्यामुळें भाऊ साहेबांस मुख्य पेशव्यांचा हुकूम झाला होता, कीं आफूगाणी लोकांस पुनः अटके पार हांकुन देण्याचा यत्न करावा. भाऊ या स्वांरीवर जात असतां, ते महापुण्यक्षेत्र यमुना एथें काळिया डोहावर आले. त्या डोहा शेजारीं मोठा कदंब वृक्ष आहे, त्याच्या फांद्या सर्व काळिया डोहावर पसरल्या आहेत. भाऊ साहेबांचा स्वभाव जात्या फारच कडक असे. भाऊ साहेबांस मागल्या स्वांरींत जय मिळाल्यावरून यासमयीं त्यांस गर्व झाला; परंतु त्या मागल्या लढायांत नानाफ-

डनवीस नव्हते यामुळें त्यांविषयीं च्या गोष्टी या ग्रंथांत लिहिण्याचें कारण नाहीं. सैन्यावरील मुख्य अधिकारी सदाशीवराव उर्फ भाउ साहेब मोठे धैर्यवान् यांस अनुभव नसल्यामुळें आपण माहान शूर, व लढाऊ असें त्यांचे मनांत आलें, व पहिल्या लढायांमध्यें त्यांस जय मिळाला होता तेणेंकरून व्यर्थ भरंवसा मनांत आला कीं, आपणांस आतांहि जय मिळेल; परंतु पूर्वीं त्याला मोठा अधिकार प्राप्त झाला नव्हता. त्या काळीं जय नमिळता, तर आतां सदाशीवराव पराजित होते, कांकीं या समयीं त्यांस असा गर्व झाला नसता. ज्याचे हातीं मोठा अधिकार असतो त्यास अशी ठेंच लागून अद्दल घडत नाहीं, ह्मणून दुर्दैवेंकरून त्याचे देशाचा नाश झाल्या वाचून, आणि हजारो प्राणी बळी पडल्याखेरीज त्याचा गर्व, व अविचार जात नाहीं. सदाशीवराव भाऊ बरोबर दक्षिणेंतील मराठ्यांची फौज जावयास तयार झाली, ती सुमारें वीस हजार शेलके स्वार, व यांखेरीज तोफखान्याचे गोलंदाज, व तयार पायदळ सुमारें दाहा हजार; तें पायदळ इभ्राहीमखान गारदी याचे हाताखालीं होतें.

पूर्वीं मराठ्यांच्या फौजा रणांगणीं आल्या होत्या त्यांपेक्षां ही फौज दिसण्यामध्यें फारच चांगली होती, रघुनाथराव यांणीं पहिल्या लढाईतून जें सामान परत आणिलें होतें, तें शोभेकरितां यासमयीं बरोबर घेतलें. मोठाले उंच आणि विस्तीर्ण डेरे त्यांचीं अस्तरें रेशमी आणि सकलादी कापडांचीं होतीं, व शेंड्यांवर चमत्कारीक सोनेरी मुलाम्याचे कळस होते. असे हे डेरे पुष्कळ दूरून दिसत असत, व सर्व मुख्य सरदारांचे प्रत्येक डेऱ्याचे भोंवताले विचित्र रंगाच्या कनाथी पुष्कळ असत, श्रंगारलेले पुष्कळ हत्ती, सर्व तऱ्हेचे झेंडे, व अमूल्य सरंजामासुद्धां सर्वोत्कृष्ट

घोडे, हें सर्व सामान, जसें हिंदूलोकांचे फौजेंतील सामान बारमाही फार चांगलें दिसतें त्याप्रमाणें फार चांगलें दिसत होतें, हें भाऊ साहेबांचे फौजेंत चहुंकडून जमविलेलें होतें. सर्व कामगारांचे किनखापी पोशाख असत; व ज्यांस श्रमाखेरीज पैका मिळत असे, ते सर्व कामगार आपली शोभा दुसऱ्यापेक्षां चांगली दिसावी ह्मणून पैका खर्च करून एकमेकापेक्षां पोशाख चांगले करीत. पूर्वी मोंगल लोंकांचे हातांत सत्ता व अधिकार होता, त्या वेळेस जसा त्यांचे पोशाखांचा डामडौल असे, त्याप्रमाणेच या लढाईच्या समयीं मराठ्यांचे फौजेचा होता. भाऊ साहेबांचे फौजेंतील जे मुख्य सरदार होते, त्यांचीं नावें बितपशील.

१ बळवंतराव गणपत मेहेंदळे,
१ नारो शंकर राजे बाहादूर,
१ विठ्ठल शिवदेव विंचूरकर,
१ समशेर बाहादूर,
१ त्रिंबक सदाशीव पुरंदरे,

यांखेरीज कित्येक सरदार ह्मणजे पूर्वीचे पुरातन मराठे लोक जे पेशव्यांचे घरांत राज्य, व सत्ता येऊन ब्राह्मण लोकांस मोठें उच्चत्व प्राप्त जाहल्यामुळें खालावून दक्षिणेंत दुसऱ्या पदवीस आले होते, त्यांचे कोणी वंशज होते.

बाळाजीराव यांजबरोबरहि मोठें सैन्य राहिलें, परंतु सदाशिवराव चढाव करून मोंगल लोकांचे मुख्य गादिकडे जात होते; यामुळें मराठ्यांचे फौजेंतील सर्व सरदारांस त्यांचे फौजेंत जाऊन मिळण्याकरितां हुकूम झाला. त्याप्रमाणें सदाशिवराव चंबला नदी उतरण्याचे पूर्वी मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, आ-

बाजीराव आठवले, अंताजी मानकेश्वर, आणि गोविंदपंत बुंदेले, हे, यां खेरीज लहान लहान पुष्कळ सरदार आपापल्या हाताखालील फौजा घेऊन येऊन मिळाले. बहूत करून रजपूत लोकांचे सरदारांनीं आपापल्या रिसाल्यांतील थोडे थोडे स्वांर पाठविले; याखेरीज असंख्य पेंढारी व मोंगलाई स्वांर या सैन्यास येऊन मिळाले. या प्रमाणें सर्व प्रजा आपलें काम जाणून येऊन मिळाली. सुरजमल्लास होळकरांच्या मर्जी करितां तीस हजार मनुष्यां सुद्धां येऊन मिळणें प्राप्त झालें.

भाऊ साहेबांचे हाताखालील अव्यवस्थित व अफाट फौज होती, ती औजड तोफखान्याशीं मिळाल्यावरून फार बोंढाळा होऊन तिला बरोबरचे पायदळासंगतीं चालावें लागे, तेणेंकरून सर्व फौजेचा एकच रट्ट झाला. तेव्हां ही फौज लढाईस अगदी निरूपयोगी असें पाहून, सुरजमल्ल, जो फार हुशार व अनुभवी होता, त्यानें ठरविलें कीं, हें औजड सामान व फौजेंतील शिपाई लोकांचीं बायकामुलें ग्वालेरींत, झांशींत, अथवा आपल्या किल्यांपैकीं एकाद्या किल्यांत संरक्षण होई अशे ठिकाणीं ठेवावीं; व मराठ्यांचे व सुरजमल्ल याचे स्वांरांनीं मिळून शत्रूचे फौजेंत अन्नाची बेगमी जाण्याची बंदी करावी, व बारमाही लढाईकरून मुसलमान लोकांचे राजांस हटवून अबदुलास परत हांकून द्यावें.

होळकरांनी हि त्याप्रमाणेंच अनुमत दिल्हें परंतु सदाशिवराव यांचें होळकरांशीं वांकडे होतें, ह्मणून ते याबेतास अनुकूळ झाले नाहींत. आणि होळकरांचें व सुरजमल्लाचें मित्रत्व पाहून सुरजमल्ला विषयीं सदाशिवरावांचे मनांत काळेंबेरें आलें. इंग्लिश लोक लढाईचे कामांत फार हुशार आहेत, असें चहूंकडे प-

सिद्ध झालें होतें आणि **सदाशिवरावानें** फ्रेंच लोकांचे फौजेची व तोफखान्याची फार सुशिक्षित व चांगली कवाईत आपल्या डोळ्यांनीं पाहिली होती. **इभ्राहीमखान गारदी** यास **सदाशीवरावानीं** आपल्या जवळ ठेवल्याने त्यांचें फार हित झालें, व ज्या मसलतीनेंच मात्र या लढाईत सिद्धि झाली असती, ती **सुरज मल्लाची** मसलत **सदाशिवरावांनीं** नाकारली. नंतर दिल्लीवरफौज नेउन किल्यावर एकदम हल्ला केला. मराठ्यांचे फौजेपैकीं कांहीं फौज बुरुजावरून आंत शिरली, व बाकीची फौज किल्याचे दरवाज्यावर हल्ला करित होती. किल्ल्यांतील लोक किल्ला बचावण्यांत गुंतले होते, परंतु मराठे लोक किल्ल्यांत शिरले होते, ते वेस उघडून किल्ला घेण्याचें मनांत न आणितां बिन हरकत लुटूं लागले. त्या लोकांस साहाय्य देण्यास कोणी नव्हते, व त्यांचीं हात्यारेंहि बरोबर घेतलीं नव्हतीं, असें पाहून बारा मनुष्यांनीं त्यांस किल्याबाहेर हाकून दिल्हे. यामुळें हल्लयास लांबण लागली. नंतर त्यांनीं मोर्चे बांधिले, आणि थोडे वेळानें किल्ला हस्तगत केला. **भाऊ साहेबांनीं** ही कार्यसिद्धि झाल्यावरून, **विश्वासरावांस** दिल्लीचे गादीवर बसवून **सुजाउद्दवला** हा वजीर करावा असें ठराविलें.

यमुना नदीस पूर्वींच उतार नव्हता ह्मणून **सदाशिवरावांनीं** आपल्या फौजेचा तळ दिल्ली जवळ दिला. तेव्हां त्यांजबरोबरचे असंख्यलोकांनीं दिल्ली शेजारील सर्व गांवशींव जाळून टाकिलें. खाण्याचे सर्व जिन्नस महाग झाल्यामुळें **भाऊ साहेबांस** प्रथमतः पैक्याचें मोठें संकट प्राप्त झालें. तरी दुसऱ्या गोष्टींपेक्षां पैक्याविषयीं ते फार सावध होते, त्यांणीं दक्षिणेंतून येतांना बरोबर दोनको टिरुपये आणिले होते. व **होळकर, शींदे, गोविंदपंत बुं-**

देले आणि रजपूत लोक मिळून या सर्वांनीं तीन कोटि मिळविले; तथापि पैका पुरणार नाहीं असें भाऊसाहेबांस वाटून त्यांणीं बादशाही कचेरींतील सोन्यारुप्याचे डागिने घेऊन सिंव्हासन फोडिलें. तरी त्यांस तेथें एकंदर सत्रा लक्ष रुपये मात्र उत्पन्न झाले.

होळकर व सुरजमल्ल यांस ही गोष्ट अयोग्य व दिसण्यांत हि वाईट असें वाटल्यावरून त्यांनीं सदाशिवराव यांस अशी गोष्ट न करावी ह्मणून फार समजाऊन सांगीतलें, परंतु त्यांनीं त्याचा धिक्कार केला. तेव्हां सुरजमल्ल आपले सर्व सैन्यासुद्धां त्रासानें ती फौज सोडून गेला, व इकडे मुसलमान लोकांचे छावणींत रजपूत लोकांचे कोणी मित्र होते; त्यांणीं सांगीतल्यावरून तेहि मराठ्यांचे सैन्य सोडून गेले.

त्याच वेळेस अहमदशाहा अबदुला याची फौज गंगातिरीं अनूप ह्मणून शहर आहे त्याचे समोर उतरली होती. तेव्हां त्यानें नजीब उद्दवला याजकडून सुजाउद्दवला यास उत्तेजन देवविलें कीं सर्व मुसलमान लोकांनीं हिंदूंशीं लढाई करावी; परंतु सुजाउद्दवला दुसऱ्यां प्रमाणें फारसें शत्रुत्व करून मराठ्यांशीं वागत नव्हता; ह्मणून सदाशिवराव यांनीं त्यांशीं मिळवून घेण्याकरितां; अथवा त्या मंडळींतून त्यास एकीकडे काढण्याकरितां यत्न करून त्याशीं गुप्तपणें कांहीं बोलणें केलें; व त्याजकडूनच अबदुलाशीं मराठे सरकाराविषयींचें बोलणें करविलें; हें मराठ्यां कडून अबदुलाकडे किन्येक महिन्यांपर्यंत चालिलें होतें. गुप्त व प्रसिद्ध जें जें बोलणें होई तें सुजाउद्दवला आपल्या कूटांतील मंडळीस सांगे; व ते सांगतील त्याप्रमामाणें उत्तरें देई.

पावसाळा संपल्या नंतर सदाशिवराव यांनीं शाहा आल-

म हा तेवेळेस तेथें नव्हता ह्मणून त्याचा पुत्र मिरजा जवानभक्त यास दिल्लीतील राज्यावर बसवून सुजाउद्दवला हा बादशाहीवजीर केला; नंतर नारोशंकर यांजबरोबर कांहीं फौज देऊन त्यांस किल्यांत पाहऱ्यावर ठेविलें, आणि अपण जातीनें कुंजपूर ह्मणून तटबंदीचें एक फार बळकट व बचावाचें शहर होतें; व ज्यांत फौजाहि पुष्कळ होती, त्याजवर हल्ला करून त्या शहराचा तट पाडिला. अहंमदशाहा किल्ल्याचे फौजेस कुमक पाठविण्याकरितां फार उत्सुक होता; परंतु यमुना नदीस ठाव नव्हता; तथापि त्यानें आपली फौज नदीचे कांठावर नेऊन ठेविली, आणि भाऊ साहेबांशीं बोलणें लावून काळ हरण केलें; आणि कांहीं वेळ उताराचा शोध केल्यानंतर त्यास दिल्लीपासून दाहा कोसांवर पाय उतार सांपडला. तेव्हां तेथून नदी उतरून पार गेला. सदाशिवराव भाऊ यांस ते वर्तमान पक्के समजण्याचे पूर्वी अहंमदशाहाची फौज बहूत करून पश्चिमेकडचे किनाऱ्यावर येऊन पोंचली आणि आकटोबरचे पंचविसावे तारिखेस सर्व मुसलमान लोकांची फौज पलीकडे गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दोन्ही फौजांतील तलावे पुढें आले होते, त्यांची जबरदस्त लढाई झाली; आणि आह्मांस जय मिळाला असें दोन्ही पक्ष बोलूं लागले. नाना फडनवीस या लढाईत होतेच परंतु ईश्वर सत्तेने वांचले. रणांगणामध्यें लढाई चालिली असतां बायका मनुष्यें उतरलीं होतीं तेथें गोळे येऊन पडत; तेणेंकरून त्यांस फार भय वाटे, परंतु नाना आपल्या आईस धीर देऊन बोलला, कीं सर्वांचे संरक्षण करणारा जो ईश्वर त्याजवर भरंवसा ठेवून स्वस्थ राहावें.

मराठ्यांचे फौजेनें दुसऱ्या दिवशीं हल्ला करण्याचा निश्चय

केला, तरी होळकर तिकडे लुटण्याच्या व शत्रूच्या फौजेंत अन्नाची बेगमी नजाऊं देण्याच्या बेतांत होताच. इब्राहीमखानानें फार रागें भरून त्याचे कान उघडून त्यास सांगीतलें, कीं येणेंकरून माझा आणि माझ्या फौजेचा नाश होऊन मी तुह्मांस सोडून जाईन; व लुटावयास आणि शत्रूचे फौजेंत अन्नाची बेगमी जाण्याची बंदी करण्यास जे स्वार जातील त्यांजवर मी गोळा टाकीन.

हे अपसांतील कज्जे मोठ्या संकटाने बंद झाले, आणि हे कज्जे चालले असतां मराठ्यांची फौज लढाई करून पानपताकडे फिरली. तेव्हां सदाशिवरावांनी इब्राहीमखानाचे मसलतीनें गोटा भोंवताला खंदक केला. पन्नासहात रुंद व बाराहात खोल खंदक करून फौजेंभोंवता व पानपत गांवांभोंवताला तट बांधिला, व त्याजवर तोफा चढविल्या. अहंमदशाहानेंहि आपल्या कूटांतील मंडळीसुद्धां तळ देऊन आपल्या फौजेचा बचाव करण्या करितां तोडलेलीं झाडें आपल्या फौजेभोंवतालीं टाकिलीं.

मुसलमान लोकांचे फौजेंत एकेचाळीस हजार आटशें स्वार, अठतीस हजार पायदळ, व सत्तर तोफा होत्या. इतकी फौज निवडक होती; याखेरीज असंख्य मोंगलाई स्वार होते, ते बहुधा निवडक पायदळ व स्वार इतके होते.

मराठ्यांच्या फौजेची गणना सुमारें पंचावन्न हजार स्वार, पंधरा हजार पायदळ, दोनशें तोफा; व याखेरीज पेंढारी व बरोबरचें बुणगें यांसुद्धां दोन लक्षांपेक्षां जास्ती होती.

फौजेचा तळ पडल्यानंतर थोड्या वेळाने सदाशिवरावांनीं गोविंदपंत बुंदेले यांस शत्रूच्या फौजेंत अन्नाची बेगमी जाऊंदेण्यास अडथळा करावयाकरितां पाठविलें; तेव्हां कांहीं वेळपर्यंत

त्यांस या गोष्टींत सिद्धी झाली; परंतु **आटाईखान** यास शत्रूने **गोविंदपंतांवर** पाठविलें, तों त्याने एकाएकीं **गोविंदपंतावर** येऊन त्यास आंबराईंत गांठिलें; तेव्हां **गोविंदपंतां** बरोबर एक हजार मनुष्यें होतीं, आणि बाकीची फौज लुटण्याकरितां गेली होती; यामुळें त्याने **गोविंदपंतांवर** घाला घालून त्यास ठार मारिलें; आणि त्याचें शीर कापून **अबदुली** ह्मणून राजा होता; त्यास ग्रहण करण्याजोगी अशी या शिराची नजर केली.

**गोविंदपंत** मारले गेल्याचे पूर्वीं दोहों फौजेचा बहूतकरून तह झाला असतां, व दोन्ही फौजांतील कामगाराहि एकमेकांस तह करण्याकरितां भेटले होते; परंतु **सदाशिवराव** बोलिले कीं, **गोविंदपंत** आपल्या जातीच्या फौजेकरितां अन्नाच्या बेगमीच्या शोधास मात्र गेले आहेत. असें बोलिल्यावरुन दोन्ही फौजा एकमेकांस दगेखोर ह्मणू लागल्या, आणि तद्दाविषयींचें बोलणें कांहीं दिवसपर्यंत राहिलें. **गोविंदपंत** मारले गेले ही मोठी जोखम झाली. इतक्यांत दुसरें अरिष्ट घडलें, तें हेंच कीं, कांहीं स्वांर खजीन्यावर होते त्यांतून प्रत्येक स्वार रुपयांचा एकएक तोडा घेऊन दिल्लीकडून परत येत होते, तों रात्रीचे समयामुळें वाट चुकून आपली फौज ह्मणून आफ्गाणी लोकांचे फौजेंत गेले; तों त्यांनीं सर्व खजीना लुटून घेऊन त्यांस ठार मारिले. अशी गोष्ट झाली असतां जे रजपूत लोक यांजकडून पळून गेले होते; त्यांनीं मराठ्यांस द्रव्याचें साहाय्य दिल्हें, व **सुरजमल्ल** याने पुष्कळ पैका पाठविला, तोंहि त्यांस सुरक्षित येऊन पोंहचला; तरी लौकरच त्यांस दुसरें महत दुःख प्राप्त झालें, आणि **इब्राहीमखानाच्या** पलटणी तुंबलेल्या पगाराकरितां दंगा करूं लागल्या. **होळकरांनीं** ठरविलें, कीं गारदी ह्मणजे तयार झालेली फौज आहे, ही तळ्वर

ठेवून स्वारांसुद्धां शत्रूवर घाला घालावा. या होळकाराच्या मसलतीस अनुमोदन देऊन भाऊसाहेबांनीं मोठेपणा दाखविला. हा घाला नवेंबरच्या पंचविसाव्या तारिखेस अबदुलीच्या छावणीच्या डावे बाजूवर घातला. तेथें शाहावलीखान ह्मणून अहंमदशाहाचा वजीर यास ठेविलें होतें. मराठ्यांची फौज सुमारें पंधरा हजार होती; तिनें शत्रूच्या फौजेंत शिरून जेजे तीस भेटले त्याजवर चढून घाला घातला. आफ्गाणी लोक लढाईस उभे राहिले; तथापि त्यांची दाणादाण झाली; व त्यांतील दोन हजार मनुष्यांपेक्षां जास्ती मारलीं गेलीं. सरतेशेवटीं छावणींतील चहूंकडील लोकांनीं वजिरास मदत देऊन त्याचा बचाव केला. मराठ्यांची फौज एक हजार मेल्यावर ते परत आले. त्या वेळेस होळकर पुढारी होता; व बारमाही लढाई होत असे, त्यांत मराठ्यांच्या फौजेंतील प्रत्येक स्वाराने एकएक शत्रूची खबर घेतली; तथापि दिसेंबरच्या तेविसावे तारखेपर्यंत मोठी लढाई झाली नव्हती. तेव्हां त्यादिवशीं सदाशीवरावभाऊ, विश्वासराव, होळकर, बळवंतराव गणपत मेहेंदळे, यांखेरीज दुसरे पुढारी शाहावलीखान याजवर घाला घालावयास आले. नंतर तो कांहीं स्वार बरोबर घेऊन शेजारील एका मशीदींत जात होता, इतक्यांत मराठ्यांच्या मंडळीने त्याच्याभोंवताला वेढा घातला. तेव्हां नजीब उद्दवला व दुसरे कामगार मिळून त्याचा बचाव करण्याकरितां आले, आणि अघोर लढाईस प्रारंभ झाला. नजीब उद्दवला हा सर्वांपुढें होऊन खंदकाकडे सरसावून गेला, तेव्हां बळवंतराव ह्मणून सदाशीवरावांचे दिवाणगिरीचें काम चालीवणारे, हे मोठे धैर्यवान व अनुभवी होते, त्यांनीं प्रसंग पाहून मोठ्या रागाने त्याजवर चालून जाऊन घाला घातला. त्या हल्ल्यांत तीन हजार

रजपूत ठार मारिलेगेले. नजीब उद्दवला कांहीं वेळपर्यंत आपणास कैद करून नेतील अशा महा संकटांत पडला होता; परंतु बळवंतराव जय आला त्याचक्षणीं दिवस मावळल्यानंतर गोळी लागून पडले; तेव्हां भाऊ साहेब, बळवंतराव मेले असें पाहून फार दुःख करून दुसरा कांहीं विचार न करितां, बळवंतरावांचे प्रेतासहित आपल्या खंदकाचे मोर्च्याकडे परत जावें, असा बेत करूं लागले. तेव्हां बळवंतरावांची स्त्री फौजेबरोबर होती, ती आपल्या भ्रताराच्या प्रेताबरोबर सती गेली. बहूतकरून रोज लढाया चालल्या होत्या, आणि रजपूत व सुजाउद्दवला यांनीं मोठी लढाई करण्याकरितां परिश्रम केले; परंतु अहंमदशाहानें नकारलें, व हें नकारण्यांत त्याणें असें दर्शविलें, कीं मी फौजेवरील मुख्य अधिकारी सर्वांचीं मनें जाणनारा, व लढाई करण्याच्या कलाकौशल्यामध्यें पूर्ण आहे.

मराठ्यांच्या सैन्यापेक्षां त्याच्या जातीच्या सैन्यांत संकट व दुःख फार कमी असून फार उतावळी झालीशी दिसली; तेव्हां मराठ्यांच्या फौजेंत सर्व गोष्टींचें फारच संकट व दुःख आहे; सरतेशेवटींची लढाई करण्याविषयीं फार उतावळी असेल, याचा विचार केल्यावरून, त्यांस त्यांचे शत्रू किती संकटांत असतील हें कळून आलें, व त्यांस वाटलें, कीं लढाई फार दिवस लांबविल्याने शत्रू आपले भक्ष्य होतील, यांत संशय नाहीं. मराठ्यांची फौज अन्नपाण्यावांचून मरत होती, व जवळ जितकें अन्न असेल, तितकें एकदम खर्चून टाकण्याची त्यांस फार दिवसांपासून संवय असे, ह्मणून अन्नपाण्यावांचून मरणें हें सहन करण्यास ते असमर्थ झाले; व त्यांस कांहीं उद्योग नव्हता यामुळें ते कोणत्या स्थितीस मिळाले, याविषयीं विचार करण्यास त्यांस पुष्कळ वेळ सांपडली. सु-

दाशिवराव यांनीं विचार केला, कीं आतां सरतेशेवटीची लढाई करणें प्राप्तच आहे, आणि ते अद्यापपर्यंत सल्लयाविषयीं बोलणें करीत होते, तरी त्यांचेच मताने त्यांस सांगीतलें कीं हें व्यर्थ होय. त्यांचे बरोबरचे पुष्कळ लोक जे भुकेनें वेडे निःकाळजी व जिवावर उदार झाले होते, ते आपण अथवा आपलीं कुटुंबे भुकेने मरत होतीं त्यांकरिता खंदकापासून रात्रींतून अन्न आणावयास निघाले, तों त्यांचे भोंवताला आफ्गाणी लोकांच्या फौजेनें वेढा घालून त्यांस ठार मारिलें. मराठ्यांच्या फौजेने मुख्य कामगारांस सांगीतलें, कीं आह्मांस लढाईस न्यावें, अशा संकटामध्यें राहून जाग्यावर मरण्यापेक्षां तरवार लागून पडणें हें फार चांगलें. मग मुख्य कामगारांनीं तें भाऊसाहेबांस विदित केलें, तेव्हां त्यांनीं त्यांचा लढाई करण्याविषयींचा निश्चय पसंत करून कांहीं न भितां नेहमीप्रमाणें कचेरी उठण्याचे वेळेस पानसुपारी वाटिली. लढाईची तयारी करण्याकरितां हुकूम देऊन कोठीमध्यें धान्य होतें तें त्या रात्रींस सर्वांनी पोटभर खावें, ह्मणून सर्व फौजेस वांटून दिल्हें. आणि जानेवारीच्या सातव्या तारिखेस सूर्योदयापूर्वीं दोनघटिका मराठ्यांची फौज खंदकाच्या मोर्च्योतून बाहेर निघू लागली. मोठाल्या तोफा गाड्यांवर, लहान लहान तोफा उंटांवर घालून बाणांसुद्धां इब्राहीमखान गारदी याचा पाहरा बरोबर देऊन प्रथम पुढें पाठविल्या; त्यांचे मागून दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, सदाशीवरावभाऊ, विश्वासराव, यशवंतराव पवार, समशेर बाहादूर, मल्हारराव होळकर, व जनकोजी शिंदे इतक्यांचे स्वार निघाले.

याप्रमाणें एकामागे एक दृढ निश्चय नकरितां निराशेने हळ हळू अबदुलीचे फौजेवर चालले. त्यांनीं पागोट्यांचे पदर सो-

डिलें होते, हातांस व तोंडांस हळद लाविली होती; याप्रमाणें जय मिळविण्याची आशा नकरितां बळिदानास तयारी करितात तशी केली.

सदाशिव रावांनी आपलें कुटुंब व मोठाल्या सरदारांचीं कुटुंबें नानाफडनविसांचे कुटुंबासुद्धां होळकराचेच स्वाधीन केलीं; असें करण्याचें कारण हेंच कीं मल्हाररांव होळकरावर नजीब उद्दवला याची कृपा होती, व अहंमदशाहाहि नजीब उद्दवला याचे विचाराने चालत असे; ह्मणून जर मराठ्यांचा कदाचित मोड झाला तर मल्हाररावावर नजीब उद्दवला याचा लोभ आहे, तेणेंकरून तरि त्या बायकांचें संरक्षण होईल.

सदाशिवराव यांनी सुजा उद्दवलाच कारकून जे सल्या विषयीं बोलणें चालणें करीत होते, त्यांतून एकास लढाईस निघण्याचे पूर्वीं थोडी वेळ चिट्टी पाठविली होती; तींत असें लिहिलें होतें, कीं पेला सांडे तोंपर्यंत भरलेला आहे, त्यांत जास्ती एक थेंब राहाणार नाहीं, आणि एकादी गोष्ट करणें जाल्यास लवकर करण्यांत यावी. चिट्टी येऊन पोहंचली तेव्हां सुजा उद्दवला याच्या जासुदांनीं वर्तमान आणिलें, कीं मराठ्यांची फौज लढाईकरितां तयार होऊन येत आहे. असें समजल्यावरून तो थेट राजाकडे गेला, तों राजा आपल्या तंबूंत निजला होता, व घोड्यावर जीन बांधून घोडा दाराशी तयार होता. राजा जागा झाल्यावर त्याने त्यास विचारिलें, कीं काय वर्तमान आहे; तेव्हां सुजा उद्दवला याने हें जलदीचें वर्तमान सांगितल्यावरून राजा घोड्यावर बसून आपल्या फौजे पुढें अर्धकोस चालिला; तेव्हां प्रथम त्यास हें वर्तमान खरें किंवा खोटें याविषयीं संशय आ-

ला होता. इतक्यांत मराठ्यांची फौज ज्या रीतीने तळावरून निघाली होती, त्याच प्रमाणें पुढें आली. **इब्राहीमखान** डाव्या बाजूस व **जनकोजी शिंदे** उजव्या बाजूस होते, व तोफखाना फोजे पुढें होता; आणि एकदम सर्व तोफांचा आवाज झाल्यामुळें, ते लढाई करितां तयार आहेत असें दिसून आलें. हें ऐकून राजा घोड्यावर बसून इरान देशांतील हुक्का पीत होता, तो त्याने आपल्या हुजऱ्या जवळ दिल्हा, आणि मोठ्या शांततेने **सुजा उद्दवला** यास बोलिला, कीं तुझ्या चाकरांनीं जें वर्तमान आणिलें तें खरेंच आहे, असें मला वाटतें. नंतर त्याने आपली फौज तयार करून पुढें तोफखाना चालविला, त्याचा मुख्य वजीर **शाहावलीखान** यास आफगाणी लोकांसहित मध्यभागीं नेमिलें. त्यांतून **अहंमदखान बेग शाहाफीरोज रहीमत**, आणि **दुर्दीखान रजपूत, अमीर बेग**, आणि **बारका हैदरखान** मिळून सर्व उजव्या कडल्या बाजूस झाले; आणि वजीराच्या डाव्या बाजूस **सुजा उद्दवला**, ऊद देशाचा नवाब आणि **नजीब उद्दवला** रजपूत इतके नेमिले. **शाहा पसंतखान** यास निवडक आफगानी लोकांचे टोळी सुद्धां डाव्या बाजूच्या शेवटास नेमिलें. या प्रमाणें दोन्हीं कडून गोळ्यांवर गोळे चालिले, आणि फौजा एकमेकां समोर आल्या. **इब्राहीमखान गारदी दमाजी गायकवाडास** हाताखालीं घेऊन मुसलमान लोकांचे फौजेच्या उजव्या बाजूस रजपूत होते, त्यांजवर धैर्याने चढून गेला; आणि **अमीर बेग** आणि **बारका हैदरखान** यांचे घाल्यापासून आपला बचाव करण्या करितां दोन्ही पलटणी उजव्या बाजूकडून मागें फिरविल्या. मराठ्यांच्या फौजेच्या उजव्या बाजूस **जनकोजी शिंदे**, व त्यांच्या समोर **शाहा पसंतखान**, आणि न-

जीब उद्दवला हे होते. नजीब उद्दवला याने एकामागें एक असे तट आपल्या पायदळाचें संरक्षण होण्याकरितां आपल्या पुढें घातले, हे तट घालताना त्यांस यत्न फार पडला. बहूतकरून मराठ्यांची फौज जिवावर उदार होऊन चढाव करून आल्यास एकएका तटानें आपल्या फौजेचें संरक्षण व्हावें या उद्देशाने हे तट घातले असतील.

**सदाशिवराव भाऊ** व त्यांचे पुतण्ये, **विश्वासराव** व **यशवंतराव पवार** हे मुख्य वजीराचे समोर उभे होते, व भगवा झेंडा अथवा सर्व प्रजेचा झेंडा पुढें होता; आणि जरीपटक्याचीं निशाणें संग्रामामध्यें तीन होतीं. मुसलमान लोकांचे फौजेचे पाठीमागें कांहीं अंतरावर **अदंमशाहा** होता, इतक्यांत दोन्ही फौजांतील योद्धे आपापले तोफखाने मागें टांकून पुढें सरसावले. तेव्हां मराठ्यांची फौज हरहर महादेव ह्मणून ओरडूं लागली, तें स्पष्ट ऐकूं येऊं लागलें; नंतर थोड्या वेळाने दोहीं कडील फौजेची लढाई होऊं लागली; आणि मुसलमानी फौजेच्या मध्यभागावर मोठ्या वेगाने मराठ्यांची फौज चालून आली. तेव्हां तेथें मुख्य वजीराची फौज होती, तींत दाहा हजार स्वार होते, ते शत्रू चढाव करून येतांच आपणहि चढाव करून जावें, ते नकारितां मौज पाहात उभे राहिले, यामुळें त्यांजवर फार दोष आला. मराठ्यांची फौज, शत्रू स्वस्थ उभे राहिले यामुळें त्यांजवर धांवून गेली. आणि त्यांचे फौजेची रांग उभी राहिली होती, ती मोडून आंत शिरली, परंतु दोन्ही फौजांतील कित्येक स्वार त्या गर्दींत धक्याने खालीं पडले. धुरळा पुष्कळ उडून इतका गोंधळ झाला, कीं योद्धे जे हातघाईस येऊन एकमेकांचा प्राण घेऊं लागले, त्यांस आपपर कांहीं दिसेनासें झालें. तेव्हां मराठे आणि मुसलमान एव-

ड्यानेंच ओळखूं येत असत, कीं मुसलमान जे होते, ते अल्ला अल्ला दीन दीन ह्मणत, व मराठे जे होते ते हरहर महादेव ह्मणत, तेणेंकरून मोठा गलबला झाला. **शाहावलीखान** चिलखतासुद्धां कंबरबंद होता त्याने घोड्यावरून उडी टाकिली, व त्याच्या माणसांत जे मोठे धैर्यवान् होते, त्यांनींहि तसेंच केलें; परंतु बहूतकरून आफ्गाण लोक मार्गे हटले. तेव्हां वजीर त्यांस बोलिला, माझे मित्रहो आपला देश तर दूर राहिला, आणि तुह्मी कोणीकडे पळता? परंतु कांहीं वेळपर्यंत त्याचे फौजेंतील रांग मोडलेले मनुष्यांनींच त्याचा बचाव केला. **इब्राहीमखान गारदी** याची निमे फौज मेली, व त्यास जखम झाली, तथापि त्याने जय मिळविला. सुमारें आठ हजार रजपूत मेले, व कांहीं जखमी झाले, तथापि मुसलमान लोकांच्या डावे बाजूकडील फौजेचा मोड झाला नव्हता.

याप्रमाणें लढाई दोनप्रहर झाली. तिचें वर्तमान **अहंमदशाहास** येऊन पोहंचलें, तेव्हां त्याने मी सैन्यावरील मुख्य मोठा धैर्यवान् आहे, असें दर्शवून अवसान न सोडतां आपल्या हुजराती पैकीं निवडक शिपाई, आपापली चाकरी सोडून जे शिपाई पळून आले होते, त्यांस पुनः फौजेंत हांकून आणण्याकरितां आपल्या छावणींत पाठविले, आणि याप्रमाणें हुकूम केला, तो मोठ्या जलदीने सिद्धीस गेला. उजव्या हाताकडील फौजेस मदत देण्याकरीतां जलदीने दुसरी फौज पाठविली, आणि मुख्य वजीर यास दाहा हजार मनुष्यांसुद्धां सत्वर जाऊन मराठ्यांचे फौजेच्या मध्य भागावर वारंवार घाला घालावा असा हुकुम दिल्हा. इकडे **शाहापसंतखान** आणि **नजीबउद्दवला** या दोघांनी एकदम

मराठ्यांचे फौजेवर हल्ला करून वजीरास मदत दिल्ही. याप्रमाणें शत्रूंची फौज चढाव करून घाला घालावयास येई, आणि मराठ्यांची फौज त्यांचा मोड करून त्यांस मागें हटवी; परंतु ही लांबणीवर पडलेली लढाई, आफ्गाणी लोक शरीराने फार बळकट, व लढाई हात घाईने करूं लागले, आणि दक्षिणेंतील हिंदू शरीराने निर्बळ त्यांची व आफ्गाणी लोकांची साम्यता होईना. मराठ्यांची फौज त्या दिवशीं मोठ्या धैर्यानें झुंजली, आणि मल्हारराव होळकराखेरीज दुसरा कोणी सरदार हयगयीने लढाई केल्याविषयीं गुन्ह्यांत आला नाहीं. त्याचे देशचे लोकांची त्याचे धैर्याविषयीं खात्री होती, परंतु आपला राजा बचावण्याकरितां होळकराने पराकाष्ठा केली नाहीं, यामुळें त्यास कितिएक दगेखोर असें ह्मणाले. अडीच प्रहर दिवस आल्यानंतर थोडे वेळाने विश्वासराव यांस मोठी जखम झाली, हें पाहून सदाशिवरावानी होळकरास निरोप पाठविला, कीं मी केलें त्याप्रमाणें तुह्मी करावें. असें सांगून लढाईविषयीं अथवा दुसऱ्या गोष्टीविषयीं कांहीं मनांत न आणितां आपले आवडत्या पुतण्याची भेट सरते शेवटची घ्यावी, या हेतूने हत्तीवरून खालीं उतरून त्यांचा आरबी चांगला घोडा होता त्याजवर बसून निघाले, आणि पळापळीचे गर्दीत अदृश्य झाले. तेव्हांपासून जे नाहींसे झाले ते पुनःदृष्टीस पडले नाहींत; व त्यांचा ठावठिकाणहि लागला नाहीं. पळापळीचे वेळेस त्यांनी होळकरास निरोप पाठविला, असें होळकर ह्मणतात, तो पाठविला असल्यास त्यांस तो फार घातक झाला असावा. होळकर पळून गेला त्याचे पाठीमागें दमाजी गायकवाडहि गेला. आणि एके क्षणांत मराठ्यांचे फौजेंतून कोणी लढाई करीनासे झाले. चहूंकडे फौज उधळली. पळापळ

व दंगा झाला, व हजारो घायाळ होऊन पडले, आणि हजारों त्यांचे भोंवताला खंदक खाणिला होता, त्यांत पडून गुदमरून मेले; पुरूष व बायका व मुलें पानपत गांवामध्यें भरून गेलीं, तेव्हां रात्रभर त्यांचे भोंवताला गराडा होता; आणि असें दिसून आलें कीं मोठे रानटी लोकांसहि कांहींतरी दया आली असती, परंतु आफ्गाण लोकांस लेश मात्र आली नाहीं. तेणेंकरून त्यांची व सर्व मनुष्यांची जी अपकीर्ति झाली ती सदोदित राहील.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्यांनी मराठ्यांचे फौजेंतील बलाढ्य पुरूष पानपत गांवांतून काढून आपल्या छावणींत वांटून घेतले. बायका व मुलें आपल्या दास्याकरितां ठेविलीं; व पुरुषांस एका रांगेने उभेकरून गमती करितां त्यांची डोकीं उडविलीं; नंतर तीं शिरें जयाचे निशाणीप्रमाणें तंबूसमोर एकावर एक रचून ठेविलीं. **विश्वासरावांचें** प्रेत सांपडलें, तें **अहंमदशाहानें** पाहण्याकरितां आणावयास पाठविलें; तेव्हां तेथें आफ्गाणी लोक कावळ्यांप्रमाणें जमले आणि ओरडूं लागले, कीं नास्तिक लोकांच्या राजाचें हें शरीर आहे. हें आह्मी वाळवूं आणि त्यामध्यें पेंढा वगैरे कांहीं तरी भरून परत जाते वेळेस तें काबुलास नेऊं.

**सुजा उद्दवला** आणि रजपूत यांनी **अहंमदखान** यास हें प्रेत जाळण्याकरितां हिंदू लोकांस द्यावें ह्मणून विनंती केली. **सुजा उद्दवला** याने **जनकोजी शिंदे** आणि **इभ्राहीमखान गारदी** हे दोघेजण पाडाव झालेले असमी लोकांत होते, त्यांस वांचविण्याकरितां यत्न केला; परंतु **नजीब उद्दवला** यास **शिंदे** या नावाचा फार द्वेष होता, त्यावरून त्यास ठार मारण्याविषयींचें त्याचे मनांत आलें; आणि **इभ्राहीमखान** मुसलमान असून हिंदू लोकांकडे होऊन सत्यवादी जे मुसलमान लोक यां-

शीं युद्धास प्रवर्तक झाला; या गुन्ह्यावरून त्याचा प्राणनाश करा-वा असें ठरविलें, आणि शेवटीं त्या दोघांस ठार मारिलें. मस्तक-खेरीज असें एक धड रणभूमी पासून कांहीं अंतरावर सांपडलें, हें स-दाशिवराव भाऊचें असें वाटलें; व भाऊ लढाईत मारले गेले याविषयीं कांहीं शंका नव्हती, तथापि ते कोठे होते, व त्यांची द-शा काय झाली, हें कोणास खचीत ठाऊक नव्हतें. यशवंत-राव पवार संग्रामामध्यें पडले, परंतु समशेर बाहादूर हा ज-खम लागून लढाईतून पळून गेला, व कुणबी लोकांनी कित्येकां-स ठार मारिलें, त्यांत हाहि ठार मेला. विठ्ठल शिवदेव, व द-माजी गायकवाड व नारोशंकर हे दिल्लींतील पाहुण्यां पैकीं कांहीं शिपाई बरोबर घेऊन आपल्या देशांत आले. योध्यांपैकीं चथुर्थांश वांचले, व याखेरीज बुणग्यांतील लोकहि चथुर्थांश वा-चले. यावरून मराठ्यांची फौज दोन लाख या स्वारीमध्यें प्रय-त झाली असें दिसतें; सुरजमल्लानें हे पळून गेलेले जितके लो-क त्याचे देशांत आले, त्यांचा फारच आदर सत्कार केला. म-राठे लोक अद्यापपर्यंत, त्याने मोठा सन्मान करून त्यांचा समा-चार त्यासमयीं घेतला, ह्मणून त्याच्या नावाची व त्याने केलेल्या उपकारांची आठवण करितात.

सदाशिवराव मोर्च्यामध्यें कोंडले होते, तेसमयीं त्यांच्या अव-स्थेचें वर्तमान क्षणोक्षणीं पेशव्यांस येऊन पोहंचे. नवेंबर महिन्यां-त पेशवे अहंमद नगराकडे येऊन नंतर गोदावरीतिरीं गेले. डि-सेंबरांत या वर्तमानाची जास्तीच भयंकर आवाई उठली. जानो-जी भोंसले दाहा हजार मनुष्यां सुद्धां त्यांजकडे जाऊन मि-ळाले, आणि ही सर्व फौज हिंदुस्थानांत चालिली. जानेवारीच्या पधराव्या तारिखेच्या सुमारें नर्मदा नदी उतरतात, तों एके सावका-

राचे गड्यास नऊ दिवसांमध्यें पानपताहून औरंगाबादेस जावयाचें होतें, त्याची व पेशव्यांचे फौजेची गांठ पडली. त्याने सांगीतलें, कीं मराठ्यांचा पराभव झाला. मग त्यास कोणी पेशव्यांपुढें आणिलें, तेव्हां त्याजवळ पत्र होतें तें उघडून वाचून पाहिलें तों त्यांतील मजकूर हा होता, कीं दोन मुक्ताफळें वितळून गेलीं, सत्तावीस मोहरा हारवल्या, आणि रुप्याचें व तांब्याचें नाणें किती गेलें याचीतर गणनाच नाहीं. या मजकुरावरून सदाशिवराव, विश्वासराव, कामगार, आणि फौज यांचा अर्थातच नाश झाला; असें समजून आलें.

फौजेंतून कांहीं मनुष्यें आलीं त्यांनींहि हें वर्तमान सांगीतलें, त्यावरून ऐकिलेलें वर्तमान खरें झालें. व या वर्तमानाविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं. प्रथम पळून गेलेल्या मनुष्यांत बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडनवीस हे होते, व त्यांविषयीं ज्या ज्या गोष्टी घडण्यांत आल्या त्या पुढें लिहिण्यांत येतील. नानांचे आईस आफ्गाणी लोकांनी नेलें, परंतु त्याची बायको व कैलासवाशी सदाशिवराव भाऊची बायको पार्वतीबाई या दोघी बचावल्या. दुःख व निराशा सर्व माहाराष्ट्र देशांत पसरली. बहूतकरून शिपाई लोकांचीं कुटुंबें, त्यांचे सोयरे धायरे, मेले असतील, अथवा चुकले असतील याविषयीं दुःख करीत होतीं, आणि या दुःखाच्या सपाट्यांतून पेशव्यांस पुनः अरोग्य झालें नाहीं. पेशवे तेथून हळूहळू पुण्यांत परत यावयास निघाले, परंतु त्यांचे बुद्धीस भ्रंश होऊं लागला, व त्यांची शरीरप्रकृती एकाएकीं क्षीण होत चालिली, आणि जून महिन्याचे शेवटीं पुणें शहराचे दक्षिण दिशेस टेंकडीवर त्यांनीं एक पर्वती ह्मणून विस्तीर्ण देवालय बांधिलें आहे, तेथें ते मृत्यु पावले.

आतां या पुढें नाना फडनवीसांस ज्या ज्या गोष्टी प्राप्त झाल्या त्यांविषयींचा आह्मी वृत्तांत लिहितों.

लढाईस प्रारंभ होतांच नानांस कोणी उपदेश केला, कीं तुह्मी पळून जाऊन आपलें संरक्षण करावें. तथापि अशा अणीबाणीचे प्रसंगीं आपल्या मित्रांस सोडणें ही अयोग्य गोष्ट आहे, असें त्यांस वाटलें; परंतु संध्याकाळीं दोन अडीच घटिका दिवसास सुमारें भाऊ साहेब नाहींसे झाले, हें पाहून नाना संग्रामांतून आपला घोडा फिरवून पानपत गांवाकडे घेऊन पोहंचले, तों तेथें पूर्वींच हजारों लोक पळून आलेले होते. जर त्यांस वाटेची माहिती असती, तर नाना तेव्हांच तेथून पुढें गेले असते, परंतु माहिती नव्हती. पुढें दैवयोगाने त्यांस एक ब्राह्मण रामाजीपंत या नामेंकरून भेटला, त्याने त्यांस घोडयावरून उतरून दुसरा वेष धारण करावा एवढ्या गोष्टीनें मात्र आपला बचाव होईल, असें सांगीतल्यावरून, त्यांनी आपल्या आंगावरील चिलखत इत्यादि सर्व लढाईचा पोषाख टाकून देऊन आंगावर लंगोटीशिवाय एक चिंधीही ठेविली नाहीं. झांझड पडतांच त्या ब्राह्मणाने बरोबर कांहीं लोक घेऊन नानांस पश्चिमेकडे नेलें. ते पानपताहून एक कोस गेले नाहींत, इतक्यांत थोडीशी शत्रुंची मंडळी भेटली, त्यालोकांनीं त्यांस उभें करून झाडा घेतला. या झोंबाझोंबींत शत्रूंनी नानांबरोबरच्या कित्येक मंडळीस ठार मारिलें, तथापि नाना फडनवीस व त्यांचा मित्र हे दोघे कांहीं उपद्रव नहोतां ईश्वर कृपेने बचावले. पुढें बारा कोस गेले तों त्यांस पुनः शत्रूची मंडळी भेटली, त्यांनी नानांबरोबरच्या सर्व मंडळीस ठार मारिलें. नाना एकटेच राहिले. तेव्हां, ते उंच गवत वाढलें होतें, त्यांत शिरले, आणि कांहीं हालचाल नकरितां थोडा वेळपर्यंत तेथें राहून शत्रूचा मागमूस नाहीं असें पाहून पुढें चा-

लते झाले; आणि त्यांस लहानपणापासून पायीं चालण्याचा अभ्यास अगदीं नव्हता, तथापि त्या प्रसंगीं त्यांस इतकें संकट पडलें, कीं अन्न पाणी न घेतां व दम न खातां सोळा कोस भूमी चालून जाणें प्राप्त झालें. दुसरे दिवशीं दोन प्रहरांचे सुमारें नाना भुकेने फारच व्याकुळ झाले, असे कीं ते झाडाचा पाला खाऊन आपली क्षुधा शांत करूं लागले. शेवटीं क्षुधाक्रांत तृषाक्रांत व शक्तिहीन असे एका गांवांस आले. तेथें एका गोसाव्याने त्यांचें फार आदर अतिथ्य करून त्यांस अन्न मिळवून दिल्हें, आणि त्यारात्रीं तेथें निद्रा करून दुसऱ्या दिवशीं प्रातः कालीं अरुणोदयीं पुढें चालते झाले. ते काहींसा दूर दुसरा गांव होता तेथें आले, तों एका सावकाराने त्यांचें फार आगतस्वागत करून यशवंतराव ह्मणून चाबुकस्वार होता, त्याची ओळख करून दिल्ही. तेव्हां त्याने नानांबरोबर कांहीं माणसें देऊन त्यांस पुण्यास पोहंचवून देण्याचें कबूल केलें. नाना त्या गांवांतच होते, तों शत्रूची फौज शेजारीं आहे, असें ऐकून त्या सावकाराने नानांस जयनगरापर्यंत गाडींतून पाठविण्याचा निश्चय केला; आणि त्याप्रमाणें नानांहि तिकडे जावयास निघाले, परंतु वाटेने त्यांचे मनांत आलें, कीं सावकाराने कदाचित कपट केलें असेल, ह्मणून नाना गाडी टाकून एकटे निघाले. ते रायवेरी या गांवाजवळ येऊन पोहंचत तोंपर्यंत प्रतिदिवशीं मोठमोठ्या मजला पांयानेच करीत असत. त्या गांवांत मोठ्या सन्मानाच्या मेजवान्या एक श्रीमंत गृहस्थ रामजीदास ह्मणून होता, त्याने नानांस केल्या, व सात दिवसपर्यंत नानांस आपल्याजवळ ठेवून घेतलें, शेवटीं नानांनी दीजकडे जाण्याचा हेतू दाखविला, परंतु रामजीदास बरोबर विश्वासू माणसें दिल्हाखेरीज जाऊं देईना. थोडे वेळा-

नंतर कोणी संभावित गृहस्थ. तेथें लग्नाकीरतां जाणार, असें समजल्यावरून रामजीदासाने आपली गाडी बरोबर देऊन त्या गृहस्थाबरोबर नानांस पाठविलें. रस्त्यावर नानांचे ओळखीचा एक मनुष्य भेटला, त्याने सांगीतलें, कीं आपलें कुटुंब जिजनी गांवांत विसोजीराव बऱ्हाणपूरकर यांनी सुरक्षित नेऊन पोहंचविलें, तेथें आपले नातलग नारोपंत गोखले यांचे घरीं तें सुरक्षित आहे. हें वर्तमान ऐकून नाना लागलेच तिकडे गेले, तेव्हां तेथील गृहस्थाने त्यांचा मोठ्या उत्साहाने आदर सत्कार केला; कांकीं त्या मनुष्याची खातरी झाली होती, कीं त्या लढाईत नाना मरण पावले. तेथें कांहीं दिवस राहून पुनः शक्ति आली, असें पाहून आपलें कुटुंब बरोबर घेऊन नाना दीजकडे चालिले. तेथें त्यांचे पुरातन ओळखीचे महादेव पुरुषोत्तम ह्मणून पानपतापासून पळून येऊन वानवळयांच्या कारकुनाचे घरीं राहात होते, त्यांची गांठ पडल्यानंतर त्यांनी बोलाविल्यावरून त्यांचे घरीं नानांनी वस्ती केली; आणि तेथें सुमारें एक महिनाभर राहून पुढें जात असतां त्यांचे आईबरोबरचा मनुष्य त्यांस भेटला. त्याने सांगीतलें, कीं आपली मातोश्री मृत्यु पावली. हें वर्तमान ऐकतांच त्यांचे अंतःकरणास इतका खेद झाला, कीं तेणेंकरून प्रथमतः शपथ पूर्वक त्यांनी संसार त्याग करून काशीयात्रेस जाण्याचा निश्चय केला, परंतु त्यांचे मित्रांनी त्यांस घरीं जाऊन आईचें क्रिया कर्म करावें ह्मणून उपदेश केल्यावरून त्यांनी तें मान्य केलें. बऱ्हाणपूर एथें येऊन पोहंचल्यानंतर नानासाहेब पेशवे फौजेची कुमक घेऊन जात होते; त्यांची व नानाफडनविसांची गांठ पडली. त्यांस वर लिहिल्याप्रमाणें नर्मदातीरीं कळलें होतें, कीं पानपत एथें आपल्या फौजेचा पराभव झाला, त्यावरून त्यांनी

ब्ऱ्हाणपूरपर्यंत येऊन तेथें मुकाम केला होता. **नाना फडनविसां-नी पेशव्यांस** पानपतावर झालेला सर्व मजकूर विदित केला, तरी **पेशव्यांचा नानांवर** फार लोभ होता. तो इतका कीं **नानां** जवळ असल्याखेरीज **पेशव्यांस** चैन पडूं नये. थोडे दिवसानंतर **पेशव्यांनी** पुण्यास जाण्याचा निश्चय केला. **नाना** आपल्या कुटुंबाची प्रकृति बिघडली याजकरितां नर्मदातीरीं जाऊन कांहीं दिवस राहावें, या बुद्धीने **पेशव्यांबरोबर** पुण्यास गेले नाहींत. **पेशव्यांनी** पुण्यास आल्यानंतर **नानांस** कित्येक पत्रें लिहिलीं, कीं मी फार दिवस जगणार नाहीं असें मला वाटतें, याजकरितां तुम्ही पुण्यास यावें. यावरून **नाना** त्यांजकडे पुण्यास जाण्यास निघाले, आणि पऱ्हेरास आले तों **पेशव्यांचे** धाकटे भाऊ **दादासाहेब** यांनी **पेशवे** मेल्याचें वर्तमान **नानांस** कळविलें. आपले यजमान **पेशवे** मृत्यु पावले, हें ऐकून **नाना फडनवीस** फार दुःखेंकरून पुण्यास गेले, आणि थोडे दिवसपर्यंत तेथें घरींच राहत होते. पुढें सप्तेंबर महिन्यांत **दादासाहेब** यांनी ठरविलें, कीं कैलासवाशी **पेशव्यांचे** दुसरे पुत्र **माधवराव** यांस साताऱ्यास **पेशवाईचीं** वस्त्रें घेण्याकरितां न्यावें, ह्मणून त्यांनी **नाना फडनवीसांस माधवरावाबरोबर** साताऱ्यास जाण्याकरितां सांगितलें. प्रथम **नानांनी** हें नाकबूल केलें, कारण त्यांस वाटलें, कीं मी **पेशव्यांचा** चाकर आणि साताऱ्याचे राजाकडे जाण्याचा मला काय संबंध आहे. असें असतांहि शेवटीं त्यांस जाणें प्राप्त झालें आणि **पेशवाईचीं** वस्त्रें **माधवराव** यांस मिळाल्यानंतर त्यांस घेऊन **नाना** पुण्यास आले.

तेव्हांपासून सन् १७६२ पर्यंत **नानांचे** वृत्तांतांत कांहींच चमत्कारिक गोष्ट झाली नाहीं असें दिसण्यांत येतें. यावर्षी मा-

धवराव व त्यांचे चुलते यामध्यें कलह उत्पन्न झाला, कारण कीं माधवरावांचे चुलत्यांनी नव्या राज्यांत सर्व अधिकार आपल्या हातांत ठेविला होता, त्यांतून कांहीं भाग माझा असावा असें माधवराव ह्मणूं लागले. नाना फडनवीस यांस हरीपंत फडक्यासुद्धां माधवरावांचे खासगीचे कारकुनांत ठेविलें, आणि माधवराव यांनी नाना फडनवीस इतके अल्पवयीं असतां त्यांसच या कामाकरितां निवडून काढिलें, ही मोठ्या अकलेची व हुशारीची गोष्ट केली.

नाना या कारकुनीचे कामावर एक वर्षपर्यंत होते, नंतर दुसऱ्यावर्षी निजामअल्लीशीं तह झाला, त्याप्रमाणें मिरज किल्ला गोपाळराव पटवर्धन यास परत दिल्ह्यावरून ते मिरज किल्याकडे गेले, तेव्हां नानांचें फडनवीशिचें काम नानांकडे कायम झालें. हें फडनविशीचें काम थोडे दिवसपर्यंत गोपाळराव पटवर्धन, व त्रिंबकपंत मामा करीत होते.

यानंतर सन् १७६९ पर्यंत नानांविषयीं कांहीं इतिहासांत वर्णन केलें नाहीं असें आह्मांस वाटतें. सन् १७६९ त महादजी शिंदे यांनी त्यांचा पुतण्या जनकोजी शिंदा मेल्यानंतर घरचे जाहागिरीकरीतां बोलणें घातलें होतें, त्याचा पक्ष नानांनी स्वीकारिला. आणि ही गोष्ट जरी पेशव्यांचे मर्जीस आली नाहीं तरी त्यांचा अधिकार इतका होता, कीं त्यांनी आपलें मत शेवटास नेलें. त्यावेळेपासून त्यांजवर महादजी शिंदे यांची फार भीति बसली.

सन् १७७२ त माधवराव पेशव्यांस देवआज्ञा झाली; त्यांनंतर नारायणराव पेशवाईचे गादीवर बसले. त्यांचे कारकीर्दींत आपले आपण नाना फडनविसांचे गुणांचा प्रसार होत

चालिला. लोक असें ह्मणतात, कीं काम जलदीने करण्याची हातवटी त्यांस फारच साधली असे. व वंश परंपरेनें फडनविशीचें काम त्यांचे पूर्वज करीत आले, याच फडनविशीचे पदवीने प्रसिद्ध होऊन त्यांचे धन्यांची त्यांजवर फारच प्रीति जडली. सन १७७३त अगष्टचे तिसाव्या तारिखेस नारायणराव मारले गेल्यानंतर थोड्या दिवसांनी नाना फडनवीस आणि त्यांचा चुलतभाऊ मोरोबा दादा या दोघांनी सखाराम बापू त्रिंबकराव मामा, राघोबा पुरंदरे, अनंदराव जिवाजी, आणि हरीपंत फडके यांशीं मिळून राज्याच्या उलटापालटीकरितां खटपट करून रघुनाथराव यांनी नारायणराव मारल्यानंतर पुनः राज्य घेतलें होतें, त्यांचे विरुद्ध राज्यास वारसदार करून यत्न केला तो पुढें लिहितों. नारायणराव मारले गेल्यानंतर जानेवारी महिन्यामध्यें त्यांची बायको गंगाबाई गरोदर आहे असें प्रगट झालें. तेव्हां तिचा बचाव व्हावा अशे ठिकाणीं ठेवण्याचे निमित्ताने त्यांनी तिला पुरंदरगडावर न्यावें असें ठरविलें. परंतु लोकांचे बोलण्यावरून याचें खरें कारण ह्मटलें असतां हेंच आहे, कीं तिला कन्या झाली तर दुसऱ्याचा मुलगा आणून बदली करावी, या कारणाकरितां पुष्कळ ब्राह्मणांच्या गरोदर बायका त्याच वेळेस त्या किल्ल्यावर नेऊन ठेऊन, गंगाबाईस जातीने नाना फडनवीस व हरीपंत फडके या दोघांनी मिळून सन १७७४ त जानेवारीच्या तिसाव्या तारिखेस प्रातःकाळीं पुण्यांतून नेली. परंतु तिला नेण्याचे पूर्वी लिहिलेलें कारण तेंच चहूंकडे प्रसिद्ध झालें. कैलासवाशी सदाशिवराव भाऊ यांची बायको पार्वतीबाई, ही फार कुलीन असतां तिचे बरोबर गेली. सर्व प्रधानलोक राजप्रतिनिधीप्रमाणें गंगाबाईचे नांवाने देशावर अमल करूं लागले. रघुनाथरावांचे कूटांतील मं-

डळीस कैदेंत घातलें. साबाजी भोंसले व निजाम अल्ली यां दोघांशीं बोलणें लावलें. तेव्हां दोघेहि गंगाबाईचा पक्ष धरून तिचा राज्याविषयीं वारसा खरा आहे ह्याविषयीं तिला मदत देण्यास कबूल झाले, आणि रघुनाथरावांचे छावणींत कृष्णराव बळवंत याने फितूर केल्यावरून रघुनाथराव यांचे सर्व लोक बंड करण्यास तयार झाले; व पुण्यांतील फितूरी लोकांकडून खूण येतांच त्यांशीं रघुनाथराव यांनी लागलीच लढाई केली. तींत त्यांचा कित्येक वेळां मोड झाला, आणि कित्येक वेळां त्यांस जय आला, परंतु शेवटीं माधवराव नारायण एप्रेल महिन्याचे अठरावे तारिखेस जन्मल्यामुळें रघुनाथरावांचे कारस्थानाचा नाश होण्याची वेळ आली, आणि ते आपणास पेशवे असें ह्मणवीत होते, ते पुनः कधीं न ह्मणवीत असें झालें. लोकांस फसविण्याकरितां गंगाबाईस किल्ल्यावर नेऊन ठेविल्यावरून सर्वांस संशय आला होता; तथापि हा मुलगा मारलेगेलेले नारायणराव यांचा खरा यांत कांहीं संशय नाहीं असें झालें. सखाराम बापू व नाना फडनवीस यांस गंगाबाईने आपल्या पुत्रास पेशवाईचीं वस्त्रें आणावयाकरितां पाठविलें, त्याप्रमाणें साताऱ्याच्या राजाने माधवराव निळकंट पुरंदरे यांजबरोबर पेशवाईचीं वस्त्रें पुण्यास पाठविलीं, आणि मूल चाळीस दिवसांचें असतां त्यास तीं वस्त्रें दिल्हीं. नंतर सर्व प्रधान लोक एकमेकांशीं लौकरच द्वेष करूं लागले. तेव्हां या मुलाचे अमलांत नाना विचार करून मुख्य अधिकार न घेतां, बंड करून उच्चत्व पावलेले असे जे लोक दरबारांत कधीं येत नसत, त्या लोकांप्रमाणें पुरातन प्रधान सखाराम बापू यांचा लोकांवर अंमल व वजन असे, यास्तव त्यांस मदत देऊन त्यांशीं मिळून राहिले. नाना

फडनविसांनी याप्रमाणें वर्तणूक केली, याचें कारण हेंच, कीं कांहीं स्वभावाच्या भित्रेपणामुळें व कांहीं मतलबानें. सखाराम बापू वृद्ध, हुशार, व प्रसंगानुसार वागणारे कामगार, व नाना फडनविसांपेक्षां फार धैर्यवान् व मसलती होते. तथापि नाना फडनवीस फार गरीब व उद्योगी हे पुढें आपले शत्रू होतील असें त्यांचे कधीही मनांत आलें नाहीं. सखाराम बापूचा अधिकार असा होता, कीं जर त्यांचा पक्ष सोडिला तर मुत्सद्दी लोकांनी जें कारस्थान केलें आहे त्याचा नाश होईल असें सूत्र त्यांच्या हातीं होतें; ह्मणून नाना वारंवार भीत असत. नानांनी आपला अधिकार वाढवावा ह्मणून जी गोष्ट केली व जी गोष्ट लोकांत अप्रसिद्ध होती, ती हीच कीं तेवेळेस गंगाबाई राजकारभार पाहात होती, ती त्यांच्या मुठींत होती, व त्यावेळेस ती नानाशीं फार मोहित होती, हें कोणास ठाऊक नव्हतें, व जुने प्रधान यांस कोणत्या रीतीनें वागवावें याविषयीं नाना तीस वारंवार शिकवीत असत. नाना व धाकटे पेशवे माधवराव यांच्या तसबिरी आहेत, त्या तसबिरींमध्यें दोघांची अगदीं साम्यता आहे, ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे; व नाना गंगाबाईशीं आसक्त होते, असें जें लौकिकांत प्रसिद्ध आहे त्यास हें सबळ कारण आहे. नानांचे चुलतभाऊ मोरोबा हे माधरावांचे बाह्यत्कारेंकरून मुख्य प्रधान होते. त्यांचे मतास कोणी विचारीनासें झालें, ह्मणून त्यांस राग आला. जर पुढें त्यांस कांहीं अधिकार मिळाला असता, व रघुनाथरावांचा पक्ष स्वीकारिल्याने त्यांस काहीं उपद्रव नहोतां त्याचा बचाव झाला असता, तर त्यांणीं रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारिला असता. तरी दुसरे प्रधान जे सखाराम बापू, व नाना फडनवीस यांस ते

शरण गेले नाहींत. त्यांनी एककूट करून कारस्थान चालविलें. त्यांच्या थोडेवेळांने दोन फळ्या झाल्या, आणि एकमेकांत चुरस पडली. मोरोबा, बजाबा, आणि बाबाजी नाईक यांजकडून स्थानभ्रष्ट झालेले पेशव्यांस पत्रें जात असतां तीं पत्रें उमगलीं गेलीं, तेणेंकरून सर्व लोकांत प्रसिद्धीस आलीं. हीं पत्रें हरीपंतांनी रस्त्यावर धरिलीं. त्यांत या तिघां जणांनी सखाराम बापू, नाना फडनवीस, गंगाबाई, आणि तिचा पूत्र यांस कैदेंत घालावें असा बेत केला होता. ही सर्व मंडळी पावसाळ्यांत किल्ल्यामध्यें फार थंडी होती यामुळें पुरंदर किल्यावरून खालीं शेजारील सास्वड गांवांत राहावयाकारितां आली होती. परंतु बंडाचें वर्तमान ऐकतांच मोठें भय वाटून किल्ल्यांत पळून गेली. या पुस्तकामध्यें रघुनाथरावाचे आचरणा विषयींचा सर्व वृतांत लिहिला तर ग्रंथ फार वाढेल, यास्तव सन् १७७५ पर्यंत वृतांत गाळून पुढें लिहितों. सन् १७७५ त सखारामबापू आणि नाना फडनवीस हे पुनः राज्य कारभार पुरंदर किल्यामध्यें चालवीत होते, व इकडे राघोबा इंग्लीश लोकांशीं बोलणें करून तहनामा करण्याकरितां, व गोविंदराव गायकवाडांची मदत मिळविण्या करितां यत्न करीत होते. त्या तहनाम्यावर सन् १७७५ त मार्चाच्या साहाव्या तारिखेस सह्या झाल्या, त्यांतील सारांश हाच, कीं मराठ्यांची पहिली लढाई असें जिला ह्मणतात, ती लढाई व्हावी याचें कारण होतें. राघोबा कार्यसिद्धी झाल्यावरून धाकटे पेशवे पुढें रूपास न यावे असें कांहीं चिन्ह दर्शवूं लागले; व यावरून सखाराम बापू व नाना फडनवीस यांची हिंम्मत खचली. व हिंदुस्थानांत एकोप्याचे मंड़ळींत फितूर झाला ह्मणजे जसा अनर्थापात होतो तसा होईल, ह्मणून भिऊं लागले. इकडे रघु-

नाथराव गुजराथेंत पळून गेले होते. तरी त्यांनी नाना फडनवीसां कडून धाकटे पेशवे यांस विनंती करवून त्यांजकडून आपल्या लेकास सेनासाहेब सुभे हें काम व त्याविषयीं मोठेपणा, व सर्व अधिकार मिळविले. व धाकटे पेशवे यांच्या रक्षकाचें अथवा शिक्षकाचें काम, व त्याविषयींचे व सर्व कामासंबंधीं हक्क आपणास मिळाले. तरी सर्व प्रधान लोक भ्याले, कीं राघोबाच्या दैवाचे उदयाने त्यास बीरचा राजा अश्रय देईल. त्यासमयीं निजाम अल्लीनेहि धाकटे पेशवे माधवराव नारायण हे औरस आहेत किंवा नाहींत, याचा संशय बाळगल्याचें निमित्त केल्यामुळें प्रधान लोकांस फार भय वाटलें. मराठ्यांचे सरदारांपैकीं कित्येक सरदारांनी ब्राह्मणी राज्य बुडवावयास उत्सुक होऊन, व कित्येकांचीं मतें फिरवून सर्वांचे मनांत चिंता उत्पन्न केली, परंतु दैव योगाने सन् १७७५ त फेब्रवारीचे तिसऱ्या तारिखेस बंगालचे सुप्रीम कौंसल यांनी सर्व ब्रिटीश इंडियांतील राज्यकारभार करण्याची सत्ता आपल्या हातांत घेतली होती, त्यांनी मुंबई सरकारास एक पत्र लिहिलें, त्यांत मुंबई सरकाराने राघोबाशीं तह केला, हें नीट नाहीं ह्मणून त्यास सर्वस्वी दोष ठेविला, आणखी त्यांनी हेंहि लिहिलें कीं मराठ्यांशीं लढाई हुकुमावांचून करणें हें अविचाराचें व भयप्रद आणि नाहक कर्म आहे. असें लिहून त्यांनी ताकीद लिहिली, कीं तुह्मी आपली फौज जशी असेल तशी परत आणावी, परंतु एकाएकीं परत येणें हें गैर बचावाचे दिसल्यास परत येऊं नये. गवर्नर जनरल आणि कौंसल यांनी हेंहि सुचविलें कीं मराठ्यांच राज्यांतील मुख्य कारभाऱ्यांशीं बोलणें चालणें करण्याकरितां आह्मी आपला वकील पाठविणार आहो. या गोष्टीस मुंबई सरकार प्रतिकूळ होतें, तरी सुप्रीम कौंसल यांनी आपण

केलेला बेत सिद्धीस नेण्याचा निश्चय करून लेफ्टीनेंट् कर्नेल जान आफटन् यास पसंत करून त्यास कुलअखत्यारीने पुण्यास जाऊन पेशवे आणि मुंबई सरकार यांमध्यें तह करण्याविषयीं पाठविलें. गवर्नर जनरल आणि कौंसल यांनी उतावळीने मध्यस्थी केल्यामुळें पुरंदर किल्यामध्यें कामगार होते त्यांस बळकटी आली, आणि शेवटीं मराठ्यांची घरसोड करणारी बंडखोर मंडळी नाना फडनवीसांचे हातांत आली. कर्नेल आफटन् सन १७७५ त दिसेंबरच्या अठाविसाव्या तारिखेस पुरंदरगड एथें येऊन पोहंचले, व त्याच समयीं गर्वनर जनरल यांनी सखाराम बापूस लिहिलें, कीं माझे हुकुमाखेरीज मुंबई सरकारांनी लढाई चालू केली होती, यास्तव लढाई बंद करण्या करितां मी हुकूम पाठविला आहे, व पेशव्यांचे कारभाऱ्यांसहि त्याप्रमाणें करण्यास लिहून पाठवून सुचना पाठविली, कीं मी सल्ला करण्या करितां एथून वकील पाठविण्याचा बेत केला आहे, असें झाल्याने प्रधान लोकांला लवकरच फायदा होईल असें वाटलें. आणि ब्राह्मण लोक अविवेकी उलट्या समजुतीचे आणि एकादी गोष्ट त्यांचे ह्मणण्याप्रमाणें कोणी केली ह्मणजे त्यानें भिऊनच केली असें त्यांस वाटतें. त्याप्रमाणें त्यांनी इंग्लीश लोक भ्याले, असें मनांत आणन त्यांनी फार गर्वास चढून इंग्लीश लोकांस धमकी दाखवून मागणी केली. यावरून कर्नेल आफ्टन् यांस वाटलें कीं मराठे लोक खरोखरीच मागणी करून धमकीने खंडणी मागतात, कर्नेल आफ्टन् यांचे कागदपत्रांवरून सरकारास स्पष्ट दिसून आलें, कीं त्यांनी जें केलें तें खरें व बरोबरच केलें, परंतु पेशव्यांचे ब्राह्मण लोकांशीं बोलणें करण्या जोगे कर्नेल आफ्टन हे पक्के हुशार नव्हते. कर्नेल आफ्टन यांचे व पेशव्यांचे

प्रधान लोकांचें पुष्कळ बोलणें झाहाल्यावर त्यांस वाटलें, कीं कारभारी आपल्या ह्मणण्याप्रमाणें ऐकत नाहींत ह्मणून त्यांनी फेब्रेवारीचे सातव्या तारिखेस गवर्नर जनरल यांस पत्र पाठवून आपला अभिप्राय समजाविला. तेव्हां गवर्नर जनरल यांनी **राघोबाचा** पक्ष धरून जितकी करवेल तितकी पराकाष्टा करण्याचा दृढ निश्चय केला. इंग्लीश लोकांस प्रधान लोकांनी पुष्कळच भय व धमकी दाखविल्यानंतर एकाएकींच **कर्नेल आफ्टन्** यांनी पूर्वी अमुक मागणी करितां बोलणें घातलें होतें, तें बहुतकरून देण्या करितां एकाएकीं कारभारी कबूल झाले आणि तह मोडिले. याविषयीं कलकत्यास बातमी जाऊन पोंहचल्याचे पूर्वीं पुरंदरचा तहनामा ठरला त्याजवर सन् १७७३ त मार्चाचे अकराव्या तारिखेस कंपनी सरकाराकडून **कर्नेल आफ्टन्** यांनी सही केली आणि पेशव्यांकडून **सखाराम बापू** आणि **नाना फडनवीस** यांनी सह्या केल्या. परंतु पेशव्यांचें नांव गाळून राव पंडित प्रधान इत्यादि पदव्या मात्र त्यांत घातल्या होत्या. लोकांस असें वाटलें, कीं **माधवराव नारायण** धाकटे पेशवे यांचें नांव गाळण्याचें कारण हेंच असावें, कीं धाकटे पेशवे कदाचित मेले असतां **गंगाबाईने** दत्तपुत्र घ्यावा, ह्मणून आधीच सावधगिरी करून ठेविली असेल. हा तहनामा झाल्यावरून मुंबईसरकाराचा व **राघोबाचा** तह झाला होता, तो दस्तुराप्रमाणें रद्द झाला. इंग्लीश लोकांची फौज आपापल्या ठाण्यांत माघारी जावी व **राघोबाने** आपली फौज एके महिन्यांत मोडावी असें ठरलें. व **राघोबा** बरोबरचे च्यार असामी खेरीज करून सर्वांस क्षमा करावी असें ठरलें. हे चौघेजण **नारायणराव** यांस ठार मारण्याचे कारस्थानांत होते, असें प्रधान लोकांस पक्कें माहीत

होतें, ह्मणून त्यांस क्षमा केली नाहीं. राघोबानें आपली फौज मोडिली नाहीं तर ठरलेल्या कलमाप्रमाणें न वागल्यामुळें राघोबास साहाय्य करणार नाहीं असें इंग्लीश लोकांनी कबूल केलें. पेशवे आणि त्यांचे कारभारी राघोबास एक हजार स्वारांचें पतक व त्याचे खातरीचे घरधुती निवडक दोनशें चाकर, आणि दर माह पंचवीस हजार रुपये त्यांच्या दुसऱ्या खर्चाकरितां देण्यास कबूल झाले. आणि त्यांचें नेहेमीचें वस्तीचें ठिकाण गोदावरी तीरीं कोपरगांव एथें होतें सबब तेथें रहावयास हुकूम झाला. सन् १७३९ व सन् १७५६ यांत तहनामे व दुसरे ठराव झाले त्यांस सांप्रतच्या तहनाम्याने कांहीं प्रतिबंध न आल्यामुळें ते कायम ठेवून पक्के केले.

सन् १७७७ मध्यें धाकटे पेशवे माधवराव नारायण यांची आई गंगाबाई मृत्यु पावली. तिने नाना फडनविसांशीं व्यभिचार कर्म केलें. आणि तो अयब छपवावा ह्मणून पोटचें पाडण्याकरितां कांहीं औषध घेतलें तेणेंकरून ती मृत्यु पावली. यावेळेस दैवावर हवाला ठेवणारा एक साहसी सेंटलुबीन यानामेंकरून कोणी मनुष्य मद्रासचे इंग्लीश सरकारास ठकवून फ्रेंच लोकांचे राज्यांतून पुण्यास जाण्याकरीतां हुकूम घेऊन फ्रेंच लोकांनीं मराठे लोकांस मदत दिल्ही असतां त्यांस त्यांत काय मिळेल हें कबूल करून घेण्याकरितां आला. सेंटलुबीन याने चेऊलचें बंदर व रेवदंड्याचा किल्ला हीं पेशव्यांनीं आपणास द्यावीं ह्मणून फार यत्न केला. आणि नाना फडनवीसांस कांहीं प्रसंग पडला असतां सेंटलुबीन याने मदत द्यावी, व सेंटलुबीन यास प्रसंग पडला असतां नाना फडनवीसांनी मदत द्यावी, असा नानाकडून तहनामा करूनघ्यावा, ह्मणून सेंटलुबीन याने यत्नकरून प्रधान

लोकांस मदत देण्याकरितां पंचवीसशें गोरे लोक, व दाहा हजार शिपाई जमाकरून त्यांस कवाइतींत हुशार करून जाहजाचें व लढाईचें पुष्कळ सामान आणून देण्याचें कबूल केलें. इंग्लीस लोकांनी राघोबाचा पक्ष स्वीकारिल्यामुळें इंग्लीश लोकांचे वर्तणूकेस फार दोष ठेविला, असें सेंटलुबीन निमित्त करी. सेंटलुबीनानें आपल्या हुकुमावरून फ्रान्सदेशामध्यें राघोबाची हुबेहूब तसबीर नारायण रावास किती क्रूरत्वानें ठार मारलें हें दर्शविण्याकरितां तयार करविली होती. कित्येक लोक ह्मणतच होते, कीं नारायण रावास ठार मारण्याचे कारस्थानामध्यें रघुनाथराव होते. ह्मणून सेंटलुबीन यानें जातीनें दरबारांत ती तसबीर आणिली आणि मोठा शोक करून सर्व दरबारांत ती दाखविली तेणेंकरून कित्येक मंडळीचे डोळ्यांतून अश्रुपात चालिले, व कित्येकांनी थट्टाकरून धिक्कार केला. मराठे लोकांस इंग्लीशलोक दंगेखोर असतात असें ठाऊक नव्हतें तरी नाना फडनवीस मोठे शाहणे व चतुर हे सेंटलुबीन याचे कापट्यानें किंचितमात्र फसले नसतील नाना फडनविसांनी सेंटलुबीन यास आश्वासन दिल्हासारिखें करून, इंग्लीस लोकांचे वकीलाचा कांहीं अपामन केला. येणेंकरून पुढें मोठा प्रलय होईल याचा विचार नकरितां व इंग्लीशलोकांचा द्वेष वाढविण्याकरितां ही गोष्ट केली असें वाटतें.

नाना फडनविसांस विलायतेंतील गोरे लोक ह्मटले ह्मणजे कपाळास पित्त जात असेच, परंतु अयोग्य आणि धिक्कार करण्या जोग्या सेंटलुबीन याचे आचरणावरून, फ्रेंच लोक अगदीं हलके असें नाना फडनविसांस व सर्व मराठे लोकांस वाटलें असेल. मिस्तर बाल्लेन्स साहेब पूर्वी कंपनी सरकाराचे चाकरीवर बंगाला एथें होते, ते यासमयीं पुण्यांत आलियाचे राजाक-

डून वकिलातीवर आले होते, त्याचा कोणी आदर सत्कार ठेविला नाही. **नाना फडनवीस** यांस वाटलें असावें कीं **सेंटलुबीन** हा सांगकाम्या आहे. व **बालेन्स साहेब** यांस लौकरच निरोप झाल्यावरून, त्यांस वाटलें, कीं आपली मराठयांनी कांहीं उपहास्यता केली नाहीं, यावरून त्यांनी त्यांस हुशार जाणून मोठा बहुमानच दिल्हा. युरोप खंड त्यासमयीं हिंदुस्थानामध्यें फारसें ठाऊक नव्हतें, त्यावरून सर्वांस जें जें ऐकण्यांत आलें तें सर्व खरें वाटलें. **सेंटलुबीन** याने गोड बोलून भोळ्या मनुष्यांस ठकवून या साहस कर्मांस मदत देण्याकरितां हिंदुस्थानांत येण्यासाठी त्यांस बधविलें. परंतु दुराचारी जे असतात, त्यांनी जरी ओढून श्रेष्ठत्व आणून आपण हुशार असें मानिलें तरी बहूतकरून त्यांजमध्यें कांहीं व्यंग असतें, तेणेंकरून त्यांची अक्कल किती आहे ती थोडक्यांतच समजूतींत येती. **सेंटलुबीन** याचे लोक फार गर्विष्ट व मोठे रागीट होते, हे बहूतकरून त्यापासून जाऊन परतंत्र झाले. व त्यांस संशय आल्यावरून ते घुसफुस करूं लागले. **सेंटलुबीन** याचे मनांत त्यांस ठार मारण्याचें होतें, परंतु मुंबई सरकारचे वकील **मिस्तर माईसन साहेब** यांचा आश्रय त्यांनी जाऊन केला. **नाना फडनवीस** यांनी **सेंटलुबीन** यास धैर्य व अश्वासन दिल्हें, तेणेंकरून कदाचित मुंबईसरकारांनी भिऊन पेशव्यांचे कारभारी लोकांनी पुरंदरचा तहनामा केला, त्यांत इंग्लीश लोकांची मोठी नुकसानी जरी केली असती, तरी ती त्यांनी कबूल केली असती, परंतु कोर्टअफ् डरेक्टर्स यांनी मुंबई सरकारास हुकूम पाठविला, कीं पुण्यांतील कारभारी लोकांनी तहनामा ह्मटल्याप्रमाणें शेवटास न नेल्यास **राघोबाशीं** लगट घालून त्याचा पक्ष स्वीकारावा.

त्यासमयीं पुण्यांतील लोकांत एकमेकांशीं चुरसा लागून कज्जे वाढत चालिले. नाना फडनवीस हे आपला चुलत भाऊ मोरोबा याची हुशारी पाहून त्याचा द्वेष करूं लागले. परंतु ब्राह्मण लोक नेहेमी सावध असतात, त्याप्रमाणें मोठ्या सावधगिरीने नाना मोरोबाचा उघडपणें धिक्कार न करितां आंतून द्वेष करूं लागले, कारण मोरोबास मोठ्या बलाढ्य मंडळीचा आश्रय होता. इंग्लीश लोकांचे वकीलास वाटलें कीं नाना कांहीं काळजी करीत नाहींत, याचें कारण हेंच कीं नानांस फ्रेंच लोकांनीं मदत देण्याचें वचन दिलें असेल. गंगाबाई मेल्यानंतर लागलेच सखाराम बापू आजपर्यंत मोठे गरीबीने आणि स्नेहाने वागणारे असे जे नाना फडनवीस यांचा द्वेष करूं लागले. आणि राघोबास पुनः गादीवर बसविण्याचे मसलतींत शिरले. तथापि राघोबास पुनः गादीवर बसवावें या बेतानेंच केवळ शिरले असें नाहीं नानांवर छाप पडावी ह्मणून शिरले.

मोरोबाने मुंबई सरकाराशीं राघोबास पुनः राज्यावर बसविण्याविषयीं ठराव करून विनंती केली, कीं राघोबास लवकर पुण्यांत आणावें. याप्रमाणें सर्व तयारी झाली, आणि मुख्य कामगार व कौन्सल यांनी त्यास क्षणमात्र उशीर न लावितां मदत देण्याचा निश्चय केला. परंतु मुंबईसरकार मोरोबाचे ह्मणण्याप्रमाणें मदत देण्यास कबूल झालें, तरी असा संकेत ठरला, कीं सखाराम बापू सर्वांत मुख्य कारभारी ज्यांनी पुरंदरचे तहनाम्यावर सही केली, त्यांनी लिहून द्यावें, कीं माझे सांगण्यावरून इंग्लीश लोकांस बोलाविलें. सखाराम बापूंनी असें लिहून देण्यास दुर्दैवेंकरून नाकबूल केलें ह्मणून तो बेत राहिला. परंतु इं-

ग्लीश सरकारास वाटलें कीं राज्यामध्यें नवे कारभारी ठेविले असतां आपला बचाव होईल.

नाना फडनवीस यागडबडीमध्यें राज्यकारभार मोठ्या चतुराईने चालवीत होते, त्यांत मोरोबा पळून गेले त्यांस धरण्याकरितां मोठ्या त्वरेने यत्न केल्यामुळे प्रथम किंचित बिघाड झाला. मोरोबास धरणें पाठवून त्यांची फार अप्रतिष्ठा केली असती तर तेणेंकरून कित्येक मंडळीस दुःख झाले असतें, परंतु नानांनी सखाराम बापू कडून आपला चुलत भाऊ मोरोबा यास परत येण्याविषयीं प्रेरणा केली, आणि मग असें ठरलें कीं नवे कारभारी करावयाचे ते मोरोबा व बजाबा पुरंधरे हे करावे, परंतु बजाबाचे मनांतून हें काम करावयाचें नव्हतें, आणि सखाराम हरी मोठ्या प्रतिज्ञेने बोलिले कीं लहानाचा मोठा करून ज्या उदार धन्याने माझा प्रतिपाळ केला त्याचा पक्ष मी कधींहि सोडणार नाहीं. व हेंहि बोलिले कीं रघुनाथराव हे शिपाई आहेत, व नाना फडनवीस मोठे चतुर सभासद आहेत, तरी मित्रे आहेत. मोरोबाचे मंडळीस होळकराचे फौजेने मदत केल्यामुळें मोठा चढ बसला. आणि नाना फडनवीस यांस पुरंदर गडावर परत जाणें प्राप्त झाल्यावरून त्यांनी असें निमित्त केलें, कीं माझा व माझ्या मालमत्तेचा बचाव होईल अशी कोणी निशा घेतल्यास मी राघोबास पुण्यास घेऊन जातो. मुंबईसरकारास तयारी करण्याकरितां पुनः पत्र आलें. परंतु गलतान मोरोबाने आपली इछा पूर्ण झाली असा विचार केला. व त्यास वाटलें कीं आपण राज्यकारभारामध्यें मुख्य अधिकारी आहों. नानांनी सखारामबापूचे मतास नेहेमींप्रमाणें मान दिल्हाअसें करून आपण आपला चुलतभाऊ जो मोरोबा त्यास फार मान

देंत असत. रघुनाथराव यास पुनः गादीवर बसविण्याविषयींच्या मसलती होऊं लागल्या. व नानांनी यागोष्टीस फार अडथळा केला. याचें कारण मोरोबास समजून आलें. मोरोबास स्मरण होऊं लागलें कीं जेव्हां मी माधवराव पेशव्याचे राज्यांत कारभारी होतों तेव्हां रघुनाथरावाचे आचरणाने मनस्वी कर्जे व मोठालीं नुकसानें, व अप्रतिष्ठा होत असत. ह्मणून ते राघोबास पुनः राज्यावर बसविण्याकारितां आपण उत्सुक आहों असें वरून दाखवीत, परंतु त्यांचे मित्र इंग्लीश लोक यांनी त्यांस जेव्हां या गोष्टीविषयीं निकड केली, तेव्हां ते टाळाटाळ करूं लागले. मुंबईचे कौन्सलांतील बहुतकरून लोकांस वाटलें, कीं मोरोबाचे मंडळीपासून, आपणांस जें प्राप्त व्हावयाचें होतें, तें सर्व व्यर्थ झालें, सबब फ्रेंच लोकांशीं हल्ला करण्याच्या बेताने आणि मोरोबाकडून पुण्यांत फ्रेंच लोकांचा इतका इतमाम वाढला होता, त्याचा नाश करावा याबुद्धीने एप्रीलचे बाविसाव्या तारिखेस कर्नेल लेसली याचे फौजेस यमुनानदी उतरून मुंबईस जाण्यास हुकूम झाला होता. तीस परत आणावयाचा निश्चय केला, परंतु पुढले महिन्याचे तिसरे तारिखेस पुढें लिहिलेल्या कारणामुळें हा निश्चय मोडून कर्नेल लेसली यास फौज घेऊन जाण्यास हुकूम दिल्हा. सेंट्लुवीन यास रजा देण्याविषयीं मोरोबाने मायस्टन् साहेब यांस वचन दिल्हें होतें, परंतु त्याचें जाणें दिवसें दिवस लांबणीवर पडल्यावरून लवकरच समजून आलें, कीं सेंटलुवीन याने नाना फडनवीस यांचे युक्तीने आपल्या योजनेंप्रमाणें करण्याचें मोरोबाचे मनांत आणून दिल्हें आहे. असें तात्पर्य बाहेरून लोकांस दिसलें. तथापि फ्रेंच लोकांनी मराठ्याचे देशांत आपला पाय शिरकाविण्याकरितां यत्न केला असता, तर

नानांनीं मोठें संकट सोसून होतां होई तोंपर्यंत त्यांस येण्यास अडथळा केला असता. नाना फडनवीस युरोपियनाचा ह्मणजे गोरे लोकांचा फार द्वेष करीत असत, यावरून इंग्लीश लोकांचें लढाईसें ठाणें मुंबई होतें तेथूनहि इंग्लीशांस हाकून देण्यापुरतें जर फ्रेंच लोकांचें सैन्य असतें; आणि पुढें फ्रेंच लोकांस हाकून देण्याकरितां आपणास सामर्थ्य आहे, अशी नानाची खात्री झाली असती तर त्यांनी त्यांस येऊं दिल्हें असतें. सेंटलुबीन फौज आणील अशी नाना फडनवीस यांची पक्की खात्री झाली असें नाहीं. सेंटलुबीन दगेखोर याने नानास विश्वास यावा ह्मणून गोवें आणि दमण एथील लोकांस लिहिलें, कीं पोर्तुगीस लोकांच्या देशांतून फ्रेंच लोकांच्या दोन पलटणी येतील त्यांस बिन हरकत येउं देणें. असें कापट्याने खोटें लिहिलें. हें सेंटलुबीन याचे मनांतून इंग्लीश लोकांस समजूं देउं नये असें होतें परंतु इंग्लीश लोकांनी वाटमारून त्यांचीं पत्रें धरिलीं, तेव्हां त्यास हें ढोंग खरे वाटलें, परंतु नानास खरें वाटलें नाहीं. पुर्वीं लिहिण्यांत आलेल्या गोष्टी घडतात, तों इकडे महादजी शिंदे व हरीपंत फडके, हे दोघेजण मिरज एथें आपल्या फौजेकडे जाऊन मिळाले. हे दोघे कामगार नाना फडनविसाच्या पक्षाचे होते, व नाना मोठे संकटांत असतां, त्यांनी हैदरास जरब देण्याकरितां, अशी कांहीं युक्ति केली, कीं तेणेंकरून हैदर व मोरोबा हे दोघे फसले व मोरोबा आपण बचावांत आहों अशा भ्रांतींत राहिले. तों हरीपंत फडके व महादजीशिंदे निरानिराळ्या रस्त्यांनी पुरंदर एथें जूनचे आठव्या तारिखेस पोहंचले. तोंपर्यंत हरीपंत त्या खटल्यापासून आगे झाले नाहींत. नानांनी पूर्वीं जो अधिकार त्यांजकडे होता,

तो पुनः घेऊन देशांतील जे मोठाले रस्ते व खिंडी होत्या त्यांवर आपली फौज ठेवून बंदी करविली; आणि शिंद्यांचे वर्गीने, नऊ लाख रुपये लांच दिल्यामुळें होळकरास कूटांतून निराळें काढि-लें. मोरोबाने पुनः एक वेळ इंग्लीश लोकांशीं बोलणें घात-लें, परंतु वेळ गेली. जुलैचे अकराव्या तारिखेस माहादजी-शिंदे यांचे स्वारांनी मोरोबास धरून कैद केलें, आणि थोड्या-दिवसांनी त्यांस नानांचे स्वाधीन केलें. तेव्हां नानांनी त्या-स अहंमदनगरचे किल्ल्यांत टाकिलें, व सखाराम बापू खेरीज करून त्याचे कूटांतील मंडळीस कैदेंत टाकिलें. सखाराम बापू पूर्वी इंग्लीश लोकांशी तह झाला त्यावेळेस सर्वांत मुख्य होते, यामुळें त्यांस कैदेंत टाकण्या विषयीं अंमळ लांबण लाविली. ब-जाबा पुरंदरे यांस वंदनचे किल्ल्यांत ठेविलें. याप्रमाणें सर्वांस निरनिराळ्या किल्ल्यांत टाकिलें. नाना फडनवीस यांच्या चातुर्यानें त्यांस स्वदेशीं माणसांचे संकल्पास व्याक्षेप करण्यांत सिद्धी झाली, परंतु त्यांनी अद्यापि इंग्लीश लोकांचें चातुर्य व प-राक्रम पाहिला नव्हता. नानांनी सर्व इंग्लीश लोकांशीं द्वेष केला होता, यामुळें सर्व इंग्लीश लोकांचा द्वेष त्यांजवर या प्रसंगीं दुर्धर झाला. इंग्लीश लोकांचे जे वकील पुणे प्रांतांत होते, त्यां-नी आपल्या फौजेस येण्यास सुलभता व्हावी ह्मणून, सरकारी का-रभारी व शिंदे होळकर यांस आमची फौज पूर्व हिंदुस्थानांतून पश्चिम हिंदुस्थानांत फ्रेंच लोक यांचे लढाईत त्यांस अडथळा क-रण्याकरितां येत आहे, तीस मोकळीक असावी अशी रहदारीची परवानगी मागीतली. यावरून प्रथमतः मराठे लोकांस वाटलें कीं हें इंग्लीश लोकांनी आह्मांस भीति घालण्यास्तव केलें. त्यांस हेंहि वाटलें असावें, कीं हे जर फौज खरोखरी मुंबईस पाठवि-

णारच असते, तर ती फौज खुशकीने न पाठवितां मलबार अथवा कोरमंडळ या किनाऱ्यावर जाहजांत बसविली असती, आणि त्या फौजेची बंगाला एथील फौजेने बदली केली असती. मुधोजी भोंसले यांशी लगत पाडण्याची शकल गवर्नर जनरल यांनी काढून लगत पाडावी ह्मणून फौज खुशकीने पाठवावी, असें ठरविलें. नाना फडनवीसांनी पुरंदरचे तहनाम्यांत लिहिलेलीं कलमें सिद्धीस न नेण्यानेच अडथळा केला असें नाहीं, परंतु त्यांनी फ्रेंच लोकांशीं तह केला, तो शेवटास गेला असेल किंवा नसेल तथापि त्यांनी तहाविषयीं बोलणें घातलें. तेणेंकरून इंग्लीश सरकारास वाटलें, कीं कंपनी सरकारचा अंमल पश्चिम हिंदुस्थानावर आहे तो उठला जाईल. गवर्नर जनरल आणि कौन्सल यांनी मुंबई सरकारास हुकूम पाठविला, कीं तुह्मी मराठ्यांचे देशांत स्वस्थता करण्याकरितां त्यांस मदत द्यावी. यावरून मुंबई सरकारास वाटलें, कीं राज्यकारभार चालविणारे नवीन कारभाऱ्यांस पत्र लिहून विचारावें, कीं पुरंदरचा तहनामा झाला, तो तुह्मांस रुजू असून तुह्मी त्याप्रमाणें वर्ततां, कीं नाहीं; व जीं कलमें ठरविलीं नाहींत त्यांचा निकाल करतां किंवा नाहीं. याविषयीं निखालस जाब विचारावयास अपण मुखत्यार आहों, ह्मणून मुंबई सरकाराने त्यांचे वकील पुण्यांत होते त्यांस हुकूम पाठविला, कीं तुह्मी कारभारी यांस विचारावें, कीं सेंट्लुबीन यास अद्यापि पुण्यांत ठेविलें याचें कारण काय? नाना फडनवीसांस वाटलें, कीं इंग्लिश लोकांशीं माझे मनांतून होता त्यापेक्षां मी जास्ती अपराध इतका केला, कीं त्यांशी पुनः दोस्ती होणें कठीण, व राघोबाशी तर असा द्वेष केला आहे, कीं त्याशी अथवा त्याचे मित्राशींहि पुनः मिळवून घेण्याचें बोलायास नलगे. मोरोबास कैदेंत टा-

कण्याचे पुर्वीं सेंट्लुबीनयास जुलै महिन्यांत पुण्यांतून जाण्यास निरोप दिल्हा. सेंट्लुबीन याने जाण्यास निरोप घेतला, नंतर नाना फडनवीस यांनी जरी ठराव पक्का केला नाहीं तरी सेंटलुबीन यांची खातरी करून वचन दिल्हें, कीं जर फ्रेंच लोकांचे वकीलाने आमचे साहाय्यास एक पलटण आणिलें तर त्यांचे लोकांस आह्मी आपले प्रांतांतील एक ठाणें देऊं. हें वचन दिल्हें तेव्हां नानांचे मनांतून ही गोष्ट खरोखरी करावयाची होती. शिंदे आणि होळकर यांनी कर्नेल वेल्स्ली याचे फौजेस आपल्या देशांतून मित्राप्रमाणें जाऊं द्यावें, या हेतूने रहदारीची मोकळीक चिठी दिल्ही. तरी नाना फडनवीस यांनी मराठ्यांचे कामगारांस व बुंदेलखंडचे राजे लोकांस गुप्त हुकूम पाठविले, कीं कर्नेल लेल्सली यांचे फौजेस इकडे येण्यास हरकत करावी.

यासमयीं मोरोबाचे मंडळीने मिस्तर मायस्टन यांशीं कांहीं पक्का ठराव केला, त्यांत त्यांनी सर्व गोष्टींविषयीं मिस्तर मायस्टन् यांची खात्री होण्याजोगीं वचनें दिल्ही; परंतु नाना फडनवीस यांस सर्व कांहीं जें चालिलें होतें तें कळन त्यांनी उशीर लावावा याबुद्धीने पेशव्यांस इंग्लिश सरकारांनी जे प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें पेशवे सरकारांतून द्यावयास उशीर लाविला. नंतर मिस्तर मायस्टन् हे वाट पाहून दमले, आणि जुलैचे साहव्या तारिखेस मुंबईस जाण्यास निघाले. तेव्हां नाना फडनवीसांनी त्यां कलमांचीं उत्तरें त्यांचे हाताखालील लुईस साहेब याजकडे पाठवून दिल्हीं, व त्यांनी तीं उत्तरें मुंबईस पाठवन दिल्हीं. या उत्तरांत स्पष्ट नाकबूल केलें, कीं फ्रेंच लोकांशी आह्मी कोणत्या गोष्टीविषयीं तह केला नाहीं. हीं

ऊतरें पूर्वी पुरंदरचा तहनामा केला त्यांतील कलमां बद्दल झाले-ल्या वादविवादाचा संक्षेप होता. नवे कारभारी यांस पुरंदरचा तहनामा कबूल असून ते त्या अन्वयें वागतात किंवा नाहीं, ह्या विषयीं इंग्लिश लोकांनी प्रश्न केला होता; त्याचें उत्तर त्यांनी असें लिहिलें, कीं इंग्लिश लोकांनी विश्वास पूर्वक पुरंदरचे तह-नाम्याप्रमाणें वर्तणूक केली ह्मणजे आह्मीहि तसें करूं.

हीं पेचपांचाचीं उत्तरें मुंबईस येऊन पोहंचलीं, त्याच वेळेस इंग्लिश लोक फ्रेंच लोकांशी लढाई करितात याचें वर्तमान ये-ऊन पोहंचलें. तेव्हां प्रेसिडेंट आणि कौन्सल यांनी जीं उतरें पु-ण्यांतून आलीं होतीं, त्यांचा व मोरोबाचे मंडळीने ठराव केला होता त्याचा विचार करून असें ठरविलें, कीं या उत्तरांवरून त्यां-नी पुरंदरचा तहनामा मोडला असें दिसतें. गवर्नर जनरल यांचे हुकुमावरून, पुण्यांतील एक्या कूटांतील मंडळी जी इंग्लिश लो-कांचा फार द्वेष करीत होती, तिचा नाश करण्यास ज्याज्या गोष्टी करण्यास आवश्यक आहेत, त्या करण्यास मुंबई स-रकारास मुखत्यारी होती, ह्मणून मुंबई सरकाराने राघोबास राज प्रतिनिधी नेमून त्याजकडून राज्य चालविण्याचा निश्चय के-ला. परंतु राज्य माधवराव नारायण धाकटे पेशवे यांच्या नां-वाने चालवावें व ते राज्यकारभार पाहावयाजोगे मोठे जाहल्या-वर, ह्मणजे मराठी कायद्याने सोळावर्षांपासून वीसवर्षांचे वयाचे झाल्यावर, सर्व राज्यकारभार व अधिकार त्यांचे त्यांस द्यावे, असें पक्कें ठरविलें. हा सर्व बेत पावसाळा संपे तोंपर्यंत गुप्त ठे-वुन पावसाळा संपल्यानंतर पराकाष्टा करून तो सिद्धीस न्यावा, असें ठरवून त्यांच वेळेस कर्नेल वेल्सली यास जुनराकडे जा-वयास हुकूम दिल्हा. आपल्यावर प्रसंग गुजरणार असें नानां

फडनवीस यांस समजून त्यांनी लढाई करण्याकरिता तयारी केली; परंतु मुंबईत तोपर्यंत तयारी झाली नव्हती. सखाराम बापूंनी राज्य कारभारांत ढवळाढवळ केली, ह्मणून त्यांस राज्य कारभारांतून काढून देण्याकरितां तुह्मी वृद्ध झालां अशी सबब लावून त्यांस राज्य कारभारांतून काढून शिंद्यांचे फौजेपैकी कांहीं शिपाई त्यांचे घराच्या व त्यांचे जातीच्या बंदोबस्तास ठेविले. असें झालें असतांहि नानां व शिंदे हे आपण सखारामबापुचे मताने चालतों असें दाखवीत.

सर्व देशांत शिलेदार चाकरीस ठेवून त्यांस हुकूम दिल्हा, कीं सर्वांनी दसऱ्यास जमा व्हावें. सर्व बंदरावरील जाहजें पुनः नीट करवून किल्ल्यांत अन्नाची बेगमी ठेविली. त्यांस आंतून हुकूम पाठविला, कीं कर्नेल लेल्स्ली वाटेने सैन्या सहीत येत असतां त्यास पुष्कळ क्लेश द्यावे, परंतु पुण्याहून हुकूम आल्यामुळें आह्मी तुह्मांस दुःख दिल्हें असें सांगूं नये. एक कारभारी पुण्याहून मुंबईस राघोबाशी बोलणें करून मुंबई सरकारास फसविण्या करितां पाठविला; परंवु लुईस साहेब हे फारच हुशार त्यांनी मुंबई सरकारास मराठ्यांनी फसविण्याचा बेत केला आहे असें समजाविलें. आगष्ट महिन्याचे शेवटी मुंबई सरकरास प्रथम गवर्नर जनरल आणि कौन्सल यांनी मुधोजी भोंसले यांशी लगत ठेवून दोस्ती करण्या कारितां लिहून कळविलें; आणि त्यांस हुकूम लिहिला, कीं मुधोजी भोंसले यांशीं दोस्ती करावी; परंतु पुणें सरकाराशी लढाई करण्यांविषयीं ठराव करणें तो सध्यां करू नये; पुढें लढाई केल्या खेरीज परिणामच नाहीं असें झाल्यास करावा. परंतु प्रेसीडेंट आणि कौन्सल ह्यांनी पुनः विचार केला, कीं राघोबास राज्यावर बसविण्याचे योज-

नेशी व मुधोजी भोंसले यांशी कांही मात्र संबंध नाहीं. तरी मुंबई सरकारांत आपण या हुकूमाप्रमाणें करून आपल्या कामास व्याक्षेप आणू नये, असें ठरलें असतांहि, मुंबईत अकटोबरचे बाराव्या तारिखेपर्यंत कांहीं तयारी झाली नव्हती. कौन्सलांत पुष्कळ वाद विवाद झाल्यावर कर्नेल जान साहेब बाहादूर यांस राघोबाशी तह केला त्यांतील मुळचीं कलमें ठरविण्या करितां कमीटी नेमिली होती तिजवर प्रेसीडेंट ह्मणजे मुख्य नेमिले. या कमीटीवर कौन्सलांतील दोन साहेब सर्व सैन्यावरील मुख्य असे होते त्यांस राज्य कारभार चालविण्या करितां, व राघोबास पुण्यास नेण्या विषयींच्या सर्व कामांची अखत्यारी दिल्ही होती. रघुनाथरावाशी नवा ठराव केला त्यांतील व सुरतेंत तहनामा झाला त्यांतील कंपनी सरकारा विषयींचा जितका मजकूर होता, तितका बहूत करून सारिखाच होता. परंतु राघोबास राजप्रतिनिधी करण्या विषयीं इंग्लीश लोकांनी त्या तहनाम्यांत कलम पक्कें लिहून दिल्हें होतें. नवेंबरचे तेविसाव्या तारिखेस मुंबईहून पनवेलीस फौज जाण्याकरितां जाहजांत बसली, आणि डिसेंबरचे तेविसाव्या तारिखेस राघोबा व त्यांचा दत्तपुत्र अमृतराव यासुद्धां सर्व सैन्य घाट चढलें; परंतु त्यांचे मोदीखान्याचा बंदोबस्त बराबर झाला नव्हता, यामुळें चारकोस जमीन जाण्यास फौजेस अकरा दिवस लागले. मुंबईत तयारी होण्याकरीतां उशीर लागल्यामुळें, नानां फडनवीस व माहादजी शिंदे यांस फौज जमा करण्यास पुष्कळ सवड सांपडली. मागे लिहिलेल्याच कारणा साठीं, ह्मणजे पूर्वी दोन्न प्रधानांनी इंग्लिश सरकाराशी पुरंदरचा तहनामा केला त्यांत सखारामबापू होते, त्यामुळें त्यांस या प्रसंगीं कैदेंत ठेवणें हें अयोग्य वाटून त्यां-

शीं मिळवून घेतलें, तेव्हां सखारामबापू प्रधानकीचें काम करितात असें बाह्यत्कारीं दाखवित. फौजे संबंधीं मुख्य काम होतें, तें माहादजी शिंदे, हरीपंत फडके, व तुकोजी होळकर यांजकडे सोपून दिल्हें होतें; परंतु नानां फडनवीस यांस होळकराचा खरोखरी संशय होता, ह्मणून त्यांनी त्यास अशा अवस्थेंत ठेविलें होतें, कीं तो राघोबाकडे गेला असतां त्याचा नाशच व्हावा. इंग्लिश लोकांची फौज आल्यानंतर मराठ्यांचें सर्व सैन्य तळे गांवास गेलें.

सन् १७७९ चे सालीं जानेवारीचे नव्या तारिखेस इंग्लीश लोकांची फौज तळेगांवास येऊन पोहंचली, तेव्हां मराठ्यांचे फौजेने तीस अडथळा करण्याचें निमित्त केलें, परंतु ते लढाईचेच बेताने तयार होऊन आले, तेव्हां ते मार्गे हटले, व त्या गांवाचा नानां फडनवीसांचे हुकुमाने जाळून पोळून नाश केला. आणि कमीटीचे कानावर आलें, कीं शिंद्याने चिंचूर व पुणें जाळण्यास हुकूम दिल्हाआहे; हें वर्तमान कमीटीच्या कानावर आल्यावरून त्यांची सर्वस्वीं निराशा झाली, यास्तव रघुनाथराव याने इंग्लिशांस परत जाऊ नये ह्मणून पुष्कळ विनवणी केली, तरी त्यांनी परत जाण्याचा निश्चय करून जानेवारीचे अकराव्या तारिखेस सुमारें बारा घटिका रात्रीस फौज हळू हळू परत चालविली. इतक्यांत मराठ्यांचे फौजेने मोठ्या धैर्याने येऊन त्यांवर घाला घातला. इंग्लिशाचें लष्कर जानेवारीचे तेराव्या तारिखेस सुमारें वडगांव एथें येऊन पोहंचलें; तेव्हां इंग्लिशांची मनुष्यें इतकीं मारलीं गेलीं, कीं पुढें परत जाण्याची मुष्कल पडली. कमेटींतील सेक्रेटारी फार्मर साहेब यांस मराठी कारभाऱ्यांशीं बोलणें करण्याकरितां पाठविलें, आणि कारभाऱ्यांनी प्रथमतः रघुनाथराव यास आमचे स्वाधीन क-

रून द्यावें, असें बोलणें घातलें. त्याप्रमाणें इंग्लश लोकांनीहि कबूल केलें असतें, परंतु माहादजी शिंदे यांशी निराळा तहकरून कांहीं दिवसांनंतर रघुनाथराव, त्यांजकडे जाऊन मिळाले. यामुळें राघोबास मराठ्यांचे स्वाधीन करून देण्याची अपकीर्ति इंग्लिश लोकांकडे यावयाची होती तिचें आपोआप निवारण झालें. शिंदे आपल्या अधिकाराची बढती व्हावी ह्मणन यत्न करीत होते, ती न होऊं देण्याविषयीं नानां फडनवीस फार प्रयत्न करीत होते. तरी एकमेकांची एकमेकांस मराठ्यांचे राज्यांत इतकी गरज होती, कीं जरी एकेकाचे अंतर्यामींचे निरनिराळे संकेत होते, तरी ते या समयीं एक मताने वागत होते. पुण्यांतील कारभाऱ्यांमध्यें नानां फडनवीस आणि शिंदे यासमयीं खरोखरी मुख्य होते; त्यांनी माधवराव बल्लाळ मृत्यु पावल्यापासून जो देश मुंबई सरकारांनी घेतला होता तो सुरत आणि भडोंच यांचे वसुलासुद्धां मराठ्यांस परत देण्याविषयींचा तह करावा, असा कमीटीस आग्रह केला. कमीटीस वाटलें कीं परत देण्याचें आपल्याच्यानें होत नाहीं, ह्मणून त्यांनी संधी सांपडे तों पर्यंत कालानुरूप वर्तणूक करून फार्मर साहेब यांस सांगितलें, कीं तुह्मी कारभाऱ्यांस जाऊन सांगावें कीं, मुख्य सरकाराचे हुकुमाखेरीज आह्मास तहनामा करण्यास कोणताच अधिकार नाहीं. तेव्हां माहादजी शिंदे यांनीं त्यांस उत्तर देऊन विचारिलें, कीं तुह्मी पूर्वींचा तह कोणाचे हुकुमाने मोडिला तें सांगा? नंतर थोडा वेळ गेला नाहीं, इतक्यांत कमीटीने मिस्तर होमस यांस माहादजी शिंद्यांकडे कुल अखत्यारी देऊन तह करण्या करितां पाठविलें. याप्रमाणें शिंद्याशीं निराळें बोलणें घातल्यावरून त्यांस फार आनंद झाला. आणि त्यांचे मनांतन इंग्लिस लोकांशीं ज-

सा तहनामा करावयाचा होता, तसा त्याप्रमाणें केला, परंतु त्यास फार आनंद झाला असतांहि नाना फडनवीसांवर जो त्याचा दाब होता, तो कायम राहाण्याविषयीं त्याची शक्ति जितकी होती तितकी खर्चून त्यानें इंग्लिश लोकांस फसवलें. आणि तहनाम्यांत असें ठरविलें, कीं सन् १७७३ त मराठ्यांकडे जें जें कांहीं चालिलें होतें,, तें इंग्लीश लोकांनी परत द्यावें.

मिस्तर हार्नबी मुंबईचे गवर्नर हे बोलिले, कीं फेब्रेवारीचे पंधराव्या तारिखेस वडगांव एथें जो तह झाला, तो कमीटीस करावयास अखत्यार नव्हता; व त्यांनी मोठ्या मेहेनतीने एक चांगली याद तयार करून शेऱ्यासुद्धां कौन्सला पुढें टाकिली. तींत मराठ्यांचे मतलबी कारभाऱ्यांविषयीं, व इंग्लीश लोकांस पुढें कोणत्या रीतीने वर्तणूक करणें प्राप्त होतें, हें सर्व लिहिलें होतें. त्याच वेळेस फौजेची वृद्धि होण्याकारितां सर्व तयारी केली. गवर्नर साहेब यांचा मनोदय असा होता, कीं चहुंकडे शांतता करून फ्रेंच लोकांस माहाराष्ट्र देशांत येऊं नदेतां इंग्लीश सरकारचे ताब्यांत जो प्रांत आहे, तो काईम ठेवावा. गवर्नर साहेब यांस प्रमाणावांचून वाटलें, कीं शिंद्यांस फ्रेंच लोक अवडत नसतील, व तो नाना फडनवीसां विरुद्ध इंग्लीश लोकांशीं मैत्री करण्यास खुशी असेल. हार्नबी साहेब यांस असें वाटलें, हें केवळ खोटें होतें असें नाहीं, कारण नाना फडनवीस परदेशांतील अथवा आपल्या देशांतील लोकांचे साहायाने महा बलाढ्य जाहले असते, तर माहादजी शिंदा साहाय्याकरितां इंग्लीश लोकांकडे आला असता; व नाना फडनवीस मुख्यत्वेंकरून शिंद्यांचे आश्रयानेंच राज्यकारभार करीत होते, यास्तव शिंद्याने नानांस राज्य कारभारांत साहाय्य देणें जरूर होतें. याप्रमाणें सर्व बेत

मुख्य सरकाराकडे लिहून गेला. शिंद्यांशी दोस्ती करण्याविषयीं हार्नबी साहेब यांनी लिहिलें होतें, त्यावरून गवर्नर जनरल यांसहि वाटलें, कीं शिंद्याचे मनांतून गुप्तपणें इंग्लीश लोकांशीं लागून राहण्याचा कांहीं बेत आहे. यास्तव गवर्नर जनरल यांनी हार्नबी साहेबांचे मतास रुकार दिल्हा, ह्मणून जनरल गाडर्ड यांस हुकूम झाला, कीं शिंदा जर कोणत्या वेळेस कंपनी सरकाराशी दोस्ती करावयास खुशी होईल तर त्यांशी निराळा तह करावा. लढाई केल्याने आतां नाना आपल्या अधिकारा खालीं राहातील, असें शिंद्यांस वाटलें; व त्यांचा वकील इकडे मुंबई सरकारास थापा देत होता, कीं शिंद्यांचे लक्ष्य इंग्लीश सरकाराविषयीं फार चांगलें आहे. इतक्यांत शिंद्यांचे सांगण्यावरून बानकोटावर इंग्लीश लोकांचा द्वेष वाढवावा, व त्यांशीं लढाई करावी, याबुद्धीने घाला घातला. नाना फडनविसांवर आपला अंमल जास्ती बसावा ह्मणून, शिंद्यांने रघुनाथरावास बुंदल खंडामध्यें बारा लक्ष रुपयांची जाहागीर द्यावी असें ठरविलें, आणि त्याबद्दल नानांकडून आपली निशा राघोबास देवऊन, पुनः सरकारास उपद्रव देणार नाहीं, याविषयीं राघोबा कडून नानांस आपण जामीन झाला. याप्रमाणें राघोबास त्याने आपल्या ताब्याखालीं आणिलें. परंतु राघोबा सर्वांचा नावडता होता, यामुळें तो त्यांचे ताब्यांत राहिला तरी तो उच्चत्व पावला नाहीं. नाना फडनवीस हे कदाचित् शिंद्यांने ज्या माणसांची संगति धरण्यास अयोग्य अशा मनुष्यांची संगत धरिली, तेणेंकरून सर्व राज्यकारभार परमुलखांतील लोकांचें हातांत जाण्याचे संकट प्राप्त होईल ह्मणून आंतून खुष झाले असतील. जाहागीरीचा बंदोबस्त झाल्यानंतर थोडे दिवसांनी बुंदेलखंड एथें राघो-

वास त्यांचे जाहागिरीवर पाठविण्याचे निमित्ताने नाना फडनवीस यांस वाटल्याप्रमाणें झांशीचे किल्ल्यामध्यें शिंद्यांचे सोईस येऊन तो त्यांस ह्मणजे राघोबास सोडवी, तों पर्यंत कैदेंत ठेवण्याकरितां पाठविलें. परंतु राघोबा बरोबरचा नेहेमीचा पाहारा व त्याच्या बरोबरच्या तोफा त्यांस नेऊं न देतां त्यांचे पाहाऱ्याकरितां नवे शिपाई पाठविले, ते त्यांचे जातीचे लोकांपेक्षां जास्ती नव्हते. राघोबा मे महिन्याचे शेवटीं नर्मदे जवळ येऊन पोहंचले, इतक्यांत शिंद्यांने त्यांस झांशीचे किल्ल्यांत टाकण्याचा बेत केला, असें त्यांस गुप्तपणें कोणी सुचविल्यावरून त्यांनी संधी पाहून बरोबर पाहरा दिल्हा होता, त्याजवर घाला घालून त्याची दाणादाण करून जरी इंग्लीश लोक आपणास सहाय्य देतील अशी त्यांची खातरी नव्हती, तरी ते मोठ्या त्वरेने इंग्लिशांचे पायां पडण्याकरितां भडोचकडे पळून गेले.

शिंद्यांने राघोबास हें समजाऊन सांगीतले नाहीं तरी शिंद्याने सर्व कापट्य केलें, यांत संशय नाहीं, असें झाल्याने इंग्लिशांचें व नाना फडननीसांचें वाकडें आलें, तरी दोन्ही पक्ष्यां कडून शिंद्यांचा फायदा झाला; व येणेंकरून नानांचा व इंग्लिश लोकांचा फार द्वेष वाढून नानांस जास्ती भय झालें यामुळें नाना आगदीं शिंद्यांस अवलंबून राहिले. *

नाना फडनवीस यांस त्यांचे शत्रू सखाराम बापू आणि चिंतो विठ्ठल ह्मणून एक वेळ राघोबाचे कारभारी झाले होते, हे दोघे शिंद्या कडून बळी मिळाले तेणेंकरून शिंद्यांचें नानांशीं पहिल्यापेक्षां जास्ती सख्य झालें, केवळ तेणेंकरून असें नाहीं, परंतु शिंद्यांने त्यांस नानांचा संतोष करण्याकारितां त्यासमयीं दिल्हे,

यावरून तो जाग्या मोठा धूर्तच, तेव्हां त्याने राघोबास पळून जाण्यास साहाय्य दिल्हें असें दिसतें. नानांनी सखाराम बापूस फार त्वरेने सिंहगड एथें नेलें, आणि तेथून एकाएकीं नेऊन प्रतापगडावर टाकिलें. ही गोष्ट पाहिली आसतां मोठा विचार उत्पन्न होण्याजोगी आहे. या वृद्ध पुरुषाने दुःख, संकट, वैभव, संपदा, जय, श्रम, इत्यादि सर्व भोगले, जसें एकाद्या मोठ्या राज्यामध्यें कारभाऱ्यांस व फौजेंतील पुढाऱ्यांस भोगावें लागतें, त्याप्रमाणें भोगून ज्या किल्ल्यांत त्यास कैदेंत ठेविलें होतें, त्या किल्ल्याचे पश्चिमेचे बाजूचा चार हजार हात खोल, काळा, उंच, नीच, भयंकर, असा खडक, व त्यावरील चमत्कार या सारिख्यां पुरुषांस पाहावयास फार अयोग्य असा त्यांस पाहावा लागला. प्रतापगडापासून फार दूर पूर्वेकडे त्यांनी एक जागा पाहिली, तेथें एकशें वीस वर्षांचे पूर्वीं त्यांचे पूर्वज दत्तोजी गोपीनाथ वकील यांनी शिवाजी राजे यांजपाशीं खोटी शपथ वाहून अपला धणी अफझूलखांन दग्याने शिवाजी कडे नेला, तेव्हां शिवाजीनें त्याचें पोट वाघनखांनी फाडून त्यास ठार मारिलें. सखाराम बापू प्रतापगडांत मेले नाहींत, कारण नाना फडनवीस यांचा त्यांशी फार द्वेष होता, ह्मणून त्यांस पळून जाण्यास किंवा बंड करण्यास संधी सांपडूंनये या उद्देशाने एक्या जाग्याहून दुसऱ्या जाग्यास नेत असत. असें होतां सखाराम बापू, ज्यांचे हातांत पूर्वीं मोठा अधिकार व सत्ता होती, ते मोठ्या विपत्तींत रायगड एथें मृत्यु पावले; व चिंतो विठ्ठल यांस दुर्भक्ष्य अन्न देऊन अयोग्य रीतीने वर्तविलें, यामुळें ते एक्या लाहानश्या किल्ल्यांत मृत्यु पावलें.

राघोबा इंग्लीश लोकांकडे पळून गेला तेव्हां इंग्लीश लो-

कांनी त्याची भेट घेतली, ती प्रथमतः केवळ खुशीने घेतली असें नाहीं. जून महिन्याचे बाराव्या तारिखेस त्याचे पुत्र अमृतराव, व बाजीराव, हे चार वर्षांचे वयाचे होते, त्याउभयतांस बरोबर घेऊन ते जनरल गाडर्ड साहेब यांचे छावणींत त्यांस भेटावयास आले, तेव्हां त्यांनी राघोबास दरमाहा पन्नास हजार रुपये नेमणूक करून दिल्ही. ही नेमणूक गवर्नर जनरल आणि कौन्सल यांच्या अगदी मनास आली नाहीं. जनरल गाडर्ड साहेब राघोबाशीं एकादा पक्का ठराव सरकार हुकुमाखेरीज न करण्यास फार हुशार होते, परंतु राघोबा मराठ्यांचे राज्यांत सर्व प्रजेस नावडता होता, त्यास पुनः बलात्काराने राज्यावर बसविणें हें फार अयोग्य असें वाटलें, यास्तव दुसरे कांहीं ठराव न केल्यास पुरंदरचे तहनाम्याप्रमाणें वर्तणूक करून इंग्लीशांस आपल्या स्वदेशाचा लौकिक राखण्याकरितां लढाईमध्यें मुख्याप्रमाणें राहाणें प्राप्त झालें. जनरल गाडर्ड साहेब आणि नाना फडनवीस यांचे तहाविषयीं कित्येक महिने बोलणें चाललें होतें. परंतु पावसाळा संपल्यानंतर मराठ्यांचे राज्यांतील हैदर अल्ली व निजामअल्ली व सर्व मराठे लोक इंग्लीश लोकांवर बंड करून त्यांचे तीन्हीं खात्यांवर ह्मणजे, मुंबई, बंगाला, आणि मद्रास, यांवर घाला घालनार असें वर्तमान जनरल गाडर्ड यांनी ऐकिलें तें मुंबई सरकारास विदित केलें. हें वर्तमान पोहंचण्याचे पूर्वी जनरल गाडर्ड यांनी नाना फडनवीस यांस काय तो निखालस जाब विचारिला. तेव्हां त्याचें उत्तर उशीराने येईल असें त्यांस वाटलें होतें, परंतु तें लौकरच येऊन पोहंचलें. त्यांत लिहिलें होतें, कीं इंग्लिश लोक कोणत्याही गोष्टी विषयीं मराठे सरकाराशीं तहनामा करावयास इछीत असल्यास त्यांनी प्रथमतः साष्टीचें ठाणें

व राघोबा यांस आमचे स्वाधीन करावें.

जनरल गाडर्ड यांस नानां फडनवीसां कडून असें उत्तर आल्यावरून ते तत्क्षणीं मुंबई सरकाराने फत्तेशींग गायकवाड यांशी साहाय्याविषयीं दोस्ती करावी, हें मुंबई सरकारास सांगण्याकरितां जावयास निघाले, आणि नोवेंबरचे पहिल्या तारिखेस ते तेथें येऊन पोंहचले. फौजेस कांहीं कुमक पाठवून द्यावी, हा त्यांचा मुख्यत्वें करून हेतू होता. मुंबई सरकाराने त्यांचे ह्मणण्याप्रमाणें कर्नल हटली याचे हाताखाली फोज देऊन त्यांस त्वरेने गुजराथेकडे जाण्यास जहाजांत बसवून पाठवून दिल्हे. जनरल गाडर्ड यांनी सुरतेंत परत आल्यानंतर नाना फडनवीसांचे वकील होते, त्यांस निरोप दिल्हे आणि आपल्या फौजेची तयारी करून फत्तेशींग गायकवाड यांशीं बोलणें घातलें. फत्तेशींग यांस इंग्लिश लोकांच्या ठरावा विषयींचे कागद पत्र येऊन पोहंचल्यानंतर त्याने गोष्ट लांबणीवर टाकून इंग्लिश लोकांशीं पक्का ठराव करावयाचें मनांत नाहीं असें दाखविलें. जनरल गाडर्ड हे त्यामुळें सन् १७८० त जानेवारीचे पाहिल्या तारिखेस आपली फौज चालती करून उत्तरेकडे निघाले. गुजराथेवर जे जे चढाव झाले, त्यां विषयींचें कथन करण्याची गरज नाहीं. परंतु फेब्रेवारीचे पंधराव्या तारिखेस मोठ्या धैर्याने घाला घालून, गुजराथेंतील मुख्य गादीचें ठिकाण घेतलें हें लिहितों. राघोबा बंदींतून पळून गेल्यावर काय काय वर्तमान घडण्यांत आलें, त्याविषयीं आतां कथन करितों. राघोबा कैदेंतून पळून गेल्यावर नाना फडनवीस, आणि शिंदे या दोघांमध्यें कांहीं वांकडें आलें, परंतु लौकरच त्यांचा एकोपा झाला. व महादजी शिंदे यांचे मनांतून त्यावेळेस पुणें सोडून जावें असें नव्हतें, तरी नाना

फडनवीस त्याचे आटोक्याखालीं होते. त्यास इंग्लिश लोकांकडे आपण जाऊन मिळतों, असें भय घालून शेवटी शिंदा गुजराथेमध्यें जनरल गाडर्ड साहेब यांस अडथळा करावयास जाण्यास कबूल झाला. शिंद्याने पुढें ज्याज्या गोष्टी केल्या, त्यांची नानांस इत्थंभूत बातमी लागली; याची वाचनारांस सुचना देतों. नानांचा व शिंद्याचा तंटा होणार अशी गप्प उडाली होती, व पुढें शिंदे मोठा आट्टाहास करून सुरतेवर घाला घालून पुनः राघोबास आपल्या ताब्यांत ठेवण्याकरितां यत्न करणार अशी ही दुसरी लागलीच गप्प उडाली.

त्यासमयीं रघुनाथराव सुरत शहरांत होते तों जनरल गाडर्ड हे संग्रामास आले. माहादजी शिंदे यांस या गोष्टीचें कारण कळलें नाहीं, परंतु तो कांहीं एक बेत करीत होता तो विसकटला. फेब्रेवारीचे एकुणतिसाव्या तारिखेस शिंदेहि लढाईंत आले. तरी कांहीं शत्रुत्व न दाखवितां जय मिळवावा, या बेताने इंग्लिश लोकांशी लढाई न करितां त्यांशीं माझें फार मित्रत्व असें तो प्रसिद्धपणें बोलिला. सुरतेमध्यें तह झाला तेव्हां इंग्लिश लोकांनी दोन साहेब लोक वोलीबद्दल शिंद्यास दिल्हे होते. त्यांचा फार आदर सत्कार करून त्याने वागविले होते, ते यासमयीं पुनः परत दिल्हे. तेव्हां ते दोघे मार्च महिन्याचे नव्या तारिखेस जनरल गाडर्ड यांकडे येऊन मिळाले. ही मोठी उपकाराची गोष्ट झाल्यानंतर आबाजी साबाजी या नामेकरून एक वकील, माझे धन्याची इंग्लिश सरकाराशी फार दोस्ती आहे, व ते नाना फडनवीसांशी फार वांकडे आहेत, कारण कीं माझे धन्याशीं नाना फडनवीस यांनी मोठी कृतघ्नता व फितूर केला असें येऊन बोलिला. परंतु जनरल गाडर्ड यांशी शिं-

द्या दोस्ती करण्याकरितां उत्सुक होता, ती दोस्ती त्याने खरोखरी इछिली असती तर तेणेंकरून त्यास मोठा फायदा झाला असता. परंतु जेव्हां शिंद्या इंग्लिश लोकांशीं दोस्ती विषयीं बोलणें करू लागला. तेव्हां जनरल गाडर्ड यांनी अमुक ठराव न करितां त्यांस उत्तर दिल्हें, कीं इंग्लिश सरकाराची आपणांशीं फार दोस्ती आहेच, आणि एक्या तहनाम्यांतील कलमांचे ठराव व्हावयाचे होते, त्याविषयीं त्यांनी शिंद्याकडे संपवून दिल्हें, कारण शिंद्याने असा ठराव करावा कीं जेणेंकरून दोघांस फायदा व्हावा, कां कीं इंग्लिश सरकार हिंदुस्थानांत याच हेतूने आले, कीं देशामध्यें चहुंकडे सदोदित स्वस्थता पक्का ठराव करून करावी, आणि त्या ठरावाने व बंदोबस्ताने इंग्लिश सरकारचे अबरूस कांहीं धक्का लागूंनये.

शिंद्याचा हेतु होता कीं तहनाम्या विषयीं बोलण्यामध्यें वेळ घालवून उघाडीचे दिवसांत जनरल गाडर्ड यांस गैरसावध ठेवावें, परंतु इंग्लिश लोकांचा सत्यवादीपणा काळ्या लोकांचे कपटी स्वभावास खालीं आणील, यांत कांहीं संशय नाहीं. जनरल गाडर्ड हे शिंद्यांस सल्ला करण्याविषयीं बोलिले, तेव्हां त्यांचे मनांतून खरोखरी सल्ला करावयाचा होता. परंतु अमुक दिवसांमध्यें सल्ल्याविषयीं बोलणें संपलें पाहिजे असें त्यांनी सांगितलें; व शिंद्यांचे कारकून इंग्लिश सरकारची छावणी सोडून गेल्यापासून तीन दिवसांत शिंद्याने सल्ल्याविषयींचें बोलणें ठरवावें, असें केलें त्याप्रमाणें मार्चाचे सोळाव्या तारिखेस वकिलाने येऊन पुढें लिहिल्याप्रमाणें कलमें आपल्या धन्याकडून आणून जनरल गाडर्ड यापुढें टाकिलीं. तीं अशीं कीं पूर्वी इंग्लिश सरकाराची फौज मुंबईस परत गेल्यानंतर राघोबा तळेगांव एथें होतें तेव्हां माझ्या

व त्यांचा कांहीं ठराव झाला आहे. आणि आह्मी दोघांनी एकमेकांस करारनामे लिहून दिल्हे, कीं ठरलेल्या कराराप्रमाणें दोघांनी चालावें. तेव्हां **राघोबाने** असें कबूल केलें होतें कीं पुण्यांतील राज्याविषयीं जे माझे दावे आहेत ते मी सोडून देतों, व मला दर वर्षास बारालक्ष रुपयांची नेमणूक करून द्यावी, ह्मणजे मी झांशीकडे जाऊन राहीन, व नाणें होणें तें धाकटे पेशवे **माधव नारायण** यांचे नांवाने व्हावें, आणि **बाजीराव राघोबाचे** पुत्र यांस पेशव्यांची दिवाणगिरी द्यावी. परंतु **बाजीराव** दिवाणगिरीचें काम करण्यास अगदीं अल्पवयी चार वर्षांचे होते, यामुळें दिवाणगिरीचें कामकाज **शिंद्यांनी** करावें असें ठरविलें. यास्तव **शिंद्यांनी जनरल गाडर्ड** यांशीं बोलणें घातलें, कीं **राघोबाने** झांशीस जावें व त्याचा पुत्र **बाजीराव** याने माझे बरोबर पुण्यास यावें. परंतु **शिंद्यांनी** इंग्लिश लोकांविषयीं कांहीं न ठरवितां **जनरल गाडर्ड** यांजकडे इंग्लिश लोकांविषयीं सर्व बोलणें ठरविण्याचें सोंपविलें. तेव्हां **जनरल गाडर्ड** यांनी जेंजें अयोग्य दिसलें त्यास प्रतिबंध केला, आणि बोलिले, कीं **राघोबाचे** मनांत नसल्यास त्यांजवर जुलूम करावयाचा नाहीं, व **राघोबाने** इंग्लिश लोकांचा आश्रय केला आहे, तो जर त्याने सोडिला तर त्याची खुशी; आणि जरी इंग्लिश लोकांनी **शिंद्यांस** पुण्यांतील सर्व राज्यकारभाराची अखत्यारी दिल्ही, तरी **शिंद्यांनी** आपल्याकडून पेशव्यांचे नांवाने इंग्लिश लोकांस फायदा होईल असा ठराव करावा. याप्रमाणें **शिंद्यांचे** मनांतून जितके महिनेपर्यंत हें बोलणें लांबवून **नाना फडनवीस** हे भित्रे, व मत्सरी यांचें व इंग्लिश लोक जे कडक, व विश्वासु, व सुस्वभावाचे यांचें झुंज लावावें असें होतें, तें तहनाम्याचें बोलणें तितकेच दिवसांत ह्मण-

जे सात दिवसांत संपलें. **महादजी शिंदे** इंग्लिश सरकाराशीं आमची दोस्ती आहे असें बोलून दाखवीत, परंतु जेव्हां त्यांस वाटलें, कीं **जनरल गाडर्ड** फसणार नाहींत, तेव्हां त्याने **फत्तेशिंग गायकवाड** यांशीं बोलणें घातलें. **जनरल गाडर्ड** यांचे मनांतून त्या समयीं कसेंहि करून लढाई करावयाची होती, ती मराठे लोकांनी मोठ्या मसलतीने टाळिली, तरी शेवटीं एप्रेलचे तिसऱ्या तारिखेस पवनगड एथें लढाई झाली, तेव्हां त्या लढाईंत मराठे लोक जिंकले गेले. **जनरल गाडर्ड** यांस वाटलें कीं **शिंद्यांची** पाठलाग करीत जाणें हें ठीक नव्हे. ह्मणून त्यांनीं **कर्नल हर्टली** यांस कोंकणांतील फौजेस कुमक पाठविण्याकरितां हुकूम केला.

मुंबईतील राहाणारे लोक बहुतकरून शेजारच्या देशांतील धान्यावर निर्वाह करीत असतां मराठे लोक मुंबईत धान्य जाऊं देत नसत. त्यांस मनाई करून अन्नाची बेगमी मुंबईत येण्याजोगी तजवीज व्हावी ह्मणून इंग्लिश लोकांनी प्रथमतः सर्व नाक्यांवर चौक्या ठेवून कल्याण ह्मणून जें **नानांचें** आवडीचें मुख्य ठाणें होते तें घेतलें. ह्मणून तें परत घेण्याकरितां व इंग्लिश लोकांस या द्वीपांतून हांकून देण्याकरितां **नानांनी** मोठें सैन्य जमा केलें. घाटावरील एका ठाण्यावर हल्ला करून तें घेतलें; आणि मराठ्यांस सिद्धी झाली, तेणेंकरून त्यांस गर्व होऊन ते कल्याणावर चढाव करून गेले, तेव्हां तें इंग्लिश लोकांनीं शर्तीने वांचविलें. दैवयोगाने **कर्नल हर्टली** हे मे महिन्याचे पंचविसाव्या तारिखेस येऊन पोहंचले त्यांनी मराठ्यांचे फौजेवर अवचित घाला घातला. तेव्हां मराठ्यांचे फौजेने कोंकणांतून परत जाऊन इंग्लिश सरकाराचे फौजेस उघडकिचे बाकीचे दिवसांत कांहीं त्रास दिला नाही.

**जनरल गाडर्ड** हे त्यावेळेस पुढील पावसाळ्यामध्यें आपली फौज सुरक्षित ठाण्यामध्यें ठेवावी, ह्मणून नर्मदेकडे गेले. पाऊस पडूं लागला तेव्हां कोंकणांत लहान लहान टोळ्यांनीं इंग्लिश लोकांचे सर्व ठाण्यांस त्रास देण्याकरितां मराठे लोक आले, परंतु त्यांस मोठी सिद्धि झाली नाहीं.

पाऊस उघडल्यानंतर **जनरल गाडर्ड** यांनी जाहजांतून आपली फौज खालीं साष्टी कडे आणिली, व वसई घेण्याकीरतां तिच्या भोंवताला वेढा घातला. नवेंबरचे तेराव्या तारिखेस वसईच्या समोर येऊन पोहंचले. खंदक खणून नवेंबरचे अठाविसाव्या तारिखेस पहिला मोर्चा तयार झाल्यानंतर डिसेंबरचे अकराव्या तारिखेस वसई हातास आली. **नाना फडनवीस** व **हरीपंत फडके** यांनी कोंकणपट्टी परत घेण्याकरितां, व तेथून इंग्लिशांस हाकून देण्याकरितां यत्न करून डिसेंबरचे दाहाव्या तारिखेस त्यांचें सर्व सैन्य वीस हजारापेक्षां जास्ती होतें त्यासुद्धां त्यांनी मुंबईचे फौजेवर पुढल्या बाजूने व मागल्या बाजूने हल्ला केला. परंतु प्रत्येक वेळेस इंग्लिश लोकांनी तो परतविला. जानेवारीचें बाराव्या तारिखेस त्यांनी पुनः इंग्लिशांवर हल्ला केला, तेव्हां इंग्लिश लोकांनी त्यांचें पुष्कळ सैन्य ठार मारिलें; व त्यांचे पुढाऱ्यांपैकीं मुख्य दोन धैर्यवान् पुढारी पडले. तेव्हां आपलें सैन्य फार मेलें, व मोठाले दोन कामगार पडले यादुःखाने मराठे परत आले. इंग्लिशांनी वसई घेतली, व कोंकणांत मराठ्यांचे फौजेचा पराजय केला, तेणेंकरून **नानांचे** अंतःकरणास ही गोष्ट फारच लागली. बंगाल्याहून नव्वे अकटोबरचें पत्र मुंबई सरकारास पाठविलें, ते डिसेंबरचे तेराव्या तारिखेस येऊन पोहचलें. त्यांत मुंबई सरकारास बंगाल सरकारांने आपला बेत कळविला, कीं पेशव्यांकडून लढाई बंद करि-

वर्तो असें पत्र आलें आहे, यास्तव तुह्मी त्यांशीं सल्ला करावा, परंतु ते याप्रमाणें लिहून पाठवीत तोंपर्यंत तुह्मी लढाई मोठ्या धैर्यानें चालवावी. इतक्यांत कर्नल वेल्सली यांस हैदर अल्लीनें जिकलें, असें वर्तमान येऊन पोहंचले. तेव्हां असें ठरले, कीं पेशव्यांकडून कांहीं खातरी होण्याजोगा ठराव होई तोंपर्यंत लढाई चालूं द्यावी. यास्तव जनरल गाडर्ड हे जानेवारीचे अठराव्या तारिखेस अर्नेलचा किल्ला खालीं करून घेऊन खेडीकडे गेले. हरीपंत त्यावेळेस कोंकणांत होते ते पुण्यास माघारे आले, परंतु बोरघाटांत पाहारा ठेवून गेले. त्या घाटावर बंगालचे फौजेंतील थोड्याशा फौजेने मोठ्या धैर्यानें घाला घालून फेब्रेवारीचे अठराव्या तारिखेस तो घाट सहज घेतला. नंतर या फौजेचा खंडाळा एथें तळ पडला, तेथें मोठें सैन्य येऊन त्यांस मिळालें. तरी जनरल गाडर्ड छावणी सहीत घाटाखालीं होतेच.

ही फौज पाहून नाना फडनविसांस कांहीं भय वाटलें नाहीं, कारण कीं जरी ते जात्या भित्र्या स्वभावाचे होते, तरी राज्य कारभार मोठ्या चतुराईनें व शाहाणपणानें करण्यांत फारच हुशार व धीट होते. यांप्रमाणें बहुत करून ब्राह्मण लोकांमध्ये धैर्यवान् असे क्वचित्. इंग्लिश लोकांची फौज घाटावर चढून गेल्यामुळें नानांस भय वाटून त्यांनी इतकेंच केलें, कीं फौज वाढविण्या विषयीं फार यत्न करून देश ओसाड करून धूळधाणीस मिळवावा व पुण्याचा नाश करावा याहेतूनें मोठी तयारी केली. नाना फडनवीस यांनी आपल्या वकीलास कोणत्या गोष्टीची अखत्यारी न देतां इंग्लिश लोकांशीं तहाविषयीं बोलणें करण्याचे निमित्तानें जनरल गाडर्ड यांस फसविण्याकरितां उगीच पाठविलें. तेव्हां हैदरानें अर्स्काटावर घाला घातला हें वर्तमान येण्याचे पूर्वी गवर्न-

र जनरल यांनी अकटोबर महिन्यामध्यें मुधोजी भोसले यांजकडून आमुक गोष्टीचा ठराव करून घेतला होता, व जो ठराव पुढे मोडला त्याविषयीं नानांचे वकीलांशीं जनरल गाडर्ड यांस बोलणें करणें भाग झालें. परंतु नानांनी मला तो ठराव ठाऊक नाहीं असें निमित्त केलें; त्यावरून जनरल गाडर्ड यांनी पूर्वी जो तहनामा झाला होता, त्याची एक नक्कल पाठवून दिल्ही. तेव्हां नानांनी तीहि अगदीं नाकारली. नाना बोलिले कीं तुह्मी ही नक्कल पाठविली याप्रमाणें आह्मी कबूल करित नाहीं, व आतां नवीन ठराव करणें तो मराठे सरकारचा मित्र हैदर अल्ली हा त्यांत असल्या शिवाय आह्मी करूं शकत नाहीं. हैदर अल्लीने सपटेंबरचे दाहाव्या तारिखेस कर्नल बेली यांचे फौजेवर घाला घालून त्याचे फौजेचा नाश केला होता. यावरून इंग्लिश सरकारांनी हैदर अल्लीस ठरावांत घेण्यास सहजच नाकारलें. नाना जातीने बोलिले तें पुढें लिहितों.

ठराव झाला त्याची नक्कल आपण पाठविली तीमी आरंभापासून शेवटपर्यंत सविस्तर वाचिली, तींत लिहिलेलीं कलमें मराठे सरकारास मान्य करण्याजोगीं नाहींत. जर तुह्मी मराठी सरकारचे खरोखरी मित्र आहां, तर या समयीं जे मराठे सरकाराशीं लागून आहेत, अथवा जे त्याचे मित्र आहेत त्यांस बोलण्यांत घेणें आपणास आवश्यक आहे. ही गोष्ट जनरल गाडर्ड यांचे विचारास आली नाहीं, परंतु सर ऐरकूट जे त्या वेळेस मद्रास खात्याचे गवर्नर होते, त्यांनी जनरल गाडर्ड यांजकडून ती मान्य करविली.

नाना फडनवीस यांनी सात वर्षांचे धाकटे पेशवे यांस पुरंदरावर पाठविलें, आणि हरीपंत फडके व तुकोजी होळकर

यांस मोठी फौज होती तिजवर नेमून ती बरोबर घेऊन आपण घाटाखालीं गेले. आणि **परशुवरामभाऊ पटवर्धन** यांज बरोबर बारा हजार मनुष्यें देऊन त्यांस **जनरल गाडर्ड** यांचे फौजेस दुःख देऊन मुंबईचा रस्ता बंद करावा ह्मणून सांगून कोकणांत पाठविलें. इंग्लिश सरकारची फौज व मराठे सरकारची फौज यांच्या लढाया झाल्या त्यांविषयीं वर्णन करण्याचें कारण नाहीं, परंतु सालबाई एथें जो तहनामा सन् १७८२ मध्यें मे महिन्याचे सत्राव्या तारिखेस इंग्लिश सरकार ह्मणजे ईष्ट इंडिया कंपनी यांजकडून **मिस्तर डेवीड आंडरसन** यांनी आणि मराठे यांजकडून **माहादजीशिंदे** व **नाना फडनवीस** आणि सर्व मुख्य कामदार यांनी केला, त्याविषयीं लिहितों. **माहादजी शिंदे** यांस पेशव्यांकडून कुल अखत्यारी होती, या तहनाम्यामध्यें सतरा कलमें होतीं, त्यांत एक कलम होतें, कीं **रघुनाथराव** यांस पंचवीस हजार रुपये दरमाहा द्यावे आणि जेथें त्यांची खुशी असेल तेथें त्यांस राहूं द्यावें. हा तहनामा जून महिन्याचे साहाव्या तारिखेस कलकत्ता एथें मुकरर झाला. परंतु मराठ्यांकडील मान्यता **नाना फडनवीस** यांनी डिसेंबरचे विसाव्या तारिखेपर्यंत पुढें लिहिण्यांत येतील त्याकारणांकरितां तहकूब करून तो तहनामा मुकरर केला नाहीं. व एकमेकांकडून एकमेकांस तहनामे द्यावयाचे होते, ते सन् १७८३त फेब्रेवारीचे चोविसाव्या तारिखेस दिल्हे.

जेव्हां या तहनाम्याची मान्यता मराठ्यांकडून लांबणीवर पडली तेव्हां गवर्नर जनरल, आणि कौन्सल यांनी वडगांव एथें इंग्लिश सरकारची फौज आली होती, त्यावेळीं **शिंद्यांनी** तिचा नीट बंदोबस्त ठेविला होता, ह्यामुळें व त्यानी इंग्लिश सरकारांतून जे साहेब लोक ओली करितां ठेविले होते, त्यांशीं दया-

लू पणाची वर्तणूक करून ते परत दिल्हे, यामुळें भडोच हा अमूल्य परगणा शिंद्यांस द्यावयाचें ठरविलें. सालबाई एथें तहनामा झाला त्याचा शेवट होऊन मराठे यांकडून त्याजवर मान्यता पडून मुकरर होई तोंपर्यंत फार दिवस गेले याचें, व त्यावेळेस त्यांत नाना फडनवीस होते ह्मणून त्या विषयींचें वर्णन करणें; व मराठ्यांचे राज्यांतील मुख्य मंडळीनें अशी वर्तणूक कां केली, याचीं कारणें उघड करणें प्राप्त आहे. माहादजी शिंदे आणि नाना फडनवीस यांचा द्वेष दिवसानुदिवस जास्ती वाढला, व माहादजी शिंद्यांचे मनांतून आपलें जातीचें स्वतंत्र राज्य करावयाचें होतें. या दोघांचेहि मनांतून सर्व मराठ्यांचे प्रजेवर आपला अधिकार व्हावा असें होतें, तरी दोघेहि इंग्लिश सरकाराशीं लढाई चालिली होती त्याप्रसंगी द्वैतभाव न दाखवून राज्यांत फुटाफूट न करण्याविषयीं शाहाणे होते. मराठे सरकाराची इंग्लिश सरकाराशी लढाई चालिली होती, त्यामुळें नाना फडनविसांचा अमल, अधिकार, व अबरू जास्ती वाढली, व शिंद्यांची कमी झाली. सालबाईचा तहनामा झाला तेव्हांच त्याचें नशीब त्याजवर फिरलेंसें दिसतें, तरी त्याने मराठ्यांचे राज्यांत ज्या रीतीनें गोंवला गेला होता, त्यापासून तुटक न राहिलों असें दाखविलें नाहीं, आणि स्वतंत्र राज्यस्थापना करावी असा जो त्यांचा मोठा हेतू होता, तो सिद्धीस नेला. शिंदे व नाना फडनवीस हे दोघे चहूंकडे शांतता व्हावी ह्मणून उत्सुक होते, तरी एकमेकांचा अधिकार व सत्ता वाढण्याचा प्रसंग आला ह्मणजे तो मोडावा, असा प्रत्येकांनीं गुप्त संकल्प ठेविला होता. नाना फडनवीस यांनी पूर्वी नर्मदेचे दक्षिणेस मराठ्यांचे प्रांत होते, ते परत घेण्याचा निश्चय

केला. व शिंदेहि हिंदुस्थानांत मराठ्यांचे प्रांतावर आपल्या अधिकाराचें व सत्तेचें पुनः स्थापन करण्याविषयीं उन्मुक होते. हैदर अल्ली आणि इंग्लिश सरकार यांची लढाई होऊं लागली त्याचे पूर्वी सालबाईचे तहनाम्यांतील कलमें मराठे लोकांस जितकीं हितकारक होतील अशीं वाटलीं नव्हतीं त्यांपेक्षां त्यांस जास्ती हितकारक झालीं, तरी इंग्लिश लोकांशीं या तहनाम्याविषयीं बोलणें व ठराव झाले त्यांमध्यें शिंदे मुख्य होते, ह्मणून नाना फडनविसांस मत्सर उत्पन्न होऊन, कांहीं दिवस हा तह लांबणीवर टाकिला, ह्मणजे साष्टी हें ठाणें इंग्लिश लोकांपासून परत येईल असें त्यांस वाटलें, व इंग्लिश सरकारास जे कागदपत्र जात त्यांत नाना असें दर्शवीत, कीं हैदर अल्लीची व आमची फार दोस्ती आहे. इकडे हैदर अल्लीचे वकीलांस सालबाईचे तहनाम्याने आपण कृतकार्य झालों असें दर्शवून नानांनी त्यांस सांगीतलें, कीं मराठ्यांचे परगणे कृष्णा नदीचे दक्षिणेस आहेत ते तुह्मी परत दिल्हे तर मात्र पेशवे सालबाईचा तहनामा सिद्धीस नेणार नाहींत, व तुह्मांस मदत देतील; परंतु परत न दिल्हे तर पेशवे इंग्लिश लोकांकडे जाऊन मिळून तुह्मांवर चालून येतील. नानांचे पुढले संकेत असे होते, कीं लांबणीवर टाकिलेला तहनामा मुकरर होऊन पक्का झाल्यास हैदर अल्लीशीं लढाई करावी, व इंग्लिश लोकांस त्या लढाईत न घेतां निजाम अल्लीशीं दोस्ती करून निजाम अल्लीनी व आपण मिळून हैसूरचे राज्यावर घाला घालावा असा निश्चय केला. शिंद्यांचे प्रकरण हिंदुस्थानांत एकाएकीं मोठें वाढलें व शिंदे मोठ्या अधिकारास चढत असतां, इंग्लिश लोक सहनशीलतेने कांहीं न बोलतां उगेंच राहिले, ह्याचीं कारणें समजण्याजोगीं विस्तार पूर्वक लिहिणें प्राप्त

आहे. मल्हादजीशिंदे यांनी जनरल गाडर्ड यांजवर गुजराथेंत स्वारी केली त्याचेपूर्वी इंग्लिश लोकांवर बंगाल्यामध्यें घाला घालावा असें त्यांनी ठरविलें होतें, परंतु शिंद्यांचेच प्रांतावर जेंव्हां हल्ला झाला, तेव्हां त्यांनी पेशव्यांशीं बोलणें केलें, कीं तुकोजी होळकर यास साहस कर्मांत साहाय्य देण्यास पाठवावें, या बेतास प्रथमतः जनरल गाडर्ड पुनः परत येतील, अशी खात्री होई तोंपर्यंत नानांनी प्रतिबंध केला, परंतु पेशव्यांपासून तुकोजी होळकरास पाठविण्या करितां भय पावले. हें जनरल गाडर्ड परत माघारे येतील यामुळेंच ध्याले असें नाहीं, तर शिंद्यांचा व होळकराचा जो वैरभाव आहे तो नाहींसा होऊन ते मित्र होतील ह्मणून भय पावले, आणि आपला बचाव व्हावा यास्तव होळकराचा व शिंद्यांचा द्वेष वाढावा, ह्मणून फार उत्सुक झाले. त्यांनी शिंद्यांचे बोलण्यास आपलें हळुहळू मत देऊन असें ठरविलें, कीं होळकराने पुण्यांतून न जातां, शिंद्यांनी आपल्या फौजेंत मराठ्यांचे राज्यांतील शिलेदार भरतीस घालून फौज वाढवावी, व या समयीं मी साहाय्य होईन असें, नाना शिंद्यांस बोलिले.

शिंद्यांनी याप्रमाणें न करण्याचीं कित्येक कारणें सांगितलीं, तीं एथें लिहिण्याचें कारण नाहीं. परंतु इतकें लिहितों, कीं इंग्लिश लोकांचा द्वेष न वाढवितां त्यांची कृपा संपादल्याने आपले बेत शेवटास जातील, असें शिंद्यांस वाटून त्यांनी सालबाईचे तहनाम्यावर सह्या करून पूर्वी लिहिल्याप्रमाणें सन् १७८२ मध्यें डिसेंबरचे विसाव्या तारिखेस तो पुरा केला. व एकमेकांनी एकमेकांस रीतीप्रमाणें तहनामें सन् १७८३ मध्यें फेब्रेवारीचे चौविसाव्या तारिखेस दिल्हे, आणि मुंबईचे बाजूस मराठ्यांचे प्रांत

आहेत ते इंग्लिश लोकांनी परत द्यावे हें कलम एप्रेलचे चौविसाव्या तारिखेस ठरलें पाहिजे असें ठरविलें. तों या तारिखेचे पूर्वीच एक अनर्थ झाला. हा अनर्थ जेव्हां इंग्लिश सरकार सल्ला करण्यास उत्सुक नव्हते तेव्हां पडला असता, तर पुनः लढाई करण्याचा बेत झाला असता. इंग्लिश लोकांचें रेंजर या नामेंकरून लढाईचें जहाज मुंबईहून कलकत्ता एथें जात होतें, त्यांत कित्येक फौजेंतील साहेबलोक मोठमोठ्या पदवीचे होते, त्या जहाजावर **आनंदराव धुळप** ह्मणून पेशव्यांचे आरमाराचे मुख्य सरदार यांचे आरमाराने घाला अवचित घातला, व मोठी लढाई करून त्यांतील कित्येक खलाशी व उतारू ठार मारिले, व कित्येक कैद केले. सरते शेवटीं तें जहाज मराठ्यांचे हातीं लागून त्यांनी तें विजयदुर्ग एथें लुटीप्रमाणें नेलें. सर्व कैदी लोकांस विजयदुर्ग एथें नेलें असतां त्यांस औषध पाणी व जेंजें पाहिजे तें मिळालें नाहीं, तथापि सर्व जखमी कामगार बरे झाले. तह मोडून अशी गोष्ट केल्यामुळें इंग्लिश सरकाराने पेशव्यांची कानउघडणी केली, आणि मराठ्यांचे प्रांत पुनः परत द्यावयाचे होते तें काम लांबणीवर टाकिलें, परंतु मराठ्यांनी या अयोग्य कर्मा विषयीं क्षमा मागितल्यावरून, व त्यांचें जहाज परत केल्यावरून तहनाम्याचीं कलमें शेवटास नेलीं.

अद्यापि लढाईचा शेवट झाला नव्हता, व **टिपू** हा त्याचा बाप **हैदर अल्ली** याचे पाठीमागें त्याचे राज्यावर बसला होता, व त्याने सालबाईचे तहनाम्यास आपली मान्यता दिल्ही, तरी तो मद्रास प्रांतांत इंग्लिश लोकाशीं लढाई करीत होता. **महादजी शिंद्यांनी** इंग्लिश लोकांशीं कांहीं लढाई न करण्या विषयीं **टिपूस** लिहिलें, व त्यास भयहि घातलें, कीं जर तूं याप्रमाणें न करशील

तर मराठ्यांची व इंग्लिश सरकारची फौज मिळून तुजवर घाला घालील. टिपू कांहीं केल्याने न ऐके ह्मणून शिंद्यांनी इंग्लिश लोकांशीं आकटोबरचे अठ्ठावीसाव्या तारिखेस टिपूस जबरीने राजी करावा ह्मणून एक तहनामा केला. नाना फडनविसांचे मनांत होतें तसेंच शिंद्यांचेहि मनांत होतें, कीं टिपू कडून सालबाईचे तहनाम्यांतील कलमें मान्य करवावीं, तेणेंकरून ईष्ट इंडिया सरकारास टिपू हा मराठ्यांचे ताब्यांतील असून मराठे सरकारास खंडणी देतो, असे समजवावें. शिंद्यांनी राज्यांतील सर्व अखत्यारी आपणांवर घेतली ह्मणून नाना फडनविसांस मत्सर उत्पन्न होऊन नाना निजामअल्लीशीं तह करणार आहेत असें प्रगट झालें, तेणेंकरून जो तहनामा शिंद्यांनी इंग्लिश लोकांशी अखत्यारीने केला होता, तो लांबणीवर पाडिला. त्याच वेळेस टिपूने मद्रास खात्याचे इंग्लिश सरकाराशीं निराळा तहनामा केला. गवर्नर जनरल यांनी मद्रास सरकारास सालबाईचे तहनाम्यावरून तह करायास हुकूम दिल्हा होता, परंतु गवर्नर जनरल यांचे हुकुमाप्रमाणें न करितां ज्या दुःखांत व संकटांत मद्रास सरकार होतें, त्याचा शेवट व्हावा ह्मणून त्यांनी अविचाराची गोष्ट केली. तेणेंकरून टिपूने त्यांचा व त्यांचे वकीलाचा अपमान केला. तेव्हां इंग्लिश लोक, दीनासारिखे सल्ला करण्यास कबूल आहेत, असें दिसून आलें, व सरते शेवटीं मार्चाचे अकराव्या तारिखेस मंगलोरचे तहनाम्यावर सह्या झाल्या, त्यांत सालबाईचे तहनाम्यापैकीं कांहींच मजकूर नव्हता, येणेंकरून टिपूस फार संतोष झाला व मराठ्यांस फार त्रास आला. सालबाईचे तहनाम्याप्रमाणें हा तहनामा न करितां टिपूशीं सल्ला करण्याकरितां लीनता दाखवून तह केला, त्यांतील कित्येक कलमांविष-

र्थी गवर्नर जनरल यांची इतराजी झाली. गवर्नर जनरल यांनी त्यांचे हुकुमाप्रमाणें तहनामा न केल्यामुळें जरी लिहिलेलीं कलमें मुकरर केलीं नव्हतीं, तरी कंपनी सरकारचे काम काजांत मोठा घोंटाळा उत्पन्न होईल यास्तव गवर्नर जनरल यांनी तो नापसंत करून मोडिला नाहीं. पुणें सरकारांनी निमित्त केलें, कीं कोणता-हि तहनामा आमचे मता खेरीज होईल असें आह्मांस वाटत नाहीं, व ते बोलिले, कीं असा तहनामा आमचे खेरीज केल्यास ही गोष्ट सालबाईचे तहनाम्याविरुद्ध होईल. परंतु मिस्तर हेस्टिंग्स यांनी गवर्नर जनरल यांचे या तहनाम्या विषयीं मद्रास सरकारास जे हुकूम गेले होते, ते महादजी शिंद्यांस पूर्वीच सांगून ठेविले होते. व आतां गवर्नर जनरल यांचे हुकुमाप्रमाणें न केल्यामुळें मद्रास सरकार दोषांत आलें आहे हें सांगितलें, व त्यांचे तहनाम्यावर सह्या करून तो शेवटास नेण्यास ज्या गोष्टी कारण झाल्या होत्या त्यांतीलहि कांहीं सांगितल्या. यामुळें मराठ्यांचे राज्यांतील मुख्य कारभारी आपापले बेत शेवटास नेण्यास उत्सुक होते. आणि हा तहनामा पुनः फिरावया जोगा नव्हता, तरी तो फिरविण्या विषयीं त्यांजकडून मतें घेण्यास कठीण पडलें नाहीं. नानांनी प्रथमतः टिपूस आपल्या आटोक्यांत आण-ण्या करितां कुष्ट आरंभिलें तें हेंच, कीं त्याजकडे फार वर्षांची खं-डणी, येणें राहिली होती, तिचें मागणें केलें तें टिपूनें मान्य के-लें परंतु लागलाच पैका देण्यास त्याने सबबी पुष्कळ सांगितल्या. टिपूस खंडणी बद्दल मागणें केलें, त्या वेळेस निजाम अल्ली कडेहि सरदेशमुखीचे हक्काबद्दल त्यांचे प्रांतावर मराठ्यांची बाकी येणें राहिली होती तिजविषयीं मागणें केलें, परंतु पुणे दरबारची व हैदराबाद कराची आपापल्यांत कांहीं गुप्तपणें समजूत झाली, व त्या उभयतांचें

मित्रत्व इतक्याच कारणांवरून होतें, कीं चौथ व सरदेशमुखीचे हक यांविषयीं मागणें करण्याचे पूर्वीच मोठें बंड झालें होतें त्याचें निवारण करण्या करितां, नानांनी हैदर अल्लीस मदत दिल्ही होती. नाना व निजाम अल्ली यांचा संकेत टिपूवर गुप्तपणें घाला घालण्याचा होता, तो प्रसिद्ध नव्हता ह्मणून निजाम अल्लीने या विनंती पत्राचें उत्तर दिल्हें, कीं पुण्यांतील कारभाऱ्यांशीं सरहद्दीवर या हक्का विषयीं बोलण्या करितां, भेट व्हावी. याप्रमाणें दोघांनी दोन्हीकडून पुष्कळ फौज बरोबर घेऊन आपलीं शहरें सोडिलीं. आणि जून महिन्यांत भिमा व कृष्णा यांचे संगमा जवळ इडगीर एथें दोघांच्या भेटी झाल्या. एकमेकांचे हक्कां विषयीं मोठमोठालीं बोलणीं झालीं त्यांत फार दिवसांचे हक्क येणें होते, तेहि ठरले, परंतु असें ठरावांत आलें, कीं मराठ्यांचीं ठाणीं सन् १७७४ पासून निजाम अल्लीने मोंगलाचे मुलुखांतून उठवून लाविलीं आहेत, तीं पुनः बसवावीं, व चौथ आणि सरदेशमुखीचे हक जे पूर्वी माधवराव बल्लाळ यांचे राज्यांत येत होते त्यावहिवाटी प्रमाणें दोन वर्षांचे राहिले आहेत, ते त्याने लवकर द्यावे. एका गोष्टी विषयीं फारच संशय असल्यास निजाम उल्मुल्क याचे राज्यांत जे हक पोहंचत असत त्यांचा एकंदर ठराव होई तोंपर्यंत ही मागणी तशीच राहावी. त्याप्रमाणें मागील अमुक दिवसांचीं राहिलीं असतील तीं मी देण्यास कबूल आहें, असें निजाम अल्लीने ठरविलें. या दोघांची सरहद्दीवर भेट झाली त्यां भेटींतील उघड इतका मजकूर झाला, परंतु पूर्वी लिहिल्या प्रमाणें मुख्यत्वेंकरून त्यांचा हेतू टिपूवर नानां व निजाम अल्ली या दोघांनी, मिळून हैसुरचे स्वारींमध्ये जे प्रांत दोघांचे गेले असतील, ते परत घेण्या करितां त्याजवर घाला घालावा, असा होता. निजा-

म अल्ली नानांस बोलिला, कीं तुमच्या मदतीपेक्षां माझी मदत तुह्मांस जास्ती आहे. यास्तव अहंमदनगर आणि विजापूर हीं आमचीं आह्मांस परत द्यावीं असें कलम, हा तह होण्याचे पूर्वी लिहून मागितलें. तुंगभद्रा हा प्रांत परत आल्यानंतर विजापर देईन असें नानांनी कबूल केलें. परंतु कांहीं दिवसां नंतर दोघांची तृप्ती न होतां राजी झाले नाहींत. टिपूवर घाला घालण्या विषयीं ते बोलणें करीत होते त्याचीहि तयारी केली नाहीं. सरहद्दीवर भेटी होऊन बोलणें झालें त्याचा शेवट असा झाला, कीं त्यांनी दोस्ती विषयीं तहनामा केला, त्यांत असें ठरविलें, कीं जेव्हां तहनाम्याप्रमाणें करावयास आपण तयार होऊं, तेव्हां त्यांतील कलमें ठरवूं. सुरापुरचे नाइकापासून खंडणी घेतल्यावर दोघेजणहि जुलई महिन्यांत आपापल्या राज्यांत आले, आणि नाना फडनविसांचे मनांतून फार दिवसांपासून जंजिरा हें बेट घ्यावयाचें होतें, तें घेण्याकरितां त्यांनी या समयीं संधी सांपडतांच पुष्कळ यत्न केला. परंतु इंग्लिश सरकारांनी मध्यें शिरून कांहीं मोठाल्या कारणांवरून नानां जंजिरा घेण्याचें विसरत तोंपर्यंत नानांस हरकत केली.

निजाम अल्ली आपल्या शहरांत येऊन, पोहंचला नाहीं इतक्यांत ज्या अयोग्य गोष्टी इकडे घडण्यांत आल्या, त्या टिपूस कळल्या असतील तेव्हां त्याने निजाम अल्लीचा अपमान करावा या बुद्धीने विजापूर हें माझें राज्य आहे, असें अयोग्य बोलणें घातलें, आणि त्या आधारावर निजाम अल्ली यास आपल्या राज्यांतील वजनी व कैली मापें चालविण्या करितां लिहिलें. टिपू अकटोबर महिन्यांत कृष्णा नदीचे दक्षिणेस मोगलाई प्रांतांचा भाग होता, त्याजवर घाला घालण्या करितां तयार झाला, अ-

से निजाम अल्लीचे ऐकण्यांत येई तोंपर्यंत टिपूने आपल्या राज्यांतील केली व वजनी मापें तुमच्या राज्यांत चालवावी ह्मणून लिहिलें त्याचें कारण काय तें समजून घेण्याविषयीं फारशी त्याने तसदी घेतली नाहीं. निजाम अल्लीने हैदराबादेहून लागलाच टिपूचे छावणींत एक वकील, बोलणें लावून विलंब करण्याकरितां पाठविला, व एक वकील पुण्यास नानांनी करारामप्रमाणें टिपूवर घाला घालण्या करिता जलदीने तयारी करावी ह्मणून पाठविला. नाना फडनविसांची तयारी झाली नव्हती असें नाहीं, परंतु कित्येक सरकारी कामांमुळें नानांस आपले मित्रांस साहाय्य देण्याकरितां जातां येईना, यास्तव निजाम अल्ली उत्सुक होऊन त्याने आपला वकील टिपूकडे श्रीरंगपट्टण एथें पाठविला होता त्यास लिहून पाठविलें, कीं टिपू एकादा घाला घालील किंवां लढाई करील, ती बंद करवावी. टिपूने हें सर्व मान्य केलें. हें त्याचे मनांतून लढाई करण्याची नव्हती ह्मणून मान्यकेलें असें नाहीं, परंतु त्याची लढाई विषयीं तयारी नव्हती.

नाना फडनविसांनी कित्येक दिवस बेत केलेला राहता केला त्याचें मुख्य कारण हेंच, कीं पुण्यांतील राज्यकारणांतील मंडळींनी माधवराव नारायण यांस राज्यावरून काढून रघुनाथ राव यांचा पुत्र बाजीराव यास पेशव्यांचे गादीवर बसविण्या करितां बंड केलें. रघुनाथ राव यांनी सालबाईचा तहनामा पक्का झाल्यावर दुसरा कांहीं उपाय नाहीं, असें पाहून त्यांत जींजीं कलमें लिहिलीं होतीं त्यांस मान्यता दिल्ही. आणि गोदावरी तीरीं कोपरगांव एथें नेहेमींचें वास्तव्याचें ठिकाण त्यांनी आपणा करितां नेमिलें. ते या गावीं रहावयास आल्यानंतर अशा मानखंडणा झालेल्या स्थितींत पुढें कांहीं महिने पर्यंत होते. मयत

राघोबाची स्त्री आनंदी बाई त्या समयीं गरोदर होती ती थोडे दिवसांनी सन् १७८४ च्या एप्रेल महिन्यांत प्रसूत होऊन तीस पुत्र झाला. त्याचें नाव चिमणाजी आपा असें ठेविलें. बाजीराव त्यांचे बापाचे मृत्युसमयीं नऊ वर्षांचे वयाचे आंत होते, परंतु रघुनाथ रावाचे कूटांतील मंडळींनी व जे कोणी माधवराव नारायण यांचे राज्यास त्रासले होते त्यांनी बाजीरावाचे तर्फेने बंड माजविलें. नाना फडनविसांनी हें बंड मोडण्या करितां यत्न करून बंड मोडून टाकिलें, ही फार योग्य गोष्ट केली. त्याने राघोबाचें कुटुंब कोपर गांव एथें होतें त्याजवर जास्ती पाहारा ठेविला नाहीं, तथापि नानांचा राघोबाचे पुत्रांस संशय वाटून एकमेकांचा द्वेष पडला. महादजीशिंदे हा या सर्व प्रकरणास आंतून उत्तेजन देत होता असें ह्मणतात. व नाना फडनविसांस नेहेमी धाक घालून भयांत ठेवीत असे. यावरून तो या बंडांत असेल असा संशय येतो, परंतु त्याने अशा या बंडास साहाय्य देण्याचा निश्चय केला नसेल कारण, कीं त्यासमयीं पूर्वीं लिहिण्यांत आलेले सरकारी प्रांत घेण्याचे उद्योगांत तो निमग्न होता, तेणेंकरून त्याचे मनांत जो हेतू होता त्याप्रमाणें त्यास मोठा अधिकार प्राप्त झाला.

सन् १७८४ च्या अक्टोबरचे बाविसाव्या तारिखेस महादजी शिंद्यांनी दिल्लीचे बादशाहाशीं तहनामा केला, तेणेंकरून त्यांस मोठा अधिकार प्राप्त होऊन जें पद पावण्यास फार दिवस लागतील, असें त्यांस वाटलें होतें, तें पद त्यांस प्राप्त झालें. तें हेंच कीं त्यांस अमीरुल उमराव याचें काम दिल्हें आणि पेशव्यांस वकील अईमुतलग अथवा राज्यांतील मुख्य कारभारी अशी जी पदवी पूर्वीं महंमदशाहाने नि-

**जाम अल्लीस** दिल्ही होती, ती देवविली . आणि जसे मुख्य ब्राह्मण कारभारी यांच्या हातांत सत्ता असून दुसऱ्या नावाने वागतो असें ह्मणतात, त्याप्रमाणें **शिंद्यांनीहि** यत्नकरून आपल्यास पेशव्यांचे हाताखालीं दुसऱ्या पदवीचें काम घेतलें. आणि याप्रमाणें हिंदुस्थानांत पेशव्यांचे परगण्यावर मुख्य अधिकार मिळविला, आणि हें त्यांस नवें काम मिळालें, याचा मोठेपणा व श्रेष्ठत्व जर त्यांचे मनांतून दाखवावयाचें असतें तर पेशव्यांचे सर्व दरबारांतिल कारभाऱ्यापेक्षांहि मोठा होता. **होळकर** व **नाना फडनवीस** हेदोघे **शिंद्यांचा** अधिकार वाढला ह्मणून मत्सर करूं लागले. **शिंद्याने** हे मत्सर करितात यांजपासून आपणास कांहीं उपद्रव होईल तो बंद करण्याकरितां त्याने जन्मांत कधीहि काळजी केली नाहीं. **नाना फडनवीस** यांनी इंग्लिश लोकांचा वकील आपले राज्यांत असावा असा वारंवार हेतू दर्शविला, ह्मणून **मिस्तर चार्लस म्यालेट** यांस या मोठ्या कामावर नेमिलें. सालबाईचे तहनाम्याने इंग्लिश सरकारचा वकील पुण्यास येण्यास हरकत नव्हती तथापि **शिंद्याचा** त्या समयीं फार मोठा अधिकार होता, सबब त्याचें या गोष्टीमध्यें मत घेणें प्राप्त होतें. त्यांस असें वाटलें, कीं **मिस्तर मालेट** हे जातीने **शिंद्याचे** छावणींत गेले असतां तो या गोष्टीविषयीं मत देईल. परंतु **शिंदा** इतका हुशार होता, कीं इंग्लिश सरकारचे वकील पुणें दरबारांत आल्यामुळें आपला अधिकार कमी होईल, असें त्यास समजलें. **शिंद्यास** वाटलें, कीं मी पुण्यांचे दरबारांत इंग्लिश लोकांचे वकीला प्रमाणें तीन वर्षेंपर्यंत काम चालाविलें असतां त्यांनी आतां आपल्या जातीचा कारभारी नेमिल्यास सर्व दक्षिणेंतील बडे लोकास असें वाटेल, कीं इंग्लिश सरकारास **शिंद्याचे** वर्त-

णुकीचा फार त्रास वाटला व आजपर्यंत त्याजवर विश्वास होता तोहि उडाला. शिद्याच्या या तकरारी चांगल्या दिसावया जोग्या होत्या, तरी मिस्तर म्याक फर्सन् गवर्नर जनरल यांचे जाग्यावर नवीन काम चालविणारे जे झाले होते, त्यांस वकील पाठविण्याचा जो बेत झाला होता तो रहाता न करितां सिद्धीस नेणें प्राप्त आहे असें वाटलें. कांहीं यात करारी, हा बेत रहाता करण्यास योग्य नव्हत्या नंतर ठरलें, कीं मिस्तर मालेट याने पुण्यास वकीला प्रमाणें जावें परंतु ही गोष्ट बरोबर ठरण्याचे पूर्वी दाक्षिण प्रांतांत कांहीं गोष्टी घडण्यांत आल्या, तेणेंकरून इंग्लिश लोकांस वकील पाठविणें फार जरूर झालें. टिपूने विजापुरावर माझा हक्क आहे असें बोलणें घालून निजाम अल्लीचे प्रांतावर घाला घालण्याचें भय घातलें. हें ज्यांणी बंडकरून आपणावर घाला घालण्याचा बेत केला आहे, असा त्यांस संशय आला होता, त्यास आपली त्यांजप्रमाणेंच लढाईची तयारी आहे असें दाखविण्या करितां त्याने केलें असेल. निजाम अल्लीचा टिपूशीं तह झाला, त्यानंतर दोघे जणहि असें समजले, कीं हा तह उगीच थोडे दिवसपर्यंत आहे. टिपू आपल्या फौजेस कवाईत शिकवून तयारी करूं लागला. व त्याने आपल्या किल्यामध्यें बरोबर बंदोबस्त केला, आणि लढाईची वेळ येतांक्षणींच त्याचे देशाचे हद्दीवर त्याने ठाणीं बसविलीं होतीं त्यांचा बचाव होण्याजोगा बंदोबस्त करणें हें त्यास मुख्यत्वेंकरून जरूर झालें. मलप्रभेचे दक्षिणेस पांच साहा कोशांवर नरगुंद ह्मणून परगणा व त्याच नामेंकरून किल्लाहि आहे तो ब्राह्मण देसाई याजकडे पूर्वी होता, व कृष्णेचे दक्षिणे कडचे कित्येक मराठ्यांचे प्रांत हैदराचे ताब्यांत सन १७७८ मध्यें आले होते, त्या प्रांतांवर फारशी खंडणी ब-

सली नव्हती, व **देसाई हैदराचे** आज्ञेत होता, ह्मणून त्याजवर खुष होऊन तो जितकी खंडणी मराठ्यांस देत असे, तितकीच त्याजपासून घेत असे. **टिपूचा** बाप मृत्यु पावल्यानंतर थोडे दिवसांनी त्याने जास्ती खंडणी वाढविली, तेव्हां **देसाई** तितकी खंडणी द्यावयास नाकबूल झाला. व पुढें आपणावर जुलूम करितील, असें त्यास वाटल्यावरून तो माझा बचाव करावा ह्मणून पेशव्यांस विनंती पत्र लिहून मी पेशव्यांचे रयते पैकीं आहें असें बोलिला. आणि त्याजवळ कोणी इंग्लिश लोक **यून** यानामें करून होता, त्याजकडून गुप्तपणें इंग्लिश सरकारास विनंती करविली, कीं कांहीं पलटणी आमचे संरक्षणार्थ साहाय्य द्याव्या, व हेंहि विदित केलें, कीं मीं स्वतंत्र राजा आहें व **टिपूवर** घाला घालण्यांत मी तुह्मांस मदत देण्यास खुशी आहें. मंगलोरचा तहनामा होण्याचे पूर्वीं ही आर्जी मुंबई सरकारास केली, परंतु मुंबई सरकारानी त्याचा अर्ज ऐकिला न ऐकिला असें केलें. यामुळें **देसाई** याने पुण्यांतील कारभाऱ्यांस मदती करितां वारंवार लिहून त्यांचा व **परशुरामभाऊ पटवर्धन** हे **देसायाचे** नातलग होते त्यांच्या प्रतापी कुलाचाहि आश्रय संपादिला. **टिपूने देसायास** खंडणी करितां तगादा केला तेव्हां **नाना फडनविसांनी** मध्यें पडून **टिपूस** सांगितलें, कीं नेहमीच्या खंडणीपेक्षां जास्ती खंडणी घेण्यास तुह्मांस अधिकार नाहीं, व जाहागीरदारांचे मुलूख दुसऱ्याचे राज्यांत गेल्यावर जाहागीरदारांनी नेहेमी पेक्षां जास्ती खंडणी द्यावी असा शिरस्ताहि नाहीं. जे संस्थांनी आहेत ते ज्याचे राज्यांत ज्या सरकाराखालीं असतात, त्या सरकाराशीं काहीं फंद फितर न केल्यास त्यांस कांहीं उपद्रव करूं नये अशी चाल आहे. **टिपूने** उत्तर केलें, कीं मी माझे प्रजेपासून जीतका खुशीस येईल

तितका पैका घेईन. असें ह्मणून त्याने लागल्याच दोन निरनिराळ्या सैन्याचा टोळ्या **देसायाचे** शक्ती पेक्षां जास्ती खंडणी जुलुमाने घेण्यास पाठविल्या, परंतु त्याचा संकेत **देसायाचा** किल्ला घेण्याचा होता. नरगुंदास प्रथमतः मार्च महिन्यामध्यें वेढा घालण्यास प्रारंभ झाला, व **गणेशपंत बेहेरे** व **परशुराम भाऊ पटवर्धन**, या दोघांचे हाताखालीं मराठ्यांनी फौज देऊन, त्यांस तो वेढा उठविण्या करितां पाठविलें. **टिपूचे** वकील तोंपर्यंत पुण्यांत राहिले होते. व **नाना फडनवीस** यांनी मराठ्यांचे फौजेवरील सरदारांस हुकूम पाठविले, कीं एकाएकीं जलदी करून लढाई करण्याचा प्रसंग आणूं नये. परंतु नरगुंदा जवळ मराठ्यांची फौज येऊन पोहंचली नाहीं इतक्यांत **टिपूचे** कामगारांस पाणी मिळेना यामुळें वेढा उठवून कांहीं अंतरावर तळ देणें प्राप्त झालें. मराठ्यांचे फौजेवरील ब्राह्मण सरदारांस **टिपूचे** सरदारांनी धिक्कार पूर्वक निरोप पाठविला, कीं आमचे धनी पेशवे यांस सन्मान देण्याकरितां आह्मी मागें हटलों. ही थट्टा केली यावरून मराठ्यांस फार राग येऊन ते घोड्यावर स्वांर होऊन **टिपूच्या** कंपूंत गेले. व त्यांचीं कांहीं ठाणीं मागें हटवून आपण पुढें सरले. तेव्हां **टिपूचीं** दोन पलटणें व कांहीं स्वांर यांनी त्यांजवर चढाव करून त्यांस मागे फिरविलें. तेव्हां मराठ्यांची फौज परत आली, यांकडून हा जलदीचा हल्ला **नाना फडनविसांचे** हुकुमाविरुद्ध झाला. परंतु त्यांनी घाला घातलाच. तेव्हां लागलेंच **नानांनी तुकोजी होळकर** याजबरोबर मोठी फौज देऊन त्यास **गणेशपंत** व **परशुरामभाऊ** यांस मदत देण्यां करितां पाठविलें. त्या वेळेसच **नानांनी टिपूस** लिहिलें, कीं आपण लढाई केली याविषयीं आह्मी दुःखी

फार आहों व तुह्मी तह करावा असें आमचे मनांतून आहे. (टिपूचे मतलब पुढें लिहिण्यांत येतील) त्यानेहि नाना फडनविसांचे ह्मणण्या प्रमाणें करावयास तयार आहें असे दाखविलें, व नरगुंद माझे राज्यांत असून त्याजवर माझा अधिकार आहे असें आपण कबूल केल्यास, दोन वर्षांची खंडणी देतों, असें बोलिला. निजाम अल्लीने मसलत दिल्ह्यावरून, व टिपूने माझे मनांतून देसायाने शरण यावें इतकेंच आहे, अशी नानांची खात्री केल्यावरून नाना फडनवीस यांनी टिपूचे ह्मणण्या प्रमाणें कबूल केलें, व खंडणी कसकशा हप्त्याने द्यावी हें कलम खेरीज करून बाकीचें सर्व ठरलेंसें दिसलें. व खंडणी ठरण्या विषयीं सत्तावीस दिवसांची मुदत दिल्ही, ह्मणून मराठ्यांची फौज कृष्णानदी उतरून परत आली, परंतु टिपूने हें सर्व कापट्य केलें. नरगुंदवाल्यास शरण जाणें प्राप्त झालें, आणि दुर्दैवी देसायास जीं वचनें टिपूने दिल्हीं होतीं, तीं किल्ला हातांत आल्या नंतर कांहीं सिद्धिस नेलीं नाहींत. देसाई त्याचे कुटुंबासहित दग्याने धरला गेला. व त्याची मुलगी टिपूचे जनान खान्यांत ठेविली. आणि बाकीच्यांस काबुलदुर्ग एथे कैदेंत ठेविलें, तेथें सर्व मृत्यु पावलीं. कितूरचा किल्ला खंडणी देणारा दुसरा देसाई यांचे ताब्यांत होता, तोहि घेतला. यादोन्हीं किल्यांत पावसाळा उघडण्याचे पूर्वीं मोठाले पाहारे ठेविले. हीं क्रूरत्वाचीं कामें सिद्धीस नेण्या करितां, व मराठे लोकांशीं फार द्वेष वाढविण्या करितां टिपूने कृष्णानदीचे दक्षिण प्रांतांतील पुष्कळ हिंदूलोकांच्या सुनता केल्या. आणि दोन हजार ब्राह्मणांनी सुनता न करून घ्याव्या ह्मणून जीव दिल्हे.

नाना फडनवीस यांस थोड्याच दिवसांनंतर समजलें, कीं

टिपूने आह्मांस फसविलें, आणि तेव्हांपासून त्यांस निजाम अल्लीचा देखील इतका संशय पडूं लागला, कीं पुढें तो मदत देईल न देईल असें त्यांस वाटलें. एदगीर एथें नानांची व निजाम अल्लीची भेट झाली, तेव्हां मोंगलांची फौज अशिक्षित, व तयारींत नव्हती ती नानांचे लश्यांत होतीच आणि टिपूच्या पलटणी फार तयार व हुशार आहेत असें ऐकून त्यांस भय वाटलें. निजाम अल्लीची फौज अशिक्षित व टिपूची फौज सुशिक्षित व हुशार हें भय नानांचे मनांत होतेंच तों इतक्यात नानांचे ऐकण्यांत आलें, कीं टिपूने फ्रेंच लोकांशीं पुनः दोस्ती केली, तेव्हां नानांचे मनांत इंग्लिश लोकांची फौज कधीं मदतीस न आणावी, असा जो त्यांचा पूर्वी बेत होता तो सर्व एकीकडे ठेवून त्यांनी मदती करितां इंग्लिशांची फौज आणावी, असा बेत केला, परंतु टिपूवर घाला घालण्या करितां इंग्लिश लोक मदतीस पाहिजे तसे कबूल होतील, व त्यांस वचनें देऊन, आपला जीव इंग्लिश लोकांचे स्वाधीन रहावा असे ठराव न करितां, पुण्यास येण्याची मोकळीक ठेवावी, असे उत्सुक होऊन मिस्तर बाडम मुंबईचे गवरनर यांशीं मोठ्या हुशारीनें बोलणें केलें. जूलई महिन्यामध्यें नानांनी पेशव्यांकडून मुंबईस वकील पाठविला, आणि ठराव केला, कीं तुह्मी आह्मांस टिपूचा मांत घेण्यां करितां फौजेची मदत दिल्ही तर मलबार किनाऱ्या वरील, टिपूचे बंदरां पैकीं जीं पाहिजे तीं दोन बंदरे तुह्मांस देऊं, मिस्तर बाडम यांनी लहानशीं दोन बंदरे देऊं ह्मणून मराठ्यांनीं ठराव केला, त्याविषयींचें कांहीं एक आश्चर्य न करितां त्याचें बोलणें ऐकून निरपेक्षतेनें नाना फडनविसांस सांगितलें, कीं तुह्मी गवर्नर जनरल यांस याविषयीं अर्ज करावा. इंग्लिश लोक मराठ्यांची

कांहीं गरज ठेवीत नाहीं, असें नाना फडनविसांचा वकील होता त्यास कळलें. तेव्हां पासून नाना फडनवीस इंग्लिश लोक मोठे बलाढ्य व सत्ताधारी असें समजूं लागले. नाना फडनविसांनी आपला जातीचा वकील गुप्तपणें कलकत्यास पाठविला, तेव्हा इंग्लिश सरकारचा वकील पुण्याचे दरबारांत नव्हता. म्हणून महादजी शिंद्या कडून याविषयीं बोलणें करविणें प्राप्त झालें. महादजी शिंदे यांनी लेफ्टनेट जेम्स अंडरसन म्हणून शिंद्याचे कंपूंत राहाणारे वकील होते, त्यांजकडून गवर्नर जनरल यांस लागलाच अर्ज केला, पेशव्यांचा आणि टिपूचा खास बिघडा होईलसा दिसतो. व सालबाईचे तहनाम्यांत इंग्लिश सरकारचा शत्रू तोच मराठ्यांचा शत्रू व त्यांचा मित्र तोच मराठ्यांचा मित्र, असें ठरलें आहे. त्यास इंग्लिश सरकार आह्मांस मदत देतीलच व निजाम अल्लीहि पेशव्यांस खास मदत देईल, अशी पेशव्यांची खातरी आहे, व तहनाम्यांत ठराव असा आहे, कीं प्रत्येकांचे राज्यांतील देश गेला असेल तो ज्यांचा त्यांनी परत घ्यावा, व कांहीं नवे देश संपादिले असतां सर्वांनी सारिखे वांटून घ्यावे. मिस्तर म्याक फरसन् यांनी उत्तर पाठविलें, कीं सालबाईचे तहनाम्यांत तुमचे शत्रू तेच आमचे शत्रू व आमचे मित्र तेच तुमचे मित्र असा कांहीं ठराव झाला नाहीं, परंतु असें ठरलें आहे कीं एकामेकांचे शत्रूंस कोणी मदत देऊं नये व मंगलोरच्या तहांतील कलमांप्रमाणें टिपूचे शत्रूस इंग्लिश लोकांनी मदत देऊंनये, असें ठरलें आहे. मिस्तर म्याक्फरसन् यांनी इंग्लिश लोक साहाय्य देणार नाहींत असें लिहिलें, तरी पेशव्यांशीं आमची मोठी दोस्ती आहे, असें दाखविलें. व मंगलोरच्या तहनाम्यांत ठरविल्या प्रमाणें टिपूने आपले ठराव

सिद्धिस नेले नाहींत ह्मणून इंग्लिश सरकारची त्याजवर इतराजी झाली आहे असेंहि दर्शविलें. याप्रमाणें मिस्तर म्याकफर्सन् यांनी लिहून सरते शेवटीं स्वारी करून असें शिद्यास लिहिलें, कीं मराठ्यांचा पराजय होऊं लागल्यास आह्मी तसें होऊं देणार नाहीं. गवर्नर जनरल मदत देण्यास खुशी नाहींत असें दिसून आलें, तेणेंकरून नाना फडनवीस इंग्लिश लोकांची मदत मिळावी ह्मणून जास्तीच उत्सुक झाले, व टिपूचा व फ्रेंच लोकांचा कांहीं नवीन ठराव झाला होता ह्मणून, त्या समयीं इंग्लिश लोकांची मदत, मिळावी ह्मणून नानां फारच उत्सुक होऊन सरते शेवटीं इंग्लिश लोकांची मदत मिळणार नाहीं, या निराशेने अथवा इंग्लिश लोक मदत देतात, किंवा नदेतात याचा ठराव लौकरच व्हावा, ह्मणून नाना फडनविसांनी पोर्तुगीज लोकांशीं साहाय्य देण्या करितां बोलणें केलें, तेव्हां त्यांनी नानांस मदत देऊं असें वचन दिल्हें.

टिपूचा व फ्रेंच लोकांचा कांहीं नवीन तह झाला असें नानांस खरेंच वाटलें. व पेशव्यां कडील वकील पांडेचरी एथें होता, त्याने फ्रेंच लोकांचा गवर्नर याशीं तकरार करून त्याजवर आळ घेतला, कीं तुमच्या राजाने पेशव्यांस जीं वचनें दिल्हीं होतीं, तीं तुह्मी दग्याने मोडिलीं. मी टिपूशीं कांहीं ठराव केला नाहीं, असें फ्रेंच लोकांचा गवर्नर याने खरें करून दाखविण्या करितां पेशव्यांशी फार दोस्ती ठेवण्या विषयीं बोलणें केलें. फ्रेंच लोक स्वतंत्र व मोठे सत्ताधारी आहेत, ह्मणून त्यांचा मत्सर टिपू पूर्वीं करीतच असे, तो फ्रेंचांचे गवर्नराने अशी गोष्ट केल्यावरून फारच वाढला. फ्रेंच लोकांचा वकील पुण्यामध्यें होता, त्याचा पेशवे फारच आदर सत्कार करूं लागले. यावरून लो-

कांस असें वाटलें, कीं जरी फ्रेंच लोकांनी मदत दिल्ही नाहीं तरी रेवदंडा हा गांव फ्रेंच लोकांस देण्यास पेशव्यांनी कबूल केलें आहे. हीं बोलणीं झाल्यावरून इंग्लिश लोकांचे रेसीडेंट् ह्मणजे वकील पुणे दरबारांत पाठविणें हें फारच आवश्यक झालें. आणि **मिस्तर मालेट** हे त्या समयीं कलकत्यामध्यें होते, त्यांस मुंबईस परत येऊन पेशवे सरकारांतून बोलाऊं आल्यावर पुण्यास जावें असा सरकारी हुकूम झाला. इतक्यांत पुण्यामध्यें **टिपूचा** मुलूख घेण्या करितां सैन्य जमा झालें, व **मिस्तर माकफर्सन्** यांनी तीन पलटणी पाठवितों ह्मणून कबूल केलें, परंतु त्यांत अडचण अशी होती, कीं आमच्या पलटणीं **टिपूस** जिकण्या करितां त्यांचे हद्दींत न जातां तुमचा देश बचावितील, असें त्यांचें ह्मणणें पडलें. परंतु **नानांचे** मनांतून इंग्लिश लोकांचे पलटणांनी आमचा देश न बचावितां **टिपूस** जिंकावें, असें होतें, ह्मणून त्यांनि हे ठराव नामंजूर केले. दर वर्षापेक्षां त्या वर्षीं फार दिवस पर्यंत पाऊस पडला, आणि **हरीपंत फडके** यांचे हाताखालीं मराठ्यांची फौज होती तिने डिसेंबरचे पहिल्या तारिखे पर्यंत पुणे सोडीलें नाहीं. फौज **मुधोजी भोसले** आणि **निजाम अल्ली** यांस जाऊन मिळण्या करितां पूर्वेचे हद्दीकडे चालिली. **मुधोजी भोसला** हा पेशव्यांशीं लागून रहाण्या विषयीं फार उत्सुक होऊन त्याने आपला लेंक **रघूजी** यांचे नांवाने नवा ठराव केला, कीं सन् १७६९ त **माधवराव** आणि **जानोजी** यांनी तह केला आहे त्याप्रमाणें वर्तणूक करून इंग्लिश लोकांनी पेशव्यांशीं लढाई केली असतां, मी इंग्लिश लोकांस मदत देणार नाहीं, व आतां **टिपूशीं** लढाई करण्या करितां जात आहें, असें त्याने वचन दिल्हें. **नाना फडनवीस** नि-

जाम अल्लीबरोबर बोलणें करण्या करितां फौजे सहवर्तमान निघाले. आणि पंढरपूर एथें हरीपंत फडके यांस त्यांनी गांठलें तेथून भिमा नदीचा उजवा किनारा उतरून खाली गेले, तेव्हां एक वर्षा पूर्वी जेथें दोघांचें बोलणें झालें होतें त्या जाग्यावर मोंगलांची फौज येऊन त्यांस मिळाली. टिपूचा सर्व देश घेऊन त्याचे साहा विभाग बरोबर करून त्या विभागां पैकी निजाम अल्लींस दोन व पेशव्यांस दोन व शिंदे होळकर या दोघांनीं मिळून दोन भाग घ्यावे, असें त्या समयीं ठरलें. प्रथमतः पेशव्यांचे प्रांत कृष्णा व तुंगभद्रा यांच्या मध्यें आहेत ते परत घ्यावे असें त्यांनी ठरविलें. या स्वारीमध्यें शिंदे होळकर इत्यादि कूटांतील मंडळीची फौज होती ती लागलीच बदामी घ्यावयास चालिली. बदामीवर गोळा टाकून वीस दिवस पर्यंत कोट व बुरूज पडत नाहींत असें पाहून, ते मे महिन्याचे विसाव्या तारिखेस शिडया लाऊन आंत गेले. बदामी हातास आल्यानंतर, नाना फडनवीस परत पुण्यास आले, आणि हरीपंत फडके यांस लढाई चालविण्या करितां तेथे ठेविलें.

पुढें लहानशा लढाया झाल्या त्यांत दोन्हीं पक्षांस जय मिळाले नाहींत, आणि टिपूने एकाएकीं सल्ला करण्याचें बोलणें घातलें, तेणेंकरून मंडळीस मोठें आश्चर्य वाटलें. तहाविषयीं बोलणें घातलें याचें कारण काय? हें त्यांस समजलें नाहीं. तरी टिपूचे मनांतून खरोखरी सल्ला करावयाचा होता. आणि त्याप्रमाणें एप्रील महिन्यामध्यें सल्ल्याविषयीं तहनामा झाला. पेशव्यांस बदामी, कितूर, आणि नरगुंद इतकीं मिळाली, आणि बाकीचे परगणे व शहरें जीं पेशव्यांचे फौजेने घेतलीं होतीं, तीं टिपूस परत दिल्हीं. टिपूहि पंचेचाळीस लाख रूपये खंडणी

देण्यास कबूल झाला, त्यां पैकीं तीस लाख रूपये लागलेच दिल्हे, आणि बाकीचे एक वर्षा नंतर देण्याचा करार केला. **टिपूने** आपला तोटा करून असा गैर फायद्याचा सल्ला केला, याचें कारण हेंच, कीं इंग्लिश लोक मराठ्यांचा पक्ष स्वीकारून मज बरोबर लढाई करितील असें त्यास वाटलें. **मिस्तर मालेट** यांस वकीला प्रमाणेंच पुण्यांत बोलाविलें असें नाहीं, परंतु **नानां फडनविसांनी** विनंती केल्यामुळें ते बदामी एथें येऊन **टिपूने** भविष्य केल्याप्रमाणें त्यांकडे मिळाले, व तेणेंकरून पेशव्यांची व इंग्लिश लोकांची दोस्ती झाली असें त्यास वाटलें. परंतु **मिस्तर मालेट** यांचे जाण्याने जें भय उत्पन्न झालें तें शांत करण्या करितां अक्टिंग गवर्नर जनरल यांनी उद्योग करून कांहीं शांत केलें. थोड्या दिवसां नंतर सन् १७८६ मध्यें सप्टेंबर महिन्यांत **लार्ड कार्नवालीस** यांनी गवर्नर जनरल या पदवीचे कामावर येऊन पेशव्यांस व **निजाम अल्लीस** पत्रें लिहिलीं त्यांत त्यांनी **होळकर, शिंदे** इत्यादि पेशव्यांकडील मंडळीचें आणि **टिपू सुलतान** याचे लढाईमध्यें आह्मी तुह्मास मदत देणार नाहीं असें लिहिलें. तरी सर्व खात्यांत फौज पाठविणें अवस्य झाल्यावरून त्यांनी फौजेची मोठी तयारी केली. तेणेंकरून सर्वत्र गडबड झाली, तेव्हां **टिपूस** खरोखरी वाटलें, कीं इंग्लिश लोकांनी तयारी केली ही मजशीं लढाई करण्या करितांच केली. यावरून त्याने मराठ्यांचे मिलाफी मंडळीशीं लढाई चालिली होती, तिचाच शेवट केला असें नाही, परंतु इंग्लिशांशीं द्वेष करून हिंदुस्थानांतून त्यांस घालवून देण्या करितां त्याने निश्चय केला. याचें कारणहि हेंच असेल सें वाटतें.

पेशव्यांचे दरबारामध्यें इंग्लिश लोकांचा रेसीडेंट ह्मणजे वकील

आल्यामुळें **टिपूस** फार भय पडलें, असें नाहीं, परंतु **महादजी शिंद्याशींहि** हेवा करावयास कारण झालें. **महादजी शिंद्यांनी** पेशव्यांचे दरबारांत इंग्लिश सरकारचा वकील असावा असें विलंबें करून आपलें मत दिल्हें. व शिंद्याकडून ही गोष्ट कबूल करवून त्यास खुष करण्या करितां **मिस्तर मालेट** यांस इंग्लिश सरकारांतून हुकूम झाला, कीं गवर्नर जनरल यांजकडे कागद पत्र पाठविणें झाल्यास मूळ प्रथम **शिंद्यांकडे** त्यांतील मजकूर कळण्या करितां पाठवीत जाऊन त्याचें मत घेत जावें. परंतु इंग्लिश लोकांचा अंमल पुण्यांत न राहुं देण्यास अथवा पेशव्यांचे राज्यकारभारांत मन घालावयास **शिंद्यांस** वेळ नव्हता, कारण, कीं **शिंदे** ते समयीं व पुढें कित्येक वर्षें पर्यंत आपलें स्वतंत्र राज्य हिंदुस्थानांत करण्याचे उद्योगांत फार गुंतले होते.

**शिंद्यांस** सन् १७८७ मध्यें रजपूत लोकांनी जिंकल्या मुळें ग्वाल्हेरीकडे जाणें प्राप्त झालें, ते त्या संकटांत असतां त्यानी **नाना फडनवीसांस** फौज पाठविण्या करितां कित्येक वेळां पूर्वी लिहिलें होतें, व पुन्हा त्यांनी **नानांस** लिहिलें, कीं यासमयीं मी नाईलाज झालो आहे, असें नाहीं, परंतु इंग्लिश लोक दिल्लीचे बादशाहाशीं व रजपूत लोकांशीं दोस्ती करणार आहेत, ती झाली असतां बादशाहाने त्यांस साहाय्य दिल्हाने हिंदुस्थानामध्यें जो अधिकार त्यांस प्राप्त होईल, तो त्यांस जर प्राप्त होऊं दिल्हा तर मराठ्यांचे राज्यास धक्का बसेल, या विषयीं आपण विचार करावा. माझ्या मनांत आपणा विषयीं मत्सर भाव नाहीं, व आपल्या मनांत मज विषयीं कांहीं असल्यास तो सोडून द्यावा. **होळकर, हरीपंत** व **परशुराम भाऊ** यांस विचारा, कीं मी कधीं त्यांचे कामां मध्यें लांडा कारभार केला होता कीं काय ? आणि

मी नेहेमी राज्य वृद्धिंगत होण्या करितां श्रम केला नाहीं? आपण सर्व एका धन्याचे चाकर यास्तव मराठ्यांचे कल्याणार्थ आपण यत्न करावा. जर तुमचे मनांत मजविषयीं संशय असला तर तुह्मीं आपल्या मनांत विचार करून पहा, कीं मोरोबाचे बंडा पासून तुमचें संरक्षण कोणीं केलें? तुमचे शत्रू सखाराम बापू यांस तुमचे ताब्यांत कोणीं आणून दिल्हे. सदाशीव राव भाऊ याने राज्यावर माझा वारसा आहे असें बोलणें घालून बंड केलें होतें, तें कोणीं मोडलें? व इंग्लिश लोकांस तळेगांव एथें जिंकून स्वांरी खर्चा बद्दल मोठा खंड त्याजवर बसवून आपला नफा होईल असा सल्ला कोणीं केला? हे सर्व केलेले उपकार आपण स्मरून मनांत संशय असेल तो सोडून द्यावा, व दोघांस एकमेकांच्या चहाड्या सांगणारे जे शत्रू त्यांची तोंडें बंद करावीं. हिंदुस्थानांतील सर्व मराठे लोकांनी धैर्य धरून आपलें राज्य दुसऱ्या लोकांस न घेऊं देतां बचावावें. इंग्लिश लोक बादशाहाशीं व रजपूत लोकांशीं दोस्ती करणार, हें सर्व खोटें होतें; बाकीचा हा सर्व मजकूर महादजी शिंद्यांनी लिहिलेला खरा होता. परंतु नानांचा मुख्यत्वें करून हाच हेतू होता, कीं पेशव्यांचे नावानें मोठें बंड माजवावें. शिंद्यांचे सर्व वर्तणूकी वरून असें दिसून आलें, कीं त्यांचे मनांतून पेशव्यांचे राज्यांत आपणांस मुख्य अधिकार मिळाला नाहीं, तर आपण स्वतंत्र राज्य करावें असें होतें. नाना फडनविसांचे मनांतून हिंदुस्थनांतील मराठ्यांचे हक्क जाऊं द्यावयाचे नव्हते. तरी शिंद्यांचे फौजेस कुमक, किती कशी, व करावी किंवा न करावी याविषयीं ते विचार करूं लागले. शिंदे परत येण्याचे पूर्वींच नानांनी कांहीं फौज अल्ली बाहादूर याचे हाताखालीं तयार केली होती, परंतु नानांचे म-

नांतून आपले प्रतिस्पर्धी शिंदे महान लोभी यास रजपुताच्या प्रांतीं सत्ता, व अधिकार दृढ करूं न देतां मराठ्यांचा अंमल वाढवावा असें होतें, ह्मणून पेशव्यांचे नांवाने रजपूत लोकांशीं कांहीं निराळा ठराव करण्या करितां ही फौज नेमिली होती.

नानांचे स्वदेशीय लोकांपैकीं कित्येकांस वाटत होतें, कीं नाना फडनवीस यांनी जयपूरचे राजाशीं कांहीं वळण हिंदूंची सत्ता व अंमल काईम राहून शिंद्यांचा लगाम आपल्या हातांत असावा, या बुद्धीने ठेविलें होतें. शिंदे परत येत असतां रजपूत लोकांनी त्यास कांहीं उपद्रव न करितां त्याशीं केवळ बिघाड केला नाहीं, हें जयपूरचे राजाशीं नानांनी वळण ठेविलें होतें असें जें अनुमान केलें त्यास प्रमाण दिसतें. व जर रजपूत लोकांनी शिंद्यांशीं बिघाड केला असता, तर तो मरांठ्यांचे राज्यास नाशकारक झाला असता. नानांचे मनांतून जें उच्चत्व प्राप्त व्हावयाचें होतें तें प्राप्त झालें नाहीं. याखेरीज शिंद्यांविषयीं विचार करून पहातां जीं संकटें नानांस प्राप्त झालीं तींहींकरून व टिपूने कांहीं नूतन दुशमानीच्या गोष्टी केल्या यामुळें त्यांनी दक्षिणेंतून फौज पाठवावयाचा बेत केला होता तो रहाता केला. शिंद्यांनी साहाय्याकरितां पुण्यास वारंवार लिहिलें, तरी त्यांनी आपल्या राज्यकारभाराचा बंदोबस्त व सुधारणूक करण्या विषयीं त्यांच्याने यत्न करवला तितका चालविला होता.

शिंदे ग्वालेरीस परत आले, तेव्हां नाना फडनविसांनी दक्षिणेंतून फौज पाठवून त्यांस साहाय्य दिल्हें नाहीं. यास हें एक कारण झालें असावें, कीं टिपूने कांहीं नवीन अगळीक केली असें आह्मांस वाटतें. टिपूने नवीन अगळीक केली ती हीच कीं, हरीपंत फडके कृष्णानदी उतरून परत आले नाहींत इतक्यांत

कित्तूर पुनःघेतलें, व बिडनोर एथें फौज जमा झाली होती, तिने कोकणांत शिरून मराठ्यांचे प्रांत होते त्यांजवर घाला घालण्यांचे भय दाखविलें. हिंदुस्थानांतील राजे लोक क्षणिक बुद्धीचे असतात, त्याप्रमाणें **टिपूस** एकाएकी तह करावयास काय कारणें झालीं तीं समजणें हें फार कठीण आहे. चहूंकडून वर्तमान आलें यावरून इंग्लिश लोकांनी असें सिद्ध केलें, कीं **पेशवे, निजाम अल्ली ,टिपू,** आणि फ्रेंच हे बंड करणार, तों **नानांचे** विचाराने **टिपूने** हें सुचनार्थ कापट्य केलें. मराठे लोक बंड करणार असें इंग्लिश लोकांस वाटलें यास कांहीं आधार नव्हता. परंतु **टिपू** बंड करणार याविषयीं योग्य कारण होतें, कांकीं **टिपूने** पुनः फ्रेंच लोकांशीं ठराव केला, व त्याचें हत्यार मराठ्यां पेक्ष्यां इंग्लिश लोकांवर जास्ती होतें, परंतु त्याचा खरा संकेत होता, तो त्याचे फौजेची तयारी होऊन फ्रेंच लोक साहाय्यास येत तों पर्यंत कोणास कळूं न द्यावा, असें त्याचे मनांत होतें. व **नाना फडनविसांचे** मनांत वाटलें कीं **टिपूचे** मनांतून मुख्यत्वें करून मराठ्यांचे प्रांतावर घाला घालावयाचा होता. सन् १७८७ या वर्षांचे शेवटीं **लार्ड कार्नवालिस** ह्मणून गवर्नर जनरल यांस **मिस्तर मालेट** यांजकडून पेशव्यांचे तर्फेने हुकुमी बोलणें करविलें, कीं **टिपू** फार उद्दाम व लोभी आहे, त्याने आह्मांवर घाला घातल्यास त्याचा लगाम हातांत राहाण्या करितां तुह्मी आह्मांस मदत द्यावी. मराठ्यांस मदत दिल्ही असतां, इंग्लिश सरकारचा जो अधिकार ब्रिटिश इंडियामध्यें आहे त्याचें संरक्षण होईल असें **लार्ड कार्नवालिस** यांस वाटून त्यांचे मनांत मराठ्यांस मदत द्यावी असें आलें; परंतु पार्लमेंटाचा हुकूम असा झाला, कीं

टिपूने आपणाशीं ठराव केला आहे तो इंग्लिश लोकांशीं स्पष्ट शत्रुत्व करून मोडी तों पर्यंत तुह्मी मराठ्यांस टिपूस जिकण्या विषयीं मदत देऊ नये. त्यावरून लार्ड कार्नवालिस यांनी मिस्तर मालेट यांस हुकूम लिहिला, कीं गवर्नर जनरल यांचे मनांतून पेशवे सरकारची दोस्ती फार असावी असें आहे. याप्रमाणें पेशव्यांस सांगावें.

सन् १७८८ मध्यें खरोखरी बातमी येऊन पोहंचली, कीं टिपू लढाई करितां विभू रचीत आहे, व चिकोरचे राजाने तालचिरीवर घाला घातला, हा टिपूचे सांगण्यावरून घातला. त्रावणकोरचा राजा जो इंग्लिश सरकारचा मित्र आहे, त्याचे देशावर घालावयाचा बेत केला, तेणेंकरून हिंदुस्थानाचे दक्षिणेस इंग्लिश सरकारचीं जीं ठाणीं आहेत, तीं पुढें जिकावयाचीं, तों हें पूर्वीं त्याचें चिन्ह दाखविलें. या गोष्टी गवर्नर जनरल यांचे कानावर आल्यावरून, त्यांनी क्यापटन क्यानोवे या नावेंकरून घनतूर प्रांत खालीं करून घेण्या विषयीं वकील नेमिले होते, त्यात गवर्नर जनरल यांनी हुकूम केला, कीं निजाम अल्लीस कळवा जे, ज्या ज्या गोष्टींचा ठराव तुमच्या आमच्या मध्यें व्हावयाचा असेल तो मित्रत्वाने गवर्नर जनरल करावयास फार खुशी आहेत. निजाम अल्ली याने इंग्लिश सरकाराशीं सर्व गोष्टींचा चांगल्या रीतीने बंदोबस्त करण्या विषयीं उत्सुकता दाखविली. तेव्हां गवर्नर जनरल यांनी त्यांस पत्र लिहून कळविलें, कीं हें पत्र तहनाम्या प्रमाणेंच आहे. यास्तव वर लिहिलेला प्रांत इंग्लिश सरकारचे ताब्यांत पुढें आल्यावर तुह्मांस व मराठ्यांस वचनें दिल्हीं आहेत तीं सिद्धीस नेऊं. टिपूचा देश सरते शेवटीं जिकावा असा या वचनांचा अभिप्राय होता. तेव्हां या पत्रावरून

टिपूस वाटलें कीं, इंग्लिश, निजाम अल्लीला मजवर घाला घालण्यास मदत देतील. टिपूने त्रावणकोरावर घाला घालण्या विषयींचा बेत केला होता, तो प्रगट न व्हावा ह्मणून फारशी काळजी केली नाहीं; आणि डिसेंबरचे एकुणतिसाव्या तारिखेस त्रावणकोर एथील फौजेवर घाला घातला. त्याजवरून तो लढाई करणार असें वाटलें. नाना फडनवीस यांचे कानावर ही गोष्ट येतांच त्यांनी गवर्नर जनरल यांस मिस्तर मालेट यांजकडून आपले धन्याचे, व निजाम अल्लीचे नावाने अमूक ठराव केला असें लिहिविलें. तेव्हां त्या ठरावामध्यें कांहीं कमजास्ती केल्यावर गवर्नर जनरल यांनी तो मान्य केला. पूर्वी मार्चाचे एकुणातिसाव्या तारिखेस हा ठराव झाला होता, व पुण्यांमध्यें जूनचे पहिल्या तारिखेस कंपनी सरकारचे तर्फेने मिस्तर मालेट, आणि पेशवे व निजाम अल्ली यादोघांचे तर्फेने नाना फडनवीस यांनी प्रसंग पडल्यास एकमेकांस एकमेकांनी सहाय्य द्यावें, असा तह केला. त्यांत निजाम अल्लीनी व पेशव्यांनी असें ठरविलें कीं, पंचवीस हजार स्वारांनी टिपूचे उत्तरे कडील देशांत पावसाळ्यांत व पावसाळा संपल्यावर घाला घालून त्याचा जितका देश हातास येईल तितका साध्य करावा. पावसाळा संपल्यानंतर त्यांनी ह्मणजे पेशवे, निजाम अल्ली, व इंग्लिश, यांनी आपली पराकाष्टा करून टिपूशीं लढाई करावी, आणि गवर्नर जनरल यांनी इंग्लिश लोकांस मदत देण्या करितां दाहा हजार स्वार मागितल्यास सांगितल्या दिवसा पासून एका महिन्यामध्यें तितके स्वार जमा करून द्यावे, व त्यांचा खर्च मात्र इंग्लिश लोकांनी चालवावा. टिपूशीं ही लढाई झाली तींत प्रथमतः स्वारींवर मुख्य जनरल मेडोस होते. ती लढाई

सन् १७९० मध्यें मे महिन्याचे सव्विसाव्या तारिखेस सुरू झाली. आणि सन् १७९१ मध्यें जानेवारीचे सत्ताविसाव्या तारिखेस फौज मद्रास एथें परत आली, तेव्हां लढाई संपली. त्यांत केवळ थोडा नफा झाला असें नाहीं, बराच झाला, परंतु त्यांस जितका वाटला होता तितका झाला नाहीं. **जनरल मेडोस्** याने मद्रासचे फौजे सुद्धा जाऊन दक्षिणे कडून **टिपूचा** देश वेढिला. आणि करूर, डिंडिगल, कोयंबतूर, आणि पालघाट, इतके घेतले. व इकडे **कर्नल हार्टली** यांनी मुंबईतील फौजेसहित जाऊन पश्चिमे कडून घाला घालून कालीकोटचे शेजारीं एका पलटणीचा मोठ्या शूरत्वाने पराजय केला. मुंबईहून **सर राबर्ट आबर क्रांबी** यांनी आपल्या हाताखालीं कांहीं कुमक आणून मलबार प्रांतांतून **टिपूची** फौज नाहींशी केली. **टिपूशीं** पुढें लढाया झाल्या त्यां विषयीं कथन करण्याचें कारण नाहीं, परंतु इतकेंच लिहितों कीं, **लार्ड कार्नवालिस** व **हरीपंत फडके** व **शिकंदर जाहां** ह्मणून **निजाम अल्लीचा** लेंक हे जमलेल्या फौजेसहित श्रीरंगपट्टणा पुढें सन् १७९२ मध्यें फेब्रेवारीचे पांचव्या तारिखेस येऊन पोहंचले; आणि दुसऱ्या दिवशीं इंग्लिश लोकांचे फौजेने **टिपूचे** छावणीवर मोठ्या शूरत्वाने जाऊन घाला घातला. तेणेंकरून **निजाम अल्ली** वगैरे सामील मंडळीचे हातांत बाहेरील तट आले, आणि सभोंवती गराडा घालण्या करितां लागलीच तयारी केली. **टिपूने** तहाचें बोलणें करण्या करितां वारंवार यत्न केला, त्यांत प्रथमतः त्याने जें बोलणें लाविलें तें कित्येक कारणांवरून मान्य करण्या जोगें नव्हतें, शेवटीं **टिपूने** इंग्लिश लोकांशीं मोठ्या लीनतेने बोलणें घातल्यामुळें, व इंग्लिश लोकांचे मित्रा कडून विशेषेंकरून **हरीपंता** क-

हून रदबदली करविल्यामुळें फेब्रवारीचे चौदाव्या तारिखेस दोन वकील बोलणें करण्यां करितां येऊदेण्याचा हुकूम झाला. तरी केवळ तह करावयाची इछा न दाखवितां इंग्लिशांकडील फौज घाला घालीत होती, व तिकडील फौज आपला बचाव करीत होती. इकडे या दोहों वकीलांशीं बोलणें करण्या करितां **हरीपंत**, **निजाम अल्ली**, आणि इंग्लिश या तिघांकडून तीन वकील नेमले. त्यांमध्यें **सर जान क्यानोवे**, हे **लार्ड कार्नवालिस** यांजकडून व **हरीपंता** कडून **बचाजी रघुनाथ**, आणि **शिकंदर शाहा** यांचे तर्फेनें **मीर आलम**, असे पाठविले. त्या-वकिलांचा पुष्कळ वादविवाद होऊन व त्यांनी आपापल्या धन्यांस त्या विषयीं मत विचारून शेवटीं लढाई होण्याचे पूर्वी **टिपू** जवळ जो देश होता, त्यापैकीं अर्धा देश व तीन कोटी तीस हजार रुपये खंडणी बद्दल **टिपूनें** द्यावे असें ठरविलें. त्या प्रमाणें देण्यास फेब्रवारीचे तेविसाव्या तारखेस **टिपू** कबूल झाला. त्यापैकीं अर्धी खंडणी लागलेच द्यावी व अर्धी एक वर्षाचे आंत सारख्या तीन हप्त्यांनी द्यावी यास, व **हैदर अल्लीचे** राज्यापासून कैद केलेलीं मनुष्यें सोडण्यास, आणि हा ठराव केल्याप्रमाणें सिद्धीस नेण्याकरितां आपले दोन पुत्र ओलीस ठेवण्यास कबूल झाला; आणि दोन दिवसांत हा तह शेवटास नेला. ओलीकरितां दोन पुत्र पूर्वीच इंग्लिश लोकांचे छावणींत येऊन पोहंचले; व खंडणी बद्दल कोट रुपयांहून, काहीं जास्ती रुपये दिल्हे. असे असतां हा नियमित तहनामा मोडण्याचा प्रसंग आला. कारण कीं **टिपूनें** जेव्हां हा तह केला तेव्हां अमक खंडणीं द्यावयाचें कबूल केलें होतें त्यावेळेस चुकून इंग्लिश लोकांस गांव दिल्हे त्यांचे यादींत कुरंग प्रांत गेला, असें त्याचे समजण्यांत आलें, तेव्हां कुरंग

ह्मणजे श्रीरंगपटणाचे वेशींतून एक वेसच दिल्ही कीं काय? असें त्यास वाटून तो कुरंग प्रांत देण्यास तकरार करूं लागला. यावरून टिपूचा तह मोडण्याविषयींचा निश्चय दिसण्यांत आला. परंतु लार्ड कार्नवालिस यांनी पुनः मोठ्या जलदीने किल्ल्यास वेढा घालून प्रांत व खंडणी इत्यादि टिपू पासून जें जें त्यांस मिळालें होतें त्यांतून टिपूस कांहीं एक परत द्यावयाचें नाहीं, असा त्यांनी पक्का निश्चय केल्यामुळें, तह मोडला असतां याचा परिणाम पुढें काय होईल, याचा विचार करून टिपस तहनाम्यावर सही करणें प्राप्त झालें. यास्तव पूर्वी पेशवे, आणि निजाम अल्ली यांशीं करार झाले होते, त्यांचा अथवा प्रथम रण संग्रामीं जातील त्यांस लढाईंत जें जें मिळेल त्यांतील दुसऱ्यांपेक्षां जास्ती भाग मिळावा असें तहनाम्यांत लिहिलें होतें, त्याचा कांहीं संबंध न धरितां सर्व मिलाफी मंडळीस टिपू पासून घेतलेले प्रांत सारिखे वांटून दिल्हे. तेव्हां एकेकास सालिना चाळीस लाख रूपये वसुलाचे प्रांत मिळाले.

लार्ड कार्नवालिस यांजवळ फौजफांटा व सामर्थ्य असतां त्यांनी टिपचा सर्व देश घेतला नाहीं, याचीं कारणें या ग्रंथांत लिहिलीं असतां हें दुसऱ्या विषयीं कथन केलेसे होईल, ह्मणून पेशव्यांचे राज्यांतील नाना फडनवीस व परशुराम भाऊ हे टिपूचा द्वेष करीत होते तरी ह्मैसूरचें ह्मणजे टिपूचें सर्व राज्य खालसा करूं नये, असें त्यांचे मनांतून होतें. व महादजी शिंद्यांचे मनांतूनहि टिपचा सर्व देश न घ्यावा असें होतें, इतकें लिहितों. विलायतेहून सर्वांचें मतें ठरून हुकूम येतो त्याप्रमाणें दक्षिणेंतील इंग्लिश सरकार करितें हें ठाऊक नसल्यामुळें मराठे लोकांस असें वाटलें, कीं टिपूचा सर्व देश न

घ्यावा असें हरीपंत फडक्यांनी सांगितल्यावरून गवर्नर जनरल यांनी ऐकिलें. लार्ड कार्नवालीस हे टिपूचा देश घेण्या करितां मराठे लोकांनी मदत द्यावी याविषयीं बोलणें करीत होते, तेव्हां त्यांनी मेजर पामर नामें शिंद्यां बरोबर रेसीडेंट् ह्मणजे वकील होते, त्यांस हुकूम पाठविला, कीं शिंदे व होळकर या दोघांस विनंती करून त्यांकडून पेशव्यांपाशीं भीड खर्चवून पेशवे इंग्लिश लोकांस टिपूवर घाला घालण्यास मदत देतील अशी तजवीज करावी. माझे फौजेचे कुमकेस दोन भर पलटणी दिल्ह्यास मी दक्षिणेंत जाईन व जोंपर्यंत मी आपल्या राज्यांतून बाहेर आहें, तोंपर्यंत हिंदुस्थानांत माझे राज्याचे बचावाचा पत्कर इंग्लिश सरकारांनी घेतल्यास टिपूचा देश घेण्याविषयीं मी इंग्लिश सरकारास मदत देईन, असें महादजी शिंद्यांनी बोलणें घातलें. हें शिंद्यांचे बोलणें मान्य न करण्या जोगें वाटल्यावरून इंग्लिश सरकाराने शिंद्यांचे बोलण्याप्रमाणें करावयास नाकारिलें. ह्मणून शिंदेहि पुण्यांतील तहनाम्यास अनुसरले नाहींत.

त्या समयीं शिंदे रजपूत लोकांशीं लढाई करीत होते तेव्हां लोकांस असें वाटलें, कीं शिंदे सर्व रजपूत लोकांस जिंकतील, परंतु होळकर आणि अली बाहादूर हे जे त्यांचे सहायकारी यांनी शिंद्यांस आडथळा करून तंटे बखेडे केले, तेणेंकरून रजपूत लोक यांनी शिंद्यांस वार्षीक नियमित खंडणी देण्याचा ठराव केल्यास त्यांच्याशीं तह करावा असा निश्चय करणें भाग झालें. शिंद्यांची सहायकारी होळकर अली बाहादर वगैरे मंडळी तिने तंटे बखेडे केले तेव्हां शिंदे या मंडळीस पुण्यास बोलवावें, या संकेताने आह्मी पुण्यास जाण्याचा बेत केला आहे

असें वारंवार बोलिले. परंतु नानां होळकरास मदत कां देत होते, याचें कारण मसिद्ध होतें. व शिंदे त्या वेळेस मोठ्या संकटांत होते ह्मणून त्यांस इतकें लांबून येणें हें फार गैरबचावाचें दिसलें. तों खरोखरी पुण्यास यावयास निघाले तेव्हां कित्येकांनी निरनिराळ्या कल्पना केल्या. कित्येकांस वाटलें, कीं इंग्लिश लोकांची पुणें व हैदराबाद एथें बडेजाव होऊन त्यांचा अमल बसत चालिला, ह्मणून शिंद्यांस मत्सर उत्पन्न होऊन, पुण्यांत आपला अधिकार व अमल बसवून, इंग्लिश लोकांनी टिपूस जिंकून त्याचें राज्य विभागून घेतले असतां विशेषेंकरून त्यांस उच्चत्व माप्त होईल, तें या निश्चयाने येत आहे. कित्येकांस वाटलें, कीं शिंद्यांचे मनांतून निजाम अल्लीचा देश घ्यावा असें आहे; व कित्येकांस वाटलें, कीं हिंदुस्थानामध्यें त्याने जे देश संपादिले त्यांत होळकराने आपला हात घालूं नये असाच त्याचा मुख्यत्वेंकरून संकल्प आहे. इतक्या सर्वांनी कल्पना केल्या त्यांस कांहीं तरी आधार असेल, असें खरोखरी वाटतें, व सर्व ब्राह्मण लोक आपल्या ताब्यांत आणून, पुण्यांत आपल्या सत्तेचें स्थापन करावें असा त्याचा निश्चित संकल्प होता यांत काहीं संशय नाहीं. सन् १७९०या वर्षीं जून महिन्यांत पट्टण यथें लढाई झाल्यावर आपणास मतिनिधींचें काम वंशपरंपरा दिल्लीस पेशव्यांस वकील मुतलग अशी पदवी देववावी ह्मणून शिंद्यांनी दिल्लीचे बादशाहा पासून त्या समयीं ही पदवी तिसऱ्याने मिळविली, परंतु या वेळेस असें ठरविलें होतें कीं, ही पदवी माघारी न घेतां पेशव्यांस वंश परंपरा चालवावी. तैमूर बादशाहा ज्यास दक्षिणेंतील मराठे लोक सन्मान देत असत, तो शिंद्यांचे मुठींत आहे असें

त्याचें स्वदेशीय लोकांस दाखविण्या करितां व सर्व हिंदुंची मनें-तृप्त करण्या करितां **बादशाहानें** त्यास अखत्यारी दिल्ही, कीं **शिंद्यांचे** खुशीस येईल तो त्यानीं आपल्या पुत्रांतन निवडून काढून आपला वारसदार करावा, आणि मंगलोरचे राज्यांत वृषभ वध, गोवध नव्हावा ह्मणून एक सनद करविली. **शिंदे** दक्षिणेकडे मंद गतीने निघाले, आणि आपलें राज्य सोडून इतकें लांब जावें किंवा न जावें याचा वारंवार विचार करूं लागले. ते बोलले, कीं वकील मुतलग या पदवीचीं राजचिन्हें व सनदा घेऊन **बादशाहाचे** हुकुमाने पुण्यास जातों. **बादशाहा** पासून अखत्यारी घेऊन **शिंदे** गोदावरी तीरीं भीर एथे पोहंचले तेव्हां त्यांनी **निजाम अल्लीस** कांहीं मागणें केलें, तें कोणत्या रीतीने केलें हें ठाऊक नाहीं. **निजाम अल्लीने** भीर ह्मणून जो पिकाऊ प्रांत होता, तो आपणास द्यावा, व औरंगाबाद पेशव्यांस द्यावी, ह्मणून **शिंद्यांनी** फार यत्न केला, परंतु **निजाम अल्लीने** ही गोष्ट नाकबूल केल्यामुळें त्याने **शिंद्यांचा** आदर सत्कार केला नाहीं, ह्मणून त्यांस वाईट वाटलें, असें त्याने निमित्त केलें.

**नाना फडनवीस** यांस **शिंदे** खरोखरी दक्षिणेंत येतात, कीं नाहीं, याविषयीं फार दिवस संशय होता, परंतु पुण्यास येण्याकरितां बऱ्हाणपूर सोडून रस्ता चालत आहेत अशी खात्री झाली तेव्हां **नाना फडनविसांनी हरीपंत फडक्यां** कडून **लार्ड कार्नवालीस** यांस विनंती करविली कीं **क्यापटन् लिटल्** यांचे हाता खालील फौज लढाईंत फार उपयोगी पडली होती, ती आमचे चाकरींत नेहेमी असावी, पेशवे तिचा खर्च देतील, असें पेशव्यांचे नांवाने पत्रहि लिहिलें, परंतु गवर्नर जनरल

यांनी ती गोष्ट नापसंत केली. इंग्लिश लोक नाना फडनविसांस मदत देतील ह्मणून शिंद्यांस भय वाटून त्यांनी नाना फडनविसांचा आपल्या जवळ फौज काढण्याची तयारी आहे, यास्तव जो द्वेष झाला होता, तो शांत करण्या करीतां थोडेसेंच पायदळ आपल्या बरोबर आणिलें, त्या फौजेवर हेशिंग या नामें करून मोठा अबरू वाला इंग्लिश मनुष्य होता; व एक भर पलटण होती तिजवर नेपूल्स् देसचा राहाणारा व नीच जातीचा ढोंगी मेकल फैलोज ह्मणन होता, परंतु त्याची रीत भात चांगली होती, व तो कावेबाज होता. शिंद्यांनी जून महिन्याचे अकराव्या तारिखेस पुण्यास येऊन मुळामुठांचे संगमावर तळ दिल्हा. ती संगमावरील जागा पेशव्यांनी इंग्लिश सरकारचे वकील व त्यांजबरोबरील लोक यांस नेमिली होती. संगम एथें इंग्लिश लोकांची राहाण्याची जागा कित्येक गोष्टीं विषयीं फार सुखकारक, आणि बहुत करून इंग्लिश लोक पुण्यास आले, असतां त्या ठिकाणीं रहात असत, यावरून संगम या नावाने रसीडेन्सी प्रसिद्ध आहे.

बादशाहाने शिंद्यां बरोबर या पदव्या व या पदव्यांचीं राजचिन्हें, व वस्त्रें पाटविलीं, होतीं, तीं पेशव्यांनी न घ्यावीं ह्मणून नाना फडनविसांनी पराकाष्टा केली. नाना फडनविसांनी पेशव्यांस निवेदन केलें, कीं कांहीं किताबती स्वीकारण्यास अयोग्य आहेत, त्यापैकीं, महाराजाधिराज ह्मणजे सर्व राजांपेक्षां उंच, ही पदवी आपणास घेण्यास योग्य नाहीं, परंतु शिंद्यांनी फार आग्रह करून सातारचे राजापासून हुकूम आणिला, कीं या सर्व पदव्या पेशव्यांनी स्वीकाराव्या. शिंदे येऊन पोहंचल्या नंतर नऊ दिवसांनी नाना फडनविसांनी शिंद्यांची भेट घे-

तली, तेव्हां **शिंद्यांने** त्यांची अंतःकरण पूर्वक भेट घेतली, आणि **नाना** जों पर्यंत तेथें होते, तों पर्यंत **शिंदे** आपल्या गादीवर बसले नाहीं. दुसरे दिवशीं **शिंदे** धाकट्या पेशव्यांचे भेटीस गेले, आणि हिंदुस्थानांतून जेजे चमत्कारिक पदार्थ आणिले होते त्यांची त्यांनी पेशव्यांस नजर केली. तिसरे दिवशीं प्रातःकाळीं धाकटे पेशव्यांस **बादशाहाकडून** वकील मुतलग अशा ज्या ज्या पदव्या आणि किताबती आणिल्या होत्या, त्या द्यावयाचा समारंभ करावयाचें ठरविलें. **शिंद्यांनी** त्या दिवशीं श्रम करून फारच मोठा समारंभ केला. पुष्कळ तंबू आपल्या छावणी पासून कांहीं अंतरावर ठोकून बार्डे चिरलीं. पेशवे मोठ्या डामडौलाचे स्वारीने तिकडे गेले. या सुंदर तंबूंचे शेवटांस एक सिंव्हासन होतें, आणि त्याजवर मोंगल लोकांचा **बादशाहा** बसला आहे, असें दाखविण्या करितां, त्याजवर **बादशाहाचे** हुकुमा सहित खिलात, ह्मणजे या पदवीचीं वस्त्रें इत्यादि सर्व मुख्य राज चिन्हें ठेविलीं होतीं. पेशवे सिंव्हासनाकडे आले, तेव्हां त्यांनी त्या सिंव्हासनास तीन वेळां वांकून कुर्निसा केल्या, व त्या सिंव्हासनावर नजरे बद्दल एकशें एक मोहोरा ठेविल्या, आणि त्या सिंव्हासनाचे डावे बाजूस आपण बसले. **शिंद्यांचा** फारशी चिटणीस होता, त्याने जो हुकूम **बादशाहाने** पाठविला होता तो वाचून दाखविला, व या खेरीज दुसरे हुकूम होते तेहि वाचून दाखविले, त्यांत वृषभ वध गोवध इत्यादि बंद केल्या विषयींची सनद वाचून दाखविली. नंतर पेशव्यांस खिलात ह्मणजे वस्त्रें झालीं, त्यांत नऊ जिनस होते. शिवाय पांच रत्नखचीत व परांचे अलंकार, व ढाल, तलवार, कलमदान, मोर्तबदऊत, व दोन मोर्चेलें, नालखी, पालखी, हत्ती, व घोडा या खेरीज **बादशाहाचे**

निशाणाचे हत्ती साहा, दोन अर्धचंद्राकृतीचे अलंकार, दोन हि-ऱ्यांचे तारे व सूर्य मछाकृतीचीं चिन्हें ह्मणजे माहे मोर्तब. हीं सर्व दिल्हीं.

पेशवे शेजारील एक्या तंबूंत गेले, आणि बादशाहा कडून खिलात आलें तो पोषाख घालून जाऊन पुनः तक्तावर बसले, नंतर शिंदे, नाना फडनवीस व पेशव्यांचे जे जे कारभारी हाजर होते ते, या सर्वांनी पेशव्यांस नवीन पदव्या मिळाल्या यांविषयीं नजरा केल्या. पेशवे राजवाड्यांत परत येण्या करितां उठले,तेव्हां शिंदे व हरीपंत फडके हे दोघे जण त्यांजवर मोर्चेल वारीत होते. पेशवे नालखींत बसून शहरांत येत असतां स्वारीची मोठी मौज पाहाण्या करितां पुष्कळ लोक जमले होते. स्वारीचा डामडौल आणि वैभव इतकें होतें, कीं पुण्यांतील लोकांनी असें कौतुक कधींच पाहिलें नव्हतें; हजारों वाद्यें वाजत होतीं व लोकांचा आरडा ओरडा चालला होता. व बंदुकांचे व तोफांचे वारंवार अवाज होत होते. तेणेंकरून शिंद्यांनी हा समारंभ मोठ्या हौसेने केला होता त्यास त्यांचे मनांतून होती तितकी शोभा आली.

पेशवे व महादजी बावा सरकार वाड्यांत आल्यानंतर महादजी शिंदे यांस वकीले मुतलग यांच्या दुय्यम पदवीचीं वस्त्रें झालीं, त्या प्रसंगीं त्यांनी कापट्येंकरून मोठी लिनता दाखविली. आणि पूर्वी पेशव्यांचा जोडा उचलणारा खिसमतगार असून त्यास पाटील इतकीच पदवी असतां हा वंश परंपरे पेशव्यांचा चाकर झाला असें लोकां कडुन ह्मणवावे ह्मणून जेव्हां त्यांनी आग्रह धरिला, तेव्हां मराठ्यांस त्यांचा फार त्रास आला, व शिंद्यांनी या समयीं कापट्याने लीनता दाखवून आपला अपमान के-

ला, तेणेंकरून, मराठे लोकांचा संतोष व्हावा, तो न होतां, कोणीहि शाहाणे आणि विद्वान ब्राह्मण फसले नाहींत अथवा त्यांस संतोषहि झाला नाहीं. महादजी शिंदे यांनी दक्षिणेंत वंश परंपरेचीं कांहीं वतनें खरीदी केलीं होतीं, तरी वृद्ध मराठे लोक यांनी महादजी शिंद्यांस, पाटील हें नाम वर्जून बादशाहाकडून पेशव्यांचे दुय्यम अशी नवीन पदवी मिळाली होती, ती त्यांनी मोठ्या संतोषाने मान्य केली, कारण, कीं पाटील ही पदवी औरस शिंदे कन्हेर खेडचे पाटील यांसच योग्य होती.

मानकरी व शिलेदार जे पुरातन सातारचे राजाचे चाकर ह्मणवीत होते त्यां पैकीं कित्येक जण ज्या घोड्यावर ते बसत असत तो आमचा असें ह्मणण्याची मुषकल होती, ह्मणजे इतकी त्यांचे पदरीं गरीबी असे, तरी त्यांनी पेशव्यां बरोबर बादशाहाचे तंबूंत येण्यास आढे वेढे घेतले, व वकीले मुतलग ही पदवी पेशव्यांनी अंगिकारली त्याबद्दल त्यांस नजरहि केली नाहीं. शिंदे आपल्या छावणींत गेले तेव्हां त्यांचे पदरचे लोकांनी त्यांस नजरा केल्या, परंतु त्यांचे स्वदेशी लोकांचे मनांत ही गोष्ट न येऊन त्यांचा द्वेष इतका झाला, कीं तो द्वेष शिंद्यांस समजून पुढें शिंद्यांचे मनांतून ज्या गोष्टी सिद्धीस न्यावयाच्या होत्या त्या करण्यास फार सावध गिरी करणें प्राप्त झालें.

पेशव्यांचा आपल्यावर विश्वास जडावा हा त्यांचा मुख्यत्वें करून हेतू होता, ह्मणून त्यांनी मोठा समारंभ केला, तो पाहून पेशव्यांची मर्जी प्रसन्न झाली होती, व हिंदुस्थानांतून जे जे अपूर्व जिन्नस आणिले होते, त्यांची नजर केली, तेणेंकरून शिंद्यांचे मनांत होतें त्याप्रमाणें झालें. शिंद्यांचें मन निःकपटी, निर्मळ, व त्यांची रीत चांगली असे, हे पेशव्यांस शिकारीस

जाण्या विषयीं, वारंवार उपदेश करीत आणि त्यांस मृगया भूमीवर वारंवार शिकारीस नेत. तेव्हां अशी **शिंद्यांची** वर्तणूक धाकटे पेशव्यांस, **नाना फडनविसांचे** संभावित मर्यादशील आणि गंभीर वर्तणूकेची संवय असे तिजपेक्षां **शिंद्यांची** अशी वर्तणूक आवडून **शिंदे** थोड्या दिवसांनंतर पेशव्यां बरोबर अष्टोप्रहर वागूं लागले. पुण्याशेजारील प्रांतांत नेहेमी मंडळी शिकारीस जाई, तेव्हां पेशव्यांस बोलावीत, त्या प्रसंगीं या गोष्टीस अनुमत देणें अवश्य आहे, असें **नानांस** वाटे तरी **शिंद्यांचे** मनांतील बेत समजून त्यांनी **शिंदे** व पेशवे यांमध्यें ज्या ज्या गोष्टी घडत होत्या, त्यांविषयीं अशी चौकशी ठेविली, कीं **शिंद्यांस** पेशव्यांशीं एकादी गोष्ट बोलणें झाल्यास त्यांस एकांती बोलण्यास सवड सांपडं दिल्ही नाहीं. प्रसंग आला ह्मणजे पेशव्यांस **नाना** अशा क्रर रीतीने वागवितात, हें **शिंदे माधवराव पेशव्यांस** बोलून दाखवीत, आणि खात्री करून सांगत, की अशाचे काजगीपासून सुटका होऊन आपण स्वतंत्र व्हावें, अशी माझी इछा आहे, व माझ्या आंगीं तितकी शक्तिहि आहे. **शिंदे** पेशव्यांस ज्या ज्या ऐष आरामाच्या गोष्टी सुचवीत त्यांस **माधवराव पेशवे** अनुसरत, तथापि पेशव्यांचा स्वभाव जात्या फार चांगला असे, आणि ते विचारवंत, व ज्ञानी असत, यामुळें त्यांचा **नाना फडनविसांवर** पूर्ण विश्वास होता, तो ढळला नाहीं. प्रथमतः **शिंद्यांचे** बोलण्याचा राग येत असे, आणि पेशवे **नानांचे** अटकेंत होते, त्याची त्यांस संवय पडल्यामुळें पूर्वीं काहीं त्यांस वाईट वाटत नसे. पुढे त्यांस त्या अटकेचा कंटाळा येऊं लागला, व **शिंद्यांचा** समागम असावा, असें दिवसानु दिवस मनांत येऊं लागलें. **शिंद्यांचीं** पुणें दरबारांत मु-

रुयस्वेंकरून हिंदुस्थानांतील राज्याविषयींचीं कामें असत. मी राज्य वाढविण्या विषयीं व पेशव्यांस मोठाल्या किताबती मेळविण्या विषयीं पुष्कळ पैका खर्च केला आहे, असें त्यांनीं पेशव्यांस सांगून हे सर्व खर्च पडले आहेत ते सरकारांनी द्यावे. हिंदुस्थानांतील राज्यावर माझा सर्व अधिकार असावा, व **होळकर** आणि **अल्ली बाहादुर** यांस परत पुण्यास बोलवावें, असें बोलणें लाविलें. या प्रश्नांचीं उतरें देण्यांचे पूर्वी **नानांनी** प्रथमतः त्यांस, विचारीलें, कीं तुह्मी हिंदुस्थानांत जे देश इतके सुलभतेने जिंकून घेतले आहेत त्यांचा सर्व वसूल इतके दिवस घेतला त्याचा हिशेब द्यावा. या खटल्या विषयीं पुष्कळ वादविवाद होऊन **शिंदे** व **नाना फडनवीस** या दोघांचा द्वेष वाढण्यास पुष्कळ कारणें झालीं, परंतु ते दोघे जण कित्येक दिवस पर्यंत एकमेकाशीं मिळवून घेवून बाह्यात्कारीं आदर सत्कार फार करीत, तरी त्या दोघांच्या फौजा हिंदुस्थानांतील रजपत लोकांच्या भांतीं कामगिरीवर होत्या त्या अगदीं एकमेकांशीं लढाई करण्याचे बेतांत आल्या.

**शिंदे** पुण्यास येऊन पोहंचले त्याचे पर्वीच कनूंद सर झालें होतें; आणि **होळकर** व **शिंदे** या दोघांच्या फौजा रजपूत लोकांचे देशीं खंडणी जमा करीत होत्या, व त्यांनीहि दोन किल्ले सर करून घेतले होते; व लूट मिळाली होती, तिज विषयीं दोन्ही फौजा तंटे बखेडे करीत असतां, त्यांतील लोक द्वेषाने एक मेकांशीं प्रसिद्धपणें लढाया करूं लागले; व त्यांची एक लढाई झाली, तींत **गोपाळराव भाऊ, लखोबा दादा,** आणि **दुबाईन** यांनी वीस हजार स्वार व नऊ हजार पलटणीचे पायदळ लोक यां सहित जाऊन **होळकराच्या** फौजेंत तीस हजार स्वार व

चार भर पलटणी होत्या त्यांचा पराजय केला. **होळकराचे** फौजेचा अगदी पराजय झाल्यानंतर बाकीची पलटणांची फौज राहिली होती ती तत्क्षणीं माळव्यांत पळून गेली, तेथें **होळकराने** मोठ्या रागाने **शिंद्यांचें** मुख्य शहर उज्जनी हें लुटिलें. हा वृत्तांत पुण्यांस येऊन पोहंचतांच **शिंदे** व पुणें दरबारांतील मंडळी यांमध्यें जो निष्कपटपणा होता त्यांत कांहीं वैमनस्य आलें; व **नाना** आणि **शिंदे** हे दोघे एकमेकांचे जिवाचा घात करितील या भयाने सावधगिरी ठेवूं लागले. **नाना फडनवीस** यांनी **परशुराम भाऊंस** साहाय्या करितां बोलावलें, तेव्हां **परशुराम भाऊ** दोन हजार स्वांरासहीत आले. **नानांनी** दोन हजार स्वांर साहाय्यास आणविल्या वरून, **शिंद्यांस** आपणा बरोबर हिंदुस्थानांतील फौज आली होती, ती पुष्कळ वाढ विण्यास व हिंदुस्थानांतून ब्रिगेड आणविण्यास निमित्त झालें; परंतु दोघेहि लढाई करून आपले बेत सिद्धीस नेण्यास उद्युक्त नव्हते, ह्मणून दोघांनी आपापल्या फौजेवरील कामगारांस निक्षूण ताकिदी पाठविल्या, कीं पेशव्यां कडून आपल्या तंट्या विषयींचा बरोबर बंदोबस्त होऊन हुकूम येई तोंपर्यंत वाट पाहून एकमेकांशीं लढाई करण्याचें बंद करा. येणेंकरून **शिंद्यांचा** हिंदुस्थानांमध्यें जास्तीच अंमल बसत चालला; परंतु दक्षिणेंमध्यें सर्व लोक त्यांस चाहात नसत; हें त्यांचें त्यांस ठाऊक असून, दक्षिणेंतील लोकांनी आपणांस चाहावें, याविषयीं त्यांनी फार यत्न केला व पुण्यांत येतांच **गोविंदराव गायकवाड** याचा पक्ष कोणत्या रीतीने धरिला, हें पुढें लिहिण्यांत येईलच. **नाना फडनवीस, पंत सचीव** बाल्य दशेंत होते ह्मणून त्यांची सर्व जाहागीर आपल्या ताब्यांत ठेवून त्याविषयींचा सर्व काम कारभार आपण क-

रीत असत, हें जनांत वाईट दिसतें असें शिंद्यांस वाटल्यावरून त्यांनी मध्यें शिरून नाना फडनविसांच्या हुकुमा वाचून पंत सचीवांस पुण्यास नेऊन त्यांचा अधिकार पुनः त्यांस देवविला व नाना फडनविसांचे तर्फेने सचिवाचे जाहागिरीवर बाजीराव मोरेश्वर यानामेंकरून कारभारी होता त्यास फांटा दिल्हा. शिंद्यांनी मध्ये शिरून ही गोष्ट धिटाईने केल्यावरून, नानांचा व त्यांचा कज्या झाला. तो हरीपंत फडके यांनी मध्यस्थी करून मोठ्या संकटाने मिटविला; परंतु पेशव्यांनी आपल्या ताब्यांत येऊन राहावें ह्मणून, शिंदे उघडपणें यत्न करीत असतां नवीन तंटे बखेडे उत्पन्न होऊं लागले. त्यांत विशेषेंकरून एके समयीं लोहोगांव एथे ते नौकेंत बसले असतां त्यांचें कांहीं, बोलणें चालणें चाललें होतें, तें कोणी ऐकून नानांस सांगितलें त्यावरून नानांस फार भय वाटून नानांनी पेशव्यांची प्रथम गांठ पडतांच त्याचें कारण विचारिलें; नानां बोलिले, कीं मी आपणांस व राज्यास किती उपयोगीं पडलों आहें, त्याचा अंतःकरणांत विचार करावा, व शिंदे आपला अधिकार आणि सत्ता जास्ती वाढवावी ह्मणून कसा यत्न करित आहेत, हेंहि पाहावें. शिंद्यांनी परदेशांतून फौज किती जमा केली आहे, व पूर्वीचे कानू कायदे एकीकडे ठेवून ते कोणत्या रीतीने वागत आहेत, व ज्या मराठे लोकांवर व ब्राह्मणी राज्यावर सर्वस्वी अधिकार असावा, अशी त्यांची उत्सुकता आहे, त्यांशीं ते किती वांकून आहेत हेंहि पहावें. या प्रमाणें त्यांनी पेशव्यांस विदित करून नंतर आपल्या अवस्थेविषयीं बोलन दाखविलें, आपण मला साहाय्य न देतां हातांतून सोडिल्यास माझा हुकूम कोणी ऐकणार नाहींत, व शिंदे आपली कृपा संपादून माझे पेक्षां मोठा अधिकार मिळावा ह्मणन यत्न

करीत आहेत, तो बंद करण्यास मी असमर्थ होईन. हें सर्व सांगून सरते शेवटीं डोळ्यांस आंसवें आणून नानां बोलिले, कीं शिंद्यांनी आपणास दुष्ट उपदेश करून कुमार्गानें वर्तावयास प्रवृत्त केलें आहे, याचा पुढें परिणाम काय होईल हें पहावें. व राजिनामा पुढें ठेऊन नानां बोलिले, कीं मी आतां काशीस जाणार मला आज्ञा असावी. असें नानांचें बोलणें ऐकिल्यावर माधवराव पेशवे यांचें अंतःकरणास फार खेद होऊन ते मोठे दुःखी होऊन बोलिले, कीं मला क्षमा करा, व कृपाकरून तुह्मी एथें रहा, ह्मणजे मी अतःपर आपल्या वर्तणूके विषयीं जपेन, असें त्यांनी नानांस वचन दिल्हें. नानाचे सत्तेचें व अधिकाराचें स्थापन पुनः झालें. हरीपंताचा सर्व गोष्टींत अनुपयुक्त आधार होता, व रास्ते आणि पटवर्धन या मोठाल्या ब्राह्मण लोकांचे कुळाचा व मोठाले पुरातन मामकऱ्यांचा व त्यांत कित्येक मोठाले जाहागीरदार होते त्यांचा नानांशीं स्नेह होता तेणेंकरून शिंद्यांच्या संकल्पास मोठा अडथळा झाला, तथापि शेवटीं बहुतकरून शिंद्यांचा आपल्या मोठे शक्तीने नानांवर दसक बसला असता, परंतु शिंदे उच्चत्व पावण्या करितां लोभाने यत्न करीत असतां त्यांस एकाएकीं बळकट ताप येऊन पुढें थोडे दिवसांनंतर मृत्यु पावले. त्यांचा अंतकाळ वानवडी ह्मणून पुण्याचे शेजारीं गांव आहे, तेथें सन् १७९४ फेब्रेवारीचे बाराव्या तारिखेस झाला.

महादजी शिंदे यांणी मरण्याचे पूर्वी आपला धाकटा पुतण्या आनंदरावाचा पुत्र दौलतराव यास दत्तक घेण्या विषयींचा निश्चय केला होता. दत्तविधानाचा संस्कार होणें राहिला होता. तरी महादजी शिंदे वारंवार ह्मणत, कीं दौलतराव माझा

वारसदार आहे. असें असतां मयत महादजी शिंदे यांची स्त्री लक्ष्मीबाई इने दौलतरावास दत्तक घेण्या विषयीं अडथळा केला. तरी नाना फडनवीस यांनीहि दौलतरावास दत्तक देण्याविषयीं मदत दिल्हावरून लक्ष्मीबाईचे संकेत एकीकडे राहिले. तुकोजी होळकर यांनी मज प्रथम दौलतराव हे महादजी शिंद्यांचे वारसदार असें कबूल केलें, शिंद्यांचे पदरचे लोकांनी आणि मोठाले मराठे लोकांनी दौलतराव वारसदार झाले ह्मणून आह्मांस फारच आनंद झाला असें सांगून पाठविलें. नानांचें अनुमत होतेंच तेणेंकरून दौलतराव त्या वेळेस तरूण पंधरा वर्षांचे वयाचा होता, तो महादजी शिंद्यांचे राज्याचा सर्वस्वें वारसदार झाला.

शिवाजी राजांनी राज्याची स्थापना केली त्या गोष्टीचा विस्तार फार वाढला, व या राज्यांत बचबच न होतां, सर्वांचा एकोपा व राज्यांतील सर्व प्रजेवर पक्का अमल राहून कित्येक देश घेऊन या राज्यांत मेळविले असते तर त्यांनी अद्यापी पुष्कळ मुलूख घेतले असते, व त्यांनी लुटीचा व लढाईचा क्रम निश्चयें करून चालविला असता; तर इंग्लिश लोकांची हिंदुस्थानामध्यें अशी बढती एकाएकीं झाली नसती, परंतु मराठ्यांस देश लुटण्याचीं जीं कारणें होतीं, तीं बंद झालीं व लोकांशीं लढाया करून त्यांचे देश घेत असत तेंहि बंद झालें, व सर्वांवर एकाचा हुकूम राहून, त्याचे आज्ञेंत सर्व राहातनासे झाले. ह्मणून ते स्वतां अमल करूं लागले. तोहि फारसा कडक नसे, न्याय व कायदे जरी जुलमी कामगारांच्या हातांत असत, तरी त्यांचे मनास येईल तसा जुलूम करणें झाल्यास त्यांचे हातांत नसे. लहान लहान राज्यांत चांगला बंदोबस्त असून, ते जसे सर्व राज्यांत आपला हूकम करूं श-

करत, तसा मराठ्यांचे राज्यांत त्यांचे कायद्याने ते करूं शकत नस- त. मराठे लोक तर जातीने शिपाई असत, सर्व कुळंबी लोकां- चे घरांतून थोडे तरी शिपाई असत, आणि बहुतकरून प्रत्येक गांवांत चतुर्थांश अथवा पंचमांश शिपाई लोक असत. लोकांस एकदां चाकरीस ठेविलें ह्मणजे जेव्हां कामगिरी येईल तेव्हां त्यां- ची तयारी असे, परंतु तुंबळ लढाई करणें झाल्यास ते योग्य न- सत. मराठ्यांचे स्वार, तोफा, व पायदळ यांजवर विश्वास ठेवी- त, या मुळें पहिल्या सारिखें त्यांचें धैर्य व चपळता राहिली नाहीं, व परदेशामध्यें एकाद्या साहस कर्मासाठीं जाणें झाल्यास पायदळ फौज व तोफखाना नसला ह्मणजे त्यांचें धैर्य सुटे. प्रथम सर्व मराठे लोक धैर्यवान व महान शूर असत, तें त्यांचें सर्व शूरत्व ना- हींसें झालें, व त्यांतून कित्येक, शिंद्यां जवळ फार तयार झालेली फौज व तोफखाना होता, ह्मणून त्याचे शाहाणपणाची व हुशारीची फार प्रशंसा करीत असत. व त्यांजवळ फौज व तोफखाना आहे ह्मणून त्यांस पुढें मोठाले फायदे होतील, व पूर्वी लिहिण्यांत आलें आहे त्याप्रमाणें कित्येकांनी बरोबर भविष्य केलें, कीं पुढें तो शिंदा अशीफौज व तोफखाना बाळगतो आहे, ह्मणून हिंदुस्था- नांतील सर्व राज्याचा मालक होईल.

पेशव्यांचा सर्व दक्षिणेंतील राज्यांवर अधिकार व हुकूम रा- हून सर्व मराठे लोकांस युद्ध करण्याविषयीं उत्तेजन देण्यास फार प्रयत्न पडतील असें जें वाटलें होतें, तें न होतां तें कांहीं दिवस प- र्यंत सुलभ झालें. कारण, सर्व मराठे लोकांस वाटलें, कीं लढाई केल्याने आपणांस फायदे होतील. सर्वांची एकी होण्यास हेंच कारण झालें, कीं निजाम अल्लीकडे कित्येक वर्षांचे चौथ इ- त्यादि कर येणें राहिले होते, त्यांचा ठराव झाल्यानंतर मराठे लो-

कांतील सर्व मुख्य लोकांस त्या पैकीं कांहीं विभाग मिळतील असें वाटत होतें. महादजी शिंदे मृत्यु पावल्यामुळें सर्व कारभार नाना फडनवीसांचे हातामध्यें आला, तेव्हां इंग्लिश लोक तिऱ्हाइता सारिखे राहिले.

निजाम अल्ली कडे कोणते व कशाबद्दल हक्क येणें होते ते मागें लिहिण्यांत आले आहेत. चौथ व सरदेशमुखी या हक्कां बद्दल पैसा फार वर्षांचा येणें राहिला होता. त्या विषयीं कित्येक वेळां मराठ्यांनी निजाम अल्ली कडे दाहा वर्षांपासून बोलणें चालणें केलें, परंतु टिपूशीं लढाई करण्या करितां पेशव्यांशीं निजाम अल्लीने दोस्ती केली. यामुळें निजाम अल्लीने दिवसानुदिवस तें पाठीवर टाकिलें होतें, व मराठ्यांस या गोष्टीचा निकाल करण्या विषयीं बोलतां येत नव्हतें. सन् १७९१ त गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे हे पेशव्यांकडून हैदराबाद एथें निजाम अल्लीचे दरबारांत वकील होते, त्यांनी निजाम अल्लीस कायद्या अन्वयें विनंती केली, कीं आपण हक्कां विषयीं चैाकशी करून ठराव करण्याकरितां आपल्या कडून कांहीं कारभारी कुलअखत्यारी सहीत नेमून द्यावे नंतर पेशव्याचे हक्कां विषयींचा ठराव करण्यां विषयीं कित्येक वादविवाद झाल्यानंतर, निजाम अल्लीने पेशव्यांचे कारभाऱ्यांस एक चवतीस कलमांची याद लिहून दिल्ही, तींत मुख्यत्वेंकरून पेशव्यांचे फौजेने जुलमाने खंडणी घेतली होती व कित्येक ठिकाणचा वसूल घेतला होता, व कित्येक ठिकाणीं वसूलास अडथळा केला होता, हे सर्व भरून देण्याविषयीं कलमें होती, व पेशव्यांचे हद्दींत राहाणाऱ्या पेंढारी लोकांनी आमचे देशांत येऊन नाश केला आहे, तोहि भरून देण्याविषयीं बोलणें घातलें. या सर्व कल-

मांस नानांनी त्यांची खातरी होण्याजोगीं बरोबर उत्तरें मोठ्या चतुराईने लिहून त्यांजबरोबर अठ्ठावीस कलमांची याद पाठवून मराठ्यांचे हक्कां विषयींचा ठराव जरूर करावा ह्मणून लिहिलें. या हक्कां पैकीं कित्येक हक्क सन् १७७४ पासून पोहंचले नाहींत असें नानांनी पुरवून दिल्हें; या हक्कां पैकीं कित्येक हक्क निजाम अल्लीस कबूल करणें प्राप्त झालें, व कित्येकांस तो नाकबूल झाला. परंतु त्याने वचन दिल्हें, कीं टिपूचे लढाईचा शेवट झाल्यानंतर त्याचा ठराव करण्या विषयीं कांहीं ग्रहस्थ नेमून देईन, कारण कीं, तोंपर्यंत इंग्लिश लोकहि, मध्यस्थीस येतील; असें त्यास वाटलें होतें. सन १७९२ वांत लढाई संपली, तेव्हां लार्ड कार्नवालीस यांनी टिपू जर आपणांपैकीं कोणावर घाला घालावयास आला तर एकमेकांस एकमेकांनी अमूक रीतीने साहाय्य द्यावें याविषयीं तहनाम्यांत कलम होतें, त्यावरून एकमेकांनी एकमेकांस साहाय्य द्यावें असा नवा तहनामा करावयास इच्छिलें. हा तहनामा करण्यास लार्ड कार्नवालीस यांनी यत्न केला याचें कारण हेंच, कीं तेणेंकरून सर्व पक्षांचा फायदा होऊन हिंदुस्थानामध्यें शांतता व्हावी. परंतु राज्यकारभारांतील मोठाले हिंदू लोकांस या तहनाम्याचें मूळ ह्मणजे मुख्य कारण समजलें नाहीं, तेव्हां तहनाम्याचें कारण ज्यास जसजसें भावलें तसतसें प्रत्येक समजले. निजाम अल्लीस वाटलें, कीं लार्ड कार्नवालीस यांनी तहनामा आपणांस साहाय्य देण्यास्तव केला, येणेंकरून पेशव्यांमध्यें आणि आपणामध्यें कांहीं आडकाठी करूं, ह्मणून त्याने जो बेत केला होता, तो सुलभ होईल, व तेणेंकरून पेशव्यांनी पुढें आपणांवर स्वारी न करावी इतकेंच होणार नाहीं, परंतु सांप्रत आपणांवर हक्काबद्दल जें पेशव्यांनी मागणें केलें आहे, त्याविषयीं-

हि टाळाटाळ होईल; निजाम अल्लीस पक्का भरवंसा होता, कीं हैदराने व टिपूने अमूक खंडणी देऊन पेशव्यांशीं ठराव केल्यामुळें त्याची पूर्वींचे तहनाम्यापासून मोकळीक झाली, तशी आपणहि अमूक खंडीत खंडणी देऊन करूं. मराठे निजाम अल्ली पाशीं आपले ठरलेले कर मागत असतां, इंग्लिश सरकारचे वकील लार्ड कार्नवालीस यांनी गर्वाने आपल्याकडे लटका कारभार ओढून घेऊन पेशव्यांची सत्ता कमी व्हावी, व निजाम अल्लीचा आणि पेशव्यांचा ठराव होत आहे त्यास अडथळा व्हावा, या बुद्धीने हा तहनामा केला, असें मराठ्यांस वाटून त्यांचा ते द्वेष करूं लागले. निजाम अल्लीचे व पेशव्यांचे चौथ वगैरे हक्कांचे ठरावांमध्यें इंग्लिश लोकांची मध्यस्थी बंद करण्या करितां शिंदे व नानां फडनवीस हे दोघे कबूल झाले. परंतु इंग्लिश लोकांनी मध्यस्थी करून पुढें काय योजीलें आहे, याविषयीं कल्पना करीत असतां नानां फडनवीस यांचे व शिंद्यांचे कल्पनेंत अंतर पडलें. शिंद्यांस वाटलें कीं इंग्लिश लोकांनी निजाम अल्लीशीं दोस्ती करून मध्यस्थी यामुळें केली, कीं निजाम अल्लीशीं मिळवून घेऊन त्याची सर्व फौज आपल्या हुकुमांत ठेवावी, नंतर त्या फौजेसुद्धां मराठ्यांवर चढाव करून यावें. असें वाटल्यावरूनच शिंद्यांनी आपल्या मरणाचे पूर्वीं थोडे दिवस टिपू सुलतानाशीं मित्र भावाने कागद पत्रांची वहिवाट ठेविली होती. नानां फडनविसांस जरी लार्ड कार्नवालीस यांनी ही गोष्ट केवळ प्रजेचे कल्याणार्थच केली असें बरोबर समजलें नाहीं, तरी नाना फडनविसांस जें वाटलें तें शिंद्यांचे कल्पनेपेक्षां बरोबर होतें. नानांस वाटलें कीं इंग्लिश सरकार तिन्हाइताप्रमाणें मध्यस्थी करण्यास उत्सुक

आहेत, तरी हैदराबाद शरहर जातें असें वाटे तोंपर्यंत लडाईस उभे राहणार नाहींत, पुढें हैदराबाद जिंकिली जाईल असें नानांचे स्वमींहि आलें नाहीं. पुण्याचे दरबारांत इंग्लिश लोकांकडून एकमेकांस साह्याय्य देण्या विषयींचे तहनाम्याचे कागद आले, तेव्हां शिंद्यांनी या तहनाम्यास लागलाच गैर रुकार दिल्हा असता, परंतु नाना फडनवीस यांचे मनांतून शिंद्यांस आपल्या अधिकाराखालीं आणावें असें होतें, ह्मणून त्यांनी इंग्लिशांशीं मित्रत्व ठेवून तहनाम्यास एकाएकीं गैर रुकार न देतां लांबणीवर टाकावें ह्मणून त्याजविषयींचें बोलणें लांबविलें. तरी तहनाम्यांत लिहिलें होतें त्या प्रमाणें नानांचे मनांतून करावयाचें नव्हतें.

सन् १७९३ आगसृ महिन्यांत लार्ड कार्नवालीस गेल्यानंतर त्यांचे कामावर सर जानशोर हे आले. निजाम अल्लीस वाटलें होतें, कीं लार्ड कार्नवालीस मध्यस्थी करून सर्व राजांनी ह्मणजे, निजाम अल्लीस, पेशवे व इंग्लिश यांनी प्रसंगानुसार एकमेकांस साह्याय्य द्यावें या विषयीं तहनामा करण्यास फार उत्सुक आहेत. ह्मणून पेशव्यांशीं तहाविषयीं बोलणें घातलें होतें, त्यांत त्यांची सिद्धी व्हावी ह्मणून त्यांस मोठी अटकळ होती, ती हा तह सिद्धीस जाणार नाहीं असें वाटे तोंपर्यंत त्यांनी बाहेर समजूं दिल्ही नाहीं. नंतर त्यांनी आपली पराकाष्ठा करून इंग्लिश लोकांस हा तह करण्याविषयींचें कारण दर्शवून उत्तेजन पुष्कळ देऊन आपणासच इंग्लिशांनी साह्याय्य द्यावें या विषयीं निराळा तहनामा करावयास यत्न केला. मराठ्यांनी इंग्लिश लोकांची मध्यस्थी कबूल करावी ह्मणून मराठे लोकांवर जुलूम करून त्यांजकडन इंग्लिश लोक ह्मणतात त्या प्रमाणें कबूल करून घ्यावें हें ठीक न दिसल्यामुळें सर जान शोर हे

कांहीं कारणांमुळें तिन्हाइताप्रमाणें वर्तणूक करूं लागले. त्या- चीं कारणें एथें लिहिण्याचें कारण नाहीं. गवर्नर जनरल यांचे मध्यस्थीने जरी निजाम अल्लीस कांहीं फायदे झाले असते, व निजाम अल्लीचे ह्मणण्याप्रमाणें तहनामा अथवा जें काय त्याचे मनांत होतें तें सिद्धीस गेलें असतें, तरी मराठे लोकांवर हा केवळ जुलूमच झाला असता.

या तहनाम्याबद्दल इकडे बोलणीं चालिलीं होतीं, इतक्यांत मराठ्यांनी पुनः निजाम अल्लीस चौथ व दुसरे हक्क यां वि- षयीं मागणीं केलीं, तेव्हां त्यास पुढें या विषयीं मराठे केवळ ल- ढाईच करितील असें न वाटतां त्याने त्यांची फौज टिपूचे ल- ढाईत सुमारें दोन पलटणें रेमंड ह्मणून फ्रेंच कामगार अबरूवाले यांचे हाता खालील होती ती तेवीस पलटणें पर्यंत वाढविली. शिंदे मेल्यांनंतर निजाम अल्लीने आपली फौज वाढविली, याचें कारण हेंच, कीं मराठे लोकांनी त्याजवर करांबद्दल मागणीं केलीं होतीं, त्यां विषयीं कांहीं बंदोबस्त करितां यावा, व जरी इंग्लिश लोकांनी मध्यस्थी न करून मदत केली, तरी प्रसंग पड- ल्यास लढाई करण्यास समर्थ व्हावें. मराठ्यांचे वकील गो- विंदराव काळे यांनी पुनः मागणें करून दोन कोटि साठ लक्ष रुपयांची तपशीलवार याद करून निजाम अल्लीकडे बाकी काढून दाखविली, तेव्हां मशुलुल्मुल्क व गोविंदराव का- ळे यांचें त्याविषयीं रागाने बोलणें चालणें होऊन, मशुलुल्मु- ल्क याने भर कचेरींत स्पष्ट सांगितलें, कीं नाना फडनवीस यांनी जातीने तुमचे मागणीची निरनिराळ्या कलमांची याद तप- शीलवार समजावून देण्याकरितां निजाम अल्लीचे दरबारांत हैदराबाद एथें यावें. तेव्हां गोविंदराव काळे यांनी उत्तर

लिव्हें, कीं नाना फडनवीस काज कारभारामध्यें गुंतले आहेत. ते कसे येतील? तेव्हां मश्रुलुल्मुल्क् बोलिला, कीं पाहा त्यांस लवकरच आणवीन. ही धमकी दाखविल्यावरून, लढाई करावी असें सांगितल्या प्रमाणेंच झालें. व शेवटपर्यंत जरी दोघांचीं बोलणीं चालणीं होत होतीं, तरी मागणी बद्दल जे तंटे बखेडे झाले त्यांचा लढाई करून शेवट करण्यास उभयपक्षीं सिद्ध झाले. लढाईस यद्यपि अवकाश होता, तरी मोंगल लोकांस फार आनंद झाला. निजाम अल्लीचे हाता खालीं मोठी फौज होती तिचा बेदर एथे जमून तळ पडला, तेव्हां फौजेची फार गलबल व ठपल दिसली; व ज्या शिपाई लोकांपाशीं पुरती हत्यारें नव्हतीं तेहि मोठें भय घालुं लागले. मोंगल लोक पुणें लुटून जाळून त्याची राख करणार होते, व निजाम अल्लीचे फौजेंतील कलावंतीनी त्यांस जय येईल असें गात होत्या, व मुख्य वजीरहि मोठे समुदायांत बोलिला, कीं, मोंगल लोकांनी मराठयांच्या स्वांऱ्या होतात त्या बंद होत असें करावें, आणि विजापूर व खानदेश हे दोन्ही प्रांत परत घ्यावे, अथवा पेशव्यांस लंगोटी घालवून पाण्याचा लोटा त्यांचे हातीं देऊन, भागीरथी तिरीं मंत्र तंत्र ह्मणण्याकरितां पाठवून दिल्हा खेरीज त्यांशीं तह करूंनये. इकडे नाना फडनवीस यांनी लागलीच मोठी फौज जमविली. शिंदे मेल्यापासून कांहीं नवीन गोष्टी घडण्यांत आल्या नाहींत, परंतु नाना फडनविसांची बडेजाव व सत्ता दिवसानुदिवस वाढावयास मात्र कारणें झालीं; व या लढाईत मोठाले फायदे होऊन त्यांत आपणास वांटे मिळतील या लोभाने ज्या बडे लोकांचें येणें फारच अवश्य होतें, ते चहूंकडून येऊन नाना फडनविसांस मिळाले. दौलतराव शिंदे व तुकोजी होळकर हे पुण्यांत

होतेंच, व विराराचा राजाहि यांजकडे येऊन मिळण्यां करितां निघालाच होता. **गोविंदराव गायकवाड** याने आपले फौजेपैकीं कांहीं फौज पाठवून दिल्ही, व दक्षिणेंतील मोठाले ब्राह्मण जाहागीरदार, पटवर्धन, रास्ते, मालेगांवकर, व विंचूर एथील जाहागीरदार, प्रतिनिधी, पंत सचीव, व मराठे मानकरी लोक निंबाळकर, घाडगे, डफळे, पोवार, थोरात, पाटणकर, व याखेरीज कित्येक दुसरे लहान सहान लोक हुकूम जातांच तो मान्यकरून आले. असे सर्व मराठे लोक व जाहागीरदार व मराठ्यांची प्रजा पेशव्यांचे राज्यांत पुनः कधीं जमली नाहीं.

**निजाम अल्ली** मूळ प्रथम रण संग्रामांत येऊन बेदरा वरून व मंजिरा नदीचे किनान्या वरून, मराठ्यांचे सरहद्दीवर चालिला. पेशव्यांनी जानेवारी महिन्यांत पुर्णे सोडिलें, व त्यांची फौजहि त्याच वेळेस निघाली, परंतु अन्नाचे बेगमीचे सोईमुळें निरनिराळ्या रस्त्यानें मात्र गेली. पेशव्यांचे एक लाख तीस हजार स्वांर व पायदळ या खेरीज दाहा हजार पेंढारी लोक होते. या फौजेपैकीं अर्ध्यां फौजेस पेशव्यांचे खजीन्यांतून पगार मिळत असे, व अर्धी जाहागीरदारांचे पदरची असून, पेशव्यांचे खडे हुकुमांत होती, **दौलतराव शिंद्यांची** बहुतकरून फौज हिंदुस्थानांत, व माळव्यांत राहिली होती, तरी दुसरे सरदारांचे फौजेपेक्षां जास्ती व फार तयार होती. **जिऊबा बक्षी** नुकतेच कांहीं फौज कुमकेस घेऊन **दौलतराव शिंद्यांचे** हाताखालीं फौजेचे मुख्य कामावर होते. **दौलतराव** यांची सर्व फौज मिळून सुमारें पंचवीस हजार होती, त्यांतून दाहा हजार पलटणी लोक **मुकसुपरांम ह्मणोन डिवाई** याचा दुय्यम याचे हाताखालीं, होते.

**रघूजीभोंसले** याने पंधरा हजार स्वांर व पायदळ जमविलें.

तुकोजी होळकर याजवळ दाहा हजारच होते परंतु त्यां पैकीं दोन हजार तर पलटणी लोक होते. ते डुंर्डीन्याक याचे हाताखालीं होते, व बहुतकरून जितके पेंढारी होते तितके होळकरा बरोबरचे होते, व परशुराम भाऊ याजबरोबर सात हजार मनुष्यें होतीं. नाना फडनविसांनी सर्व बडे लोकांच्या निराळ्या मसलती घेतल्या. परशुराम भाऊ यांस नानांनी सेनापतीचे कामावर नेमिलें, व पेंढारी व दुसरे स्वार यांस हुकूम दिल्हा, कीं मोंगलांचा तळ पडला असेल त्याच्या आसपासचीं ठिकाणें लुटन त्यांचे अन्नाच्या बेगमीचा नाश करावा. पेशव्यांनी पक्क्या बंदोबस्ताने पुष्कळ सामान आणिलें होतें तें एक मुकाम मागें राहिलें, व फार हुशार लोक त्यांज बरोबर चांगल्या पलटणी, व दीडशें तोफा देऊन त्यांस निजाम अल्लीवर चाला घालण्या करितां पुढें पाठविले. निजाम अल्लीची फौज एक लाख दाहा हजार होती, तिजवर ही पेशव्यांची फौज खंडाळ्याकडे चढाव करून गेली.

मराठ्यांचे लढाईचा वृत्तांत आह्मी लिहीत नाहीं. यामुळें या दोन्ही दळांच्या लढाया झाल्या, त्याविषयीं हि लिहिण्याचें कारण नाही. परंतु इतकें लिहिणें मात्र आहे, कीं त्या लढाईत निजाम अल्लीचा अगदीं पराभव होऊन शेवटीं त्याने तह करावा अशी विनंती केल्यावरून मराठ्यांनी मार्चचे तेराव्या तारीखेस तह केला. मराठ्यांनी निजाम अल्लीचा मुख्य दिवाण मस्लुलुल्मुल्क जो पेशव्यांस अभद्र भाषणें बोलिला, व नानांस कैद करूं ह्मणून भय घातलें त्यास आमचे स्वाधीन केल्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीने त्याने केलेला अपराध क्षमा होणार नाहीं, ह्मणून त्यास आमचे स्वाधीन करून द्यावें, ह्मणून प्रथमतः बोलणें-

घातलें. नाना फडनवीस यांनी दक्षिणेंतील पेरिदाचे परग-ण्या पासून उत्तरेकडे तापी नदी पर्यंत प्रांत, व दौलताबादचा किल्ला, व सदाशिवराव भाऊ यांनी सन् १७६० इसवीमध्यें जे-जे प्रांत जिंकून घेऊन परत निजाम अल्लीस दिल्हे होते त्यांसुद्धां निजाम अल्लीने पेशव्यांस द्यावे, असें बोलणें घातलें. मागील बाकीबद्दल व लढाईचा खर्च मिळून तीन कोटी रुपये देण्यास निजाम अल्ली कबूल झाला. या खेरिज रघूजी भोंसले यांचा गंगातीर एथें घास दाण्याबद्दल सुमारें सालिना साडे तीन लाख रुपये आकार होत होता, त्या हकाबद्दल निजाम अल्लीने भोंसल्यास तीन लक्ष अठरा हजार रुपये वसुलाचा एक प्रांत निराळा करार करून दिल्हा. रघूजी भोंसले यांचे मागील बाकीबद्दल त्यांस एकोणतीस लक्ष रुपये देण्याविषयींचें कबूल करून तो ऐवज, व पूर्वींचे शिरस्त्या प्रमाणें सर्वांचे बेदार प्रांतांतील विभागाचा वसूल करून, देण्यास कबूल झाला. आणि या सर्वांस रघूजी भोंसल्या बद्दल पेशवे जामीन झाले.

आपल्या मुख्य वजीरास पेशव्यांचे स्वाधीन करून देण्यास निजाम अल्ली मोठ्या खेदाने कबूल झाला. मसरुलमुल्क निजाम अल्लीचा मुख्य वजीर याने मला पेशव्यांचे हवालीं करावें ह्मणून निजाम अल्लीस प्रेरणा केली, याचें मुख्य कारण हेंच, कीं त्यासमयीं ते महान संकटांत होते. पेशव्यांनी हाल्ली पैसा व देश घेतला या पेक्षां फार घेतील असें त्यास पूर्वी वाटलें होतें, सबब त्यास हाल्ली घेतलेला पैसा व देश फारसा वाटला नाही. मसरुलमुल्क यास न्यावयास मराठ्यांचे दोनशे लोक आले होते, त्यांचे स्वाधीन त्यास केलें, त्यांनी त्यास आप-

ल्या फौजेंत नेलें. पेशव्यांस मसरुल्‌मुल्क छावणी शेजारील आवारांत भेटला, तेव्हां पेशव्यांनी त्याची मोठ्या आदरसत्कारानें भेट घेतली, परंतु त्यास मोठे सावधगिरीनें व हुशारीनें पाहाऱ्यांत ठेविलें. मराठे लोकांची कार्यसिद्धी झाली तेव्हां, त्यांस अतिशय आनंद झाला. मसरुल्‌मुल्क आला त्यावेळेस पेशव्यांनी मोठें खिन्न वदन केलें होतें; तें पाहून नाना फडनविसांनी किंचित विनोद केला, तेव्हां पेशव्यांनी नानांस जें उत्तर दिल्हें, तें सत्य व फारच चमत्कारिक होतें. पेशवे असें बोलिले, कीं मोंगल लोकांनी मराठ्यांस शरण जाऊन अशी अपकीर्ती मेळविली, व आमची फौज कांहीं यत्न न करितां जय मिळविले अशी बडाई भोगितात; या प्रमाणें दोन्ही फौजांनी आपली अबरू हलकी करून घेतली, हें पाहाण्यास मला फार दुःख वाटतें. या लढाईमध्यें दोन्ही मोठाल्या सैन्यांतील मिळून दोनशें मनुष्यें देखील मेलीं नाहींत, पुढें गर्दी झाली तेव्हां मोंगल लोक मात्र कांहीं मारले गेले. अद्यापि मराठे लोकांतील सरदार आपापले गांवांत मोठा डौल मिरवून गप्पा मारितात, कीं आह्मी खर्ड्यांचे लढाईत होतों, तेथें अशी लढाई मारली. पेशवे पुण्यास परत आले तेव्हां नाना फडनवीस या लढाईमध्यें देश वगैरे जें जें मिळविलें होतें तें वांटून देण्यांत व कित्येक मोठाले लोकांशीं कित्येक कामांचा ठराव करण्यांत गुंतले होते. परशुराम भाऊ व रघूजी भोंसले शहरा जवळचे प्रांतांत राहिले, व होळकर आणि शिंदे कांहीं अंतरावर तळ देऊन राहिले. होळकर जेजूरीस व शिंदे जामगांव एथें राहिले होते. अल्ली जाहान आपला बाप निजाम अल्ली यावर बंड केल्याचें वर्तमान ऐकल्यानंतर पुण्यास आले, परंतु कोणत्या उद्देश-

ने आले, हें ठाऊक नाहीं. मराठ्यांनी त्यांजकडून बंड करविलें, असेंहि प्रमाण नाहीं, तथापि निजाम अल्लीस संशय आला, कीं मराठे लोकांनी बंड करविलें, व असें मोंगल लोकांचे इतिहास कर्त्यांनी प्रतिज्ञापूर्वक लिहिलें आहे. सप्टेंबरचे पंधराव्या तारिखेस सुमारें दौलतराव शिंदे यांस परत जाण्यास हुकूम झाला, तेव्हां ते हिंदुस्थानांत जात असतां वाटेने जामगांव एथें गेले. परशुराम भाऊहि तासगांवास आपल्या जाहागिरीवर गेले. होळकर पुण्यांतच होते व रघूजी भोंसलेहि अक्टोबरचे अर्ध्या महिन्यापर्यंत पुण्यांत राहिले. नंतर भोंसल्यास मोठे सन्मानाने निरोप देऊन नर्मदेचे दक्षिणेकडे जे कांहीं प्रांत होते, त्यांच्या सनदा नव्या करून दिल्या

नाना फडनवीस यांचे भरभरीचा कळस झाला, व परदेशांतील कोणी कामकाजामध्यें गडबड करण्यास नव्हते येणेंकरून नानांचे मनांत जें जें होतें तें परिपूर्ण झालें. दौलतराव शिंद्यांचाहि नानांवर लोभ होता, व त्याचे प्रधान आणि त्याचे हाताखालील कामगार दौलतरावाचा पेशव्यांचे राज्यावर अधिकार ठेवावयास यत्न न करितां आपापलें हित करून बेत सिद्धीस नेण्याकरितां आपले तरूण धन्याचे अमलांत फार उत्सुक होते तुकोजी होळकर बुद्धिहीन व बलहीन झाले आणि त्यांचे हाताखालील कामगार नाना फडनविसांचे ताब्यांत आले. रघूजी भोंसले व जाहागीरदार ब्राह्मण नानांचे पक्षपाती होते. यावरून पहातां सवाई माधवरावाचे कारकीर्दींत जशी राज्याची बळकटी व सर्वांचा एकोपा होता, व सर्व राज्यांत स्वस्थता व बरोबर व्यवस्था होती त्याप्रमाणें पुढें पेशव्यांचे राज्यांत चालली असती, परंतु आपल्या हातांत सर्व सत्ता व अ-

धिकार असावा व त्याचें संरक्षण व्हावें अशी नानांस इछा झा-ली, त्यामुळें लौकरच अनर्थापात होऊन त्यांची सत्ता व अधि-कार जाऊन त्यांनी इतके श्रम केले होते ते सर्व व्यर्थ होऊन स-रते शेवटीं ते दुःखांत व मोठ्या संकटांत मृत्यु पावले.

धाकटे पेशवे एकवीस वर्षांचे झाले तथापि नानांनी त्यांस लहानपणापासून ज्या रीतीने शिक्षेत ठेविलें होतें, त्याप्रमाणेंच क्रूर शिक्षेत ठेविलें, आणि शहरांत जे जे कैदी होते ते मुक्त असतां आपला अधिकार, व सत्ता जाईल या भयाने नानां फार साव-धगिरी ठेवूं लागले. ब्राह्मण लोकांचे घरांतून राज्यकाढावें, असा शिंद्यांनी बेत करून तो बेत सातारचे राजाकडून सिद्धीस नेण्या-चा निश्चय केला होता, ह्मणून नानां फडनवीस मनांत भय पावून सातारचे राजाची नेमणूक कमी करून व त्याचे सोयरे धा-यरे किल्ल्यांत भेटावयास येऊं देण्याचें बंद करून त्यांस जास्ती क्रूरतेने वर्तवूं लागले. रघुनाथरावाचें कुटुंब कोपरगांव एथें सन् १७९३ पर्यंत ठेविलें होतें, नंतर या वर्षी आनंदी बाई मयत रघुनाथरावाची स्त्री हिची प्रकृत फार बिघडली होती, सबब आनंदवल्ली ह्मणून नाशिका जवळ गांव आहे ती जागा तिचे प्र-कृतीस मानल्यामुळें तीस तेथें नेऊन ठेविलें. पुढल्यावर्षी एप्रेल महिन्यामध्यें तिचा अंतकाळ झाला; आणि तिचे पुत्र बाजीराव व चिमणाजी आपा, हे राघोबाचे दत्तपुत्र अमृतराव या सहित आनंदवल्ली एथें, पेशवे निजाम अल्लीशीं लढाई करा-वयास जाणार असें दिसून येई तों पर्यंत राहिले होते; नंतर त्यांस शिवनेरि किल्ल्यावर टाकिलें, त्या किल्ल्यांत त्यांस कैदेंत टाकि-ल्यावर त्यांजविषयीं कांहीं काळजी करावी लागली नाहीं. ना-ना फडनवीस यांनी निजाम अल्लीशीं लढाई संपल्या नं-

तर त्यास राघोपंत गोडबोले व बळवंतराव नागनाथ हे दोघे विश्वासु कामगार यांचे हाताखाली सक्त कैदेंत ठेविलें.

या तरूण मनुष्यांस कैदेंत ठेवणें आवश्यकच आहे, असें ज्यांस वाटलें, त्यांचेहि मनांत त्यांविषयीं फार दया आली व ज्या ज्या मंडळीस त्यांची दया आली, त्यांपैकीं कित्येकांस वाटलें, कीं नाना फडनविसांची वर्तणूक फार क्रूर आहे, व लोकांच्या समुदायापैकीं नानांचे वर्तणूकेस या गोष्टी विषयीं दोष लावणारे असें पुष्कळ होते, या खेरीज राघोबाचे कूटांतील वृद्धमंडळी व दुसरे दंगेखोर लोक होते, त्यांनी या कैदेंतील मनुष्यांची अबरू वाढवून नानांचे अबरूस धक्का लावावा ह्मणून फार यत्न केला. लोकांचे मनांत असें आलें, हें नानांस समजल्यावरून दुसरें तर कांहीं झालें नाहींच, परंतु नाना जास्ती सावध झाले. तेव्हां रघुनाथरावाचे औरस पुत्रां पैकीं वडील पुत्र बाजीराव हा नानांचा द्वेष लौकरच करूं लागला. त्याचें शरीर फार सुकुमार व तारुण्यामुळें मुद्रा बहुत सुंदर, येणें करून लोकांस तो फार आवडत असे. बाजीरावाची वर्तणूक बहुत सौम्य असे व त्याची बोलण्याची ढब इतकी चांगली असे, कीं कोणी जवळ आलें असतां त्यास मोहनी पडून त्याने त्याचें कल्याण इछावें. त्याचे सौंदर्या प्रमाणेंच त्याचे बुद्धीची फार प्रशंसा होत असे. एकूणीश वर्षांचें वय झालें तेव्हां त्यास घोड्यावर सर्वोत्कृष्ट बसतां येत असे. व तो पट्टा खेळणें व धनुष्याने तीर मारणें यांतहि फार हुशार होता. व भाला खेळण्यांत सर्वांपेक्षां फार चांगला असे. त्याने शास्त्राध्ययनाहि फार केलें होतें. विशेषें करून न्याय शास्त्र वाचिलें होतें, आणि त्या वेळेस त्याचे वयाचा त्या सारिखा पंडीत सर्व महाराष्ट्र देशांत नव्हता.

धाकटे पेशवे आपल्या चुलत भावाचे गुणानुवाद ऐकून मत्सर न करितां फार संतोष पावत; त्याची स्तुती करीत; व बाजीरावाची सुटका होऊन त्याचा माझा समागम होईल तर बरें होईल अशी वारंवार उत्कंठा दाखवीत. नाना फडनवीस यांनी धाकटे पेशव्यांस सांगितलें, कीं तुमचे चुलत भाऊ फार सुंदर आहेत, तथापि त्यांचे वडील रघुनाथराव हे जातीने घातकी व नाकरते होते व स्त्री आनंदीबाई ही चौचालीची होती. याकरितां आपण त्याशीं सहवास न करितां, सावध रहावें, असें जों जों नाना सांगत व मना करीत, तों तों पेशव्यांस फारच उत्कंठा प्राप्त होई, परंतु नानांनी माधवराव पेशव्यांची फार चौकशी ठेवून बाजीरावास सक्त कैदेंत ठेविलें. बाजीरावास समजलें, कीं पेशव्यांचा लोभ आपणावर आहे, तेव्हां सरतेशेवटीं त्याने बळवंतराव नागनाथ यास फितवून त्याजकडून धाकट्या पेशव्यांस मोठ्या प्रीतीने व सत्काराने निरोप पाठविला, कीं माझी आपणावर प्रीति फार आहे, मी शिवनेरीचे किल्ल्यावर कैदेंत आहें, आणि आपण नानांचे ताब्यांत आहां, एकूण आपली दोघांची अवस्था बहुतकरून एक सारिखी आहे, तथापि आपलीं अंतःकरणें आणि एकमेकांची प्रीति कैदेंत नाहीं, तर आपण एकमेकांवर प्रीति करावी. आपली व माझी वेळ कधींनाकधीं येईल, तेव्हां आपल्या वाडवडिलांनी जशी कीर्ति मेळविली त्याप्रमाणें आपणहि सदोदित नांव लौकीक रहावा असें करूं; व त्यांनी प्रताप केले, तसे आपणहि करूं. या निरोपावरून पुढें एकमेकांचे एकमेकांस कागदपत्र येऊं जाऊं लागले या प्रमाणे कागदपत्रांची वहिवाट पुण्यांत फौज आल्यानंतर थोडे दिवसांनी झाली; व पुढेंहि कांहीं दिवस पर्यंत होती. सरते शेवटीं नाना फड-

नविसांस हें समजून शोध लागला, तेव्हां त्यांस कधीं आला नव्हता असा राग आला. नानांनी बळवंतराव नागनाथ यास पायांत बेडी घालून किल्ल्यावर टाकिलें, व माधवराव पेशवे यांची अत्यंत निर्भर्त्सना करून पूर्वीपेक्षां बाजीरावास फारच सक्त कैदेंत ठेविलें.

माधवराव पेशवे यांस नानांनी दाबांत ठेविलें होतें, त्या विषयीं त्यांस मुळापासूनच त्रास आलेला होता, व त्यांचे चुलतभावाचे त्यांस वारंवार कपटी निरोप येत, तेणेंकरून त्यांस फारच राग येऊन निराशा व दुःख झालें. ते अगदींच आपल्या महालांतून बाहेर निघतनासे झाले, व दरबारांमध्यें येतनासे झाले, ते तापाचें निमित्त सांगत. अकटोबरचे बाविसाव्या तारिखेस दसरा आला ते दिवशीं पेशवे आपले फौजे सुद्धां मोठ्या डामडौलाने आणि वैभवाने सीमोल्लंघनास निघाले. आणि संध्याकाळीं सरकार वाड्यांत आल्यावर सर्व बडे लोकांचा व मोठाल्या वकीलांचा दरसालाप्रमाणें दरबार झाला, परंतु अंतःकरणांत फार दुःख व खेद होऊन ते प्राणावर उदार झाले. मनांमध्यें फारच खेद उत्पन्न होऊन अकटोबरचे पंचविसाव्या तारिखेस प्रातःकाळीं त्यांनी समजून उमजून राजवाड्याचे बाराद्वारीवरून खालीं उडी टाकिली; तों शरीराचे दोन अवयव तुटले व कारंजाचे नळीवर पडल्यामुळें ते फारच जखमी झाले होते. त्या नंतर पुढें ते दोन दिवसपर्यंत होते. शेवटीं त्यांनी बाजीरावास गादीवर बसवावें असें मोठ्या उत्सुकतेने सांगून बाबूराव फडके यांचा त्यांजवर फारच लोभ होता, त्यांस त्यांनी कवटाळून धरिलें असतां प्राण सोडला.

माधवराव पेशवे मेले, तेणेंकरून आपणास राज्य कारभा-

रांतून काढितील असें नानांस भय वाटून, याचा पुढें परिणाम काय होईल, असा विचार करून, असा महा योग्य राजपुत्र अ-योग्यकाळीं मृत्यु पावला या विषयीं जें दुःख झालें होतें, त्याचा त्याग करणें त्यांस प्राप्त झालें. त्यांनी विचार करून माधवराव पेशव्यांनी बाजीरावास गादीवर बसवावें असें सांगितलें होतें, तें मोठे शहाणपणाने छपविलें, कारण त्यांस, वाटलें, कीं बाजीरावास गादीवर बसविलें असतां माझे हातांतून राज्यकारभार जाईल इतकेंच नाहीं, तर मला कदाचित बंदींतहि घालितील, अथवा प्राण घेतील. हा अनर्थ कसा झाला, हें समजल्यानंतर नानांनी या विषयीं मूळ प्रथम मोठे तजवीजीने परशुराम भाऊस लिहून पाठविलें, कीं तुह्मी फौज पुष्कळ घेऊन अ-लद पुण्यास यावें. पेशवे मेल्यानंतर तिसरे दिवशीं रघूजी भोंसले आणि दौलतराव शिंदे यांस पुढें गादीवर कोण बसवावा याचा विचार करावयास पुनः परत बोलाविलें. तुकोजी होळकर पुण्यांत होता, तो लागलाच नानांस भेटला, तेव्हां नानांनी रघुनाथरावा विषयीं लोक कांहीं संशय घेतात हें सर्व सांगितलें, व बाजीराव अगदीं लहान होता त्यास समजूं लागलें तेव्हां पासून त्याचे आईने त्याचे मनांत राज्यांतील कामगारां विषयीं द्वेष उत्पन्न केला आहे, व बाजीरावाची व इंग्लिश लोकांची एकी झाल्याने मराठ्यांचे राज्यांत मोठा अनर्थापात होईल; व मराठ्यांचे राज्यांत सर्व प्रजेंत एकोपा व शांतता होऊन हाल्ली जें सुख आहे, त्याचा नाश होईल. या करितां आपले राज्याचा क्रम चालिला आहे, त्या प्रमाणें चालविला असतां आपणास मोठाले फायदे होतील, यास्तव मोठे हुशारीने वर्तलें पाहिजे असें बोलिले. या सर्व गोष्टीं विषयीं होळकराने आपलें मत

दिल्हें, व सर्व मोठाल्या बडे लोकांस नानांनी त्यांचें मत विचारून आपले सर्व संकेत होते ते त्यांस उघड करून सांगितले. ते अशारीतीने, कीं मयत माधवरावांचें कुटुंब यशोदाबाई ही अद्यापि लहान आहे, हिने दत्तपुत्र घ्यावा व बाईचे नांवाने पूर्वी प्रमाणें राज्य चालवावें असें ठरविलें. बाळोबा तात्या ह्मणून शिंद्यांचे कारभाऱ्यांपैकीं मुख्य होते त्यांनी या गोष्टीस अडथळा केला, परंतु जिऊबा बक्षी कामगार नानांचे मित्र होते त्यांनी नानांचे ह्मणण्या प्रमाणें मान्य करविलें. जिऊबा बक्षी यांनी विचार केला, कीं आपले धनी अद्यापि या गोष्टीचा विचार करण्यास लहान आहेत, व जे केलेले मोठाले व वृद्ध बडे लोक आहेत त्यांच्या बुद्धीने त्यांनी चालून तुकोजी होळकरानी ज्या रीतीने वर्तणूक केली, त्या रीतीने करावी हें फार चांगलें आहे. सरते शेवटीं कांहीं बोलणें चालणें होऊन मुख्य सरदारांनी आपापलीं मतें लिहून दिल्हीं, आणि जानेवारी महिन्यामध्यें ते पुनः आपापले जाहागिरीवर गेले.

सन इसवी १७९६ मागले नवेंबर महिन्यामध्यें मिस्तर मालेट या नामेंकरून इंग्लिश सरकारचे वकील होते त्यांनी नाना फडनविसांस कायद्या प्रमाणें विचारिलें, कीं राज्य कशा रीतीने चालवावयाचें तें आह्मांस कळूं द्या. नाना फडनवीसांनी उत्तर दिल्हें कीं सर्व मराठे मोठाले कारभारी यांचे अनुमतें अमुकास राज्यावर बसवावें असें ठरे, तों पर्यंत मयत माधवराव पेशवे यांची स्त्री हीच राज्यांतील मुख्य असें मानून तिचे नावाने राज्य चालवावयाचें, तर अमुकास राज्यावर बसविण्याचें ठरलें ह्मणजे आपणास कळवूं. आणखी मिस्तर मालेट यांस कळविलें, कीं मयत पेशव्यांचे कुटुंबानी दत्त पुत्र घ्यावा असें

सर्वांनी ठरविलें आहे, तेव्हां त्यांस मिस्तर मालेट यांनी कांहीं हरकत केली नाहीं. मग अमुक मुलगा निवडून काढून त्याचें दत्त विधान करणें इतकेच मात्र राहिलें होतें. परंतु बाजीरावास राज्यावर आपला योग्य वारसा असतां आपणास राज्य मिळत नाहीं व दत्त विधानाविषयीं तिकडे विचार चालला आहे, हेंहि कळतांच त्याने आपली हुशारी दाखविण्या करितां कारस्थान करून बाळोबा तात्या ह्मणून त्याचे पक्षाचा व त्याजवर लोभ करणारा होता, त्याशीं कागदपत्राची वहिवाट घालून त्या कडून आपला पक्ष स्वीकारावेला. बाळोबाने बाजीरावाचा पक्ष स्वीकारला, हें बाजीरावास मोठें हितकारक झालें; कारणकीं, जिऊबा बक्षी थोड्या दिवसांपूर्वी मृत्यु पावले होते. व त्यांनी आपल्या अंतकाळीं दौलतराव शिंदे यांस बोलावून आणून सांगितलें होतें, कीं बाळाजी विश्वनाथ यांचा वंश योग्य वारस असतां, दत्तक घेण्याविषयींचे संकेतास सल्ला देण्यास मी आपणास सांगितलें, याकारितां मी फार दुःखी आहें. प्रथमतः मुख्य प्रधानास वळवून बाजीरावाने शिंद्याशीं बोलणें घातलें, कीं मला राज्यावर बसविलें असतां चार लाख रुपयांचा एक परगणा तुह्मांस देईन व गादीवर बसविण्या करितां, आपल्या फौजेची मदत लागल्यास द्यावी, तिचा खर्च मी देईन. तेव्हां या प्रमाणें बाजीरावाचें बोलणें शिंद्यांनी कबूल करून त्या उभयतांचा ठराव होऊन हा बेत सिद्धीस जाणार तों इतक्यांत नाना फडनविसांस गुप्तपणें हें सर्व माहीत झालें. नानांनी मोठें भय पावून परशुराम भाऊस बोलावणें पाठविलें, तेव्हां ते कित्येक स्वारांची टोळी बरोबर घेऊन दोन दिवसांत एकशें वीस इंग्लिश मैल ह्मणजे पक्के साठ कोस चालून आले. नंतर त्यांचा कां-

हीं विचार होऊन शिंद्यांनी बेत केला आहे, त्या प्रमाणें आपण बाजीरावास आधींच बंदींतून सोडवून गादीवर बसवावें असें ठरलें; त्याप्रमाणें परशुराम भाऊनी शिवनेरी किल्ल्याकडे जाऊन बाजीरावाशीं बोलणें लावलें, तेव्हां अमृतराव याने आपल्या भावास या ठरावाविषयीं नाकबूल होण्यास सांगितलें. कारण या ठरावावरून त्यांस असें दिसून आलें, कीं शिंद्यांचे मनांतून बाजीरावास गादीवर बसवावें असें खचीत नव्हतें. शिंद्यांचें व नानांचें बोलणें बाजीरावास राज्यावर बसविण्याचें होतें, तरी त्याने दोन्हीं पक्षावर भरंवसा ठेविला नाहीं. जर त्यास राज्यावर बसविणार अशी त्याची पक्की खात्री असती तर त्याने या गोष्टीस रुकार दिल्हा असता. व खात्री होण्या जोगें बोलणें करावें ह्मणून त्याने कित्येक आढेवेढे घेतले, कीं कित्येकांनी शपथा कराव्या, आणि परशुराम भाऊनी गाईची शेंपटी धरून गोदावरीची शपथ घ्यावी, कीं ह्यांत कांहीं कपट नाहीं, असें झाल्यानंतर बाजीराव शिवनेरी किल्ल्यावरून खालीं येऊन चिमणाजी आपा बरोबर घेऊन आपणास पुढें जें राज्य मिळणार तिकडे जाण्यास निघाले. परशुराम भाऊचे हुकुमाने अमृतराव शिवनेरी किल्ल्यावर तोंवर कैदेंत होतेच, बाजीराव पुण्यांत आल्यानंतर लागलीच त्यांनी नाना फडनविसांची भेट घेतली. नंतर त्यांनी एकमेकांस वचनें दिल्हीं, कीं एकमेकांचा पूर्वीं पासून द्वेष आहे, तो अगदीं सोडून द्यावा. नंतर नानांनी तुह्मांस गादीवर बसावितों अशी बाजीरावांची खात्री केल्यावर त्यांनी नाना फडनविसांस मुख्य प्रधान करण्याचें वचन दिल्हें, आणि बाजीरावांनी व नाना फडनविसांनी एकमेकांस शपथपूर्वक करारनामे लिहून दिल्हे.

बाजीरावांनी नाना फडनविसांस करारनामा लिहून दि-ल्हा तो पुढें लिहिला आहे.

मी ईश्वर साक्षीने व अंतःकरण शुद्ध करून पर्वी ज्या ज्या गोष्टी घडल्या, त्यां विषयींचा सर्व राग व संशय सोडून दिल्हा. तुह्मी आपली वर्तणूक यापुढें योग्य रीतीने व ईश्वरास रुजू अ-शी करावी; मी तुमचे व तुमचे मनुष्यांचे शब्देंकरून एकादी गोष्ट मनांत आणून एकादी गोष्ट करण्याने तुमचें मन दुखविणार नाहीं; अथवा दुसऱ्या कोणास असें करूंहि देणार नाहीं. या गोष्टी विषयीं दृढ निश्चय करून आपलें मन चंचळ होऊं दे-णार नाहीं. व दुसऱ्याचें ऐकणार नाहीं व तुमचे आबरूस धक्का लागूं देणार नाहीं. अशी गोष्ट करण्या विषयीं एकादा माझे म-नांत आणून देऊं लागला तर मी तुह्मांस सांगेन. तुमचे मता-वांचून मी कोणास कैदेंतून सोडणार नाहीं; व सर्व राज्य कारभार तुमचे आमचे मताने करूं. आजपासून तुह्मी जें केलें तें मी केलें असें होईल. मी आपल्या मनांतन कापटच्य अगदीं काढून टाकिलें.

बाजीरावांनी माझे मसलती खेरीज राज्यावर बसण्याचें बो-लणें व ठराव केले; असें बाळोबा तात्यांचे कानावर येतांच त्यांस फार राग आला; ह्मणून नाना फडनविसांचे बेत उ-लटवावे असा त्यानी निश्चय केला. शिंदे त्या वेळेस गोदाव-री तिरीं होते, त्यांस बाळोबा तात्यांनी लिहून पाठविलें, कीं तुह्मी आपल्या सर्व सैन्यासहीत पुण्यास निघून यावें. तेव्हां नाना फडनविसांची हिंमत सुटल्या वरून परशुराम भा-ऊनी नानांस सांगितलें, कीं तुह्मी धैर्य धरून फौज जमा क-रून लढाई करावी, परंतु नानां जातीने भित्रे, व शिंद्यांची फौज फार तयार आहे हें ठाऊक होतें, व नानांच्याने बाजी-

रावावर विश्वास ठेववेना कांकी बाळोबा तात्या आपणास कैद करितील किंवा ठार मारितील; असें नानांस भय वाटलें. नंतर नानांनी परशुराम भाऊस पुण्यांत बाजीरावा जवळ ठेविलें. आणि शिंदे मजवर मात्र द्वेषाने येत आहेत, तर हा नाश न व्हावा, व तंटे बखेडे न व्हावे, यास हाच उपाय आहे, कीं मी काम सोडून पुण्यांतून चार दिवस कोणीकडे तरी जातों, असें नानांनी बाजीरावास सांगितलें. त्याप्रमाणें मूळ प्रथम ते पुरंदर एथें जाऊन नंतर सातान्यास गेले. शिंदे पुण्याजवळ आले तेव्हां, त्यांनी बाजीरावाची भेट घेतली. बाळोबा तात्यांनीहि बाहेरून निष्कपटपणा दाखवून बाजीरावाची भेट घेतली. तरी विशेषेंकरून त्यांनी अमृतरावास पाहिलें तेव्हां बाजीरावाची वर्तणूक त्यांचे मनांतून गेली नाहीं. त्यांनी अमृतरावास शिवनेरी किल्ल्यावरून काढून जामगांवास आणिलें, तथापि त्यांस कैदेंतून सोडिलें नाहीं. बाळोबा तात्यांनी सरते शेवटीं कारस्थान करून बाजीरावास एकीकडे ठेवून राजा व प्रधान दोन्ही आपल्या मर्जीने करावे असें ठरविलें. ही गोष्ट त्यांनी बहिरोपंत मेहेंदळे यांजकडून परशुराम भाऊस कळविली, कीं मयत माधवरावाचे कुटुंबाने चिमाणाजी आपा यास दत्तक घ्यावें; व बाजीरावास कैदेंत टाकून परशुराम भाऊंनी राज्य कारभार चालवावा, असें योजिलें आहे.

नाना फडनवीस फार भित्रे होते, ह्मणून परशुराम भाऊ त्यांचा धिक्कार करूं लागले, तरी नानाचे शहाणपणाविषयीं ते त्यांचा इतका सन्मान ठेवीत, कीं सर्व गोष्टींमध्यें त्यांचें मत घेत. जो ठराव झाला आहे, त्याप्रमाणें तुह्मी कबूल करून बाजीरावास सक्त कैदेंत ठेवावें, असें नानांनी परशुराम

भाऊंस सांगितलें. बाजीरावास कैदेंत ठेवण्या विषयीं जें नानांनी सांगितलें, तें परशुराम भाऊंनी ऐकिलें न ऐकिलें सें केलें. बाळोबा तात्या या समयीं जी गोष्ट करीत होते तेणें-करून नाना फडनाविसांस संतुष्ट करून ही गोष्ट त्यांनी मान्य करावी अशी माझी इछा आहे असें बाह्यात्कारें करून त्यांनी दा-खविलें. नाहींपेक्षां नाना फडनवीस दौलतराव शिंदे अ-द्यापि तरूण आहेत, यामुळें दुसऱ्या बडे लोकांशीं मिळवून घेऊन शिंद्यांवर बंड करितील. बाळोबांनी या गोष्टीस नानांचा रुकार येतांच नानांशीं मिळवून घेण्या विषयीं बोलणें केलें त्या-स नानांनी आडेवेढे घेतले नाहीं.

त्या वेळेस नानांची वृत्ती व आचरण कसें होतें त्याचें वर्णन करण्याजोगें आहे. नाना पुरंदर सोडून साताऱ्यास गेले, तेव्हां त्यांनी राजास कैदेंतून सोडवून शिवाजीचें राज्य जसें पूर्वी चा-लिलें होतें, तसेंच राज्य पूरातन रीतीने चालवावें, ह्मणजे राज्या-मध्यें तंटेबखेडे जे हाल्लीं चालले आहेत, व पुढें दिवसानुदिवस जे वृधिंगत होणार ते बंद होतील, असें मनांत आणिलें, परंतु थोडे दिवसांत ही गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं असें नानांस वाटलें. नाना फडनाविसांनी राजाशीं पूर्वी जी वर्तणूक केली होती, तेणेंकरून नानांचा त्यांस विश्वास येईना. राजाचा लौकिक चहूंकडे होता, व राजास सर्व प्रजा चाहात होती, तेणेंकरून लढाऊ मराठे लोक त्याजकडे येऊन मिळाले, व शिवाजी बरो-बर जे लोक मूळ प्रथम होते त्यांचे व राजमावळ आणि खोरा-स एथिल जंगलामध्यें राहत होते, त्यांस उत्सुकता प्राप्त होऊन, तेहि राजाकडे येऊन मिळाले. राज्य कारभार चालविण्यास रा-जा असमर्थ होता, तरी तो जातीने धैर्यवान असे, त्याचे कित्येक

सोपरे धायरे भयंकर साहसिक कर्म करणें झाल्यास त्यांचा मुख्य अधिकार घेऊन फौजेचा बंदोबस्त करण्या जोगे हुशार होते. परंतु नानांचा मनोदय होता, कीं राज्यांत बंड अथवा बखेडा न होतां, सर्व राज्यांतील बडे लोकांवर आपला अमल बसावा, अशी कांहीं युक्ति करावी. याविषयीं बोलणें झाल्या नंतर, नाना फडनवीस वांई शेजारी मेणवली ह्मणून गांव आहे, तेथें गेले, परंतु नानांनी हा बेत केल्यामुळें राज्यास इतकें बरें झालें, कीं त्यांस कांहींशी जास्ती मोकळीक मिळाली; व नानां यांस मोठ्या आदरसत्काराने वर्तवूं लागले.

चिमणाजी आपास दत्तक घ्यावें ह्मणून बाळोबा तात्यांचा संकेत होता, त्यास नाना फडनवीस मान्य झाले, तेव्हां राजापासून नव्या पेशव्यांचे दत्त विधानास वस्त्रें आणण्या करितां, नाना फडनवीस, वांईहून, सातान्यास आले, आणि राजापासून खिलत मिळाल्या नंतर नानांनी शाहू राजास वचन दिल्हें, कीं जर संधी सांपडली, तर बाळाजी बाजीराव यांचे कारकीर्दींत, राम राजाशीं जो करार झाला आहे त्या प्रमाणें तुह्मांस सांगोलचे तहनाम्यांत लिहून दिल्हेला परगणा देऊन तो करार सिद्धीस नेईन. नाना फडनवीस खिलत घेऊन पुण्यास जाणार होते, परंतु परशुराम भाऊनी शिंद्यांचे कारभाऱ्यांकडून बाजीरावास कैदेंत ठेविलें असें समजल्यावरून नानांस संशय आला, कीं हा बेत सगळा मला बाळोबा तात्यांचे हाताखालीं आणण्या करितां केला आहे. यास्तव आपण पुण्यास जाऊं नये, असा विचार करून नानां तें खिलत पुण्यास पाठवून देऊन आपण वांईत राहिले. बाजीरावावर कष्ट केल्याचें त्यास समजलें नव्हतें. शिंद्यांनी खर्चा बद्दल बाजीरावास मा-

र्गणें केलें असतां, बाजीरावानें माझानें देववत नाहीं असें सांगीतलें, तेव्हां कांहीं खणाजंगीचा प्रसंग आला. आणि शिंद्यांस बाजीरावानें नाहीं ह्मटलें ह्मणून राग आला, हें दाखविण्याकरिता निमित्य करून त्यानें हिंदुस्थानांत जाण्याची परवानगी मागीतली. बाजीराव भविष्य केल्या प्रमाणें शिंद्यांचे छावणींत युक्तीनें त्याचे कान उघडण्या करितां गेला, तेथें त्यास बोलण्यां चालण्यांत रात्र पडली. तेव्हां इकडे परशुराम भाऊनी चिमणाजी आपास पळवून नेलें, असें वर्तमान येतांच त्यांचें बोलणें एकाएकी राहिलें. तें वर्तमान सर्वांस ठाऊक असतां त्यांनी त्यास कोठें नेलें, हें बाजीरावास सांगितलें नाहीं, तरी त्यास सातान्यास नेलें असें वाटलें. तेव्हां बाजीरावास आश्चर्य व भय वाटून त्याची पाठलाग करावी ह्मणून बाजीरावानें शिंद्यांची प्रार्थना केली, परंतु ते कोणत्या रस्त्यानें गेले व त्यांज बरोबर किती फौज आहे हें ठाऊक नाहीं, त्या वेळेस काळोखीरात्र ह्मणून, शिंदे त्यांचे ह्मणण्याप्रमाणें करूं सकले नाहींत. दुसरे दिवशीं बाजीरावास आपणावर कुभांड उभें केलें होतें तें समजलें. तेव्हां त्यास शिंद्यांनी सांगितलें कीं तुह्मी माझी छावणी सोडून बाहेर गेल्यास तुह्मांस दगा होईल, यास्तव आह्मां एथेंच असावें ह्मणजे तुमचा बचाव होईल. परशुराम भाऊ, आणि बाबूराव फडके यांनी चिमणाजी आपास पुणें शहरांत मात्र पोंहचविलें होतें, परंतु चिमणाजी आपानी आपल्या भावाचा अधिकार बळकावण्यास नाकबूल केलें, परंतु त्याजवर बळजोरी केल्यामुळें त्याणें तो अधिकार घेतला. त्याचें दत्तविधान करवून चिमणाजी माधवराव असें त्याचें नांव ठेवलें आणि त्यास मे महिन्याचे सव्विसाव्या तारिखेस पेशवाईचीं

वस्त्रें झालीं. शिद्यांस पैक्याची अडचण पडली व त्यांची फौज खरोखरी दुःखांत होती, तेव्हां परशुराम भाऊस प्रधान केल्यानंतर त्याने पैका जमा करण्यास कबूल केलें, व या कारणास्तव खंडाळ्याचे तहनाम्यांत ठरल्या प्रमाणें मशिरुलमुल्क जो निजाम अल्लीचा वजीर होता त्याजकडून तीन कोटि रुपये येणे होते, ते त्याने दिल्हे तर त्यास बंदींतून सोडवून देईन असें कबूल केलें. मशिरुलमुल्क बोलिला, कीं मी यत्न करून पाहतो; एवढ्यां वरूनच त्यास कैदेंतून सोडून पुणें शहरा शेजारील प्रांतांत तळ देण्यास हुकूम दिल्हा, व थोड्या वेळांतच त्याजबरोबर मोठी स्वांरी जमली.

या नव्या पेशव्यांस पेशवाईचीं वस्त्रें झाल्या नंतर दुसरे दिवशीं परशुराम भाऊनी असें ठरविलें, कीं नानांनी पुण्यास येऊन बाळोबा तात्यांची भेट घेऊन त्यांशीं मिळवून घ्यावें, आणि नव्या पेशव्यांचे राज्यांत दिवाणी व मुलखी काम आपण घ्यावें. आणि सर्व फौजेचा अधिकार व फौजे संबंधी सर्व कामकाज मी पाहीन. असें पत्र गेल्यावर त्यास नानांनी उत्तर लिहिलें कीं तुमचे वडील पुत्र हरीपंत यांस वांईस मुक्त प्रथम कांहीं दाबादाब करून ठराव करण्या करितां पाठवावे. त्या वरून हरीपंत निघाले, परंतु वकीलाप्रमाणे न येतां बरोबर चार पांच हजार निवडक स्वांर घेऊन निरानदी उतरून आले. ही गोष्ट संशय येण्याजोगी होती, त्या वरून नानांस संशय आला. व बाबूराव फडके यानी नानांस गुप्तपणें आपल्या जिवाचे संरक्षणार्थ पळभर विलंब न करितां कोठेंतरी जावें, ह्मणून लिहिल्यावरून नानांची खात्री झाली, कीं कांहीं तरी दगा आहे.

लोकांस व नानांसहि असें वाटलें, कीं आपणांस या समयीं

संकट व्यर्थ प्राप्त झालें; परंतु पूर्वी ते एकादी गोष्ट करणें झाल्यास भित्रेपणानें अर्धी अर्धी करीत, ही खोड त्यांस सोडून देणें प्राप्त झालें. त्यांचे आंगीं शाहाणपण व हुशारी व लोकांवर त्यांचा अमल होता येणेकरून या प्रसंगीं ज्या ज्या युक्ति केल्या तीहीं करून त्यांनी सर्व हिंदुस्थानास आश्चर्य करावयास लाविलें, आणि त्यांचे बरोबरीचे इंग्लिश लोक यांनी त्यांस मराठा म्याचिवल असें नांव दिल्हें.

मोठें संकट प्राप्त झालें असें दिसलें, तेव्हां नाना तत्क्षणीं वांईहून कोकणांत महाडास पळून गेले, व आपण गेले त्या वाटेने खिडी बुजवीत गेले; व प्रताप गडावर मोठा पाहारा ठेविला. आणि माहाड एथें येऊन पोहंचले तेव्हां त्यांनी प्रथमतः रायगडामध्यें दारूगोळा, अन्नबेगमी, इत्यादि लढाईचे सामानाचा बंदोबस्त केला. बाळोबा तात्यांनी असें ठरविलें, कीं कांहीं उशीर न लावितां नानांची पाठलाग करावी, व शिंद्यांचे फौजे पैकीं, कांहीं फौज घेऊन जावे ह्मणून सांगीतलें. परंतु परशुराम भाऊ यांस, नानांचे गुप्त हित कर्ते होते, त्यांनी ही गोष्ट न करावी असें सांगीतल्यावरून परशुराम भाऊनी ती गोष्ट राहाती केली, तथापि नानांची जाहागिर शिंद्यांस देऊन नानांचें पुण्यांतील घरदार व चीचबस्त यांवर जप्ती ठेवून ती आपल्या कारणीं लाविल्यामुळें नानांचा व परशुराम भाऊचा पुढें फारच द्वेष पडला. नानांची अशी असंख्य संपदा परशुराम भाऊनी नेली, तरी त्यांचें पुरलेलें जें द्रव्य होतें त्याचा शतांशसुद्धां त्यांचे हातीं गेला नसेल. नाना फडनवीस पुण्यांतून गेले, तेव्हां त्यांनी स्वयें संपादलेलें पुष्कळ सोनें व पेशव्यांनी संपादिलेलें कोट्यावधि द्रव्य होतें, तें नेलें, असें सर्व लोक बोलतात. पेश-

त्यांचें राज्य पहिल्या माधवरावाचे कारकीर्दींपर्यंत क़र्जांत व घोटाळ्यांत होतें. पुढें दौलत सांचली हें पूर्वीं लिहिण्यांत आलेंच आहे. या वरून नानांची असंख्य दौलत होती, ती नाना कारभार करीत होते तेव्हां पेशव्यांच्या दौलतींतूनच घेतली असावी. नानांचे द्रव्य निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या कारभाऱ्यांचे हाता खालीं ठेवलें होतें, कारण कीं तें गरज लागली असतां त्यांज पासून जलद मिळावें. नानांनी जो पैका पुरून ठेविला होता, व त्यांचा जो व्यवहार चालिला होता तो गुप्त होता. तो लोकांचे समजण्यांत आला नाहीं; याचें मराठे लोकांस फार आश्चर्य वाटत असें, व अद्यापि वाटत आहे.

पुढें राज्याची उलटा पालट झाल्याने बाजीराव व नाना फडनवीस हे आंतून एक झाले; व एकमेकांस तिसऱ्या पुरुषाचे हातून गुप्तपणें निरोप व कागद पत्र पाठवूं लागले, तो पुरूष पुढें मोठा प्रख्यात झाला. नाना पुरंधऱ्यांचे पदरीं एक मराठा शिलेदार पुरंदरा शेंजारील वलंगापूर नावें गांवचे पाटलाचा लेक होता. त्याने बाजीराव शिवनेरी किल्यांतून सुटून आला तेव्हां कांहीं युक्तीने बाजीरावाची मर्जी प्रसन्न करून घेतली, नंतर तो नाना पुरंदऱ्यांचे हुकुमाने बाजीरावा जवळ चाकरीस राहिला. त्याचें नाव बाळोजी कुंजर ह्मणून होतें; त्याला राज्याची अशी अवस्था पाहून आपल्या धन्यास बोलावयास सवड सांपडली नाहीं तरी त्याने नाना फडनवीसांची माहाड एथें जाउन भेट घेतली, आणि बाजीरावा कडून नानांस दोघांस अनुकूळ करून घेण्या करितां यत्न करण्या विषयीं मोठे मित्र भावानें जे निरोप पाठविले होते, ते नानांस कळविले; बाजीरावाने नानांस दोघांविषयीं यत्न करण्यास्तव लिहिलें, परंतु हें

नानांस सांगावयाची गरज नव्हती, बाबूराव फडके हे पेश-व्यांचे घरगुती फौजेवर होते, त्यांनी त्या फौजेस बाजीरावाकडे आणण्यास कबूल करून वचन दिल्हें, व तुकोजी होळकर यांचें सैन्य इशारत करितांच तयार झालें; आणि रायाजी पाटिलाचें व बाळोबा तात्यांचें वांकडें आहे, असें नानांस ठाऊक होतें, त्यावरून नानांनी त्याजकडून शिंद्याशीं बोलणें करविलें, कीं परशुराम भाऊ पटवर्धन यांची जाहागीर अहंमद नगरचा किल्ला व दाहालक्ष रुपये वसूलाचा परगणा इतके, जर बाळोबा तात्यांस कैद करून बाजीरावास गादीवर बसवाल, व आपल्या फौजेसहीत हिंदुस्थानांत निघूनजाल तर, देऊं, असें आपण कबूल केलें; हें सर्व वर्तमान नाना फडनविसांनी बाळोजी कुंजर यास बाजीरावास कळविण्यास सांगीतलें.

राज्याची उलटा पालट झाल्याने कित्येक पुरुष मोठे प्रख्यात झाले; तरी ते वर लिहिलेल्या हलक्या शिलेदारां पेक्षां चांगले व अबरूचे होते. त्यां पैकीं मोठे योग्यतेस आलेला एक ग्रहस्थ नाना फडनविसांनी शिंद्याशीं मिळवून घेण्याविषयीं बोलणें करण्या करितां ठेविलाहोता त्याचें नांव सखाराम घाडगे होतें; हा कागल वंशांतील होता; याची पूर्वीची किताबत मागे लिहीण्यांत आल्या प्रमाणें सरजे राव अशी होती. सखाराम घाडगे यांनी आपले वतनी गांवचे वंश परंपराचे हक्का बद्दल यशवंतराव घाडगा ह्मणून कोल्हापूरचे राजाचा मेहुणा याशीं व त्याचे भाऊबंद यांशीं कज्या केला होता, तेव्हां त्यांनी एकत्र जमून त्याशीं लढाई केली. त्या लढाईंत सखाराम जिंकला जाऊन त्यास कोल्हापूर इलाख्यांतून पळून परशुराम भाऊ यांजकडे

यथावास्तव जाणें प्राप्त झालें, नंतर तो परशुराम भाऊ यां जवळ चाकरीस राहिला. पुढें परशुराम भाऊची चाकरी सोडून नाना फडनविसांचे पदरीं राहिला. तेव्हां नानांनी त्यास शंभर स्वारांची नेमणक करून दिल्ही. नाना फडनवीस पुण्यांतून गेले, तेव्हां सखाराम घाडगा शिंद्यां जवळ राहिला, तेथेंहि त्यास शंभर घोड्यांचें पतक मिळालें, तो स्वभावें करून मोठा बंडखोर धैर्यवान् आणि चपळ होता, आणि त्याचें बोलणें फार लीनतेचें व आर्जवाचें होतें, ह्मणून रायाजी पाटील याची त्याजवर मर्जी होती. या समयीं शिंद्यांची व त्याची फार सलगी पडली, त्याची लेंक फार सुंदर होती; व शिंद्यांचे मनांतून तिशीं लग्न करावयाचें होतें, ह्मणून शिंदे त्याचा आदर सत्कार ठेवीत. सखाराम यास वाटलें, कीं कागलकर घाडगे यांच्या वंशांतील मुलगी कन्हेर खेडचे पाटील यांचे लेकवळ्यास दिल्हयानें आपले कुळापेक्षां आपली योग्यता अधीक वाढून आपणास मोठा अधिकार प्राप्त होईल. असें वाटून, सखाराम घाडगा शिंद्याशीं शरीर संबंध करण्यास फार खुषी झाला; तथापि शिंद्यांची कृपा जास्ती व्हावी, व त्याने लग्न करण्यास फारच उत्सुक व्हावें, ह्मणून त्याने या गोष्टीस एकाएकीं रुकार दिल्हा नाहीं. नाना फडनविसांचे मनांतून शिंद्यानीं आपला पक्ष स्वीकारावा असें होतें, त्यांत अशा ग्रहस्थाचें द्वार मिळालें. त्याचे मदतीनें नानांची कार्य सिद्धी झाली. हें गुप्त वर्तमान बाबूराव फडके व दुसऱ्या पक्षाची मंडळी यांचे कानावर गेल्यावरून त्यांनी आपली तयारी झालेली छपविण्यास फार श्रम घेतले नाहींत. बाजीराव शिंद्यांचे फौजेचे मध्यभागीं होता, व त्याचे सहाय्यास त्याचे वडिलांचे मित्र वयो वृद्ध मानाजी

फांकडे होते, त्यांनी अशा प्रसंगीं नाना फडनविसांनी जो पैसा दिल्हा होता, तो फौज जमा करण्या करितां खर्च केला. बाजीराव या समयीं पंचवीस वर्षांचे वयाचा व गोरा व उंच होता, त्याचें स्वरूप फार सुंदर होतें, व त्याची बोलण्याची ढब इतकी चांगली होती, कीं त्या बोलण्याने लोकांस मोहनी पडावी, व मानाजी फांकडा हा शिपाई मोठ्या अबरूचा व मोठा कीर्तिमान होता. त्यास इतके वार लागले होते, कीं त्यास मनुष्य मुख आहे, किंवा नाहीं, असें समजूतींत येत नसें. आतांचे ह्मातारे शिलेदार लोक असें ह्मणतात, कीं तो मराठे लोकांतील शेवटचा शूर पुरुष होऊन गेला, आणि तो आपल्या घोड्याचे पायांत वाळा बांधीत असे, तो त्यासच मात्र योग्य होता; कारणकीं त्याने शत्रूस आपली पाठ कधीं दाखविलीच नाहीं.

या सर्व मूर्खपणाचा गोष्टी बाळोबा तात्यांस समजल्या वरून त्यांनी बाबूराव फडके यांस धरून कैद केलें, आणि त्यांस चाकणचे किल्यावर टाकिलें, परंतु त्यांचा कारकून नारोपंत चक्रदेव मोठा हुशार कामगार होता, तो मसरूल्मुल्क याचे छावणींत जाऊन दडल्यामुळें बचावला. निळकंठराव परभू व मालोजी घोरपडे हे त्याचे कूटांतील दोघेजण यांस आपला बचाव करण्यास्तव लढाईची तयारी करण्या करितां थोडीशी वेळ सांपडली, तेणें करूनत्यांस धरावयास जी फौज पाठविली होती, तीस जिंकून, ते दोघे बरोबर कांहीं मंडळी घेऊन पुण्यांतून निघून निरा नदीचे दक्षिणेस मोठी डोंगराची रांग होती, तिकडे सुरक्षित पणें पळून गेले.

बाजीराव शिंद्यांचे लष्करांत तळ देऊन राहिला होता, त्याचे भोंवताला गराडा घालून त्याचें पाणी बंद केलें. त्याने

जमा केलेल्या फौजेस त्याजपासून जाण्यास हुकूम दिल्हा, परंतु **मानाजी फांकडे** यांनी वांई शेजारीं येऊन मला मिळावें असें फौजेस सांगीतलें, तेथें फौज येऊन जमली, तेव्हां **निळकंठ राव**, व **मालोजी घोरपडे**, हे हि जलद वांई येथें येऊन मिळाले. **नाना फडनविसांनी** त्यांस पैका देऊन हुकूम केला, कीं तुह्मी सालपा घाट एथें जाऊन तळ द्यावा; तेथें **नानांचे** मित्र **बजाबा शिरोळकर** यांनी फौज जमा करण्यास मदत दिल्हामुळें त्याजपाशीं दाहा हजार मनुष्य थोडे दिवसांत जमले, हें **बाजीरावाचे** तर्फेने जमविलें होतें. **नाना** चोंहींकडे असे भगीरथ प्रयत्न करून फौज जमा करीत आहेत, हें **बाळोबा तात्यास** अगदी माहीत नव्हतें. तेव्हां हें सर्व कृत्य **बाजीरावाचे**, असें मनांत आणून त्याने त्यास कैद करून हिंदुस्थानांत पाठवून देण्याचा निश्चय केला. आणि त्या प्रमाणें **सखाराम घाडगे** याचे ताब्यांत त्यास देऊन बरोबर फौज दिल्ही, तिजवर **सखाराम घाडग्याचा** हुकूम ठेविला. परंतु **बाजीरावास** खातरी होती, कीं बहूत करून **शिंदे** आपला पक्ष स्वीकारतील. ह्मणून त्यांनी **घाडगे** यांशीं बोलणें घातलें, कीं मला दक्षिणेपार न नेतां गादीवर बसविण्याचें **शिंद्यांनी** कबूल केलें तर, त्यांस तूं आपली लेंक दे, नाहीं पेक्षां **नाना फडनविसांची** कार्य सिद्धी झाली तरी मी जवळ नसलों ह्मणजे **नानां** मला एकीकडे ठेवून दुसऱ्यास गादिवर बसीवतील. **घाडग्याने** मूळ प्रथम सांगीतलें, कीं ही गोष्ट होण्यास अशक्य आहे, परंतु शेवटी मी **बाजीरावास** अनुकूळ होतों अशी आशा दाखवून पुढें लिहिलेल्या करारनाम्याप्रमाणें करीत असलां तर मी आपली लेंक **शिंद्यांस** देईन, असें सांगितलें.

तुह्मांस पेशवाईची गादी प्राप्त झाल्या नंतर, मला दोन कोटि रुपये रोख देण्याचें कबूल करण्यास शिंद्यांस हुकूम द्यावा, व मला शिंद्यांचा मुख्य दिवाण करून कागलगांव हें इनामी करून देविण्यास यत्न करावा, याप्रमाणें घाडग्याचें बोलणें पडलें, तें बाजीरावानें कबूल केलें, तेव्हां घाडग्यानें दुख-ण्यांस पडल्याचें निमित्त करून, तो बाजीरावाबरोबर पारा न-दीचे तिरीं राहिला.

पुण्यांत मोठी तयारी चालली होती. नाना फडनविसांचे व बाजीरावाचे तर्फेने सैन्य जमा झालें होतें, त्याचा नाश करण्या करितां मशिरुल्मुल्क यानें साहाय्य देण्याचें मिष के-ल्यावरून, परशुराम भाऊंनी त्यास सैन्य जमा करण्यास हु-कूम दिल्हा. होळकराचें व शिंद्यांचें सैन्य या कामाकरि-तांच तयार होतें; इकडे दसरा झाल्या नंतर अकटोबरचें अक-राव्या तारिखेस पेशव्यांचे पदरचा मेस्तर बोईड याचे हाता-खालीं पलटणी होत्या त्या निरेचे पुलाकडे चालिल्या, आणि शिंद्यांचीं पलटणें रायगडाकडे चालिलीं. या सर्व फौजा जि-कडे तिकडे पाठविणें हें जातीने परशुराम भाऊंनी केलें; किं-वा कोणी दगे खोरांनी परशुराम भाऊ किंवा बाळोबा तात्या यांस फसविण्या करितां, ही मोठी चतुराईनें युक्ती केली. नाना फडनविसांनी केलेली युक्ति सिद्धीस गेली; आणि वर लिहिण्यांत आलें आहे, त्या खेरीज त्यांनी हें जास्ती केलें, कीं कोल्हापुरचे राजास परशुराम भाऊचे जाहागिरीवर घाला घालावा असें सांगीतलें. नानांनीं मशरुल्मुल्क याजबरोबर अकटोबरचे अकराव्या तारिखेस तहनामा केला; त्याचे प्रथम न कलेस निजाम अल्लीने रुकार दिल्हा. त्यांत मुख्य कलमे

हींच होतीं, कीं बाजीरावास गादीवर बसवावें, व नानांस पुनः फडनविशीचें काम द्यावें; व पेशव्यांस खंडाळ्याचे तह-नाम्याप्रमाणें एक प्रांत दिल्हा आहे, तो त्यानी परत देऊन ठरले-ल्या हक्काबद्दल जी बाकी होती, ती निजाम अल्लीस सोडून द्यावी. खेरीज बिडारची चौथ मजपासून अगदी घेऊंनये, असें निजाम अल्लीने बोलणें घातलें. परंतु नानां फडनवीस बोलिले, कीं बाजीरावाचे हुकुमाखेरीज मी चौथाईची सुट घालू सकत नाहीं. व खरोखरीं पाहिलें असतां हे सर्व ठराव बाजीरावाचे मताखेरीज नाना करूं शकले नसते.

या तहनाम्याचीं मुख्य कलमें वर लिहिलीं आहेत. याखेरीज पेशव्यांचे राज्यांत सर्व घोंटाळा उत्पन्न झाल्यामुळें नानां फ-डनवीस माहाडाकडे गेले आहेत; या करितां राज्याचा पहिल्या प्रमाणे बंदोबस्त व्हावा, ह्मणून नानांनी निजाम अल्लीचा व-जीर मसरुल्मुल्क याजकडून पेशव्यांचे राज्यांत निजाम अल्लीस आणवून बंदोबस्त करावा याचा पुढें लिहिल्या प्रमाणें ठराव केला.

निजाम अल्लीने पंधराहजार फौज व याखेरीज तोफखाना इतके नानांचे आणि रघुजी भोंसल्याचे फौजेस बाजीरावास गादीवर बसविण्याची मदत देण्यास पाठवावें, या गोष्टीविषयीं इं-ग्लिश लोकांनी मध्यस्थी करावी, व प्रसंग पडला असतां मदत हि द्यावी, असें या ठरावांत नानांनी कबूल केलें. निजाम अल्ली कडून घेतलेला प्रांत व बाकी बद्दल पैक्याच्या हुंड्या करंडळा एथें घेतलेल्या परत द्याव्या, व निजाम अल्लीचा दिल्ली शेजारील कितीएक प्रांतावर हक्क होता, तो त्याचा कायम असावा, व दोघांची एकमेकांकडे तफावतीचीं कलमें असतील तीं

दोघांनीं सोडून द्यावीं, व मराठ्यांचे हक्काचा निजाम अल्लीने सालेसाल उलगडा करावा, व बेदर सुभ्याची चौथ ही परंपरेच्या वतनाप्रमाणें अथवा पेशव्यांचे खासगीचें उत्पन्ना प्रमाणें आहे, यास्तव ती बाजीरावास देण्याविषयीं मात्र नाना फडनवीस यांनी बोलावें. दोन लाख रुपये निजाम अल्लीस खर्चा करितां अगाऊ द्यावे, असें त्यांनी ठरविलें, नाना फडनविसांनी इंग्लिश लोकांशीं ठराव करावा, कीं निजाम अल्लीची फौज महाराष्ट्र देशामध्यें गुंतली आहे; इतक्यांत टिपू निजाम अल्लीचे राज्यावर घाला घालू लागला तर इंग्लिश लोकांनी त्यास अडथळा करावा. व निजाम अल्लीचें राज्यांतील लोक पळून आलेले कैदेंत आहेत, ते सोडून द्यावे, आणि या सर्व तहनाम्याचे कलमांवर बाजीरावाची सही व्हावी.

या प्रमाणेंच रघूजी भोसल्याशीं नानां तहनामा करीत होते तोहि सिद्धीस गेला. नाना फडनविसांनी त्यास पंधरा लक्ष रुपये त्याचे चालत्या खर्चा करितां द्यावयाचे लागलेच कबूल केले; व मंडळा हा परगणा चुराईगड व त्या गडाचे पोटांतील गांव अथवा प्रांत या सुद्धां नाना फडनवीस रघूजी भोंसल्यास द्यावयास कबूल झाले, तीन हजार स्वांर जेव्हां लागतील तेव्हां रघूजी भोंसल्याने द्यावे, असें जें होतें तें मोठी गरजच लागेल तेव्हां द्यावे, असें ठरविलें. याखेरीज रघूजी भोंसल्यास कित्येक फायदे झाले, तेव्हां त्याने नाना फडनविसांस साहय्य देण्या विषयींचें शपथ पूर्वक वचन दिल्हें.

या प्रमाणें ठरल्यावर सर्व मुख्य कारभारी व फौजेवरील सरदार नाना कडे मिळाले, नंतर इंग्लिश लोकांनीहि बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं मत दिल्हें. शिंद्यांनी अकटो-

बरचे सत्तावीसाव्या तारिखेस बाळोबा तात्यास कैद करून परशुराम भाऊस धरण्यां करितां आपली जातीची व कांहीं मसरुल्मुल्क याची फौज नारोपंत चक्रदेव याचे हाताखालीं पाठविली. नारोपंत याचे मनांत फार होतें, कीं आपल्या मित्रांपैकीं परशुराम पंत वैद्य यांस याविषयीं कळवावें, ह्मणून त्याने त्यास एक पत्र लिहिलें, हें पत्र गफलतीने परशुराम भाऊ पटवर्धन यांजकडे गेलें, तेव्हां ते पत्र वाचतांच कांहीं स्वांर व चिमणाजी आपा यास बरोबर घेऊन शिवनेरी किल्याकडे फार त्वरेने पळाले. परंतु त्यांची जलदीने पाठलाग करून त्यांस कैद केलें. अनंदराव रास्ते हे त्यास बंदोबस्तानें कैदेंत ठेवू, ह्मणून जामिन झाल्यावरून त्यांचे स्वाधीन त्यांस केलें. बाजीरावास पुनः माघारें आणिलें, तेव्हां पुण्यापासून नऊ कोशांवर कोरेगांव एथें भिमानदीचे तिरीं तळ पडला. अमृतराव आणि बाबूराव फडके यांस कैदेंतून सोडविलें; आणि नाना फडनवीस सालपा घाट एथें येऊन आपल्या फौजेस मिळाले. मिस्तर बाईड याचे हाता खालील फौज आपल्या आपण नानांचे हातांत आली. तेव्हां नाना फडनवीस पुण्यास जाण्यास निघाले. वाट चालत असतां बाजीरावाकडून एक पत्र आलें, त्यांत नानांस लिहिलें होतें, कीं तुह्मी येण्यास व तुमचे सर्व कामास फार लांबण लाविली. तेव्हां नानांस लागलेंच भय वाटून त्यांनी बाजीरावास लिहून पाठविलें, कीं आपण असा करारनामा लिहून पाठवावा, कीं मजवर कांहीं दगा नाहीं. नंतर मी पुण्यास येईन, नाहींपेक्षां आपल्या मनांतून मी फडणिशीचें काम सोडावें असे असलें, तर माझी जातीची जितकी जिनगी आहे, तितक्याचें संरक्षण झाल्यास मी चाकरी सोडन घरीं बसेन.

त्याच वेळेस शिंद्यानी व निजाम अल्लीने, नाना फडनविसांचा बचाव करण्याचा तहनामा करून ठरविलें, कीं बाजीरावास गादीवर बसवावें, व नाना फडनविसांस पुनः मुख्य प्रधान करावें; परंतु निजाम अल्ली व शिंदे यांनी आपापलें हित साधावें ह्मणून, नाना फडनविसांनी त्या दोघांशीं जे निरनिराळे तर्ह केले होते त्या प्रमाणें नाना फडनविसां कडून उलगडून घ्यावे ह्मणून दोघांनी निश्चय केला. शिंद्यांनी निजाम अल्लीशीं तहनामा केला, त्यांत गफलतीने मोठी चुकी झाली. त्या तहनाम्यांतील कलमाविषयीं विचार न करितां, खंडाळ्याच्या तहाने त्यास जो प्रांत व मागील खंडणीचा ऐवज मिळाला होता, तो परत देण्याने आपला तोटा किती होईल, याविषयीं तहनाम्यांत कायकाय कलमें लिहून दिल्हीं, या विषयींचा शिंद्याने विचार केला नाहीं, असें दिसून येतें. तहनाम्याचे प्रारंभीचीं कलमें ठरल्यानंतर नाना फडनवीस पुण्यांत आले. आणि मुख्य प्रधानाचें काम पुनः नवेंबरचे पंचविसाव्या तारिखेपासून पाहूं लागले. पेशवाईचीं वस्त्रें सातारचे राजाकडून मिळाल्यानंतर शेवटी बाजीरावास संन १७९६ त दिसेंबरचे चवथ्या तारिखेस गादीवर बसविलें. शास्त्र्यांची सभा झाली त्यांत असा शास्त्रार्थ ठरला, कीं माधवराव नारायण मयत पेशवे यांचें व रघुनाथ रावाचे पुत्र यांचें नातें असून मयत माधवराव पेशवे यांचे कुटुंबाने रघूनाथ रावाचा दुसरापुत्र दत्तक घ्यावा हें अयोग्य आहे. असें ठरल्यावरून दुसरे पुत्राचें दत्तविधान राहिलें. चिमणाजी आपा जरी राज्यावर खुषीनें बसले नव्हते; तरी त्यांस त्याचे प्रायश्चित्ताबदल कांहीं दुःख भोगावें लागलें, परंतु थोडे दिवसां नंतर बाजीरावांने त्यांस गुजराथेचे शुभ्यावर नेमिलें. हे

जातीने नांवाचे मात्र सुभेदार होते, परंतु गुजरार्थेतील सुभ्याचा सर्व कारभार त्यांचे हाता खाली आबा शेलूकर ह्मणून कामगार होते ते करीत होते.

नाना फडनविसांस राज्य कारभारामर्ध्ये त्रिंबकराव परचुरे यांनी मदत दिल्ही; व नारोपंत चक्रदेव यांस फौजेवर मुख्य नेमिले होते ती फौज या दंग्यामर्ध्ये अव्यवस्थित होती. एके दिवशीं पुण्याचे रस्त्या मर्ध्ये आरब व मिस्तर बोईड यांचे फौजे पैकीं कांहीं लोकांची कलागत झाल्यामुळें लहानशी लढाई होऊन मोठें अरिष्ट झालें; त्यामर्ध्ये शंभर शिपायांपेक्षां कांहीं जास्ती शिपाई मारले गेले; आणि लढाई चालिली असतां बाजारांतील किल्येक वाण्याचीं दुकानें आणि कांहीं सामानाचीं दुकानें हि लुटलीं गेलीं.

अहंमदनगरचा किल्ला व त्या खालचे किल्येक परगणे शिद्यांस कबूल केल्याप्रमाणें दिले, आणि सवड सांपडल्यास त्यांनी परशुराम भाऊची जाहागीर लढाई करून घ्यावी, अशी त्यांस मोकळीक दिल्ही. रघूजी भोंसल्याशीं करारनामा केला त्यांतील ठरावाप्रमाणें हि त्यास दिल्हे, तेव्हां तो नागपुरास गेला. परंतु बाजीरावाने निजाम अल्लीशीं माहाड एथें तहनामा केला होता, त्यांतील पुष्कळ कमी ज्यास्ती केल्या खेरीज तो तहनामा बाजीराव खास करीनां, ह्मणून मशिरुल्मुल्क पुर्णे सोडन पेशव्यांचा निरोप न घेतां, फार रागाऊन हैदराबादेस गेलां. ते समयीं निजाम अल्लीचें दरबारांत पेशव्यांचा वकील नव्हता. गोविंदराव पिंगळे पुण्यांत होते, तरी त्यांचे कारभारी सदाशीव माणकेश्वर, ज्यांविषयीं पुष्कळ वर्णन पुढें लिहिण्यांत येईल, व ज्यांस पेशव्यांनी पूर्वी निजाम अल्लीचे

दरबारांतून कांहीं बातमी लिहिण्या करितां लहानशे कामावर ठेविलें होतें. त्यांची पिंगळ्यांनी नानांपाशीं अशी शिफारस केली, कीं हे मशिरुल्मुल्क याची समजूत करून त्यास आळविण्यास व तुमची जी कागद पत्रांची वहिवाट बंद झाली आहे ती सुरू करणें प्राप्त होतें, त्या कामावर नेमण्यास योग्य आहेत. तथापि निजाम अल्लीचे व बाजीरावाचे ठरावामध्यें जें अंतर होतें तें ठरविण्या विषयीं बाजीरावानें फारशी काळजी केली नाहीं. कारण, नानांनी व सर्व मंडळींनी मिळून एक कट केला होता, त्यामध्यें कमी पडून त्यांनी राज्यामध्यें जो पक्का बंदोबस्त व एकोपा केला होता; तो आगष्टचे पंधराव्या तारिखेस तुकोजी होळकर मेल्यामुळें अमळसा कमी होत चालिला. होळकरास चार पुत्र होते, त्यांत दोनऔरस पुत्र होते, काशीराव आणि मल्हारराव व दोन राखलेल्या बायकोस झाले होते, यशवंतराव आणि विठोजी. काशीराव हा शरीरें करून अशक्त व शाहाणाहि जितक्यास तितकाच होता. परंतु मल्हारराव आपल्या सर्व कुळाचा लौकीक व दौलत यांचें संरक्षण करण्या जोगा व सर्व गोष्टींनी योग्य व शूर होता. भावांभावांमध्यें लौकरच तंटे होऊन लेकवळे होते ते मल्हाररावाकडे मिळाले, मल्हारराव थोडे दिवसांत आपल्या बापाची छावणी सोडून बरोबर कांहीं स्वांर घेऊन पुण्या शेजारीं भांबोडें ह्मणन गांव आहे तेथे जाऊन राहिला; तेव्हां तेथें नाना फडनविसांनी त्याची बारकाईनें चौकशी ठेविली. शिंदे बारमहां कांहीं दंगा व्हावा ह्मणन वाट पाहात असत, त्यास त्यांनी ही संधी सांपडतांच व काशी रावानें हें विदित करितांच त्यास मल्हाररावास धरण्या करितां कांहीं सैन्याचें साहाय्य लागलेंच दिल्हें; ते-

ऱ्हां मल्हाररावाचे मनांतून शत्रूकडून धरलें न जावें ह्मणून त्याने मरे तोंपर्यंत मोठ्या शौर्याने त्याशीं लढाई केली. मल्हाररावाचे भिन्नोदर भाऊ जे बरोबर होते, ते पळून गेले. यशवंतराव नागपुरास गेला व विठोजी कोल्हापुरास गेला. त्यांजबरोबरचे बहुतकरून लोक लढाईत पडले. त्यांपैकीं लेनावीकर शिंदे दुसऱ्यांबरोबर लढाईत पडले, त्यांचें वर्तमान त्यांचे बायकोस कळतांच तिणें आंग टाकून तत्क्षणीं प्राण सोडिला. ह्मणाने त्याजविषयीं थोडें वर्णन लिहिलें.

दौलतराव शिंद्यांनी काशीरावास मदत दिल्यामुळें होळकराचें घराणें कांहीं दिवस शिंद्यांचे हुकुमांत राहिलें; तेणेंकरून नानांचा अधिकार सर्वस्वीं कमी झाला. कैलासवासी मल्हारराव होळकर याचा लहान पुत्र पास कैदेंत ठेविल्यानें शिंद्यांस जास्ती फायदा झाला.

बाजीरावास पुढील भविष्यज्ञान कमी, ह्मणून त्याने शिंद्यांस पुण्याचे राज्यामध्यें राज्यकारभार पाहाण्यास हळूच आंतून उत्तेजन दिल्हें. तेणेंकरून शिंदे पुण्यांतील राज्यकारभार पाहूं लागतांच त्यानी अमल करडा करून अशा कांहीं जुलमी गोष्टी केल्या, कीं तशा पेशव्यांचे अमलांत कधींहि झाल्या नसतील.

वर लिहिलेल्या गोष्टी शिंद्यांनी जुलमाच्या केल्या, त्या विशेष करून ह्यांच होत्या कीं, त्यानी कुलाबा किल्ला घेऊन मानाजी आंगऱ्यास कैद केलें; व त्याचा मुलूख घेऊन शिंद्यांचा कोणी जवळचा नातलग बाबूराव आंगऱ्या ह्मणून होता त्यास दिल्हा.

अशा जुलमी व पक्षपाताच्या गोष्टी शिंद्यानी केल्या; त्याचा

दोष कोणी बाजीरावास लाविला नाहीं. बाजीरावाचें स्वरूप चांगलें असें, यामुळें व तो पूर्वी संकटांत होता, यामुळें लोकांस त्याची दया फार येई; व तो कैदेंत होता, ह्मणून त्याचा चांगला स्वभाव होता तो प्रगट झाला नाहीं, तेणेंकरून सर्व लोक मोठे दुःखी असत. मिरतर युटाफ ह्मणून त्या वेळेस पुण्यांत काम चालविण्या करितां कारभारी होता, त्यास मात्र बाजीरावाचा खरा स्वभाव लौकर समजला होता; बाजीरावाचा स्वभाव फार चांगला आहे; व तो फार शाहाणा आहे; असें लोकांस वाटलें, याचें कारण हेंच, कीं बाजीराव जात्त्या मोठा कपटी व खोट्या स्वभावाचा. कोणावर कधीं विश्वास ठेवूंनये; व सर्वांस फसवावें; हा त्याचा नेहेमीचा पाठ असे; व असें ज्यांणीं ज्यांणीं केलें त्यांस त्या प्रमाणेंच फळ झालें. शिद्यांपासून व नाना फडनविसांपासून स्वतंत्र राहावें, ह्मणून बाजीरावाचे नेहेमी यत्न चालिले होते. त्यास वाटलें, कीं शिद्यांस हिंदुस्थानांत घालवून देण्यास आपण लौकरच शक्तिमान होऊं; परंतु नाना फडनविसांचे ताब्यांत मात्र नेहेमी राहावें लागेल. यामुळें नाना फडनविसांचा मूळप्रथम नाश करावा ह्मणून त्याचें मनांत आलें, अमृतराव, व गोविंदराव काळे व यांखेरीज दुसरे कित्येक मुत्सद्दी यांस बाजीरावाचा बेत ठाऊक होता; परंतु नाना फडनविसांचा नाश करण्या विषयीं बाजीरावाचे तर्फेनें मुख्य माणूस घाडग्या ह्मणून होता. जो पुढें सरजेराव या नामेंकरून प्रसिद्ध झाला. व त्यानें आपली लेंक दौलतराव शिद्यांस देण्या करितां वचन देऊन आद्यापि दिल्ही नव्हती. ह्या सरजेरावावर कोणाचा अधिकार नव्हता. आणि बाजीराव त्याचे मनांत नेहेमी आणून देई, कीं पुढें दौलतराव

शिंदे तुमचे जांवाई झाल्यावर तुह्मी त्यांचे दिवाण होणार. परंतु ही गोष्ट जों पर्यंत नानांचे हातांत सत्ता व अधिकार आहे, तों पर्यंत होणार नाहीं. ह्मणून नानांस कैदेंत घालावें, असा त्यांनी निश्चय केला. डिसेंबरचे एकतीसाव्या तारिखेस नाना फडनवीस सावधगिरी करून शिंदे पूर्वी भेटावयास आले होते, ह्मणून त्यांस भेटावयास जाणें अवश्य होऊन ते त्यांस भेटावयास गेले. तों मिचल फियोज ह्मणून एक पलटणी सरदार नियापालीट देशांतून माहादजी शिंद्यांबरोबर दक्षिण देशांत सन् १७९२ त आला होता; व त्या वेळेस शिंद्यांच्या आठ पलटणींवर तो मुख्य कामगार होता, त्यानें नानांस कैद केलें. मिचल फियोज याने पूर्वी नानांस शपथ पूर्वक असें सांगीतलें होतें. कीं तुह्मास कांहीं दगा न करितां तुमचे घरास पोंचवून देवूं, असें असतां, त्या सरदाराने असी दग्याची गोष्ट केल्या वरून युरोप देशांतील सरदार, व जे पेशव्यें इत्यादि हिंदू राजे यांच्या, पदरचे सरदार; व पूर्वी साधारण शिपाई लोक असून पुढें मोठ्या पदवीस व लौकिकास आलेले, व लढाई इत्यादि साहसिक कर्म करण्या विषयीं व आपलें वचन सिद्धीस नेण्या विषयीं फार प्रख्यात होते; त्यांस फियोज यानें ही अयोग्य गोष्ट केली, ह्मणून फार राग आला; व त्याची योग्य चाल नानांस माहीत होती सबब नानांनीं दुसरे कोणास जामीन न घेतां फियोज याचे शद्वावरच विश्वास ठेविला.

मराठे लोक असें निमित्त सांगतात, कीं फियोज यानें तुह्मास तुमचें घरीं सुरक्षीत नेऊन पोंचवूं असें शपथ पूर्वक सांगितलें होतें, व शिंदे नानांस धरणार होते, हें त्याचे गावीं सुद्धां नव्हतें; व त्याने पूर्वी पासून दगा करण्याचा बेत केला नव्हता, परंतु

**मीरअसद अली वलद** याजबरोबर **सरजेराव** याने मोठी दहशत घालून व वचनें देऊन हुकूम पाठविल्यावरून, **फिरोज** यास धरणें प्राप्त झालें. मराठे लोक **फिरोज** याचा पक्ष घेऊन त्याच्या अबरूचें संरक्षण करितात, येणेंकरून इंग्लिश लोकांचे लौकिकास चांगलें आहे. हाच कोणी, जर त्यांचा स्वदेशी लोक असता, तर तो बुध्या **नानांस** धरण्या विषयींचा बेत करून दगा करितां, यांत कांहीं संशय नाहीं असें ह्मणत.

मराठे लोक आपला मोठेपणा व सभ्यता दाखविण्याकरितां, आपली निंदा करितात; व इंग्लिश लोकांस आपला मोठेपणा दाखविणें झालें ह्मणजे, स्वनिंदा करून बोलतात, कीं अमची जात ह्मटली ह्मणजे मोठी दगेखोर, अशी कीं, कोणीहि आह्मांवर विश्वास ठेवूं नयेच. ज्या एकादे इंग्लिश लोकांस यांच्या अशा रीती ठाऊक नसतात; व यांची फारशी माहिती नसतां, त्यांस हिंदुलोक हे इंग्लिश लोकांस सत्य व शुद्ध, आणि त्यांस खरा मार्ग आवडतो असें समजून त्यांनी आपणास चांगले व मोठे खऱ्या चालीचे ग्रहस्थ ह्मणावें ह्मणून स्वनिंदा करितात; असें लौकर समजणार नाहीं.

**आबा शेलूकर, बजाबा शिरोळकर, नारोपंतवैद्य**, व यांखेरीज कित्येक मोठाले अबरूचे गृहस्थ जे **नाना फडनविसांबरोबर** होते, त्यांस त्याच वेळेस धरिलें; व **नानांचे** स्वारींतील मनुष्य सुमारें एक हजार होतें; त्यास लुटून त्याचे हात पाय तोडिले; त्यांपैकीं कित्येक ठार मारले गेले, व अशी दाणादाण होऊन कित्येक पळून गेले. **सरजेराव घाडगे** यांनीं लागलेंच **नानांची** व त्यांजबरोबर जे गृहस्थ होते त्यांची घरें दारें लुटण्या करितां शिपाई पाठविले. त्यांतून कित्येकांनीं आप-

त्या दारांस दडपे घालून वरील मजल्यांत जाऊन खिडकींतून शत्रुस गोळ्या घालून आपला बचाव केला. पुण्यासारख्या शहरावर मोठा प्रसंग गुजरला. सर्व रात्रभर व दुसरे दिवशीं सुर्योदय होई तोंपर्यंत गोळागोळी चालिली होती, चहुंकडून रस्ते बंद झाले. व चहुंकडे अरडाओरड लुटालूट होऊन रक्ताचे सडे पडले, व चहूंकडे सर्वांस मोठें संकट प्राप्त झालें. ही गोष्ट ज्यांणीं पाहिली ते लोक बोलतात, कीं त्या समयीं पुणें शहरांत लोकांस बाहेर पडणें झालें तर बरोबर सोबती व हातांत ढाला तरवारा घेऊन लोक बाहेर जात.

नाना फडनविसांस शिंद्यांचे छावणींत धरून कैद केलें, तेव्हां बाजीराव यांने कांहीं काम आहे, असें निमित्त करून नानांचे बरोबरचे कामगारास बोलावणें पाठवून आणवून त्यांसही कैद केलें. त्यांत मुख्य बाबूराव फडके, आपा बळवंत, नारोपंत चक्रदेव, नारो निळकंठ मुजुमदार आणि गोविंदराव पिंगळे हे होते. नाना फडनवीस यांस अहंमदनगरचे किल्ल्यांत सक्त कैदेंत ठेविलें; आणि बाजीरावाने आपला बंधू अमृतराव यास मुख्य प्रधान करून त्याचे हाताखालीं गोविंदराव काळे व शिवराम नारायण थथे यांस नेमिले; व बाळाजीपंत पटवर्धन यास फौजेचा बंदोबस्त करण्याविषयींचा व दुसरे कोणत्याही कामाचा अगदी अनुभव नव्हता, तरी त्यास फौजेवर नेमिलें.

बाजीरावाने मनांत आणिल्याप्रमाणें नानांचा नाश करून, शिंद्यांचे ताब्यांतून कसें निघावें या विषयीं ही युक्ती करूं लागला; प्रथमतः शिंद्यांशीं व घाडग्याशीं ठराव केले होते, त्यां प्रमाणें त्यांस द्यावयाचे समयीं शिंद्यांचे ताब्यांतून

निघण्या विषयींचे जे आपले संकेत आहेत, ते सिद्धीस जातील, असें बाजीरावास वाटलें; तरी ठरावा प्रमाणें त्या दोघांस कबूल केलेलें मूळप्रथम देणें प्राप्त झालें. शिद्यांनी मार्चमहिन्यामध्यें घाडगे यांचे मुलीशीं लग्न लाविलें; तेव्हां समारंभास मोठा खर्च झाला, व शिद्यांची फौज पुण्यांत होती, त्या फौजेस दर महिना वीस लाख रुपयांहून जास्ती पगार द्यावा लागत होता. जवळ पैसा नाहींसा झाला, तेव्हां बाजीरावानें गुप्तपणे दोन कोटि रुपये देऊं केले होते, त्याविषयीं शिद्यांनी बाजीरावास फार सक्ती लाविली; तेव्हां बाजीराव बोलिला, कीं मजजवळ तर पैसा नाहीं, यास्तव जर तुह्मी घाडगे यांस आपला दिवाण कराल, तर बाळोजी कुंजर हा पुण्यांमध्यें मोठाले कोण कोण सावकार आहेत त्यांचीं नांवें सांगेल ह्मणजे घाडगे त्यां पासून तितका पैसा उत्पन्न करून घेतील.

या मसलतीस शिंदे मान्य झाले; व अशा गुप्त संकेतानें सरजेराव घाडगा आपल्या जांवयाचा दिवाण झाला. त्याच्या द्वारें बाजीराव रघुनाथानी आपल्या प्रजेवर एकाएकी जुलूम करून आग पसरविली. ज्या सरजेराव घाडग्याकडन असा जुलूम करवून लोकांपासून पैसा घेतला. त्या घाडग्याचें नांव पुणें शहर कायम आहे तों पर्यंत मोठे तळतळाटीने निघेल. आपला बेत सिद्धीस जाऊन पैसा मिळावा ह्मणून सरजेराव घाडगा हा मूळप्रथम बाजीरावाचे वाड्यांत गेला; तेथें नाना फडनवीस यांचे पक्षाचे दुसरे मोठाले लोक मोठ्या अबरूचे कामावरून काढलेले कैदेंत होते; ते आपापल्या जिनग्या देत तोंपर्यंत त्यांस वोढून त्यांजवर कोरडे उडविले. नंतर शहरांतील सावसावकारास व जे जवळ दोन

पैसे बाळगून होते; त्यांस धरिले; आणि त्यांचे फार हाल केले; त्यांपैकिं कित्येक हाल भोगून मेले. आणि गंगाधरपंत भानू ह्मणून नाना फडनविसांचा कोणी नातलग होता; त्यास तापलेल्या तोफेवर बसविले यामुळें, तो मरण पावला. या प्रमाणें नाना प्रकारच्या रीतींनी लोकांचे हाल केले. तापलेल्या तोफेवर बसवून जीव घ्यावा ही एक सरजेरावानें रीत काढिली होती.

लोकांस त्या समयीं हा सर्व जुलूम बाजीरावानेच करविला असें वाटलें नाहीं, व सर्व लोकांतहि हें प्रसिद्ध नाहीं; व बाजीरावाने खरोखरी असे जुलूम करवावे व हाल करावे; असें मनांत आणिलें नाहीं. घाडग्यानें असा जुलूम केला; तेंव्हां बाजीरावास फार खेद होऊन त्याविषयीं बाजीरावाने शिद्यांची कान उघडणी केली; तेव्हां त्यानी या गाराण्यास कान दिल्हा न दिल्हा असें केलें; व शिंद्यांस वाटलें; कीं हें बाजीरावानें लोकांस दाखविण्याकरितां उगेच ढोंग केलें आहे. अमृतराव यास याविषयीं अगदीं समजलें नव्हतें; व बाजीरावाने पैसा जमविण्या करितां ही युक्ति केली, हें ठाऊक नव्हतें; ह्मणून त्यास घाडग्याने असा जुलूम केल्यावरून फार राग आला. व सर्व जन शिंद्यांनी असा जुलूम करिवला ह्मणून त्यांचे नांवे तळतळाटानें खडे फोडून त्याचा अत्यंत द्वेष करूं लागलें; तेव्हां अमृतरावाने आपल्या भावास सांगीतलें, कीं शिंद्यांस भेटीस बोलावून त्यांस धरावें. बाजीराव या गोष्टीस लागलाच मान्य झाला; व त्याप्रमाणें शिंद्यांस धरण्याचा बेत सिद्धीस नेण्यास फार उत्सुक झाला. बाजीरावाने हे बेत ठरविण्याचे पूर्वीं अमृतरावांशी बेत केला होता; कीं शिंद्यांशी

व निजाम अल्लीशीं फौजे विषयीं बरोबरी करण्याकरितां कांहीं नवी पलटणें तयार करावीं, ह्मणजे आपणा जवळ दोघांपेक्षां स्वांर जास्ती होऊन पायदळाविषयीं त्यांची बरोबरी होईल. अमृतराव यांस लाहानपणीं त्यांचे वडील राघोबा यांनी स्वांऱ्या केल्या, तेव्हांपासून इंग्लिश लोक सर्वा पेक्षां चांगले असें वाटलें होतें, ह्मणून त्यांने मेस्तर डब्ल्यू एच टोन ह्मणून इंग्लिश लोक होता; त्यास पहिल्या ब्रिगेडीवर नेमिलें. त्या पलटणींत सर्व इंग्लिश लोक अमलदार नेमावयाचे होते; ही फौज वाढविण्याचें निमित्त अमृतरावाने शिंद्यांस हें सांगीतलें; कीं निजाम अल्लीचा व आमचा संबंध कोणत्या रीतीचा आहे; हें तुह्मास ठाऊकच आहे. निजाम अल्लीवर तुह्मी आह्मी मिळून, त्याजकडे ठरलेली खंडणी राहिली आहे, तिज विषयीं व नाना फडनविसांनी जे प्रांत निजाम अल्लीपासून खंडाळ्याचे तहनाम्या प्रमाणें घेतले होते ते पेशव्यांस न विचारितां, व तुह्मांस न कळवितां; निजाम अल्लीस परत दिल्हे आहेत, ते माघारे घेण्या विषयीं स्वांरी करूं. शिंद्यांनी ती गोष्ट लागलीच मान्य केली, व हा बेत पुणेसरकारांनी इंग्लीश सरकारास फेब्रेवारीचे नव्वे तारिखेस रीती प्रमाणें निवेदिला; परंतु तोंपर्यंत पलटणीची नवी ब्रिगेड ठेविली नव्हती. बाजीरावाचा अमृतरावाशीं आंतून द्वेष होता; व बाजीरावास फौजेच्या कामकाजाविषयीं अगदी ज्ञान नव्हतें, व त्यानें फौजेवर अगदीं अडाणी कामगार नेमिले होते; यामुळें त्याची बाकीची फौज दिवसानुदिवस अगदी अडाणी होत चालिली. बाजीरावानें लढाईची तयारी अगदी केली नाहीं, तरी तेणेंकरून त्याचें मनांतून शिंद्यांचा नाश करावयाचा बेत होता, तो सिद्धीस नेण्यास त्यास कांहीं व्याक्षेप झाला नाहीं; शि-

यांचे छावणींत मोठाल्या टोळ्यांचीं बंडें उठं लागलीं, तेणेंकरून बाजीरावास वाटलें कीं, शिंद्यांचे फौजेंतील बंडखोर लोकांस अधिक उत्तेजन दिलें असतां, शिंद्यांची फौज व कामगार आपल्याकडे येऊन मिळतील; अथवा शिंद्यांस राज्यावरून हांकून देण्याचे मसलतीस ते मिळतील.

अशा समयीं शिंद्यांचा लोकांस फार त्रास आला. व अमृतरावांनी बाजीरावाचे सल्ल्याने आबा काळे हे पेशव्यांचे तयार पलटणीपैकीं एके पलटणीवर होते, त्यांस संकेताप्रमाणें इशारत झाली ह्मणजे आंत शिरून शिंद्यांस धरावें असें सांगितलें. दौलतराव शिंद्यांस कांहीं कामाचे निमित्तानें पेशव्यांचे वाड्यांत येण्याकरितां बोलावणें पाठविलें; परंतु शिंद्यांनी बोलावण्याचा अनादर केल्यावरून त्यांस बाजीरावानें साफ हुकूम पाठविला, कीं तुह्मांस वाड्यांत आलेंच पाहिजे; तेव्हां शिंदे हुकुमाप्रमाणें येऊन बसले. नंतर थोडे वेळानें बाजीरावानें सांगीतलें, कीं मी तुह्मांस तुमची वर्तणूक विचारण्याकरितां बोलावणें पाठविलें होतें; असें बोलून एकाएकीं मोठा रागाचा आवेश आणून त्यांस बोलिला. तेव्हां शिंद्यांस बाजीराव रागावेल असें वाटलें नव्हतें. बाजीरावानें विचारिलें, कीं तुह्मी माझे धणी किंवा चाकर, तेव्हां शिंद्यांनी मोठे लीनतेने आणि सत्काराने उत्तर दिल्हें, कीं मी पेशव्यांचा चाकर आहें; व पेशवे सरकारचा हुकूम मानून पेशव्यांचे ताब्यांत राहाण्यास तयार आहें. बाजीराव बोलिला, कीं तुमचा उद्धटपणा, जुलूम, व क्रूरत्व, माझ्या लक्षांत आहे. तूह्मी आणि तुमच्या चाकरानें, कित्येक वेळां सरकारी चाकरांवर व प्रजेवर शहरांत व माझे वाड्यांत देखील जुलूम केले आहेत; ते ध्यानांत आणा; व या कर्मे करून तुह्मी प्र-

ला अपमान व धिःकार केला आहे, त्याचें माझ्यानें सहन करव-त नाहीं; यास्तव तुह्मी आमगावास जा. दौलतरावांनी मोठ्या नम्रतेनें व लीनतेनें उत्तर दिल्हें, त्यांत त्यांनी असें दर्शविलें, कीं मी सरकारची आज्ञा शिरसा वंद्य करण्यास फार उत्सुक आहे; परंतु फौजेस देण्याकरितां मजजवळ पैसा नाहीं, यामुळें माझें जाणें होत नाहीं; व आपणास गादीवर बसविण्याने जो माझा खर्च झा-ला, तो सरकारास देणें प्राप्त आहे; तो दिल्हा ह्मणजे मी लागला-च पुण्यांतून निघून जातों. त्यासमयीं अमृतरावांनी बाजी-रावास गुप्तरूपें विचारीलें, कीं शिंद्यांस धरण्यांविषयीं खूण करूं कीं काय? तेव्हां बाजीरावाचें धैर्य सुटलें; ह्मणून त्याच्याने त्यांस धरावयास सांगवेना; व असें झाल्यानें त्याचे मित्रांस दिसून आलें, कीं तो जन्ममित्रा खराच आहे. शिंदे मोठ्या आदर-सत्काराने व मनांत मोठा संशय धरून उठून गेले; नंतर बाजी-रावाने पुढें कांहीं दिवसांनीं तुह्मांस धरण्याविषयीं अमृतरा-वांनी बेत केला होता, असें नीचपणानें शिंद्यांस सांगितलें. व याविषयीं तुह्मी सावध राहा; असेंहि त्यांस सांगितलें.

शिंद्यांचे फौजेप्रमाणेंच पेशव्याचे फौजेस कित्येक दिवसांचा पगार देणे राहिला होता. तिकडे सातान्यामध्यें काय अवस्था होती, तिजविषयींचें वर्णन पुढें लिहितों. ती अवस्था अशी, कीं सातारचे राज्याचा बंदोबस्त करण्यास कांहीं फौज पाठविणें प्राप्त झालें; परंतु त्या लोकांस सातान्यास जावयास सांगितलें, तेव्हां ते पगार मागूं लागले; तेणेंकरून मोठा दंगा झाला. त्या दंग्याचें शांतवन बाळाजीपंत पटवर्धन ह्मणून फौजेवर होता, त्याच्यानेंही झा-लें नाहीं. बाळोजी कुंजर यानें आपण बाजीरावाचे भी-तीतले आहों याजमुळें आपण फौजेचा बंदोबस्त करूं, असें म-

नांत आणून बंदोबस्त करण्याकरितां यत्न केला; परंतु या खटल्यामध्यें तो पडला, ह्मणून शिपाई लोकांनी त्याची थट्टा करून त्याणें दृढ निश्चय केला असें पाहून त्यास दुष्ट भाषणें केलीं; व त्याचें पागोटें पाडून तें रस्त्यांत पायांनीं उडविलें. **गोविंदराव पिंगळे**, हे तंवपर्यंत कैदेंत होते, त्यांनी पेशव्यांस मोठ्या विश्वासानें निरोप पाठविला, कीं आपण **नारोपंत चक्रदेव** यांस कैदेंतून सोडवावें; ह्मणजे ते दंग्याचें शांतवन करूं शकतील, फौजेनें दंगा केल्यामुळें **बाजीरावास** भय वाटून त्यानें **पिंगळ्याचे** बुद्धिवादास रुकार दिल्हा. **पिंगळ्यासही** कैदेंतून सोडविलें; कारण तो जुने प्रधानांपैकीं होता, तरी **नाना फडनविसांशीं** फटकून होता.

फौजेवरील ज्या कामगारांवर काळे लोकांचा विश्वास असतो, त्यांस जसे शिपाई लोक अनुकूळ असतात, त्याप्रमाणें **नारोपंत चक्रदेवास** झाल्यावरून दंग्याचें शांतवन त्यानें सहज करून एका दिवसांत दंगा बंद केला; परंतु **बाजीराव** यास पुण्यांतून फौज पाठवितां येईना, व फौजेवरील नव्या कामगारांस दूर ठेविले असतां, ते काय करतील याचा विश्वास येईना. येणेंकरून राज्यांतील मोठे गृहस्थ **परशुराम भाऊ पटवर्धन** कैदेंत होते; त्यांस कैदेंतून सोडणें प्राप्त झालें. **बाजीरावानें नाना फडनविसांचा** नाश करावा असा बेत केला; तेव्हां सातारचे राजास या मसलतींत घेऊन त्यास **नानांचा** कारभारी **बाबूराव** यास कैद करून सातारचा किल्ला घ्यावा असें सांगून वचन दिल्हें, कीं पहिले **बाजीराव** यांनी सातारचें राज्य मुख्य गादी करून विश्वासाने सातारचे राजाची जशी चाकरी केली होती; त्याप्रमाणें मीहि करण्याचा निश्चय केला आहे. सातारचे राजानें

बाजीरावाची विनंती मान्य करून बाबूरावास कैद करून किल्ला घेतला; परंतु पुढें नानांस कैद केल्यानंतर शिवराम नारायण यथे पेशव्यांकडून साताराचा किल्ला आपल्या ताब्यांत ठेवावा ह्मणून आलें, तेव्हां राजानें त्यांस सांगितलें, कीं मी किल्ल्याची खबरदारी ठेवितों; आणि मी अशी इछा करितों, कीं माझा चाकर पेशवा याणें आपल्या बोलण्या प्रमाणें सिद्धीस न्यावें; बाजीरावास त्यांचे फितुराच्या परिणामाचें भय वाटून त्यानें माधवराव रास्ते यांस हुकूम केला, कीं आपण सातान्यास जाऊन राजास वचन देऊन आपली फौज किल्यांत जाऊं देण्यांविषयीं राजास अनुकूळ करावें. रास्त्यां बरोबर मोठी फौज आली, परंतु सातारचे राजाजवळ त्याचे सोयरे धायरे होते ह्मणून वचन दिल्यानें अथवा भय दाखविल्यानेंही गोष्ट ते कबूल करीनात. या सर्व गोष्टी शिंद्यांस कळल्या, तेव्हां त्यास संशय आला, कीं बाजीरावानें आपली सत्ता व अधिकार वाढावा ह्मणून सातारचे राजाशीं सल्ला केला; असें त्यास वाटून, त्याणें सातारचे राजास गुप्तपणें असा सल्ला दिल्हा, कीं आपण किल्ला हातांतून न जाऊंदेतां फौज तयार करावी, ह्मणजे मी शपथ पूर्वक ब्राह्मण लोकांचें राज्य आहे हें बुडवून टाकण्याकरितां आपणास तोफांसुद्धां पाच पलटणी साह्याय्यास पाठवीन.

सातारचे राजानें लौकरच फौज जमा केली; आणि माधवराव रास्ते सातारचे राजानें फौज जमा न करावी ह्मणून अडथळा करण्यास्तव गेले असतां; त्याशीं मारामारी केली. तेणेंकरून त्यांस सातान्याहून मालेगांवास जाणें प्राप्त झालें. पूर्वीं लिहिल्या प्रमाणें पेशव्यांचे फौजेंत बंडाळ झाली होतीच, व सातान्यांत अशी गोष्ट झाल्यानें पेशव्यांस जास्तच भय पडलें.

पुढें असें घडलें, कीं परशुराम भाऊ यांस माधवराव रास्ते यांचे तीर्थरूप अनंदराव रास्ते यांनी मांडवगण एथें कैदेंत ठेविले होते त्यांस वाईस नेलें; व परशुराम भाऊ यांस खात्री होती, कीं फौजेचें शांतवन आपल्या हातून होईल. ह्मणून त्यांनी बाजीरावास लिहिलें, कीं जर आह्मांस फौज जमवावयास हुकूम द्याल तर दंग्याचें शांतवन करून किल्ला परत येईल अशी तजवीज करूं; यावरून बाजीरावानें त्यांस हुकूम दिल्हा; व रास्त्यांनी मदत दिल्ह्यामुळें परशुराम भाऊंनी वांई शेजारीं मोठी फौज जमविली.

सातारा शहर हें अगदीं किल्ल्याशीं लागून खोलगट जाग्यावर वसलें आहे; व तिन्ही बाजूंचे टेंकड्यांनीं वेष्टिलें आहे. सह्याद्रि पर्वत पश्चिमेस व वेण्या कृष्णा, उरमोडी या नद्या चहूंकडे आहेत. सातारचे राजाचे फौजेचा तळ शहरांत पडला; व पावसाची झड लागली होती; यामुळें वेण्या नदीस पुरानें तुफान झाल्यामुळें उतार नव्हता, ह्मणून सातारचे फौजेस असें वाटलें, कीं बाहेर पाहारे ठेवून शोध करण्याची गरज नाहीं. सातान्यांत परशुराम भाऊ आल्याचें वर्तमान येऊन पोंचण्याचें पूर्वी परशुराम भाऊ उताराची जागा शोधून काढून दाहा हजार सैन्यासहीत वेण्या उतरून आंत आले. सातारचे राजानें फौज जमा केलेली सुमारें अडीच हजार होती; ती लढाई करण्यास अगदीं तयार नव्हती. सातारचे राजास किल्यांत पळून जावयापुरती मात्र वेळ होती. त्याची फौज चहूंकडे पळत होती; तों त्यांत एलोजी व सेनाजी मोहीते कुशाबा राजे आणि दुर्गोजी राजे माहाडीक इत्यादि राजांची सोयरीधायरी मंडळी होती, त्यांस राजाचा भाऊ चतुरशिंग ह्मणून जो फौजेचा मुख्य होता

त्याने धैर्य दिल्हें; तरी परशुराम भाऊंशीं लढाई करून त्यांस अडथळा करण्यास आपण शक्तिमान होणार नाहीं असें त्यास वाटलें. पुढें जय न मिळेल असें दिसलें; तरी निराशेने एलोजी मोहिते मारले जात तोंपर्यंत फौज मोठ्या वेगानें पुढें चालिली होती; आणि दोन माहाडीकांस जखमा लागल्या, तेव्हां चतुरशिंग यानें सांगीतल्यावरून फौज माघारी परतली. सेनाजी मोहिते हे शत्रूस पाठ न दाखवावी ह्मणून एकटे लढत होते; तरी माधवराव रास्ते यांस एकीकडे काढन त्यांजवर चालून गेले, तेव्हां त्यांचे बरोबरचे लोकांनी त्यास ठार मारून त्याचा शरीराचे तुकडे तुकडे केले.

सातारा शहर लुठण्यामध्यें शत्रूची सर्व फौज गुंतली, व कांहीं फौज चतुरशिंग याचा पाठलाग करीत गेली; तरी चतुरशिंगाबरोबर कांहीं विश्वासु लोक होते, त्यांसुद्धां तो कोल्हापूरचे राजाकडे गेला. तेव्हां नानांनी कोल्हापूरचे राजास परशुराम भाऊ यांवर घाला घालण्यास सांगितलें होतें. त्यावरून कोल्हापूरचे राजानें मराठ्यांचा दक्षिण प्रांत जाळून पोळून लुटून टाकिला.

सातारचे किल्ल्यामध्यें अन्नसामुग्री कांहीं नव्हती, ह्मणून राजा शत्रूचे हस्तगत झाला; व परशुराम भाऊंनी या प्रमाणें कामगिरी बजावल्यानंतर त्यांस त्यांचे फौजेस फांटा देण्याचा हुकूम आला. तेव्हां परशुराम भाऊंनी निमित्त केलें, कीं माझे फौजेस पगार देणें राहिला आहे, व माझे जवळ पैसा नाहीं. असें त्यानें पेशव्यांस कळविलें; तेव्हां बाजीरावास कोणीं सांगीतलें, कीं परशुराम भाऊ दंडा बदल दाहालक्ष रुपये देण्यास कबल झाल्यास त्यांस माफी करावी.

अशा समयीं पुण्यांतील राज्यांत बेकैद जास्ती होत चालिली; व शिंदे मोठ्या संकटांत होते; कारण कीं, जिकडून कधीं नाश होणार नाहीं असें त्यास वाटलें होतें, तिकडूनच झाला.

माहादजी शिंदे मेले. त्यांस तीन बायका होत्या; त्यांपैकीं भागीरथी बाई ह्मणून जी होती; ती तरुण व फार लावण्यवती होती. दौलतराव शिंदे हे त्याचे चुलत्याचे पुत्र व खरे वारिसदार असें ठरल्यावर त्यांनी या तिघी जणींस मोठाल्या नेमणुका करून देण्याचें कबूल केलें; ह्मणून त्या त्याजवळ राहिल्या; परंतु त्यांच्या बारमाहींच्या नेमणुका न करून दिल्यामुळें, व थोड्या दिवसांत त्यांचे सुखांपैकीं काहीं सुखे कमी झालीं; यामुळे त्यांनी गाऱ्हाणीं व फिर्यादी केल्या नाहींत; परंतु एकाएकीं दुसऱ्या दोघी वडील बायका पाळतीनें शोध लावून बोलूं लागल्या, कीं दौलतराव शिंदे धाकट्या आईशीं अयोग्य रीतीनें रत झाले आहेत; आणि मख्यातपणें त्यांस दोष देऊन बोलूं लागल्या, कीं ज्याणें आपल्या बापाचे बिछान्यास पाय लावून आपल्या आईशीं संग केला त्यास आह्मी आपला पूत्र असें ह्मणणार नाहीं.

सरजेराव घाडगा मध्यस्थी करूं लागला, परंतु त्या दोघीजणी बोलिल्या, कीं सरजेराव यानें आमचे जवळ येऊंनये; परंतु त्या दांडग्यानें त्यांचे तंबू भोंवतालच्या कनाथी सोडून आंत शिरून त्यांस धरून छड्यांनी मारिलें; व मोठ्या क्रूरत्वानें त्यांची अप्रतिष्ठा केली. माहादजी शिंद्यांचे राज्यांत मुख्य कारभारी शेणवी होते; त्यांस सरजेराव हा फार माजला ह्मणून पूर्वींच त्याचा त्रास आला होता, व बाळोबा तात्या ह्मणून जो त्यांचा मुख्य व ज्यास ते मुख्य मानीत असत, त्यास कैद केल्यामुळें, त्यांस फारच त्रास येऊन त्यांनी दोघी बायांचा पक्ष स्वीकारिला. तेव्हां

त्याचे तंटेबखेडे व वादविवाद होऊं लागले; परंतु सरतेशेवटीं कैलासवासी माहादजी शिंद्यांचे बायकांनी बऱ्हाणपुरास जाऊन राहावें, आणि त्यांचे चरितार्थास त्यांच्या योग्यतेप्रमाणें नेमणुका करून द्याव्या, असें ठरलें.

असें ठरल्यावरून त्या पुण्याहून निघाल्या; परंतु त्यांजबरोबर शिपाई दिल्हे होते, त्यांस असा हुकूम दिल्हा, कीं यांस बऱ्हाणपुरास न नेतां अहंमदनगरचे किल्लयांत कैद करून ठेवावें. ही दगाबाजी त्यांचे बरोबरचे लोकांस लागलीच समजल्यामुळें, ते भिमानदीचे काठीं कोरेगांवाजवळ आले नाहींत तों मुझाफीरखां पठाण ह्मणून जो शिंद्यांचे निवडक स्वांरलोकांवरील मुख्य हिंदुस्थानांत होता, तो या शेणवी कारभाऱ्यांचे पक्षाचा होता; ह्मणून तो त्या स्वांरांपैकीं कांहीं स्वांर बरोबर घेऊन जाऊन शिंद्यांचे बायकांबरोबर जे शिपाईलोक होते; त्यांस हांकून देऊन बायांस सोडवून शिंद्यांचे छावणीशेजारीं घेऊन आला. असें उद्धटपणाचें काम केल्यामुळें शिंद्यांनी त्या पठाणास शिक्षा केली असती; परंतु त्यांस वाटलें, कीं आपल्या फौजेपैकीं कित्येक मुख्य कामगार बायांशीं फितलेले आहेत; व त्यानें हाहि विचार केला, कीं जिवावर उदार झालेले शिपाई यांजवर फौज पाठविली असतां तोडातोडी होऊन, कदाचित या बायांपैकीं एकादी मरेल; व असें झाल्यानें सर्व मराठ्यांचे मांतांत आपला नावलौकिक जाऊन आपल्या तोंडास काळोखी येईल. असें वाटलें. तरी घाडगा याने दौलतराव यांस तें बंड मोडून टाकण्यास मोठे अग्रहाने सांगीतलें; व सरतेशेवटीं घाडग्यास त्या दंगेखोर लोकांशीं लढाई करण्यास हुकूम झाला. परंतु मुझाफीरखां यास त्याचे आचाराचे पक्कें वर्तमान समजलें

होतें, ह्मणून त्याने शिंद्यांचे बायकांस पेशव्यांचे भाऊ अमृतराव यांचे छावणींत नेलें; ते समयीं अमृतराव जुंनरास जात असतां भिमा नदीचे तिरीं उतरले होते; तेव्हां अमृतरावांनी तत्क्षणीं त्यांस साह्य देऊन त्यांचा बचाव केला. घाडग्याने जातीने मुझाफीरखां याची पाठलाग केली, परंतु मुझाफीरखां याने शिंद्यांचे बायकांस अमृतरावांचे स्वाधीन करून आपण मोकळा होऊन लागलाच माघारा फिरून घाडग्यावर चढाव करून जाऊन त्याची पाठलाग करीत जे आले होते, त्यांजवर घाला घालून त्यांस जिंकिलें; आणि आपण मोठ्या जयाने अमृतराव यांचे छावणींत आला.

बाजीराव या बंडास कारण होता; असें लोकांचें खचीत ह्मणणें आहे; त्याने बायांकडील लोकांस दृढ निश्चयेंकरून त्यांचा बेत सिद्धीस नेण्याकरितां उत्तेजन दिल्हें, यांत कांहीं संशय नाहीं. बाजीराव मोठ्या निःकपटपणाने बोलिला, कीं आमचे भाऊ अमृतराव यांणी मयत महादजी शिंद्यांचे बायकांस आश्रय दिल्हा; ही दयाळूपणाची आणि चांगली गोष्ट केली. परंतु शिंदे आणि घाडगे यांस अमृतरावाचा राग येऊन ते लढाई करितील. असें बाजीरावास भय वाटून त्याने आपल्या दरबारांत इंग्लिश लोकांचे वकील कर्नेल पारमर होते, त्यांस या गोष्टींविषयीं मध्यस्थी करावी असें सांगीतलें; तेव्हां त्यांनी शिंद्यांशीं मध्यस्थी करण्याविषयीं बोलणें केलें असतां शिंद्यांनी तें नाकारलें.

शिंद्यांनी जून महिन्याचे सातव्या तारिखेस रात्रीं, हुशार व तयार अशा पांच पलटणी शिडूप्रांट ह्मणून फ्रान्स देशांतील राहणारा सरदार होता, त्याचे हाताखालीं देऊन अमृतरावांचे

छावणीवर एकाएकीं घाला घालण्याकरितां, व शिंद्यांच्या बायका धरण्याकरितां पाठविल्या; परंतु त्यांस सिद्धी झाली नाहीं. आणि अमृतरावांनी त्यांजवर मोठ्या शूरत्वाने घाला घातल्यामुळें त्यांपैकीं कित्येक लोक मेले; यामुळें बाकीच्यांस परत येणें प्राप्त झालें. नंतर शिंद्यांनी बोलणें लावलें कीं, बायांस चांगली नेमणूक व त्यांचे मर्जीस येईल ती जागा राहावयास देतों. असें पुन्हा वचन दिल्यावरून अमृतराव हे शिंदे दंगा करतील असें मनांत न आणितां, शिंद्यांचे छावणीजवळ पुण्या शेजारीं आले. आणि खडकीचे पुलावर राहिले, तेसमयीं अमृतराव यांचें संरक्षण करण्यास पाहारे इत्यादि अगदीं कांहीं नव्हते; तेव्हां ही अशी सवड पाहून सरजेराव घाडगा मोहरमचे ताजाचें निमित्त करून मोहरमचे दाहाव्या तारिखेस डोले पडत असतात तेव्हां डोले घेऊन नदीचे कांठीं आला; ते समयीं मग सुंदरजन ह्मणून फ्रान्स देशींचा राहाणारा सात आठ पलटणींवर मुख्य होता, त्यास डोले जात असतां त्यांत दंगा होऊं नयें असा बंदोबस्त राहावा; या निमित्ताने त्याचे सैन्यासहीत बरोबर घेतलें; आणि एकदम पंचवीस तोफांचे गोळे अमृतरावांचे फौजेस ही गोष्ट माहित नसतां तिजवर टाकिले; आणि पुढें सरसाऊन त्यांजवर या मोठया सैन्यासहीत घाला घालून त्यांची दाणादाण केली; आणि अमृतरावांचे तळावरील सर्व कांहीं लुटलें.

या समयीं शिंद्यांच्या बायका विठलवाडी ह्मणून खेडें आहे तेथें राहात होत्या; व हा घाला प्रत्यक्ष पेशव्यांचे भाऊ अमृत राव यांजवर घातल्यावरून शिंद्यांची आणि पेशव्यांची लढाई खचीत होईलसें वाटलें.

काशीराव होळकर अमृतरावांकडे जाऊन मिळाले व

सर्व मानकरीहि **अमृतरावांकडे** जाऊन मिळाले. व पेशव्यांनी **निजाम अल्लीचा** वकील जो त्या समयीं पुण्यांत होता त्याचे द्वारें **निजाम अल्लीशीं** तह केला, कीं तुह्मांवर कांहीं प्रसंग पडला तर आह्मी तुह्मांस मदत देऊं, व आह्मांवर प्रसंग गुदरला तर तुह्मी आह्मांस मदत द्यावी; **निजाम अल्ली** व **नाना फडनवीस** यांचा माहाडांत तह झाला होता, तो पेशव्यांनी पक्का करावा व बिडारची चौथ सोडावी; व याखेरीज आठ लक्ष रुपये, वसूलाचा परगणा सदोदित **शिंद्यांस** जिकण्याकरितां पेशव्यास मदत दिल्याबद्दल **निजाम अल्लीस** द्यावा; असें त्याने बोलणें घातलें. **निजाम अल्लीनेहि** कबूल केलें, कीं पुढें कामावरून काढिलेले दिवाण **नाना फडनवीस** यांनी पेशव्यांवर स्वारी केली, तर आपला बचाव करीन; परंतु असें ठरलें होतें, कीं **शिंद्यांनी नानांस** मोकळे केल्यास **बाजीरावाने** एक लक्ष रुपये पेनशनाबद्दल प्रतिवर्षी **नानांस** द्यावे. **रघूजी भोसल्याची** मर्जी असल्यास त्यानेहि या तहनाम्यांत भागीदार व्हावें; त्यास **बाजीराव**, गढामंडळा हा प्रांत देईल.

**शिंद्यांस** त्या समयीं फार भय वाटून इंग्लिश सरकारची मध्यस्थी पूर्वी नाकारली होती; ती मिळावी ह्मणून फार उत्सुकता झाली. तेव्हां **कर्नेल पारमर** याने सांगितलें, कीं तुह्मी सांप्रत दिवाण आहे यास कामावरून काढून बायांस जाहागीर नेमून द्यावी; व पेशव्यांस शरण जाऊन पुनः त्यांचे ताब्यांत राहावें. याप्रमाणें **शिंदे** कबूल करण्यास राजी झालेसें दिसलें. परंतु बायांनी आह्मांस अमुक नेमणूक द्यावी अशी मोठाली बोलणीं घातलीं; तेव्हां **शिंद्यांच्याने** ती कबूल करवेनात, व **शिंदे** हे हिंदुस्थानांत जाण्यास उत्सुक होते, तरी त्याच्या

फौजेस फार दिवसांचा पगार देणें होता, त्यापैकीं थोडाबहूतहि देण्यास त्यांजवळ पैसा नव्हता.

**बाजीरावास** भय घालावें ह्मणून, व जशी पेशव्यांनी **निजाम अल्लीशीं** तह करून साह्यता संपादिली; तशी आपण संपादावी या हेतुने उत्सुक होऊन त्याने **टिपूकडे** वकील पाठविला; परंतु **बाजीरावाने गोविंदराव काळे** याचे मसलतीनें आपणहि तसें केलें. **नाना फडनविसांस** कैदेंतून सोडण्याचें **बाजीरावास** जास्ती भय वाटूं लागलें. व आपल्या फौजेस पगाराबद्दल फार दिवसांचा पैसा देणें आहे, त्या घोटाळ्यापासूनहि मुक्त होण्याजोगा पैसा **नाना फडनवीस** आपणास देतील, असें **शिंद्यांस** वाटलें; त्यावरून त्यानी **नाना फडनविसांस** अहंमदनगरचे किल्यांतून आणविलें; आणि त्यांस कैदेंतून सोडण्याबद्दल दोन कोटी रुपये मागीतले. कांहीं दिवस मध्यें लोटले; इतक्यांत **नाना फडनवीस** यांनी इंग्लिश सरकारचा आश्रय संपादून आपली सुटका करून घेण्याविषयीं यत्न केला. सरतेशेवटीं **नाना फडनवीस** कबूल झाले, कीं आधी मला कैदेंतून सोडावें ह्मणजे दाहा लाख रुपये देईन. आधीं सोडण्याचें कारण **नाना फडनवीस** बोलिले, कीं मी कैदेंत असतां कांहीं खूण जरी दिल्ही तरी माझे कारकून पैका देणार नाहींत. त्यावरून **नाना फडनवीसांस** कैदेंतून सोडिलें; आणि कराराप्रमाणे पैकाहि **शिंद्यांस** मिळाला.

**नाना फडनवीस** सुटणार असें कदाचित ठाऊक पडमुल्याळें **बाजीरावास** फार भय वाटून त्यानें **निजाम अल्लीशीं** तहनामा केला होता, तो मोडिला. त्यावरूनच एकाएकीं **नानांची** सुटका झाली. या विषयींचीं कारणें बरोबर समजण्यांत आलीं-

नाहींत; तथापि मसुलुल्मुल्क ह्मणून निजाम अल्लीचा वजीर होता, त्याच्या चंचल व कपटी बुद्धीच्या योगेंकरून नानांची सुटका झालीशी वाटते. ह्मणून पेशव्यांनी क्षणभर न विसंबतां नाना फडनाविसांशीं व शिंद्यांशीं बोलणें घातलें; तेव्हां शिंद्यांस निजाम अल्लीचा व पेशव्यांचा तह झाला होता तो मोडला; हें ठाऊक नव्हतें, ह्मणून व दगेखोर मोगललोक व मराठेलोक आपणावर घाला घालितील, या भयाने व हिंदुस्थानांत त्याचे फौजेमध्यें बखेडा व अव्यवस्था झाली असें कानावर आल्यावरून पेशव्यांनी त्याचाशीं बोलणें घातलें होतें; तें त्याने मोठ्या खुषीने कबूल केलें; परंतु बाजीरावास असा आग्रह केला, कीं तहनामा करण्याचे पूर्वी प्रथमतः नाना फडनविसांस पुनः फडणविशीचे कामावर नेमावें; असें बोलणें चालिलें आहे, तों घाडग्याचे योग्यते प्रमाणेंच फकीरजी गाढवे यानामें करून त्याचे दिवाण होते, त्यांनी मदत दिल्ह्यावरून त्याने लोकांवर जुलूम करून अनर्थापात मांडिला. शिंद्यांनी त्यास समजून सांगितलें असतांहि त्याने त्यांचे ऐकिलें नाहीं. लोकांचा नाश करून कर्मणूक करण्याने त्याचे क्रूरत्व इतकें वृद्धीस पावलें, कीं त्यासारिखें क्रूरत्व पूर्वी कोणींच केलें नसेल, व पुढेंहि कोणी करणार नाहीं. त्याने शिंद्यांचे फौजेंतील चार कामगारास बायांचे बंडांत होते. अशा संशयावरून कैदच केलें; व त्यांपैकीं तिघांजणांस तोफेचे तोंडीं दिल्हें; व चवथा एशवंतराव शिवाजी या नामेंकरून होता, त्यास डोकींत मोगरीनें मेख ठोकून ठार मारिलें. शिंद्यांचा हुकूम न मानितां त्याचा घाडगा याने असा अपमान केल्यावरून, व सर्व प्रजा अनर्थापात व जुलूम झाला यामुळें तळतळाटाने ओरडूं लागल्यावरून सरतेशेवटीं शिंद्यांस

फार त्रास येऊन त्यानी रामजी पाटील, व आबा चिटणीस यानी सांगीतलेली मसलत ऐकून फैलोज आणि हेंशिग या नामें हिंदु बायकांकडून दोन पुत्र झाले होते; त्यांस घाडगे व गाढवे यांस धरून आणण्याकरितां पाठविलें; त्याप्रमाणें त्यांणी मोठे धैर्याने त्या दोघांस धरून आणिलें.

या दोघांस कैदेंत ठेविल्यावरून शिंद्यांची व बाजीरावाची एकी होण्यास जास्ती कारण झालें; व या समयीं इंग्लिश लोक नव्या रीतीने वर्तणूक करूं लागल्यामुळें त्या दोघांचा एकोपा झाला.

सर जानशोर, हिंदुस्थानांत राज्यकारभार पाहत होते. त्यांच्या कारकीर्दीत इंग्लिश लोकांची राज्यकारभार चालविण्याची रीत तिऱ्हाईता सारिखी होती. ती लार्ड मार्नी गटन जे पुढें मार्कीस वेलसली या पदवीस आले, ते हिंदुस्थानांत सन् १७९८ एप्रेल महिन्याचे सव्विसाव्या तारिखेस आल्यानंतर त्यांनी ती रीत बदलली. यावरून इंग्लिश लोकांची हैदराबाद व पुणें एथील राज्यकारभार चालविण्याची रीति बदलल्यामुळें हैसुरचे सुलतानाने फ्रेंच लोकांशीं तहनामा होतांच इंग्लिश सरकाराशीं लढाई करण्याचा बेत केला होता; तसें कदाचित होईल, असें गवर्नर जनरल यांस वाटल्यावरून या दोन्ही राजांनी टिपू प्रमाणें न करावें व त्यांचे राज्यांतील फौजेने इंग्लिश सरकाराशीं लढाई न करितां दोस्ती ठेवावी, असा बंदोबस्त करावा, ह्मणून प्रथमतः इंग्लिश सरकारचे रसीडेंट् ह्मणजे वकील यांस हुकूम झाले.

टिपूशीं लढाई करण्यास इंग्लिश लोकांस मुख्यत्वेंकरून हेंच भय प्राप्त झालें, कीं टिपूस फ्रेंच लोकांनी मदत दिल्ही ह्म-

णजे बहूतकरून दुसरीं हिंदुराज्यें ज्यांचा अमल दिवसानुदिवस निर्बळतेप्रत पावत आहे; ते योग्य रीतींचें राज्य न चालवितां बंडें करून टिपूकडे जाऊन मिळतील. परंतु त्यांच्या फौजांत फेरफार झाला. विशेषेंकरून शिंद्यांचें व निजाम अल्लीचें असंख्य सैन्य हुशार पलटणी व पायदळ होतें, त्याजवर मुख्य अमलदार फ्रेंच लोक होते.' त्यांत मोठा फेरफार झाला, ह्मणून इंग्लिश सरकारास निजाम अल्लीशीं व मराठ्यांशीं मित्रत्व ठेवणें प्राप्त झालें. शिंद्यांची पलटणें व फौज दक्षिण देशाचे मध्यभागीं होती, त्या फौजेसुद्धां कसेंहि करून शिंद्यांस प्रथमतः हिंदुस्थानांत घालवून द्यावें, असा इंग्लिश सरकारचा हेतू होता. यास्तव पेशव्यांस सदोदित आपल्या ताब्यांत ठेवून, इंग्लिश लोकांची बढती पेशव्यांचे राज्यांत न होऊं द्यावी, अशी शिंद्यांची इछा माहीत होती, ह्मणून प्रथमतः त्यास हिंदुस्थानांत लाऊन देणें आवश्यक झालें. जामन शाहाशिंग काबूलचा राजा यानें शिंद्यांशीं लढाई करून त्यांचें हिंदुस्थानांतील राज्य घेण्याविषयीं बेत केले होते; ते इंग्लिश सरकारचे वकीलांनी शिंद्यांनी आपलें राज्य बचावण्याकरितां हिंदुस्थानांत जावें ह्मणून प्रसिद्ध केलें; व इकडे बाजीरावास कंपनी सरकारचीं कांहीं पलटणें तुह्मी आपले व आपल्या राज्याचें संरक्षण करून अमल अगदीं कमी झाला आहे तो सबळ होण्यास्तव ठेवावी, असें सांगितलें. थोडे दिवसांपूर्वी बाजीरावानें इंग्लिश सरकाराशीं असाच ठराव करण्याकरितां अर्ज केला होता; परंतु त्या वेळेस इंग्लिश लोकांचा अमल बरोबर न बसल्यामुळें सोईस न पडून पार्लमेंटाचे कायद्यानें या गोष्टीस विक्षेप झाल्यामुळें त्यावेळेस बाजीरावाचे ह्मणण्याप्रमाणें त्यांनी कबूल

केलें नाहीं. परंतु इंग्लिश लोकांनी **बाजीरावाचे** साहाय्यास फौज द्यावी, त्या फौजेस **बाजीरावानें** पगार द्यावा; व **नाना फडनविसांस** पुनः राज्यकारभारावर नेमावें, व **शिंद्यांस** पुण्यांतून घालवून द्यावें, असें एकाएकीं बोलणें घातलें. तेव्हां **नाना फडनविसांचा बाजीराव** फार द्वेष व त्रास करीत होता; व त्याचें ज्ञान व समजूत जितक्यास तितकीच होती; यामुळें त्यास वाटलें, कीं हें सर्व कृत्रिम **नाना फडनविसांचें** असेल. याप्रमाणें **शिंद्यांनी** हिंदुस्थानांत परत जाण्याचा बेत केला; तरी त्यानी कचेरी करून सर्वांची भेट घेतली; तेणेंकरून **नानांची** व **शिंद्यांची** व **बाजीरावाची** एकी झाली होती, ती प्रसिद्धीस आली. तेव्हां आपण पुण्यांत राहून **नाना फडनवीस** इंग्लिश लोकांस आपल्या राज्यांत आणितात, तें बंद करावें, ह्मणून **बाजीरावानें** गुप्तपणें भेट घेऊन **शिंद्यांस** सांगितलें; परंतु त्याच समयीं **बाजीरावाने नाना फडनविसांशीं** मिळवन घेण्याकरितां आपली पराकाष्ठा करून त्यांस **शिंद्यांची** छावणी सोडून पुनः राज्यकारभार पाहावा ह्मणून फार आग्रह केला. त्याजवरून **नाना फडनवीस** पुनः एकवेळ पुण्यास येऊन बोलिले, कीं इंग्लिश सरकार व **निजाम अल्ली** या दोघांनी माझे शरीराची व जिनगीची निशा घेतल्या खेरीज, व माझे आणि **शिंद्यांचे** कुटुंबांतील मंडळीची एकी होऊन **शिंद्यांस** हिंदुस्थानांत घालविण्यास शक्तिमान केल्या खेरीज, मी पेशव्यांचें काम पाहाणार नाहीं. **शिंद्यांस** हिंदुस्थानांत पाठविण्याविषयीं त्याने यत्न करून त्यांच्याशीं जमवून घेतलें; आणि त्यांस हिंदुस्थानांत लौकर पाठवावें, या योजनेने त्यांस खर्चाबद्दल पूर्वीं सुटका होण्याचे वेळेस दाहा लक्ष रुपये दिल्हे होते; त्याशिवाय आपल्या खासगी खजीन्यांतून पंधरा लाख

रुपये आगाऊ दिल्हे. शिंदे हिंदुस्थानांत खरोखरी जातात असें वाटल्यावरून बाजीरावांनी नानांची भेट गुप्तपणें घेण्याचा हेतू दर्शविला; आणि सोंग घेऊन नानांचे भेटीस गेले, कांकीं आपण नानांस भेटावयास आलों हें शिंद्यांस न समजावें. मध्यरात्रीचे सुमारें बाजीराव एक खासगी चाकर बरोबर घेऊन नाना फडनविसांचे घरीं आले आणि नाना फडनविसांस बोलिले, कीं तुह्मांस कैद करून तुमची अप्रतिष्ठा केली, यामध्यें मी नव्हतों; व दुसऱ्या कारभाऱ्यांस जें कैद केलें, तें या बुद्धीने केलें, कीं शिंद्यांचा दिवाण याने मळय व जुलूम करून लोकांस दुःख दिल्हें, त्याजपासून या कारभाऱ्यांस बचवावें, या उद्देशाने त्यास कैद व्यर्थ केलें. असें नानांस सांगीतल्यावरून, त्यावेळेस त्यांस खरें वाटलें. इंग्लिश सरकारचे रसिडेंट कर्नेल पारमर यांस वाटलें, कीं नाना फडनवीस बाजीरावाकडून कधीं फसले गेले नसतील; परंतु सरते शेवटीं नानांचे कृतीवरून ते फसले गेले असें ठरलें. बाजीरावाचें बोलणें इतकीं मोहनी पडण्याजोगें असे, कीं जे जे बाजीरावाचें शत्रुत्व व द्वेष करीत होते ते सावध असत तरी बाजीरावाचें बोलणें ऐकून भुलून जाऊन फसले जात. बाजीराव ज्या समयीं नानांकडे आले तेव्हां त्यांचे बोलण्याने नानांस मोहनी पडली. तेव्हां बाजीरावांनी नानांचे पांयांवर डोचकी ठेऊन त्यांचे पायांची शपथ घेतली, कीं तुह्मी माझे वडिला समान मला आहां, व या उपरांत कांहीं एक गोष्ट करणें झाल्यास तुमच्या मसलतीशिवाय मी करणार नाहीं. असें बोलून शेवटीं डोळ्यांतून अश्रु काढून पूनः शपथपूर्वक बोलिले, कीं मराठे लोकांचे बंडाने व इंग्लिश लोकांचे

लोभाने ब्राह्मण लोकांचें राज्य नाशाप्रत पावत चालिलें आहे हें आपण जाऊं देऊंनये.

बाजीरावांनी या प्रमाणें नानांशीं पुनः करार केल्यामुळें नाना फडनविसांनी पूर्वीं निजाम अल्लीची व इंग्लिश सरकारची जिमा दिल्याखेरीज मी राज्य कारभार पाहाणार नाहीं, अशी शाहाणपणाने आड घातली होती, ती आड या समयीं न घालितां नाना पुनः राज्यकारभार पाहूं लागले. परंतु राज्यकारभार पाहावयास आरंभ केला इतक्यांत येशवंतराव घोरपडे यांनी नानांस कळविलें, कीं तुह्मांस पुनः कैद करण्याकरितां बाजीराव प्रयत्न करून शिंद्यांचे मनांत आणन देतात. हें वर्तमान शिंद्यांनी जातीने नाना फडनविसांस सांगीतल्यावरून त्यांस खचीत वाटलें.

नाना फडनवीस तत्क्षणीं सरकार वाड्यांत आले, आणि पेशव्यांस बोलिले, कीं माझेप्रमाणें दुसरा कोणी मूर्ख नसेल; यास्तव मी पुरातन वृद्ध दुर्दैवी व अशक्त मनुष्य, मला कैदेंत घालून माझ्या जीवाचा घात न करितां मला सरकारी दरबारापासून व छावणीपासून एकादे दूर जागीं राहाण्यास हुकूम व्हावा, कांकीं मी तेथें राहिलों असतां, तेणेकरून जेजे संकेत सरकार करितील त्यांस कांहीं विक्षेप येणार नाहीं. नानांनी शपथ घेतली, कीं माझे मनांतून आपल्या हातांत सत्ता व अधिकार असावा ह्मणून पुनः काम घेतलें असें नाहीं; परंतु सरकारास अद्यापिहि माझा उपयोग घडावा या बुद्धीने घेतलें. बाजीराव निश्चय पूर्वक बोलिले कीं, असें दग्याचें काम माझे हातून झालें नाहीं, व या गोष्टीस मी सामीलहि झालों नाहीं; तुह्मांस ज्याणें माझें नांव सांगीतलें असेल; त्यास बेलाशक कैद करावें; असें ह्मणतांच शिंद्यांनी लागलेच पेशव्यां-

चे कारभारी **गोविंदराव काळे** व **शिवराम नारायण** थत्ते ज्यांस **नानांस** धरावयास नेमिलें होतें, त्यांस कैद केलें. परंतु मराठे लोकांत अशा प्रसंगीं आपले धनी ज्यांनी आपल्यास दुष्टकर्म करण्यास उद्युक्त केलें त्यांचें नाव न फोडावें ह्मणजे मोठी अबरू मेळविली असें आहे. यावरून या दोघांस कैदेंत ठेऊन त्यांची चीजवस्त घेतली तरी त्यांनी आपल्या धन्याचें नाव समजं दिल्हें नाहीं; व **शिवराम नारायण** थत्ते हे लवकरच पुढें मृत्यु पावले. याप्रमाणें **नानांची** खातरी केल्यावरून **नानांनी** पुनः मुख्य प्रधानाचें काम घेतलें; तथापि मनांतील संशय गेला नाहीं, पुढें त्यांचे खेरीज जें काम व्हावयाजोगें असे तेंच काम मात्र ते करीत.

अशा गोष्टी घडत होत्या त्याप्रसंगीं फारच अणीबाणीची वेळ होती. **निजाम अल्लीने** इंग्लिश लोकांशीं सन् १७९८ चे सप्टेंबरचे नवव्या तारिखेस नवा तहनामा केला. त्यांत त्याने असें ठरवून दिल्हें, कीं मी फ्रेंच लोकांस आपल्या पदरीं चाकरीस ठेवणार नाहीं, व जे असतील त्यांस चाकरी वरून दूर करीन; व नवीन फौज **रायमंड** याचे हाताखालीं आहे, ती मोडून टाकून त्याचे बद्दल साहा पलटणी इंग्लिश शिपायांच्या चाकरीस ठेवीन, व प्रत्येक पलटणींत हजार मनुष्यें ठेवीन. व इंग्लिश लोकांचा तोफखाना बाळगीन. या सर्वांबद्दल **निजाम अल्ली** इंग्लिश लोकांस चोवीस लाख सत्रा हजार एकशें रुपये सालीना द्यावयास कबूल झाला, व इंग्लिश सरकारांनींहि एके कलमांत मोठ्ये हुशारीने लिहून दिल्हें, कीं तुह्मांमध्यें व पेशव्यांमध्यें, कांहीं कमजास्ती झाल्यास इंग्लिश सरकार मध्यस्थी करून पेशव्याकडून नि-

जाम अली ह्मणेल त्याप्रमाणें मित्रत्वाचे नात्याने कबूल करवून देईल.

हा तहनामा झाल्यावरून मराठे लोकांस फारच मत्सर उत्पन्न झाला. व जेव्हां इंग्लिश सरकारचे वकीलांनी पेशव्यांशीं असाच तह करण्याविषयीं बोलणें घातलें तेव्हां पेशवे बोलिले, कीं आपण ह्मणतां त्याप्रमाणें आह्मी फौज ठेवूं, असें वचन देऊनच त्यांनी टाळाटाळ केली. आपणास टिपूशीं लढाई करण्याचा प्रसंग आल्यास आह्मी मदत देऊं अशीं वचनें दिल्हीं, या उत्तरांत बाजीरावांनी नाना फडनविसांचें मत घेतलें; परंतु वचन दिल्हाप्रमाणें करावें किंवा न करावें हें कांहींच बाजीरावांचे मनांतून ठरलें नव्हतें; तथापि नाना फडनविसांनी सांगितलें, कीं आपण कबूल केल्याप्रमाणे न केल्यास आपल्या राज्याची कीर्ति व खरेपणा जाईल. नाना फडनविसांनी बाजीरावांस सांगितलें, कीं परशुराम भाऊचे चिरंजीव आपा साहेब यांस इंग्लिश लोकांचे मदतीस देण्याकरितां किरकोळ फौज नेमिली आहे तिजवर नेमावें व अशा घाईच प्रसंगीं फौज जमाकरणें ती धोंडोपंत गोखले कर्नाटकचे सर सुभेदार यांचे हाताखालीं जमा करावी; व रास्ते विंचूरकर इत्यादि ब्राह्मण जाहागीरदारांचे हाताखालील जितके स्वार जमा करवतील तितके करावे. राज्यांत फौजेची गरज होती; व शिंदेहि पुण्यांत होते ह्मणून बाजीरावांस पुण्यांतून फौज बाहेर पाठवितां येईना. व वाढवितांहि येईना.

आपा साहेब हे फौजेचें काम घेईनात, परंतु हें काम आपा साहेबांस देतों असें नानां बोलिल्या वरून परशुराम भाऊंची व नानांची एकी झाली. तेव्हां परशुराम भाऊ

बोलिले, कीं आमचा दंड माफ करून धारवाड व कर्नाटक या प्रांतीं अमुक गांवें जाहागिरी बद्दल दिल्ह्यास मी जातीनेंच हें काम घेतों. पूर्वी इंग्लिश लोकांची फौज जितकी होती तितकीच दुसरी फौज पूर्वीचेच कामगाराचे हाताखालीं देऊन **परशुराम भाऊस** जाऊन मिळण्याकरितां तयार केली; हे सर्व बेत **नाना फडनविसांनी** केलेले **बाजीरावांनी दौलतराव शिंद्यांचे** मसलतीने मना केले. इंग्लिश सरकार, **टिपूशीं** लढाई करूं लागल्यांनंतर पेशवे **टिपूचे** वकीलास प्रसिद्धपणें दरबारांत येऊं देऊन त्याचा आदर सत्कार करीत; तेव्हां इंग्लिश सरकारचे कारभारी यांनी असें करितां हें ठीक नव्हे असें वारंवार कान उघडून सांगितलें व **टिपूचे** वकीलास चालीप्रमाणें निरोप दिल्हा असतांहि मार्चाचे नवव्या तारिखेस **कर्नेल पारमर**. यांस समजलें, कीं **टिपूचे** वकील परत न जातां पुण्याहून साडेबारा कोश दक्षिणेस किकवी ह्मणून गांव आहे, तेथें ते उगीच गेले आहेत. **कर्नेल पारमर** यास मूळ प्रथम वाटलें, कीं **बाजीरावांनी** पूर्वी जशीं खोटीं निमित्तें करून पैसा घेतला, तसें **टिपूस** मदत न देण्याचे निमित्ताने अथवा दोन्ही पक्षांसहि मदत न देण्याचे निमित्ताने त्यापासून पैका घेण्याकरीतां त्याचे वकील ठेवून घेतले असतील. इंग्लिश सरकारचे वकीलांस ठाऊक होतें, कीं **बाजीरावांनी टिपूपासून** दाहा लक्ष रुपये घेतले. हे **शिंद्यांस** माहीत होतें; परंतु त्या समयीं **नाना फडनविसांस** ठाऊक नव्हते. ह्मणून जेव्हां गवर्नर जनरल यांस पुण्यांतील दरबारांत काय काय चालिलें आहे हें समजलें, तेव्हां त्यांनी **परशुराम भाऊ** यांजबरोबर जाण्या करितां जी फौज तयार

केली होती, ती मार्गे परतविली; तरी नाना फडनाविसांस त्याचें कारण काय हें समजलें नाहीं.

बाजीरावांस वाटलें, कीं परशुराम भाऊंनी मागितल्याप्रमाणें त्यांस देऊन टिपूस उत्तेजन दिल्हाने या दोघांस फसवून कांहीं कमजास्ती दिसल्याने अमका पक्ष स्वीकारिला असतां ठीक होईल असें आपल्यास समजून येई तोंपर्यंत पक्ष स्वीकारण्याचें लांबवितां येईल. असा बाजीरावांनी निश्चय केला, तरी टिपूचा पक्ष स्वीकारावा, असा त्यांचे बुद्धीचा निश्चय झाला. शिंद्यांनी व बाजीरावांनी मिळून निजाम अल्लीवर घाला घालावयाचा बेत करून यांत रघूजी भोसल्यास घ्यावें असें इच्छिलें. व इंग्लिश लोकांनी निजाम अल्लीशीं नवा तहनामा केला आहे त्याप्रमाणें ते त्याचा पक्ष स्वीकारून त्यास मदत देतीलच ती दिल्ही ह्मणजे मराठे लोक टिपूचा पक्ष स्वीकारून त्यांस मदत देणार असें प्रसिद्ध करावें असें योजिलें. मार्कीस वेलसली यांस पेशव्यांचे हे संकेत समजल्या वरून त्यांनी रघूजी भोसले यांस निजाम अल्लीशीं तह केला त्यांत भागीदाराप्रमाणें घ्यावें ह्मणून यत्न केला.

टिपूचा नाश इतका जवळ आला हें शिंद्यांचे अथवा पेशव्यांचे ध्यानीं मनींहि नव्हतें; तों एकाएकीं इंग्रजांनी श्रीरंगपट्टण घेतलें, टिपू मेला, व टिपूचें राज्य जिंकून घेतलें; असें त्यांस समजलें, तेव्हां त्यांस फार आश्चर्य वाटलें. बाजीराव बाहेरून महोत्साह झाला असें दाखवून थोडे दिवसांनी कर्नेल पारमर याचे मनांत आणून देऊं लागले, कीं मी ठराव करून वचनें दिल्हीं होतीं त्याप्रमाणें सिद्धीस गेलें नाहीं, त्यास हा सर्व दोष नाना फडनविसांकडे आहे. धोंडोपंत गोखले

कर्नाटकचे सर सुभेदार यांस तत्क्षणींच हुकूम लिहिला कीं तुम-च्याने जितकी फौज जमा करवेल तितकी करून त्या फौजेसुद्धां टिपूचे देशांत चढाव करून जावें. पुढें त्याचा परिणाम असा झाला, कीं इंग्लिश लोकांचे हातांत टिपूचा देश आल्यानंतर त्यांनीं त्याचीं कित्येक गांवें लुटलीं. धोंडोपंताचे फौजेने काय तें इतकेंच केलें, कीं धोंड्या वाघ ह्मणून श्रीरंगपटणाहून पळून गेलेला मनुष्य होता, त्यास धरिलें. आणि धोंडोपंताने त्याजवर एकाएकीं घाला घालून त्याचे बरोबरचे लोकांची दाणादाण करून दिल्ही. त्यानंतर कोल्हापूरचा राजा ते समयीं पेशव्यांशीं लढाई करीत होता त्याजकडे धोंड्या वाघ गेला; तेव्हां कोल्हापुरचे राजाने त्यास आपल्या सैन्यांत ठेविलें. टिपूचें राज्य बुडालें हें वर्तमान शिंद्यांस कळल्यानंतर त्यांनी श्रीरंगपट्टणांत टिपूचे पक्षपाती जे या लढाईतून वांचले होते, त्यांकडे इंग्लिश लोकांशीं लढाई करून त्यांस अडथळा करण्यां विषयीं उत्तेजन देण्याकरितां गुप्त जासूद पाठविले, व इकडे इंग्लिश लोकांचे वकील पुण्यांत होते त्यांस अनुमोदनार्थ लिहून पाठविलें, कीं लढाईचा शेवट झाला असें पाहून आह्मास फार संतोष झाला. मोठ्या जलदीने व तजविजीने टिपूचें राज्य घेऊन धूळधाणीस मिळविलें. याच रीतीने व तजविजीनें पूर्वी विलायतेमध्यें मोठालीं युद्धें झालीं त्यांत ग्रेट ब्रिटनचे लोकांनी जय मिळविले, ह्मणून त्याचे लढाईच्या चतुराईविषयीं व तजविजीविषयीं ते फार प्रख्यात आहेत. निजाम अल्लीचे राज्यांतील फौज व सर्व कांहींएक मार्कीस वेल्सली यांचे हुकूमांत ठेविलें होतें. व किरकोळ फौज मागल्या लढाईपेक्षां फारच हुशार व तयार झाली ही गवर्नर जनरल याचे पोलिटीकल एजेंट् क्यापटन मालकम् यांनींच

मोठ्या श्रमाने सुधारली. **टिपूचे** जे देश जिंकून घेतले त्यांची वांटणी शाहाणे व उदार माणसाचे हातून झाली. **निजाम अ-ल्लीने मार्क्विसवेल्सली** यांजवर सर्व विश्वास ठेवून वाटणी विषयींचा बंदोबस्त करणें हें त्यांजकडेसच दिल्हें. तेव्हां त्यांनी पुढें लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त केला. पुढें **टिपूचे** गादीवर त्याचे पुत्रास बसविलें असतां देशामध्यें स्वस्थता राहून इंग्लिश लोकांचे हातांत राज्य राहाणार नाहीं असें वाटल्यावरून **हैदर अल्लीने** राज्य बळकावून घेतलें होतें; सबब त्याचे वंशजांपैकीं कोणी कैदेंत होता; त्यास कैदेंतून सोडवून त्याचे पूर्वजांचे राज्या-वर बसविलें. व ज्या नवीन राजास गादीवर बसविलें त्याचा **निजाम अल्लीशीं** इंग्लिश सरकारांनी वाटणी देण्या विषयींचा तहनामा केला. **टिपूचे** सर्व देशांचा वसूल तीस लाख चाळीस हजार प्यागोडा नाण्याचा होता; त्यापैकीं नवीन रा-जास तेरा लक्ष साठ हजार नेमून दिल्हा. **निजाम अल्लीस** पांच लक्ष तीस हजार, व कंपनी सरकारास पांच लक्ष सततीस हजार घेतला. **हैदर** आणि **टिपू** यांचीं कुटूंबें इंग्लिश सर-कारचे ताब्यांत होतीं, त्यांचे चरितार्थाकरितां त्यांस दोन लक्ष चा-ळीस हजार नेमून दिल्हे. व **निजाम अल्लीचे** ताब्यांत **खमरूद्दीनखां**, याचें कुटूंब होतें, त्याचे चरितार्थास सत्तर हजार नेमून दिल्हे. व **बाजीरावांनी** ठराव केले होते त्याप्र-माणें इंग्लिश सरकारास देणें ते दिल्हें नाहीं तरी **निजाम अ-ल्लीशीं** तहनामा केला त्यासारिखा इंग्लिश सरकाराशीं तह के-ल्यास त्यांस **टिपूपासून** जिंकिल्या पैकीं, काहीं विभाग द्यावा हें ठीक आहे, असें गवर्नर जनरल यांस वाटलें. ह्मणून दक्षिण प्रांताचे हद्दी शेजारील जो देश सालीना दोन लक्ष त्रेसष्ट हजार रु-

पये वसूलाचा होता; तो बाजीरावाकीरतां वगळून ठेवून बाजीरावांस लिहून पाठविलें, कीं निजाम अल्लीने तहनामा केला तसा तुह्मी कराल तर तुह्मांस हा परगणा देऊं. याविषयीं पुणे-दरबारचें व गवर्नर जनरल याचें पुष्कळ बोलणें झालें; बाजीरावांस वाटलें, कीं आपण एकाएकीं ही गोष्ट नाकारल्यास आपणाकरितां ठेविलेला देश वांटून घेण्यास इंग्लिशांस निमित्त होईल; तेव्हां जो देश बाजीरावांकरितां ठेविला होता त्याचे दोन तृतीयांश निजाम अल्लीस दिल्हे, व बाकीचा कंपनी सरकाराने घेतला. त्यावेळेस जें बोलणें झालें, त्या बोलण्यावरून बहुतकरून नाना फडनविसांची बुद्धि व चातुर्य हीं सहज दिसून आलीं. पेशव्यांनी टिपूचे वकीलांस ठेऊन घेतल्यामुळें व इंग्लिशांस वचन दिल्ह्याप्रमाणें फौजेची मदत न दिल्ह्यामुळें इंग्लिश सरकारची नाखुषी व बेमर्जी होऊन त्यांनी बाजीरावांवर दोष ठेविला होता. तो घालवावा ह्मणून पेशव्यांनी निमित्त केलें, कीं माझ्या राज्यांत बेकैद होऊन बडे लोकांत चहूंकडे बंडें व दंगे होऊन माझ्या राज्याची मोठी वाईट अवस्था झाली, तेणेंकरून माझ्याने फौज जमा करवेना, व मराठी राज्याची चाल अशी आहे, कीं एकमेकांशीं लढाई चालिली असली तरी एकमेकांचे वकीलांस आपल्या दरबारांत येऊं द्यावें. प्रथमतः पेशव्यांनी हैसूरचे राजाचे देशावर स्वारी करूं नये व त्याजवर जुलूम करूं नये असें मूळ तहनाम्यांत इंग्लिश सरकारानीं ठरवून घेतलें, त्यास बाजीरावांनी उत्तर दिल्हें, कीं ठरलेला देश दिल्ह्याने तो मराठ्यांचा प्रयत सुलतानाचे सर्व देशावर जो चवथाई बद्दल कर आहे त्याचे ऐवजा बरोबरच होईल. फ्रेंचलोक हिंदुस्थानांत चढाव करून आले तर

आह्मी फ्रेंचलोकांस हाकून देण्याकरितां इंग्लिशांस मदत देऊं अ- सें पेशव्यांनी कबूल केलें, परंतु फ्रेंच लोक बाजीरावांचे पदरीं होते; त्यांस चाकरीवरून काढण्यास पेशवे कबूल करीनात. बा- जीराव बोलले कीं माझ्या राज्यास खंडणी देणारे लोक दंगा क- रितात त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां व जंजिऱ्याच्या सिद्दीलो- कांस जिंकण्या करितां तुह्मी दोन पलटणी दिल्यास आह्मी त्यांचा पगार देऊं, परंतु आमचा व निजाम अल्लीचा चवथाई ब- द्दल तंटा आहे त्यामध्यें कंपनी सरकारांनी अगदीं मध्यस्थी करूं नये. सूरत देशचे चौथाई इतका वसूल पेशव्यांस सालिना नेमू- न दिल्याने दंगे धोपे शांत होऊन आपला तोटा न व्हावा ह्मणून इंग्लिश सरकारांनी पेशव्यांस विचारिलें. तेव्हां पेशव्यांनी तें नाकारलें. व रघूजी भोंसले यांस ठरलेल्या तहनाम्यांत मु- ख्याप्रमाणें घेणें हें अगदीं अयोग्य आहे, असें बाजीरावांनी सांगितलें. सरते शेवटीं या गोष्टीविषयीं पुष्कळ वादाविवाद झा- ल्यानंतर बाजीरावांकरितां जो देश ठेविला होता, तो इंग्लि- श सरकारांनी व निजाम अल्लीने तहनाम्यांत ठरल्याप्रमाणें विभागून घेतला. आणि सन् १८०० मध्यें अकटोबरचे बारा- व्या तारिखेस त्या दोघांचा तहनामा झाला, त्या तहनाम्यांत इं- ग्लिश सरकारांनी कबूल केलें, कीं निजाम अल्लीचा मांत कोणी जुलमाने घेऊं लागल्यास इंग्लिश सरकार त्याचा बचाव करतील. तेव्हां पूर्वीच्या काळे लोकांचे साहा पलटणींत दोन दुसऱ्या पलटणीं व मराठे लोकांचे स्वारांचा रिसाला मिळविला. त्या सर्व सैन्याचे पगारा बद्दल निजाम अल्लीने म्हैसूरच्या राज्यापैकीं सन् १७९२ व १७९९ मध्यें जे देश विभागाअन्वयें मेळविले होते ते सर्व इंग्लिश सरकारास सदोदित लावून दिल्हे.

शिंदे अशा समयीं फार गडबडींत होते. सरजेरावाने अमृतरावाचे छावणीवर दग्याने घाला घातल्यावरून मयत महादजी शिंद्यांच्या बायका कोल्हापुरचा राजा पेशव्यांशीं लढाई करीत होता, त्याजकडे पळून गेल्या. नारायणराव बक्षी व शिंद्यांचे छावणींतील मुख्यमुख्य शेणवी लोक त्यांजकडे जाऊन मिळाले. तेव्हां त्यांजकडे चहूंकडून पुष्कळ स्वांर येऊन मिळाले. व लढाई करण्यापुरती फौज जमली. मग त्यांनी उत्तरेकडे कृष्णा नदीपासून गोदावरी नदीपर्यंत जितकीं गावें दौलतराव शिंद्यांचे ताब्यांतलीं होतीं, तितकीं लुटून फस्त केलीं; आणि शिंद्यांचे फौजेंत त्याचा अपमान करून पुण्या शेजारील सर्व रस्ते बंद केले. शिंद्यांचे स्वांरांनी प्रथमतः त्यांस अडथळा करण्याविषयीं यत्न केला, परंतु त्यांचा जमाव इतका थोडा होता, कीं थोड्या लाहान लाहानशा लढायांत त्यांचा मोड झाला. नंतर पलटणी पुढें आल्याखेरीज ते स्वांर शत्रूंवर चढून जावयास धजावेनांत. तेव्हां पलटणी येतांच बायांकडील फौज प्रथम मार्गे हटली, आणि शिंद्यांची फौज तळावर परत येतांच या बंडखोर लोकांनी पुनः चढाव करून जाऊन त्यांची पाठलाग केली. यासमयीं पेशव्यांचे राज्यांत बेकैद इतकी झाली होती, कीं त्यास उपमा नव्हती. दोघा राजांनी ज्या राजास आपला मुख्य असें मानावें, त्याचे राज्यांत येऊन लढाई करावी. येणेंकरून सर्व राज्यामध्यें किती बंडाळी झाली असेल याचा विचार पाहावा; देशामध्यें एकाएकीं स्वांर मनस्वी जमले आणि फारशी लूट चालिली नव्हती, तरी मोठा अनर्थापात होऊन हिंदुस्थानामध्यें मोठा प्रळय झाला. लखोबा दादा ह्मणून शेणवी ब्राह्मण ज्याचें नांव पूर्वी लिहिण्यांत आलें आहे, तो बाळोबा

तात्यांच्या खालचे पदवीचा असून ज्यास बाळोबा तात्यांनी अबरूस चढविलें होतें, त्याचा व बाळोबा तात्यांचा अत्यंत स्नेह होता ह्मणून सरकाराशीं वांकडा होऊन त्याने बंड केलें. या वहिमावरून त्यास कामावरून काढिलें; आणि त्या बंडखोर लोकांचे अबरूस त्याची अबरू मेळविली. असें केल्यावरून त्याने लवकरच पुष्कळ फौज जमा केली, आणि सरकारी फौज त्याजवर पाठविली; त्या फौजेस त्याने कित्येक वेळां जिकून उज्जनीपासून शिरोज पर्यंत देश घेतला.

पेशव्यांस अशीं महान संकटें प्राप्त झालीं, त्यांत येशवंतराव होळकर हा त्याचा भाऊ पुण्यांत मेल्यानंतर तो नागपुराकडे पळून गेला; तेथें त्यास शिंद्यांनी कैद करविलें. तो कैदेंतून सुटून माळव्याकडे पळून गेला; आणि तेथें फौजा जमाकरून तोहि देश लुटूं लागला. शिंद्यांचे पलटणींवर प्रथमतः मिस्तर डिबाईन हे होते. ते आजारी झाल्यामुळें सन् १७९६ त विलायतेस गेल्यानंतर मिस्तर पेऱ्याम त्यांचे कामांवर आले; परंतु आग्रा देश लखोबा दादाचे कूटांतील मंडळीचे ताब्यांत होता; त्यास वेढा घालण्यांत मिस्तर पिरन हे फार गुंतले होते, व हा वेढा घालण्यास आबाजी इंगळे यांनी साहाय्य दिल्हें, तरी जास्ती फौज आल्या खेरीज माळव्यांतील दंग्याचें शांतवन होणार नाहीं असें त्यास वाटलें; व दक्षिणेंतून जास्ती फौज पाठविण्यास शिंद्यांस वारंवार मोठ्या उत्कंठेने अर्ज केला; असें झाल्यावरून शिंद्यांनी पुनः बायांशीं बोलणें घातलें; परंतु बाया सर्व राज्य मागूं लागल्या व आमच्या हुकूमाने शिंद्यांनी राज्य करावें असें बोलिल्या, तरी प्रथमतः बाळोबा तात्यास कैदेंतून सोडावें असें बोलणें घातलें.

शिंद्यांचे नवे कारभारी आबा चिटणीस व रायाजी पाटील यांनी विचार करून निष्काम बुद्धीने आपल्या धन्यास बाळोबा तात्यास मुख्य प्रधान करण्याविषयीं मसलत दिल्ही, त्या गोष्टीस शिंदे कबूल झाले. यावरून त्या उभयतांचा मोठा लौकिक झाला. बाळोबा तात्यास मुख्य प्रधानाचें काम मिळतांच बंडांतील मुख्य पुढारी यांस बंडांतून काढिलें. बाळोबा तात्याचे मसलतीने अकरा लक्ष रुपये यांची जाहागीर आशीरचा किल्ला व बऱ्हाणपूर शहर इतक्या नेमणुकेस बाया कबूल झाल्या. बाळोबा तात्यांस पुनः दिवाणगिरी प्राप्त झाल्यावरून लखोबा दादा यांनी आबाजी इंगळे यांचे भाऊ ज्यांनी त्यांस माळव्यांत लढाई झाली तेव्हां अडथळा केला होता व ज्यांनी तह करितों असें कबूल केलें होतें त्यांची भेट घेतली. आणि जे बायांचे व शिंद्यांचे लडथडे होते, ते सर्व ठरण्यांत आले होते. शिंद्यांचे बायकांस त्यांची चीजबस्त कापड जवाहीर, व खासगीची सर्व दौलत शिंद्यांचे छावणींतून परत मिळाली, आणि जेजोरी शेंजारीं राजवाडें एथें पुण्यास जाण्याकरितां येऊन पोहंचल्यावर त्यांचे मंडळीपैकीं एकावर घाला घालून त्यास ठार मारिलें; तेव्हां त्या तत्क्षणी पंढरपुरास परत गेल्या, आणि त्यांनी पुनः लुटीचा क्रम चालविला.

मराठ्यांच्या सर्व दक्षिण प्रांतांत, चहूंकडे बेकैद व दंगा झाला. कोल्हापुरचा राजा पेशव्यांशीं अद्यापि लढाई करीत होता, व सातारचा राजा जिंकला गेल्यानंतर चतुरशिंगाने जी फौज कुमकेकरितां आणिली होती, तीस जास्ती धैर्य येऊन तिने पुनः यत्न चालविला. कांहीं रास्त्यांची व कांहीं प्रतिनिधीची फौज मिळून चतुरशिंगाची कोल्हापूर प्रांतांत पाठलाग करीत गेली हो-

ती, या सर्व सैन्याचा वारणा नदीशेजारीं तळ पडला होता. सातां-
ऱ्यामध्यें फौजेची दाणादाण करून दिल्ही होती, त्या फौजेपैकीं
पांचशें स्वार पुनः एकत्र होऊन त्यांनी आह्मी अमुक स्थितींत
आहों असें चतुरशिंगास कळविलें; आणि चतुरशिंगाचे
हुकुमाने कांहीं दिवसपर्यंत डोंगरांत चतुरशिंग कोल्हापुराहून
कुमकेस फौज आणी तोंपर्यंत छपून राहिले; आणि ज्या फौजेने
त्यांची पाठलाग केली होती तिजवर घाला घालून बहुतकरून
सर्वांस कापून काढिलें. परशुराम भाऊचे फौजेपैकीं कांहीं
फौज त्याने थोडे दिवसांनंतर एकाएकीं घाला घालून जिंकिली;
आणि परशुराम भाऊ साताऱ्याहून गेल्यावर, रास्त्यांची
दोन तीन हजार फौज कांहीं तोफांसहीत साताऱ्याचे किल्या शेजा-
रीं उतरली आहे असें चतुरशिंगास कळतांच, पूर्वीं रास्त्यां-
कडून तो जिंकला जाऊन त्याची अपकीर्तीं झाली होती. त्यागो-
ष्टीचा सूड घेण्याचा निश्चय करून त्याने त्याप्रमाणें पांच साहाशें
पायदळ बरोबर घेऊन, दरे व डोंगर यांतून फार त्वरेने पाली
समोर आला; आणि रात्रपडे तोंपर्यंत तेथें लपून राहिला. नंतर
खंडोबाचे देवालयांत जाऊन, नेहेमीप्रमाणें देवाची पूजा केली.
सर्व फौजेने जय द्यावा ह्मणून खंडोबाची प्रार्थना करून आपलीं
वस्त्रें हळदिने पिवळीं केलीं; व सर्व हाता तोंडास भंडार लावून
मोठ्या धैर्याने मरूं किंवा जय मिळवूं अशा दृढ निश्चयाने शत्रूवर
घाला घालावयास निघाले; तों रास्त्यांचे फौजेची तयारी होती;
परंतु, यांस त्यांजवर गोळा टाकावयास मात्र अवकाश होता. ते-
व्हां चतुरशिंगाची फौज हातांत तरवारी घेऊन रास्त्यांचे फौ-
जेवर चढून गेली, आणि तिने त्यांच्या तोफा घेऊन त्यांचा नाश
करून थोड्या वेळांत त्यांची दाणादाण करून दिल्ही. चतुर-

शिंगाची फौज वारणा नदीकडे अडथळा न होतां फार त्वरेने गेली. ही मोठी शाहाणपणाची व साहस कर्माची गोष्ट झाली. तेणेंकरून चतुरशिंगास मराठी फौजेचा मोठा विश्वास आला आणि त्याची फौज थोड्या माहिन्यांत फारच वाढली फौजेचे लहान-शे टोळीवर असतां; व जवळ पैसा नसतां त्याने रास्त्यांकडची आलेली सात हजार फौज ठेवून तिचें निरा आणि वारणा या नदींच्या मध्यें बारमाही चळणवळण ठेविलें. तो पुष्कळवेळां पराभव पावला, तरी एके समयीं पांचशें मनुष्य बरोबर असतां त्यास रास्त्यांचे पांच हजार फौजेने वेढा घातला, आणि त्याचे फौजे पैकीं निमे फौज मारिली. तथापि तो पांच हजार फौजेंतून निघून गेला. साहास कर्मा विषयीं व मोठ्या हिकमतीने सुटून जाण्याविषयीं व छपून राहाण्या विषयीं तो फारच धीट व चतुर असे. ह्मणून मराठेलोक त्यास फार चाहत असत; व कुळंबी लोकांचा त्याजवर फार विश्वास होता; तेणेंकरून तो जरी वारंवार गांवें लुटून जबरीने पैसा घेई तरी सर्व लोक त्यास चाहत असत.

चतुरशिंगाने बंड केलें, हें कोल्हापुरचे लढाई पैकींच असें पुण्यांतील लोकांस वाटलें; या बंडास पेशवे व नाना फडनवीस यादोघांनी उत्तेजन दिल्हें; सबब त्यांस लोक दोष ठेवीत असत.

सातान्याचें बंड झालें होतें तेव्हां व त्या नंतर चतुरशिंगाने रास्त्यांस वारणा नदीचे उत्तरेस अडवून ठेविलें होतें. कोल्हापुरचा राजा, परशुराम भाऊ पटवर्धन, आणि धोंडापंत गोखले यांशीं लढाई करीत होता. तासगांव ह्मणून परशुराम भाऊचें जाहागिरीचें मुख्य गांव तें लुटलें; व त्यांचा वाडा पु-

ष्कळ खर्च करून बांधिला होता तो जाळून टाकिला. करनाटक प्रांतांतून खंडणी घेतली, आणि धोंडोपंत गोखले एवढे धैर्यवान होते तरी त्यांस कित्येकवेळां जिंकिलें. या वेळेपर्यंत ह्मणजे आह्मी वर्णन केलें आहे तोंपर्यंत कोल्हापुरचे लढाईची अशी अवस्था होती.

आगष्ट महिन्यामध्यें बाळोबा तात्या कैदेंतून सुटले. त्यानंतर त्यांचें व नाना फडनविसांचें पुनः सख्य झालें; तेव्हां त्यांनी आपापले धन्यांचे हुकुमावरून यापुढें कोणत्या रीतीने इंग्लिश लोकांशीं व निजाम अल्लीशीं व्यवहार करावा याविषयीं विचार करून एकमेकांचे मताने असें ठरविलें, कीं कोणताहि एकादा बंदोबस्त करण्याचे पूर्वी दक्षिण प्रांतीं जें मोठें बंड उठले आहे, तें अगोदर मोडून टाकावें, ह्मणून टिपूशीं लढाई करण्याकरितां इंग्लिश लोकांबराबर जावयास नाना फडनविसांनी जें सैन्य नेमिलें होतें, तें या बंडाचा नाश करण्याकरितां पुष्कळ कुमकेसहित परशुराम भाऊचे हाताखालीं पाठवावें. पेशवे, शिंदे, व दुसरे सरदार जाहागीरदार यांनी तीस हजार स्वार व साहा हजार पायदळ मिळून जमवावे असें ठरलें, परंतु हें सैन्य दसऱ्यापर्यंत जमा होणार नाहीं; असें वाटल्यावरून परशुराम भाऊंस कोल्हापुरचे राजाच्या पाळतीवर राहून त्यास जितका अडथळा करवेल तितका करावा, असा हुकूम दिल्हा. परशुराम भाऊ मोठे शिपाई व शूर व उतार वयाचे झाले होते, तरी त्यांस कोल्हापुरचे राजाने फार दुःख व त्रास दिल्हामुळें त्यांनी फार चेतून सर्व पावसाळाभर त्याशीं लढाई करून मुलुखगिरी संभाळून घटप्रभेपासून मलप्रभेपर्यंत जितकीं ठाणीं होतीं तितकीं परत घेतलीं. सप्टेंबर महिन्या मध्यें ते गोकाकेहून को-

ल्हापुरास लढाई संपवावी या बुद्धीने गेले नव्हते, तरी पट्टणकुडी या गांवाशेजारीं त्यांस कोल्हापुरचा राजा आणि **चतुरशिंग** ह्या दोघांनी गाठलें, आणि **परशुराम भाऊंस** सर्वस्वीं जिंकिलें व मोठी जखम करून पाडाव केलें. **शरजेराव घाडगे** यांचा भाऊ **विश्वासराव** याने **परशुराम भाऊंस** मरतांमरतां उचलून घोड्यावर आडवें घातलें, आणि त्यास कोल्हापुरचे राजापूढें जमीनीवर टाकून दिल्हें. तेव्हां राजाने **परशुराम भाऊ** अशा अवस्थेंत असतां त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे करावयास सांगितले. **दाजीबा लिमये** हे त्या लढाईत होते, त्यांनी हा सर्व वृत्तांत लिहून दिल्हा आहे; व **बाजीराव साहेब एलफिनस्तन् साहेब** बाहादूर यांशीं सन् १८१२ त पंढरपूर एथें कांहीं एक गोष्टीविषयीं बोलत असतां तेहि बोलिले, कीं **परशुराम भाऊंचे** शरीराचे तुकडे तुकडे केले. ही गोष्ट चहूंकडे प्रसिद्ध आहे, परंतु कोल्हापूर व सातारा एथें कोल्हापुरचे राजाचे फार शत्रू होते, यास्तव ही गोष्ट लोकांस खरी वाटली नाहीं. **दाजीबा लिमये** ज्यांचे नांवाचा वर उल्लेख झाला आहे, हे **परशुराम भाऊंचे** मोठे विश्वासू कारभारी होते, त्यांनी पुणे दरबारचा कारभार **नानां** करीत असतां मोठालीं कामें केलीं होतीं; व राज्यामध्यें पुष्कळ हेरफेर होऊन ज्या ज्या बंडाविषयीं व ज्या ज्या गोष्टींविषयीं आह्मी वर्णन करीत आहों त्यासर्वांमध्येंहि ते होते, त्यांनी आपल्या कारकीर्दीची बखर जातीने लिहून ठेविली आहे ती फार चांगली आहे. कोल्हापुरचे राजास जिंकून त्यास शरण आणावें ह्मणून **परशुराम भाऊंचे** चिरंजीव **आपासाहेब** यांचे मदतीस **नाना फडनवीस** व **बाळोबा ता-**

त्या यांनी विंचूरकर मीतनिधी यांची फौज व शिंद्यांच्या साह्य पलटणी मेजर ब्रौनूरींग या कामगाराचे हाताखालीं पाठविल्या. ह्या मोठ्या सैन्याशीं लढाई करण्यास कोल्हापुरच्या राजास फार कठीण वाटलें ह्मणून तो पन्हाळ्याकडे बचावाकरितां पळून गेला. परंतु त्याची फौज अशा अवस्थेंत असतां तिजवर आपासाहेबानें घाला घालून त्या फौजेपैकी किन्येकांस किल्ल्यांत पळवून लाविलें; व राजाचें बहुतकरून सैन्य कोल्हापुरांत दडून राहिलें. नंतर पेशव्यांचे फौजेने कोल्हापुरास वेढा घातला, तो वेढा पुष्कळ दिवस राहिल्यानंतर त्या फौजेने कोल्हापूर अगदीं घेतलेसें केलें होतें; परंतु इतक्यांत पुण्यामध्यें कांहीं घडामोड झाली, यामुळें तूर्त कोल्हापूर नघ्यावें असें झालें, असें नहोतें तर कोल्हापूर खास हातीं आलेंच असतें; अथवा पुणे सरकारचे ताब्यांतील, असें तरी करून सोडिलें असतें. वर लिहिल्या घडामोडीस कारणें झालीं त्यांत विशेषेंकरून मोठें कारण हेंच झालें, कीं प्रथमतः नाना फडनवीस मृत्युपावले. नानाच्या शरीर प्रकृतीचें मान फार दिवसांपासून बिघडलें होतें, तरी मरत तोंपर्यंत त्यांनी नेहेमीचे बेताप्रमाणें, व नियमाने काम केलें. ते मार्चाचे तेराव्या तारिखेस मृत्यु पावले. कर्नल पारमर लिहितात, कीं पेशव्यांचे राज्यांतील शाहाणपणा व कैद व बंदोबस्त हीं सर्व नाना फडनविसांबरोबर गेलीं. नाना फडनवीस हे राजकीय कामांत मोठे धुरंधर होते, तरी जातीचा भित्रेपणा व लोभिपणा हे त्यांचे दुर्गुण असत. त्यांनी कांहीं वर्षें मोठ्या संकटांत घालविलीं, शेवटीं त्यांनी आपल्या देशाचा अभिमान धरून आपला देश न जावा ह्मणून यत्न केला, ह्याविषयीं इंग्लिश व मराठे लोक त्यांची फार स्तुति करितात. बाजीरावांचे हिताच्या ज्या

ज्या गोष्टी होण्या त्या केल्याने परिणामीं आपणास काय फळ होईल याचा विचार न करितां त्या गोष्टी करण्यास बाजीरावांस नाना अनुमत देत. परराज्यांतील फौज मदतीस न घेतां जर राज्याचा बंदोबस्त बरोबर होत असला, तर मार्क्विस वेलसली यांनी सांगितल्याप्रमाणें परदेशांतील फौज आपल्या राज्यांत नसावी ह्मणून नानांनी सांगीतलें. नानां इंग्लिश लोकांचा आदर सत्कार ठेवीत, व त्यांचे खऱ्या व्यवहाराची व त्यांचे राज्याची रीति व बंदोबस्त यांच्या चागुलपणाची फार स्तुति करीत. राज्यप्रकरणांत ह्मणाल तर नानांसारिखा इंग्लिश लोकांचा द्वेष कोणीच केला नसेल. नानांनी शाहाणपणाने विचार केला, कीं इंग्लिश लोकांनी असा प्रवेश केला तर त्यांस मोठें उच्चत्व व अधिकार प्राप्त होईल.

नानांची कारकीर्द बहुत करून सर्वांस माहीत आहेच, यास्तव त्यांनी आपल्या कारकीर्दीत ज्या ज्या गोष्टी केल्या त्या विषयीं व त्यांचा स्वभाव, व त्यांच्या युक्ती, व चतुराई यां विषयीं एथें वर्णन करण्याची गरज नाहीं. त्यांची चाल फार चांगली, असे, व ते नेहेमीं सत्यवादी, दयाळू, व धार्मिक, व उदार असत. त्यांनी आपल्या सर्व वेळा बरोबर बांधल्या असत, व ते इतकें पुष्कळ काम करीत, कीं लोकांस तें सांगितल्यास खरें वाटणार नाहीं. नाना फडनवीस राज्यकारभार करीत होते, तोंपर्यंत मुलकी कामाविषयीं माधवराव बल्लाळ यांनी जसा अमल केला होता, त्यारीतीने अमल चालविण्याकरितां यत्न करीत, परंतु कामाचा रगडा मोठा व वारंवार दंगे व फितूर होत; तेणेंकरून राज्यकारभांरात व अमलांत ढिलेपणा होई. कोणत्याहि राज्यांत कारभाऱ्यांकडन पुष्कळ अंदाधुंदी हयगय व बेकैद झाली नसेल,

अशी पुण्याचे राज्यांत होऊन **घाशीराम** ह्मणून पुण्यांतील पोलीस लोकांवरील कोतवाल होता, त्याने कोतवालीचे लाइनसे कामावर असून असंख्य मोठाले अपराध केले. हा हिंदुस्थानी ब्राह्मण होता, यास सरकारी अधिकार जो मिळाला होता, तेणेंकरून त्या दुष्टाने मोठाले खून केले. लोकांत कोणी मनुष्य नाहींसें झालें किंवा कोणाचा शोध लागेनासा झाला, ह्मणजे लोकांस **घाशीरामाचा** संशय येई; परंतु **नाना फडनवीस** लोकांचे गाऱ्हाण्यास कान देत नसत, कारण लोक ज्या गोष्टींविषयीं **घाशीरामावर** फिर्याद करीत, ती गोष्ट इतकी अघोर पातकी व असुरी असे, कीं ही गोष्ट खोटी असेल असें **नानांस** वाटे. सरते शेवटीं **घाशीराम** कित्येका माहान योग्य ब्राह्मणांस उपास घालून ठार मारीत आहे, असा संशय आल्यावरून **मानाजी फाकडे** कांहीं फौज घेऊन जाऊन तुरुंग फोडून आंत शिरले; आणि गरीब ब्राह्मणांस कैदेंतून मुक्त केलें, त्यावरून त्याने माहान अघोर दुष्टकर्में केलीं होतीं, तीं उदयास आलीं. शेवटीं त्यास पुण्यांतील राहाणारे लोकांनी धरून धोंड्यांनी ठार मारिलें.

**नानांचें** शरीर उंच व सडपातळ होतें व वर्ण काळसर होता, व त्यांचा चेहेरा मोठा संभावित गंभीर होता. ते दिसण्यांत मोठे रागीट दिसत, व त्यांची नजर फार चंचल तीक्ष्ण व भयंकर असे. **नानांच्या** जातीचें वर्णन पुढें लिहितो.

**नाना फडनविसांनी** जातीने नऊ बायका केल्या तरी त्यांस कांहीं मूलबाळ न होतां मृत्यु पावले. बायकांचीं नावें व त्या कोणत्या कुळांतील होत्या, याविषयीं अनुक्रमणिकेंत पाहावें.

**नाना फडनवीस** मृत्यु पावले त्यासमयीं त्यांची स्त्री सिद्धटेक ह्मणून पुण्यापासून पंधरा कोशांवर गांव आहे, तेथें होती.

बाजीरावांनी नानांची बायको व नानांचें सर्व द्रव्य आपल्यास प्राप्त व्हावें असें मनांत आणून लागलीच नानांचे बायकोस पुण्यास आणण्याकारितां कांहीं फौज पाठविली. तेव्हां नानांचे पदरीं दोन हजार आरब लोक चाकरीस होते, त्यांनी पेशव्यांचे फौजेशीं लढाई केली, त्यांत पेशव्यांची कांहीं फौज मेली. नंतर त्यांनी कांहीं बंदोबस्त करून आरब लोकांस गुजरार्थेत खांबे देशाकडे लावून दिल्हें. येशवंतराव होळकरांनी पुण्यांत येऊन पेशव्यांस पळवून लाविलें; तोंपर्यंत मयत नाना फडनविसांची स्त्री बाजीरावाचे ताब्यांत होती.

होळकराने नानांचे बायकोस मोठ्या आदर सत्काराने, तो पुण्यांत होता तोंपर्यंत, वर्तविलें; परंतु अमृतराव पुण्यांत आल्यावर नानांचा व अमृतरावाचा पूर्वी द्वेष होता, त्यावरून तिला वाटलें , कीं हा आपल्यास कांहीं तरी दगा करील; ह्मणून ती लोहगडाकडे आपल्या संरक्षणार्थ पळाली; व त्या किल्ल्याचा किल्लेदार धोंडो बल्लाळ ह्मणून नानांचे पदरचा होता. त्याने नानांचे बायकोचा सन १८०४ पर्यंत बचाव केला. नंतर याच शकांत जनरल वेल्स्ली, ह्मणून दक्षिणेंतील पेशव्यांचा सर्व राज्यकारभार पाहाण्या करितां कुलअखत्यारी देऊन नेमिले गेल्यानंतर, त्यांनी धोंडो बल्लाळाशीं तह केला. त्या तहनाम्यांत असें ठरलें, कीं लोहगडचा किल्ला खालीं करून कैलासवाशी नाना फडनवीस यांची बायको इने पेशव्यांचे राज्यांत खुषीस येईल तेथें इंग्लिश सरकारचे जामीनकीने राहावें; व तीस वार्षिक खर्चास बारा हाजार रुपये नेमणूक मिळेल. धोंडो बल्लाळ यांचें मनांतून होतें, कीं नानांचे बायकोने साष्टी या ठाण्याचे समोर कुलाल एथें राहावें; परंतु तेथें ब्राह्मणाची व-

स्ती नव्हती ह्मणून तेथें ती राहिली नाहीं. नंतर पनवेल एथें राहावें असें ठरलें; ती पनवेल एथें सुमारें सोळा वर्षें राहिली आणि तेथून मेणवलीस जाण्याची परवानगी आल्यावरून, तेव्हांपासून मेणवली एथेंच राहिली आहे.

सन् १८२७ त दत्तक घ्यावा असा इंग्लिश सरकारांतून हुकूम आला, हाच हुकूम **बाजीरावापासून** मिळावा ह्मणून तिने यत्न फार केला होता. प्रथमतः पेशव्यांनी दत्तक घेण्याविषयीं आपलें अनुमत आहेसें दाखविलें, परंतु पुढें कित्येक निमित्तें करून शेवटीं मत देण्याविषयीं फार लांबणीवर टाकिलें. **रामकृष्ण भानू** यांचा मुलगा **महादाजी** हा दत्तक घ्यावा असें बाईने ठरविलें होतें; त्याचें वय हल्ली ३० वर्षांचें आहे. त्याचें लग्न सन् १८३० मध्यें **केशवराव पटवर्धन** ह्मणून करदाचे जाहागीरदार यांची मुलगी **रमाबाई** हिशीं झालें; नंतर त्यांनी जांवयास पंचवीस हजार रुपये रोख व एक हजार रुपये वसूलाचा गांव असें आंदण दिल्हें. या बाईसहि अद्यापि मूल नाहीं.

मेणवलीचा वसूल सालिना दोन हजार रुपये येतो. मयत **नाना फडनविसांची** बायको **जिऊबाई** हिच्या मनांत फार आहे, कीं तिची नेमणूक तिचे दत्तक पुत्रास मिळावी. याविषयीं तिने सरकारांत अर्ज्या केल्या आहेत. तिला सनद मिळाली आहे तींत ती मेल्यावर तिचे वारिसास पेनशन मिळावें असें कांहीं लिहिलें नाहीं.

**नानां** जिवंत होते तेव्हां खालीं लिहिलेल्या जाहागिरी त्यांजकडे चालत होत्या, तरी त्यांचे कुटुंबांतील मनुष्यें फार डामडौल न दाखवितां गरीबी दाखवीत.

| जाहागिरी देणारांचीं नावें. | जाहागिरीचा दर साल वसूल. |
|---|---|
| पेशवे. | ६००० |
| आंग्रे. | २००० |
| गाइकवाड. | १०००० |
| नागपूरकर. | १०००० |
| हैदरअल्ली. | ८००० |
| हपशी. | २००० |
| होळकर. | १०००० |
| शिंदे. | ६५००० |
| सचीव. | २००० |
| परशुरामभाऊ पटवर्धन. | ५००० |
| कोल्हापूरचे प्रतिनिधी. | १००० |
| सातारचे प्रतिनिधी. | १०००० |
| कारकुनीचे कामाबद्दल. | ४०००० |
| सातारचे मंत्री. | २००० |
| दुसरे जाहागीरदारांकडून. | ५०००० |
| | २२३००० |

यासर्व जाहागिरी **बाजीरावांनी** जप्तीस ठेविल्या असें त्यांचें कुटुंब सांगतें.

पुढें लिहिलेलीं पत्रें **ड्युक अफ़वेलिंगटन्** यांजकडून **नानांचे** बायकोचा बंदोबस्त करून देण्याविषयीं निरनिराळ्या कामदारांस गेलीं आहेत.

**सर आरथर वेल्ज़्ले** यांनी तारीख २६ जानेवारी सन

१८०४. **मेजर शाहा** यास पत्र लिहिलें त्यांतील तात्पर्य.

जर पेशवे योग्य रीतीने व शाहाणपणाने वर्तणूक करून मज-वर किंवा इंग्लिश सरकारावर विश्वास ठेवितील तर मी त्यांचे देशाचा बंदोबस्त थोडे दिवसांत करीन.

जर पेशवे **अमृतराव** यांच्या बायका व चाकर मनुष्यें इ-त्यादि कैदेंतून सोडतील तर पुरंदर कील्ला सोडण्याविषयीं व पुणे सरकारचे जे प्रांत त्यांकडे आहेत; ते पेशव्यांस देण्या विषयीं म-ला **अमृतरावां**कडून हुकूम आला आहे; व याखेरीज पेशव्यां-करितां मी बोरघाटाजळवचा लोहगडहि मिळवीन. इतकीं ठिका-णें हातांत आल्यावर पेशव्यांचें राज्यहि पूर्वीपेक्षा फार मोठें हो-ईल, व तेणेंकरून आपल्या आपण देशाचा बंदोबस्त होईल, प-रंतु पेशव्यांस जें सांगावें तें ते ऐकत नाहींत, व **अमृतराव** यां-चे चाकरहि कैदेंतून सोडून देण्याचें कबूलकरीत नाहींत. यास्तव कायदे व ठराव यांच्या विरुद्ध वागून त्यांशीं नेहेमी लढाई के-ल्या खेरीज माझ्याने त्यांस देश परत देववत नाहींत. पेशवे लो-होगडचे किल्लेदारांस व मयत **नाना फडनविसांचे** बायकोस त्यांच्या जिनगी सुद्धा मुंबई सरकारचे आश्रयाखालीं राहाण्या क-रितां जाऊं देत नाहींत.

**लेफटेनेंट फज्ल्** यांस **डयूक अफ़ वेलिंगटन** यां-ने तारीख ३० जानेवारी १८०४ चें पत्र पाठविलें, त्यांतील हांशील लोहोगडाविषयीं मी पेशव्यांचे कारभाऱ्यांस कळवितों; कीं तुम-चे पत्रांत लिहिलेली सर्व मंडळी व मयत **नाना फडनविसां-ची** बायको यांस पेशव्यांनी किल्ल्यांतून जाऊं दिल्ह्याखेरीज त्या किल्लेदारास पेशव्यांस किल्ला खालीं करून देण्याविषयीं आमच्या-ने सांगवत नाहीं; मला वाटतें, कीं यामागें **नाना फडनविसांचे**

बायकोस मुंबईत राहूं दिल्हें असतें तर तेणेंकरून तिला फार उपद्रव व भय प्राप्त झालें असतें, परंतु सांप्रत पेशवे इंग्लिश सरकाराशीं मिळून आहेत, यास्तव मयत नानांचे बायकोस पेशवे सरकार अथवा दुसरे कोणी दगा करितील किंवा करवितील याविषयीं भय बाळगणें नको.

गवर्नर जनरल यांस तारीख ७ मार्च सन् १८०४ चे पत्र गेलें त्यांतील हांशील, आह्मी पुण्यास आल्यानंतर थोडे दिवसांनी पेशव्यांचे कारभारी **सदाशीव माणकेश्वर** यांस मार्च महिन्याचे पहिल्या तारिखेस पेशव्यांचे राज्याविषयीं माझ्याशीं बोलणें करण्या करितां नेमिलें. बोलणें होत असतां **माणकेश्वर** मजकूर बोलिले, कीं पेशव्यांचे राज्यांत स्वस्थता होऊन, बंदोबस्त राहाण्यास लोहोगडचा किल्ला पाहिजे. मी बोलिलों, कीं दोन वर्षांपूर्वीं लोहोगडचा किल्लेदार थोड्या व योग्य ठरावावरून किल्ला खालीं करून देत होता, व त्याप्रमाणें आलिकडे हि थोड्या दिवसांचे पूर्वीं किल्लेदार किल्ला सोडून देण्यास राजी झाला होता. परंतु किल्लेदाराचे ह्मणण्याप्रमाणे कबूल केल्याने पेशव्यांस किल्लेदाराचें शासन करून त्यास लुटतां येईना यामुळें पेशव्यांनी तो ठराव नाकबूल केला; यास्तव किल्लेदार आतां किल्ला खालीं करून देणार नाहीं असें वाटतें. आणखी मी बोलिलों, कीं लढाई करून लोहोगड घेणें ही मुष्कल गोष्ट आहे, व पेशव्यांपाशींहि नेहेमींप्रमाणें फौज नाहीं यामुळें ते इंग्लिश सरकारावर जरी मदती करितां विश्वास ठेवितील, तरी इंग्लिश सरकारास त्या किल्ल्यास वेढा घालण्याचे पूर्वीं, किल्लेदारापासून किल्ला घेण्यास योग्य कारणें आहेत किंवा नाहींत, याचा विचार करणें प्राप्त आहे. आणि पूर्वीं लढाई झाली तींत त्या किल्लेदाराचा किल्ला फार उप-

योगीं पडला. व किल्लेदारानेहि फार चांगल्या रीतीनें वर्तणूक केली.

**माणकेश्वर** बोलिले, कीं पेशवे वांईवरून जात असतां लोहोगडच्या खालचे किल्ल्यावरून किल्लेदाराने त्यांजवर गोळी टाकिली, हें पेशव्यांनी सोसून घ्यावें कीं काय ? मी **माणकेश्वरास** उत्तर दिल्हें, कीं तुह्मी सोसून घेऊंनये, व ही गोष्ट फार अयोग्य व अपमानाची आहे; व कोणतेहि राजे अशी गोष्ट सहन करणार नाहींत. व याविषयीं इंग्लिश सरकार, पेशवे ह्मणतात त्याप्रमाणें खरें असल्यास त्यांचा पक्ष घेईल. तथापि लोहोगडचे किल्लेदाराशीं ठराव करावा हें ठीक आहे, असें सांगून मी **माणकेश्वरास** विचारिलें, कीं पेशवे लोहोगडचे किल्लेदारास त्याचे जिनगीसुद्धां व **नाना फडनविसांचे** बायकोसुद्धां मुंबईस जाऊन राहूंदेण्यास खुषी आहेत कीं नाहींत ? .

किल्लेदाराने आपल्या जिनगीसुद्धां मुंबईस जाऊन राहाण्याविषयीं पेशव्यांकडून कांहीं हरकत नाहीं. परंतु पेशव्याचे मनांत फार आहे, कीं **नाना फडनविसांचे** कुटुंबाने पुण्यांत राहावें व पेशवे इंग्लिश सराकरास जी योग्य वाटेल ती नेमणूक तिला करून देतील. व इंग्लिश सरकारांनीहि याजविषयींची जिमा घ्यावी. परंतु मयत **नानांचे** बायकोने पुण्यांत राहावें.

**लेफटेनेंट कर्नल अलमस्** यांस तारीख २७ मार्च सन १८०४ चें पत्र आलें त्यांतील तात्पर्य.

**क्यापटन बार्कले** यांनी काल तुह्मांस विदित होण्याकरितां, पेशव्यांचे मर्जीस्तव आह्मी लोहोगडचे किल्लेदाराशीं किल्ला इंग्लिश सरकारचे फौजेचे स्वाधीन करून देण्या विषयींचा ठराव केला, हें लिहिलें आहेच.

या ठरावांतील कलमें अशीं आहेत, कीं इंग्लिश सरकारची फौज किल्ला घेण्याकरितां येईल तिचे स्वाधीन एप्रिलचे दुसऱ्या तारिखेस लोहोगडकिल्ला करून द्यावा. किल्लेदार व पाहारेकरी यांस त्यांचे जातीची जिनगी खालीं नेऊं द्यावी, परंतु तोफा वगैरे लढाईचें सामान व दाणादुणा इत्यादि किल्लेदारास देऊं नये. या पुढें किल्लेदार यांचें इंग्लिश शरकाराकडून संरक्षण होईल, व त्यांनी आपली जिनगी व कुटुंबें नेऊन सालसितीचे बेटांत ठेवावीं, असा हुकूम दिल्हा आहे. व सालसितीस जात असतां वाटेने त्यांचा सांभाळ करण्यास इंग्लिश सरकारचे फौजेपैकीं पाहारा दिल्हा जाईल, व आजपासून किल्लेदार इंग्लिश सरकारचे आश्रयाखालीं येऊन, तो मित्रत्वाने व सरळ रीतीने दंगा न करितां जोंपर्यंत वर्तणूक करील तोंपर्यंत इंग्लिश सरकार त्याचें संरक्षण करितील.

लोहोगडचे किल्लेदाराखेरीज मयत नाना फडनविसांची बायको किल्ल्यांत आहे; व ती या ठरावांत आहे. ह्या बाईने पेशव्यांचे प्रांतांत, इंग्लिश सरकारचे आश्रयाखालीं राहावें असें ठरलें आहे परंतु आह्मांस वाटतें, ती पुण्यांत राहील हें अद्यापि खचीत नाहीं.

मी लोहोगड हातीं येण्याविषयींचे ठरावांतील सर्व कलमें आपणांस तपशीलवार लिहिलीं आहेत, कांकीं ही गोष्ट सिद्धीस नेण्यास जे मी हुकूम देणार ते आपणांस यथास्थित कळावे.

कारल्यास आपण येऊन पोहंचल्यानंतर आपण कृपाकरून एक पत्र किल्लेदारास लिहावें. किल्लेदाराचा कारकून येथें आहे, त्याचें पत्र किल्लेदारास पाठविलें आहे हें आपण आपले पत्राबरोबर किल्लेदाराकडे पाठवावें. तुह्मी किल्लेदारास सांगावें,

कीं किल्ला स्वाधीन करून घेणारे जे कामगार ते आह्मीच आहों, व एप्रिलची दुसरी तारीख जवळ आली यास्तव किल्ला आमचे स्वाधीन करून देण्याचे पूर्वी किल्ल्यांतील पाहारेकऱ्यांनी किल्ला स्वाधीन करण्या विषयींचे ठराव करण्याकरितां एक विश्वासु कारकून आह्मांकडे पाठवून द्यावा. जर त्यानीं तुमचे छावणींत उत्तर लवकर पाठविलें नाहीं, अथवा कारकून पाठविला नाहीं तर त्यांस पुनः लिहावें, कीं वेळ निघून चालिली. आणि एप्रिलची दुसरी तारीख गेल्यानंतर आमच्या हुकुमाची वाट न पाहतां तुह्मी जाऊन बलात्काराने किल्ला घ्यावा.

जर त्याने तुमचे छावणींत कारकून पाठविला तर तुह्मी ठरलेल्या दिवशीं किल्ला हातीं येण्यांकरितां ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या तुह्मी त्याजपासून ठरवून घ्याव्या, व तुह्मी त्या कारकुनास सांगावें, कीं किल्लेदाराचा कारकून आबाजीपंत मुंबईस आहे, त्याशीं ठराव झाल्याप्रमाणें एप्रिलचे दुसऱ्या तारिखेस जर किल्ला दिल्हा तर घ्यावा असा आह्मास हुकूम आहे. जर ठरलेल्या दिवशीं किल्ला खालीं करून दिल्हा नाहीं तर आह्मी किल्ल्यावर चढाव करून किल्ला घेऊं, अथवा हा केलेला ठराव जसा किल्लेदारास हितकारक झाला तसा हितकारक ठराव पुनः न करितां नवा जुलमाने गैर हितकारक ठराव करूं.

कारकून एप्रिलचे दुसऱ्ये तारिखेस किल्ला खालींकरून देण्यास कदाचित हरकत करील; व निमित्त करील, कीं धोंडो-बल्लाळ किल्लेदार याजवळ त्याचें सामान किल्ल्याखालीं नेण्याकरितां मनुष्यबळ कांहीं नाहीं, व मयत नाना फडनविसांचे बायकोस तंबू डेरे नाहींत व पुण्यांत राहाण्यास घरहि दिल्हें नाहीं. ह्या सर्व निमित्तांस तुह्मीं उत्तर द्या, कीं किल्लेदारास त्याचें सामा-

व नेण्याकरितां सोय सांपडे तोंपर्यंत किल्ल्यांत राहूं देण्यास व नानांचे बायकोची पुण्यास जाण्याची तयारी होई तोंपर्यंत तिलाहि राहूं देण्यास आह्मांकडून हरकत नाहीं. परंतु हत्यारबंद शिपायांखेरीज दुसऱ्यांनी किल्ला ठरलेल्या दिवशीं मोकळा करून द्यावा, व आमचे फौजेंतील शिपाई दरवाज्यांत व दुसऱ्ये गैर बचावाचे ठिकाणीं बसून किल्ला आमच्या स्वाधीन झाला पाहिजे.

कारकुनास हेंहि कळवावें, कीं धोंडोपंतास व नानांचे बायकोस कांहीं धक्का न लावतां योग्य रीतीने किल्ला स्वाधीन करून घेण्याविषयींचा बंदोबस्त करावा अशी माझी इछा आहे; परंतु पूर्वी जे जे मुख्य ठराव झाले आहेत, त्यांत गडबड अगदीं कामास पडणार नाहीं. व पूर्वी जो प्रतीज्ञापूर्वक ठराव झाला आहे त्यांत किंचित कमजास्ती चालणार नाहीं.

जर कारकून किल्ला खालीकरून देण्यांस, शिवबंदीस देण्यास पैसा नाहीं, अथवा शिपाई कांहीं दंगा करितात, अशीं निमित्तें करूं लागला तर तुह्मी तें अगदीं न ऐकतां त्यास सांगावें कीं धोंडोपंताचे फौजेची अशी अवस्था आहे तर याचा बंदोबस्त तुह्मी करावा व कांहीं गडबड झाल्यास त्याविषयींचा परिणाम कसा होईल याचा विचार पहावा.

किल्ला हस्तगत करून घेण्याविषयींचा बंदोबस्त तुमच्याने होतो असें झाल्यास शांततेने हातास येण्याकरितां; तुह्मी मेजर डालास यांस त्यांचे पलटणीसुद्धां एप्रिलचे दुसऱ्ये तारिखेस किल्ला घेण्याकरितां किल्ल्यांत पाठवावें; व त्यांस सुचवावें, कीं किल्ल्याकडे जात असतां झाडींत व शेजारील गांवांत कांहीं दंगा होईल त्याविषयीं सावध असावें.

किल्ला हातांत आल्यावर धोंडोपंत व नाना फडनविसांची

बायको व किल्ल्यांतील राहाणारे दुसरे लोक यांशीं मिळवून घे-ण्या करितां जितकें होईल तितकें करावें, असें मी फार उत्सुकतेने सांगितले आहे; असें मेजर डालास यांस सांगावें; कोणती एकादी गोष्ट फौजेचें व किल्ल्याचें संरक्षण करण्याखेरीज करूं न-का, व धोंडोपंत आणि नाना फडनाविसांची बायको यांस कैदी असें मनांत आणूं नका.

एप्रिलचे दुसऱ्या तारिखेस किल्ला तुमचे हातीं आल्यास तुह्मी मेजर डाल्स यांस हुकूम द्यावा, कीं किल्लेदारांनी त्याची चीजवस्त असेल ती घाठावरून सालसितीस नेण्याकरितां संरक्षणार्थ कांहीं शिपाई बरोबर मागीतल्यास द्यावे; व मयत नानांची बायको पुण्यास जावयास निघाल्यास तिजबरोबरहि पाहारा द्यावा. आबाजीपंत यांशीं ठराव झाला आहे त्याविरूद्ध कोणती गोष्ट करूं नये.

किल्लेदार किल्ला सोडतील त्याचे पूर्वी केळंजा नामें किल्ला घ्यावयाचा आहे त्या बद्दलचा किल्लेदारापासून हुकूम घ्यावा, हा किल्ला कृष्णातटीं वांईजवळ आहे.

गवरनर जनरल वेलसली यांस मुंबईहून सन् १८०४ एप्रिलचे ६ वे तारखेस पत्र गेलें त्यांतील अभिप्राय.

सातव्या मार्चीचें साहेब बाहादुरांस पत्र पाठविलें त्यांत केळंजाचे किल्लेदाराने पेशवे वांईस कृष्णेस जात असतां त्यांवर गोळी टाकून जी बेअदबी केली होती, तिजविषयीं पेशव्यांनी आह्मांस त्या किल्लेदाराचें शासन करण्याविषयीं लिहिलें होतें; हें विदीत करण्यांत आलेंच आहे. केळंजा किल्ला यांत फारशी फौज आहे असें नाहीं व हा किल्ला नाना फडनाविसांचे वंश-

जांकडे व दुसरे त्यांचे संबंधी यांजकडे आहे. मयत नाना फडनविसांचें कुटुंब लोहोगडावर आहे तेथें नाना फडनविसांनी पुष्कळ द्रव्य पुरून ठेविलें आहे, असें लोक ह्मणतात. व नाना फडनविसांचे मनुष्यांपैकीं मुख्य असे जे धोंडोबल्लाळ हेहि तेथें आहेत. लोहोगड हा किल्ला फार बळकट आहे, व पुणें आणि वांई यामध्यें आहे, व पुण्याहून मुंबईस जाण्यास जो रस्ता आहे तो बंद करावा, असें किल्लेदाराचे मनांत आल्यास तो बंद करूं शकेल.

धोंडोबल्लाळ लोहोगडचा किल्लेदार यांने कांहीं वर्षांपूर्वी मिस्तर डंकीन यांशीं बोलणें घातलें होतें, कीं माझे चीजबस्ती सुद्धां मुंबईस कंपनी सरकारचे आश्रयाखालीं मला राहाण्यास हुकूम व्हावा, परंतु ही गोष्ट पेशव्यांस विचारिली तेव्हां पेशवे यांनी या गोष्टीस रुकार दिल्हा नाहीं. त्यानंतर कित्येक वेळां पुनः तेंच तेंच बोलणें निरनिराळ्या रीतींने केलें; व दौलतराव शिंदे व विरारचा राजा यांशीं तह केला त्याचा शेवट झाल्यानंतर धोंडोपंताने मिस्तर डंकीन यांशीं बोलणें घातलें त्यांतील अभिप्राय ह्राच, कीं आजपर्यंत तहनामे केले ते मोडून किल्ल्यांत बारमाही राहूं द्यावें व नाना फडनविसांचे कुटुंबास दत्तविधान करूं द्यावें.

याप्रमाणें आह्मी पुण्यांत आलों तेव्हां व्यवस्था होती; व पेशव्यांनीहि मजपाशीं फार जिकीर केली, कीं केळंज्याचे किल्लेदाराने जो उपमर्द केला त्याविषयीं किल्लेदारास शासन करावें; परंतु मला वाटतें, कीं धोंडोपंत किल्लेदाराची मागल्या लढाईंत कांहीं वाईट वर्तणूक नव्हती. पुण्याहून मुंबईस जाण्याचा जो रस्ता आहे तो बंद करून पुष्कळ रीतींनी दंगा करून उपद्रव क-

रण्यास त्यास शक्ति होती; परंतु त्याने अगदीं तिऱ्हाइताप्रमाणें वर्तणूक केली, व कारणपरत्वेंकरून आह्मीं त्यास पत्रें लिहिलीं-त्यांत आह्मी त्यास वचनें दिल्हीं, कीं जोंपर्यंत तुह्मी पेशव्यांची चाकरी विश्वासुक पणाने कराल तोंपर्यंत तुह्मांस इंग्लिश सरकाराकडून कांहीं उपद्रव होणार नाहीं.

लोहगडचे किल्लेदाराने आतां आपलें बोलणें एकाएकीं फिरविलें यावरून माझे मनांत त्याविषयीं संशय आला आहे, व मी पुण्यास गेलों तेव्हां त्याचे पुढले बेताविषयींचा ठराव करून घेण्यास निश्चय केला. व मुंबईहून पुण्यास जावयास जो रस्ता आहे; तो बंद करणें झाल्यास अथवा त्या विषयीं दुसरी एकादी गोष्ट करणें झाल्यास आजपर्यंत **धोंडोपंताचे** हातांत होतें, परंतु त्याविषयीं आतां पक्का बंदोबस्त करण्याचा मी निश्चय केला आहे, व पेशव्यांचा जो केळंजाचे किल्लेदाराने उपमर्द केला आहे, त्याविषयीं इंग्लिश सरकारास कानाडोळा नकरितां किल्लेदारास शासन करावें लागतें यामुळें, मला अशी सवड सांपडली आहे, कीं लोहोगडाविषयींचा पक्का बंदोबस्त करून घेतां येईल.

मार्चाचे सातव्या तारिखेस आपणांस मी विनंतीपत्र लिहिलें होतें; त्या रपोटावरून आपणांस कळून आलें असेलच, कीं पेशव्यांचे कारभाऱ्यांचें व आमचें बोलणें झालें त्यांत, मी जो ठराव **धोंडोबल्लाळाशीं** करणार होतों त्या ठरावास पेशव्यांचा कारभारी कबूल झाला. तो ठराव हाच, कीं किल्लेदारास त्याचे चीजवस्तीसुद्धां मुंबईस जाऊं द्यावें. मयत **नाना फडनविसांचे** बायकोचे खुषीस जें ठिकाण येईल, त्याठिकाणीं पेशव्यांचे राज्यांत इंग्लिश सरकारचे आश्रयाखालीं तिने राहावें, व इंग्लिश सरकारचे निशोने बैठा पगार खावा.

याखेरीज असें ठरलें, कीं यापुढें जो क्लिदेदार पेशवे नेमितील तो इंग्लिश सरकारच्या विश्वासास उतरला असला तर तो नेमावा.

या ठरावाप्रमाणें मी **धोंडोबल्लाळ** यास कळविलें, कीं तुह्मी पेशव्यांचा उपमर्द केला ह्मणून ते तुह्मावर फिर्याद करितात. यास योग्यकारण आहे, कीं पेशवे सरकारचा केळंजा किल्ल्यापाशीं तुह्मी मोठा अपमान केला. व इंग्लिश सरकार अशा गोष्टींविषयीं कांहीं बंदोबस्त केल्याखेरीज सोडणार नाहीं; यास्तव तुह्मी या गोष्टीविषयीं व आपल्या पुढील वर्तणूकेविषयीं पेशव्यांची खात्री करावी; अथवा किल्ले खालींकरून द्यावे. तुह्मी **मिस्तरडंकिन** यांशीं कांहीं वर्षांपूर्वी ठरावकेले, ते सरकार कबूल करितील; व आपल्या सर्व जिनगीसुद्धां मुंबईस इंग्लिश सरकारचे आश्रयाखालीं येऊन राहावयास तुह्मांस हुकूम देतील. मी या ठरावाचे कागद पाठविले, त्याच समयीं ७८ वे पलटणींतील एक टोळी व काळे लोकांच्या दोन पलटणी व कांहीं तोफा, व जी टोळी आजपर्यंत पुण्यांत होती ती याप्रमाणें **कर्नल आडमस** याचे हाताखालीं देऊन लोहगडाकडे पाठविली.

हे ठराव झाल्यानंतर थोड्यादिवसांनी एके तहनाम्याविषयीं बोलणें सुरू झालें, त्यांत मराठे लोकांनी आडवे तिडवे पांचपेंच घेऊन गैरशिस्त बोलणीं घातलीं, त्या बोलण्याविषयीं सरते शेवटीं कांहीं ठराव न होतां तें लांबणीवर टाकावें असें ठरलें, पण हें बोलणें चालणें मार्चाचे सव्विसाव्या तारिखेस तहनामा झाला तेणेंकरून संपलें; त्याच्या इंग्रेजीमध्यें व मराठीमध्यें नकला आहेत.

या तहनाम्यांतील कलमांप्रमाणें या महिन्याचे दुसरे तारखेस लोहोगडचा किल्ला इंग्लिश सरकारचे फौजेचे स्वाधीन झाला. **धोंडोबल्लाळ** आपल्या चीजवस्तीमुद्धां इंग्लिश सरकारचे फौजेपैकीं एक टोळी वाटेने संरक्षण व्हावें ह्मणून घेऊन मुंबईस जाण्यास निघाले आहेत. कैलासवासी **नाना फडनवीस** यांचे कुटुंबाने सालसीतींतील ठाण्याचे समोर कुलाबा ह्मणून जागा आहे ती यापुढें राहावयाविषयीं पसंत केली आहे. व तीहि त्याजबरोबर जात आहे. **खंडेराव रास्ते** ह्मणून या वेळेस पेशव्यांचे पदरीं दोनपैसे बाळगून आहेत हे किल्लेदारांस पगार देण्याजोगे आहेत, यास्तव त्यांचे ताब्यांत किल्ला ठेवावा व वसई व दुसरे कोकणांतील प्रांत त्यांचे ताब्यांत आहेत ते मुंबई सरकारचे ताब्यांत असल्याप्रमाणेंच आहेत. व त्यांनी हा किल्ला बळकाविला तरी त्यांचा लगाम आपल्या हातांत राहावयास पुष्कळ कारणें आहेत, परंतु हा किल्ला त्यांचे ताब्यांत ठेविल्याने फायदे होतील. **खंडेराव रास्ते** पेशव्यांचे पक्षाचे आहेत यांत संशय नाहीं; तरी **बाजीरावांनी** इंग्लिश सरकाराशीं दोस्ती ठेविली असतां त्यांस पुष्कळ फायदे उत्पन्न होतील, हें त्यास पक्के ठाऊक आहे; यास्तव **कर्नल क्लोस** साहेबांस मी अर्ज केला आहे; कीं **खंडेराव रास्ते** यांस या किल्ल्याचे किल्लेदार करण्या विषयीं पेशव्यांस शिफारस करावी. असा बंदोबस्त केल्याने किती फायदा होईल हें साहेब बाहादुरांचे लक्ष्यांत येईलच. **लेफटीनेंट कर्नल आडमस** यांनी जो किल्ला फार बळकट आहे असें विदित केलें होतें, तो किल्ला आपल्या मित्राचे हातांत ठेविल्याने पुण्याहून मुंबईस जाण्याचा जो रस्ता आहे तो सुरक्षित राहील. मयत **नाना फडनविसांचें** कुटुंब व त्यां-

चे आश्रित यांस इंग्लिश सरकारांनी आपली जिमा देऊन आपल्या आश्रयाखालीं घेतलें येणेंकरून इंग्लिश सरकारचा मोठा लौकिक होईल. लोहोगडचे किल्लेदाराजवळ असंख्य द्रव्य आहेसें वाटतें; व असें पेशवे व पेशव्यांचे कारभारी खास ह्मणतात. परंतु यास कांहीं आधार व प्रमाण नाहीं. व माझे सर्व चीजवस्तेसुद्धां मला मुंबईस जाऊन तेथें राहूं द्यावें, ह्मणून धोंडोबल्लाळाने मिस्तर डंकिन यांशीं बोलणें घातलें होतें; त्याचें याखेरीज दुसरें कांहीं कारण नसेलसें वाटतें; व सांप्रत किल्ला सोडून देण्याचें कारण हेंच, कीं त्याची चीजबस्त व धनदौलत असेल ती बचवावी. व त्याची जिनगी धनदौलत जी काय असेल तेणेंकरून मुंबईचे बेटांत जास्ती पैसा खेळेल.

पुण्यांतील राज्यांच्या उलटापालटी होत होत्या तेव्हां साव सावकार व जे गृहस्थ चार पैसे बाळगून होते; ते संरक्षणार्थ लोहोगडामध्यें जाऊन राहिले व ते अद्यापि तेथेंच आहेत. मला ठाऊक आहे, कीं ते सर्व धोंडोपंताचे खटल्याबरोबर मुंबईस जातील आणि तेथें आपल्या जिनगीसहित राहातील, येणेंकरूनहि मुंबईत जास्ती पैसा खेळेल. लोहोगड पेशव्यांचे ताब्यांत गेल्याने या देशांत मुंबई ही एवढी जागा मात्र जे गृहस्थ दोन पैसे बाळगून आहेत त्यांचे द्रव्याचा बचाव होण्याजोगी, व जे पेशव्यांचे शत्रू आहेत, व ज्यांचा पेशवे सूड उगविणार आहेत त्यांचें संरक्षण होण्याजोगी आहे, व येणेंकरून इंग्लिश लोकांस फारच अबरू व लौकिक मिळेल, आणि तेणेंकरून त्यांचें हित व फायदा होईल; व हिंदूलोक आमची राजनीती व कानु कायदे व न्याय व शाहाणपणा यावरून आह्मांवर फार विश्वास ठेवितात; असें लोकांस दिसून येईल.

मुंबईस येणाऱ्या गृहस्थांपैकीं कित्येक लोक इंग्लिश सरकाराशीं आह्मी तहनामे केले त्यांत ठरल्याप्रमाणें, आमची प्रजा आहे त्यांस नेऊं नये असें कदाचित पेशवे ह्मणतील.

मुंबईस येऊन राहाण्याविषयीं पुष्कळ हिंदूलोकांशीं आमचें बोलणें चालणें झालें, त्यांत मी त्यांस इंग्लिश सरकारचे पेशव्यांशीं कोणत्या रीतीने ठराव झाले हें समजून सांगितलें; परंतु मी हेंहि त्यांस सांगीतलें, कीं पेशव्यांशीं इंग्लिश सरकाराने ठराव केले ते, ज्या गृहस्थांचा पेशवे सूड उगविणार आहेत त्यांचा उगवूं द्यावा, किंवा ज्यांनी राज्यामध्यें तंटेबखेडे चालिले असतां पेशव्यांचे शत्रू होऊन इंग्लिश सरकारचा आश्रय जोडिला आहे तो त्यांचा आश्रय नाहिंसा करावा या उद्देशाने केले नाहींत. सर्वांच्या गोष्टी तपासून न्याय होईल, व जो पेशव्यांचा शत्रू नसतां मुंबईस येऊन इंग्लिश सरकारचा आश्रय जोडील त्यास पेशव्यांचे स्वाधीन कोणी करणार नाहीं असेंहि सांगितलें.

या बेताने मी **कर्नल क्लोस** यांस विनंती केली आहे, कीं ज्या मनुष्यास पेशवे मागतील त्याने गुन्हा काय केला आहे, व पेशव्यांनीं त्यास काय ह्मणून मागून घ्यावें याविषयींचा तपास केल्या खेरीज त्यास मुंबई सरकारांतून पेशव्यांचे स्वाधीन करून देऊं नये.

## चौकाहून **कर्नल क्लोस** यांस तारीख १८ मे सन् १८०४ चे पत्र लिहिलें होतें त्यांतील अभिप्राय.

आज प्रातःकाळीं मी चौक एथें येऊन पोहंचलों व उद्यां येथून कूच करून पुढें जाईन. पनवेलपेथें येऊन जाहजांतून

उतरतों इतक्यांत बयाजी नाईक याचे मनुष्याने आपलें तारीख ७ मिनहूचें पत्र मला आणून दिल्हावरून मी मयत नानांचे स्त्रीची भेट घेतली. माझें व तिचें पुष्कळ बोलणें चालणें झालें, ते समयीं धोंडोबल्लाळ यांचे कोणी जवळ नव्हतें. बाईजवळ एक मुसलमानी दुभाषी बायको होती, तीस जो मजकूर बोलावयाचा होता तो मुसलमानींतून तिला सांगून, मी जीं उत्तरें दिल्हीं तीं त्याच भाषेंत समजून घेई. या वरून मला वाटतें, कीं ती जो मजकूर बोलिली तो खरा व खात्री होण्याजोगा असावा, व तिच्या बोलण्यांतील भाव मिळोन इतकाच, कीं तिचा पुण्यांत जावयाचा मनोदय नाहीं असें मला वाटतें; आणि तिचे मनांतूनच नाहीं त्यापक्षीं तिजवर जुलूम करितां येत नाहीं. मी तीस बोलिलों, कीं मी पनवेलींतून जात आहें त्यापक्षीं आपण या उपरांत कोठें राहाणार याविषयीं आपला बेत व मनोदय असेल तो समजून घ्यावा ह्मणून मी आपणांस भेटावयास आलों; आपल्या मनांतून पुण्यास जावयाचें आहे असें माझे ऐकण्यांत आलें होतें, असें मी बोलून त्यांस सांगितलें, कीं आपल्या मनांतून पुण्यास खास जावयाचें असल्यास, मी आपणांस बरोबर घेऊन जाऊन तेथें आपला पक्का व योग्यरीतीने बचाव होऊन बंदोबस्त होईल अशी गोष्ट करीन. मी असें बोलल्या वरून त्यांनीं उत्तर दिल्हें, कीं पेशव्यांचे मनांतून मी पुण्यांत जावें असें आहे खरें, परंतु माझे कारकुनांचे जीव बचावून त्यांचे शरीरास कांहीं धक्का न लागतां त्यांच्या चीजवस्तीचें संरक्षण होईल अशी खातरी झाल्याखेरीज माझ्याने पुण्यास जाववत नाहीं. तेव्हां मी बोलिलों, कीं कारकून ह्मणजे नानांचे पक्षाची सर्व मंडळी यांचा याप्रमाणें बंदोबस्त करून द्यावा, असें आपलें बोलणें असल्यास माझ्याने त्याविषयीं

कांहीं सांगवत नाहीं. परंतु आपले घरगुती कारकून लोक अ- सल्यास मी त्यांचीं नांवें यादिवर टिपून घेऊन पेशव्यांचे मनांत त्याविषयींचें काय आहे हें विचारून घेईन, अशी गोष्ट आपल्या मर्जीस आल्यास लागलेंच मजबरोबर चलावें आणि आपल्या मनांत आपल्या कारकून लोकांविषयीं बंदोबस्त करून घेणें आहे; तसा पेशव्यांनी न केल्यास आपण परत येऊन आपल्या खुषीस येईल तेथें राहावें; अथवा आपल्या कारकुनास पाठवून देऊन खुषीस येईल त्याप्रमाणे करावें.

याविषयीं कांहींवेळ बोलणें झालें त्यांत मजबरोबर येण्या विषयीं त्यांचा मनोदय दिसण्यांत आला नाहीं; त्यांनी आपल्या कारकुनांचीं नावें सांगितलीं तीं पुढें लिहिलीं आहेत. नानांचे- वेळेस जनार्दनपंत ह्मणून जामदारखान्यावर होते; ते व आ- पाजीपंत ह्मणून नानांचे कुटुंबाचे खासगीचे कारकून व बा- ळकृष्णपंत भाऊ ह्मणोन तीस वर्षांपर्वी लोहोगडचे किल्लेदार होते व तूर्त त्यांचे घरगुती कारकून आहेत ते; नागोपंत ह्मणू- न नानांचे घरगुती कोठीवर होते ते; व गंगाधरपंत बाईचे भाऊ इतक्या मंडळीची याद करून दिल्ह्यानंतर माझें पेनशन मला पुरतें नाहीं; व मला सालिनां पंचवीस हजार रुपये देऊं असें पेशव्यांनी सांगून पाठविलें आहे, असें ती बोलिली. मी त्यांस सांगितलें, कीं पेशव्यांकडून बारा हजार रुपये पेनशन जें करून देवविलें त्या विषयीं कंपनी सरकार जामीन झालें आहे, तेंच पेनशन करून देण्यास मला फार यत्न पडले परंतु पेशव्यांनी आपणच होऊन तुह्मांस पंचवीस हजार रुपये नेमणूक करून द्या- वी असें मला सांगितलें तर मी तुह्मास तितकी नेमणूक करून दे- ववीन. परंतु पेशव्यांनी मला पंचवीस हजारांची नेमणूक करून

देऊं ह्मणून वचन दिल्हें आहे असें आपल्या सांगण्या वरूनच इतकी नेमणूक देईन असें माझ्याने वचन देववत नाहीं, नंतर मी त्यांस बोलून दाखविलें, कीं आतां आपणांस वैधव्यकाळीं बारा हजार रुपये नेमणूक पुष्कळ झाली असें आपण समजावें.

याविषयीं व तहनाम्यांत लिहिल्या गोष्टींविषयीं ह्मणजे त्यांची जिनगी इत्यादिविषयीं पुष्कळ बोलणें चालणें झालें. सरते शेवटीं मी सर्व बोलण्याचें तात्पर्य समजून घेऊन बाईस सांगितलें, कीं आपण ज्या कारकुनांचीं नावें लिहून दिल्हीं आहेत; त्यांचा बंदोबस्त आपल्या मनांत आहे त्याप्रमाणें माझे हातून झाल्यास मी पेशव्यांकडून करून घेईन, व असा बंदोबस्त केल्यावर जर आपण पुण्यास येण्याकरितां निघाल, तर आपणांबरोबर जाण्याकरितां मी एक पाहारा तयार करीन. ती बोलिली, कीं लोहोगडचा किल्लेदार याचा पुत्र व केळंजाचा किल्लेदार यास मजबरोबर येऊन मजजवळ राहाण्यास परवानगी असावी, तेव्हां मी उत्तर दिल्हें, कीं त्यांनीं पाहिजे तिकडे जावें, व जोंपर्यंत ते इंग्लिश सरकारास कांहीं उपद्रव न करितां चांगल्या रीतीने वर्तणूक करितील तोंपर्यंत ते इंग्लिश सरकारचे आश्रयाखालीं आहेत असें समजावें. नंतर ती बोलिली, कीं आमचे घरगुती चाकरांचा व त्यांचे चाकरांचा इंग्लिश सरकारांनी बचाव करावा, तेव्हां मी उत्तर दिल्हें, कीं ठीक आहे.

पुनः ती आपल्या नेमणुकेविषयीं बोलणें बोलून मला दत्तक घ्यावयास हुकूम झाल्याखेरीज माझा बचाव होणार नाहीं, व माझे भाऊ **परशुराम पंत** हे शिवगड किल्यावर कैदेंत आहेत त्यांस कैदेंतून सोडावें; असें बोलिली. तेव्हां मी उत्तर दिल्हें या गोष्टींत मी दखलगिरी करणार नाहीं, परंतु तुमचे भावाचे

मोकळीकेविषयीं तुह्मी पेशव्यांस विनंती करावी. या सर्व मजकुरावरून त्यांचे मनांतून पुण्यास येण्याचें दिसत नाहीं, अशी माझी पक्की खात्री झाली; परंतु पांच कारकुनांविषयीं बचाव करण्यांचा पेशव्यांकडून ठराव करून घ्यावा; व पुण्यांत राहिल्यास नेमणूक जास्ती वाढवूं असें वचन द्यावें; ह्मणजे कदाचित ती पुण्यास येईल. ती गोरी व फार सुंदर आहे; व एकादा तह करणें झाल्यास ती योग्य आहे.

हें बोलणें झाल्यानंतर मी धोंडोबल्लाळास अंमळ ताव दिल्हा आणि बाईचे कारभारांत तुह्मी तोंड घालून त्यांचे कोणत्याही कामास अडथळा केल्यास तुह्मांवर इंग्लिश सरकारची फार गैरमर्जी होईल, असें मी बोलिलों हें बाईस एकूं गेलें असेल.

आज मी बाईस पत्र लिहीलें आहे, कीं मी पेशव्यांस आपल्या कामाविषयीं लिहून घातलें आहे; त्याचें उत्तर येई तो पर्यंत आपण पनवेल सोडूं नये. आपला बचाव पनवेली एथें चांगला आहे असें समजून लोकांनी भय घातलें असतांहि भिऊं नये असें लिहिलें; याचें कारण हेंच, कीं बयाजी नाईक यांचे चिरंजीव, मी बाईपासून निघाल्यावर मध्यान रात्रीपर्यंत मज बरोबर होते; त्यांनी मला सांगितलें, कीं बाईस भिववीण्या करितां लोक प्रयत्न करितात.

## कर्नल् क्लोस यांस वडगांवाहून तारीख २१ मे सन् १८०४ चें पत्र गेलें त्यांतील अभिप्राय.

मी आपणांस हें पत्र लिहिण्याचे पूर्वी जें पत्र लिहिलें होतें त्यावेळेपासून मला प्रयत नाना फडनविसांचे बायकोकडून एक पत्र आलें, त्यांत तीं लिहितात, कीं मेणवली एथें आमचा वाडा

आहे तें गांव आह्मांस असावें असें लिहितात, ही गोष्ट खरी आहे असें मला वाटतें; तीं पुण्यांतील आपला वाडा, पागा व बाग मिळावी ह्मणूनहि लिहितात; त्यांस कित्येक गृहस्थांकडून सनदा आहेत त्या जमीनी व गांवें चालवावीं असें लिहितात. मी त्यांस गांवांची जमीनीची, व कोण कोणाकडून त्यांस सनदा मिळाल्या आहेत, त्यांचे नावाची याद करून पाठवावी असें लिहिलें आहे, ती याद मी आपणांकडे पाठवून देईन व पुण्यांतील वाड्याविषयीं, व मेणवलीविषयीं पेशव्यांशीं बोलिलें असतां बरें होईल.

**कर्नल क्लोस** यांस पनवेलीहून तारीख २२ मे सन् १८०४ चे पत्र गेलें त्यांतील सारांश.

मयत **नाना फडनविसांचे** बायकोशीं ठराव व्हावयाचा आहे तो इतकाचकीं, तिचे कारकुनाचा बंदोबस्त होऊन त्यांचा पुण्यांतील वाडा बाग व मेणवलींतील वाडा त्यांस मिळावा. **धोंडोपंतास** त्यांजवळ राहाण्याविषयीं व दुसऱ्या मुख्य गोष्टींविषयीं, व त्यांचे शरीराचे व जिनगीचे बचावाविषयीं जीं मोठालीं कलमें तीं तहनाम्यांत ठरलेलीं आहेतच; व पेशव्यांचे मनांतून त्यांची नेमणूक वाढविणें असल्यास त्यांचे ते पाहून घेतील.

**धोंडोपंताचे** व बाईचे मागणीविषयीं आपणास कांहीं बोलण्याचें कारण नाहीं, परंतु बाईनी पुण्यास येऊन राहावें असें पेशव्यांचे मनांत येऊन कदाचित् त्यांनी कांहीं याविषयीं खर्च केल्यास त्याविषयीं मात्र पाहातां येईल.

## नाना फडनवीस यांचे बखरेचा शेष संग्रह.

### नाना फडनवीस यांनी नऊ लग्में केलीं.

त्यांचे पहिल्या बायकोचें नाव यशोदाबाई, ही पुण्यांतील सदाशीव रघुनाथ गद्रे ह्मणून मोठे नामांकित सावकार होते त्यांची मुलगी होती. तिला एक पुत्र झाला तो बाल्यदशेंतच मृत्यु पावला.

दुसरी बायको लक्ष्मीबाई धारावडोहो ह्मणून शिवन दुर्ग किल्ल्यामध्यें सरकारी कामावर होते त्यांची कन्या तीस कांहीं मूल झालें नाहीं.

तिसरी स्त्री अन्नपूर्णाबाई गाडगीळ ह्मणून संपत्तिवान् गृहस्थ वांईचे राहाणार यांची मुलगी. तिला एक कन्या झाली होती तीहि बाल्यदशेंत मृत्यु पावली.

चौथी स्त्री राधाबाई, ही बिडार ह्मणून पुण्यांतील मोठे सावकार यांची मुलगी होती तिला कांहीं अपत्य झालें नाहीं.

पांचवी स्त्री आनंदीबाई, वैद्य ह्मणून पेशवे सरकारांत कारकुनीचे कामावर होते त्यांची मुलगी, तिला कांहीं अपत्य झालें नाहीं.

साहावी स्त्री यशोदाबाई पेंडसे ह्मणून पेशवे सरकारांत कामावर होते त्यांची मुलगी हीस एक कन्या झाली होती ती लाहानपणीं मृत्यु पावली.

सातवी स्त्री अन्नपूर्णाबाई, परांजपे ह्मणून विजयदुर्ग एथील कारकून यांची मुलगी होती, इजला कांहीं अपत्य झालें नाहीं.

आठवी स्त्री बगाबाई, सुतार ह्मणून रत्नागिरींतील कारकून यांची मुलगी होती; ही नाना मेल्यानंतर चौदा दिवसांनी चौदा वर्षांचे वयाची असतां मृत्यु पावली तिला मूल झालें नव्हतें.

नववी स्त्री जिऊबाई; गोपाळभट वैशंपायन ह्मणून मुरुड तालुक्यांत शिवनदुर्ग एथील राहाणारे यांची मुलगी; स्वरूपानें फार सुंदर तीस नाना मृत्यु पावले तेव्हां यौवन दशाप्राप्त झाली नव्हती ती बाई अद्यापि आपल्या गांवीं आहे.

श्री

नक्कल

चिरंजीव राजमान्य राजेश्री मोरोबा दादा यांसि बाळाजी जनार्दन आशीरवाद उपरी येथील कुशळ तागाईत वं १९ जमादिलोवल पावेतों मुकाम पाणिपत्त एथें सूखरूप असो विशेष बहूत दिवस जाहले, आपणाकडून पत्र येऊन, कांहीच वर्तमान कळत नाहीं तरी निरंतर पत्रीं संतोषवीत जावें इकडील मजकूर पूर्वी कुंजपुऱ्यास लढाई जहाली अबदुल समदखान वगैर मारले, त्यानवर आबदालीची गांठ पडली. कृष्णजोशी संगमेश्वरकर यांस गोळा लागून देव आज्ञा झाली, इतकें वर्तमान तपशीलवार लेहून पाठविलें होतें त्यावरून साकल्यकळलेंच असेल, त्या आलीकडील मजकूर तरी यांणीं तोफखान्याचा आरब पसरून खंदक खणून पाणिपत गांव आपल्या पाठीशीं घालून सड्या फौंजा तोफांचे मार्गे उभ्या याप्रमाणे बंदोबस्तानें राहिले आहेत बुणगें गांवाचे पुढें फौजेचे मार्गे ठेविलें आहे नित्य गोळागोळी होती सभोंवत्या त्याचा फौजा आहेत, त्यापाशींही चाळीस पन्नास तोफ चांगली आहे साठहजार पर्यंत फौज आहे. एके दिवशीं सरदाराकडील बाजूकडे त्याची फौज वाढून आली, त्याची याची लढाई चांगली झाली. शिद्याकडील लोकांनीं त्यांना गोटांत नेऊन घातलें. साहाशें पावेतों माणूस जखमी व ठार त्यांजकडील जाहाले. यांजकडील ही दोन अडीचशें पर्यंत ठार व जखमी झाले. अस्तमान झालें यास्तव लढाई राहिली, त्यानंतर पंधरा दिवशीं चंद्र २८ रविलाखरीं श्रीमंताकडील मोर्चावर चालुन चार पांच हजार आले वरकड फौज त्यांची पाठीमागेंच उभी होती त्यांची यांची लढाई होऊं लागली. लढाईस प्रारंभ होतांच अस्तमान झालें ते दिवशीं बळवं-

तंराव गणपत, यांस छातींत गोळी लागली, तसेच घोड्याखालीं पडले, तों त्यांजकडील माणसें, धांवली. त्यांतील एकानें तोंडावर तरवारीचा वारकेला. दुसऱ्यानें गळाकापुन ते शीर नेऊं लागले तों पांच सात राऊत धांऊन सोडविलें. गळा अर्धा कापलाहोता, तसेच आणून दहन केलें. समागमें स्त्री अग्नी प्रवेश केली त्या दिवशीं त्यांज कडील दीड हजार माणूस ठार. आपल्या आराच्या पुढें पडलें होतें. त्यांचे पुढें किती होतें हें कळलेंच नाहीं, औशीची तीन घटका रात्र पावेतों लढाई झाली, आपल्याकडील दीडशें पावेतों ठार, व पांचशे सातशें पावेतों जखमी झाले, ही लढाई फार चांगली झाली होती, परंतु बळवंतराव यांचा प्रकार असा झाला यामुळें, ते सर झाले, त्यावर गोविंद बल्लाळ यांस पूर्वी पासून पत्रें जात होती कीं अंतर वेदींत उतरून, अबदालीचा रस्ता बंदकरणें यावरून, ते दरमजल दिल्लीचा सुमारें आले, तेथील नारोशंकर यांचीही कांही फौज मदतीस घेतली व पुढें रस्त मारावी तों अबदालीनें दाहा हजार फौज निवडक पाठवून दगा केला, कोणी लढले व कोणी पळाले. गोविंद बल्लाल यांचें शीर कापून आणून श्रीमंता कडे पाठवून दिल्हें, मग दहन झालें, गोविंदपंता कडील वगैरे तीन चारशें फौज ठार झाली. गोविंदपंताचे चिरंजीव बाळाजी गोविंद हे समागमे होतें, ते पळून नारोशंकर यांजवळ दिल्लीस आले, कोणीकोणी पळालेले लोक येत याप्रमाणें झालें. मोठे दगेबाज याजकरितांच आरब पसरून खंदक खणून मोंगलाई रीतीने राहिले आहेत, दोन महिने यांची त्यांची लढाई होत्ये,. अद्यापि लढावें हाच निश्चय उभयतां पक्षीं झाला आहे, ईश्वर काय परिणाम लावील तो खरा, मनसबा भारी पडला आहे, पैसा नाहीं महागाई फार यामुळें लष्कर गलबलले आहे, याप्रमाणें वर्तमान आहे,

आपल्ये बुणग्यांत गोळे जातात, त्याची बहूत पत्रें मी पाठविलीं; परंतु आपणास एकही लिहावयास अनुकूल नपडलें बरें असो. बहूत काय लिहिणे लोभ कीजे हे आशिर्वाद, हें वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री बाबांस लिहून पाठवावें हे आशीर्वाद. पेटा फुलमरी एथील फडनविशी माहादाजी पंत कुंटे यांस दिल्ही आहे. त्यास त्यांचे वेतन उत्तम प्रकारें होय, अशी विनंती श्रीमंतांस करून करून घ्यावें. मी आपणास लिहावें असें नाहीं आसामी आपल्ये घरचा परंतु माहादाजीपंत यांची पत्रे येतात त्यावरून लिहिलें आहे हे आशिर्वाद.

श्री

नक्कल

यादि जिऊबाई मातुबाळाजी जनार्दन यांची स्त्री पुण्यास होती ती, दंग्यामुळे किल्ले लोहगड एथें जाऊन राहिली होती, ती तेथून निघून जाऊन कसबे पनवेल प्रांत कल्याणभिवंडी एथें राहिली आहेत, तीं पुण्यास येऊन आपल्ये घरीं राहाणार याविषयीचे बंदोबस्ता विष्यीं सुरसन आर्बामयातैन वअलफ कलमें

१ बाळाजीजनार्दन यांचें राहातें घर सरकारचे वाड्याचे दाक्षिणेस आहे तें, सरकारांत जप्तीस आहे, तें मोकळें करून जिऊबाई यांस राहाण्या कारितां यांचे हवाली केलें जाईल

१ बाळाजी जनार्दन यांचे निसबतीचे कारकून वगैरे आसामि

| | |
|---|---|
| १ जनार्दन | १ आबाजी |
| १ राघो | १ गंगाधर |
| १ आपाजी | १ राघो |
| ३ | ३ |

एकूण साहा आसामी यानीं आपल्ये घरीं घेऊन स्वस्थ राहावें फंद फितूर वगैरे करूंनये त्यांस सरकारांतून उपद्रव लागणार नाहीं।

जिऊबाई यांचा भाऊ परशूराम गोपाळवैशंपायन केदेंत आहेत त्यांस मोकळे केले जातील, त्यानी घरीं जाऊन स्वस्थ राह्यावें, फंद फितूर करूंनये,

जिऊबाई यांस सालिना बेगमी बदल रुपये बारा हजार द्याव-याचे त्या पैकीं बाळाजी जनार्दन यांज कडे इनाम गांव व जमि-नी व वतनें सरकारांतून व लोकां कडील चालत होतीं, त्यांतून जिऊबाई यांस द्यावयाचे ठरले ते नेमून देऊन त्यांची बेरीज बारा हजार रुपयांत वजा करुन बाकी ऐवज सरकारांतन दिल्हा जाईल बाळाजी जनार्दन यांची चीजवस्त जप्तीस गेली ती गेली. मस्तुत त्यांची स्त्री जिऊबाई यानीं चीजवस्त घेऊन पुण्यात, आपल्ये घरीं स्वस्थ राहावें. फंद फितूर वगैरे काहीमात्र वावगी वर्तणूक क-रूंनये.

एकुण पांच कलमें सदहूं प्रमाणें करार. छ २२ सफरवैशाख मास सन आर्बामयातैन.

श्री

नकल

असमत् पन्हा व शराफत दस्त गाद जिऊबाई साहेब सलामत्

छ अजी सबब कर्नेल क्लोस साहेब बहुजुसलाम अ-कें जनराल वेलसली साहेब बाहादुर यानी तुह्माविषयीं श्रीमंत सा-हेबांशीं बोलुन श्रीमंताचा कऊलनामा व आपलें पत्र अजम परशु-रामपंत यांचे समागमें पाठविलें आहे, तरी आपण खातर जमेने

पुण्यास येऊन आपल्ये हवेलींत राहावें. श्रीमंतसाहेबाचे पत्रावरून स्वातर जमेने व खुषवक्तीने परशुराम पंताचे बराबर पुण्यास यावें तुह्मास कोणे विषयीं तोशीस लागणार नाहीं जादाकाय लिहिणे हे कितावत.

सही इंग्रेजी

श्रीमन्मातोश्री जिऊबाई साहेब यांचे शेवेशि अजतर्फे जनरल वेल्सली बाहादुर सलाम

अंकीं एथील खैरखुषी जाणून असोंबी आपली षादमानी कळमी करीत असिलें पाहिजे. बरी आयाम साहेबानीं राजश्री परशुराम पंत वैशंपायन यांचे समागमें पत्र पाठविलें तें पुण्याचे मुकामी पोंचून मजकूर जाहीर झाला. आणि श्रीमंत पेशवे साहेबाचा करारनामा आपणा कडे पाठविला होता तरी याच अन्वये साहेबांशीं चांगलें समजलें नाहीं, त्या करार नाम्यांत तुह्मी व तुमचे कारकुनासहीत आपल्ये संतोषानुसार पुण्यांत येऊन राहावें यास काहीं इजा होणार नाहीं. ह्मणुन लिहिलें होतें, व तुमचे इनाम गांव, जमीनी वगैरेचे बातबेत सालिना बारा हजार रुपये प्रमाणे देणे मो झाले आहेत ते ऐवज वसुल घालुन बाकीचे तुह्मास देतील परंतु आपण पुण्यास येऊन राहाण्यास आपणाशी समर्पक नसल्यास आपल्यासंतोषानुसार कळविते हा व दुसरा कोणता तरी पेशवा साहेबाचे मुलुखांत हा सुरक्षीत राहा तैसें करणे आणि साहेबानी कोणत्येजागी राहिलें तरी आपण व आपणा कडील लोक कुंपनीचे आश्रतेंत आहेत आतां कर्नैल कुलोस साहेबांचे नावें एक चकती लिहून आह्मी आपणा कडे पाठविली असे, तरी त्यात लिहिले आहे कीं आपणाशी वेळेवेळेस चांगले पणे तुमचे दरमाहा पावतेसे करवणे व

आपल्ये मनोदयानु सार आपलें बरें होण्या विषयीं दृष्टी ठेवणे. ह्मणून असें लिहिलें कळावें जे काहीं तुमचें काम काज पडलें तर करण्यास्तव आह्मांशीं बहूत खुष आहे. वरचेवर आपली खैर खुषी लिहून पाठवित असावी रवाना चंद्र ३ माहे जुलई सन् १८०४ इसवी मुताबी चंद्र २४ रबिलोवल जादा काय लिहिणे मोहोबत असो दिजे हे कितावत्.

साहेब मुषफक जिऊबाई साहेब
फडनवीस सलमु मह्नुताला ५

अज सौब जनरल वेल्सली बाहादूर यादकैद मुकक येथील खैर यतखुषी जाणन आपली षादमानी कलमीं लिहीत आलीं पाहिजे दिगर तुह्मी खत १९ रबिलोवलचें पाठविलें पाहून लिहिली कैफियत मोफसल जाहीर झाली, तुह्मी आपल्ये कामा निमित्यें फार विस्तार लिहिला होता, या कामास आह्मी या आगोदरच एक खात अमारत व अयालगमरग बदल कर्नल क्लोस साहेब बाहादूर यांस लिहून रवाना केला आहे तरी साहेब मैसुफताव आलबंग काहीं ज्युबई नाहींक विशेष तुह्मी आपल्या कडून एक कारकून यांकडे पाठवून दिल्हा, त्यानी तुमचा कामास कुमक करून चालविगलयातक विआपल्या एक कामास कर्नैल साहेब बाहादूर मौसुम सलजाहारी कवीत जाणे त्याणी सांगीतल्याप्रमाणे वर्तणुकेंत आली, याकामाची बेदतरी असे जादाकाय लिहिणे तारीख १६ माहे जुलई सन्- १८०४ इसवी मुकाम श्रीरंग पट्टण.

श्रीमन्मातोश्री जिऊबाई साहेब यांचे शेवेशि अजतर्फ जनरल वेल्सली बाहादूर सलाम अंकी येथील खैर खुष जाणून साहेबीं आपली खैर खुशाली नामेंशीं कलमें करवऊन दीलताजा करीत अ-

सावा बदरी आयाम तुमचे विषयीं आह्मी अजम कर्नेल कुलीस सा हेबांशी लिहून पाठविलें आहे आतां थोड्ये रोजांत त्याचा जाबये-ईल जाब आल्या क्षणीच आपल्याशीं विदीत करीत असे व दुस-ऱ्यानीं काहीं रदबदली केल्यास आपण त्याची गोष्टी ऐकूं नये ह-रएक गोष्टीस आपल्ये मर्जीस समर्पक आल्या प्रमाणे करणे आप-णाशीं काहीं इजा न होईल आपण काहीं अंदेशा करूनये कळावें बहुतकाय लिहिणें प्यारमोहोबत असोदीजे हेकिताबत्.

असमत् पन्हा उतुफत दस्तगाहा जिऊबाईसाहेब सलामत छ अजी सबब मिस्तर हेनरी रसल साहेब साबीत जंग-बाहादूर बदसलाम खैरयत अजामपशहु दबाद अंके येथील खैर-यत जाणून हमेशाखत पाठवित जावें. दिगर आपलें खत मार्फत राघोभास्कर वकील वसुले होऊन मजमुन वर्याफूत झाला व खातरेस बिसियार विसियार खुर संदगी हाशील झाली हमेशा याद-माफक फिरस्ताद करून जास्ती खुष वख्तीची फरमावीत असावी असमत पन्हानी अवल्याची मुरंब पाठवा पाठविला तो बहुत खुष वख्तीने कबूल केला राघोपंत गोखले हमेशा हजर असतात जास्त काय लिहिणे रवाना छ ७ दिर्जेबर हे किताबत्

इंग्रेजीसही.

कौलनामा श्रीमंत कैलास वाशी राजश्री नानाफडनवीस यांचे कुटुंब मातोश्री जिऊबाई यांशी

कुंपनी सरकार इंग्रेज बाहादूर यांजकडून वेलूसली बाहादूर यानी लिहून दिल्हा कऊल ऐसीजे राजश्री धोंडोपंत सुभेदार लो-होगड यांसि केले ते कराराप्रमाणे आपण आपली वस्तवानी व

खासगत चाकर लोकानीशी श्रीमंत पेशवा साहेब रावपंडीत प्रधान बाहादर यांचे मुलुकांत आपल्ये मनाशीं कोठे प्रशस्त आहे कीं त्या-स्थळांत सुखरूप असूंये आपल्ये पोठगी खर्चा करितां इंग्रेज बा-हादरचे सरकार वियमानी सालिना १२०० बारा हजार रुपये प्रमाणे आपण कुंपनी इंग्रेज बाहादूरचे सरकार व श्रीमंत पेशवा साहेब राव पंडित प्रधान बाहादर यांचे शत्रु वर्गाशीं समंध न ठेवि जों पावेतों पावत जाईल आपणाशीं कोणाकडून ही कोणे गोष्टीची इजा पोंचणार नाहीं अजाये अस ता. २५ माहे मार्च सन् १८०४ इसवी मुताबक सं १२ जिल्हेज मुकाम मुंबई.

सही इंग्रेजी.

मेहेरबान असमंत दस्तगाहां जिउजीबाई साहेब सलाम हु कवताक.

(७) अजी सबब कर्नेल क्लोस साहेब बाहादर बाद सलाम खैरयत आजाम अंके येथील खैरयत जाणून हमेशा खत पाठवून दिलताजगी करीत गेलें पाहिजे दरीविक आ साहेबांचे पत्र एक तिळाचे थैलीचें व दुसऱ्ये जाहागिरीचे बंदोबस्ताचें ऐशीं दोन खतें वसुल जाहालीं लिहिला मजमुन दर्याफत जाहाला अजम राघोपंत गोखले यानीं जाहीर केलें कीं श्री काशीत वाडा आहे तो वाडा प्रभाकर पंत निसबत अमृतराव साहेब यानीं बळकाविला आहे ह्मणून सांगीतले त्याजवरून तेथील सरदारास चक्र ती लिहून दिल्ही असे तरी श्री काशीचे वाड्याचा बंदोबस्त होईल. दुसरे आपलें वकील बोलत होते कीं कल्याणास जाऊन राहावे ह्मणून आपला इरादा आहे त्याजवरून कलमी केलें जातें कीं आ साहेबाचें राहा-णे पनवेलींत बहूत मुनासब आहे वस्ताहाकी तेथें लोकांची मजर राहात्ये बंदोबस्त पाहाण्याचा वगैरे चांगला आहे. दुसरे जामीं

आपण गेलातर पाहारे वगैरेचा बंदोबस्त राहाणार नाहीं या बाबें अजम राघोपंडत यानीं बोलणे जाइलें आहे तें लीहीतील जादा काय लिहिणे रवाना चंद्र १ माहे एप्रेल प्यार मोहोबत असोदीजे हे किताबत

इंग्रेजी सही-

श्रीमंत मातोश्री जिऊबाई साहेब यांचे शेवेशि अजतर्फ जनर्ल वेल्सली बाहादर सलाम अंकि एथील खुशी जाणून आपली याद मानी कलमी करीत असिलें पाहिजे बिअयाम तुह्मी छ २२ सफरचें दोन्ही पत्र व यादाष्त एकसहीत पाठविलें तें पावोन लिहिला मज कूर जाहीर जाहाला आह्मी लिहिलें तें सर्व पत्र आपणाशिं पावलें नाहीं ह्मणून मनांत संदेह असेल त्यास आपण लिहिलें त्यापत्राचे अ न्वयावरून कळत आहे की पत्र तमाम आपणाशी पावलें ह्मणून तरही आपल्ये मनांतील संदेह परिहार होण्यास्तव पनवेलीहून आ ह्मीनिघून आपले अरजे अजीपर्यंत आपणाशीं लिहिलें तें पत्र दरो बस्ताची नकल करून सांमत आपणाकडे पाठविले आहे त्यावरून संदेह निवृत्ती होईल आह्मी चंद्र २२ सफर मुताबीक चंद्र २ माहे जू नचे रोजीं पुण्याचे मुकामाहून आपणास एकपत्र लिहून त्यांत श्री मंत पेशवा साहेब बाजीराव रघुनाथ पंडीत प्रधान बाहादूर याचे करारनाम्याची याद सत्रीत घालून तें पत्र आपले भाउ राजश्री प्ररशरामगोपाळ वैशंपायन याचे हातीं देऊन आपणाकडे पाठविले असें कळावें आणि केळंजाचा किल्ला श्रीमंत पेशवा साहेब मोसुफ देऊन चुकल्यावरी आणखी कोणास ही देणे होत नाहीं व आपण दुसरे एक पत्रांत जमींनी इनाम गांव वगैरेची तपशीलवार यादी पाठविल्या होत्या, कीं त्यांत खर्चाची अडचण आहे तर पैका द्या-

वा ह्मणून लिहिलें होतें, तरी या विद्यमानें आह्मी त्या यादीस दया मी करून मागून याचा जबाब पाठवीत असें कळावें बहूत काय लिहिणे प्यार मोहोबत असों दिजे रवाना चंद्र २८ सफर मुताबी चंद्र ८ जून सन १८०४ इसवी हे किताबत.

श्रीमंत मातोश्री जिऊबाई साहेब यांचे शेवेस.

अजतर्फ कर्नल वेल्सली बाहादुर सलाम अंकी एथील खैर खुशी जाणून आ साहेबी आपली खैर खुशी नामी कलमी करवून दील-ताजा करीत असले पाहिजे बिआयाम साहेबाचे विद्यमानी श्रीमंत पेशवा साहेब बाजीराव रघुनाथ पंडित प्रधान बाहादूर यानीं करार केल्या त्या यादी आपणाकडे पाठविल्या असें पहिल्ये पनवेली वर आह्मी आले असतां आपण आमचा अरुबरु केले ते सव्वाल सर्वही यांत आहेत ते सर्व गोष्टींस ही पेशवा साहेब मैसुफ यानी कबूल आहेत. व आपले बंधु राजेश्री परशुराम गोपाळ यांशी शिवगडांत कैदेंत ठेविलें होतें, तरी त्यांविषयीं आह्मी श्रीमंत साहेबांशीं सांगून कैदेंतून सोडून पत्रा सहीत लेहून आपणाकडे पाठविले असें हें पत्र मशारनिल्हे कडून आपणाशीं पावेल आणि आह्मी बहूत प्रकारें आपणाशीं याचना सांगत असे जें पाउसाळा दिवस पाऊस लाग-ण्याचे पर्वीच आपण शीघ्र पुण्यास येऊन पावेतसे करावे केळं-जाचे किल्लेदार राजेश्री माहादजी पंत व राजेश्री धोंडोपंत सुभेदार व त्यांचा वाबस्त नोकरीसुद्धां त्याचे विषयीं तहनाम्याप्रमाणे तुमचे समागमें पुण्यास येऊन त्यानीं एक निष्ठपणे चालत असे जोंपर्यंत त्यांचे मनांत कोणत्ये जाग्यांत राहावयाशीं समर्पक पडेल त्यांचे सं-तोषानुसार स्वस्थ राहाणें कळलें पाहिजे. रवाना चंद्र २२ सफर

मुताची माहे जून २ रबिलोवल सनू १८०४ इसवी आदा काय लि हिणे प्यार मोहोबत असोंदीजे हेकिताबतू.

श्री नकलेची नक्कल

करारनामा महाराज जर्नेल वेल्सली बाहादूर कुंपनी सरकारचे तर्फेने व राजश्री धोंडोपंत लोहगडाचा सुभेदार या उभयतां मध्यें करावा ऐसाजे.

१ अवल कलम लोहगडचा किल्ला व किल्ले केळंजा हे दोन्ही किल्ले जंगी सरंजाम तोफ वगैरेनिशीं श्रीमंत पेशवा साहेब राव पंडित प्रधान बाहादूर यांचा सरकार चाकरी करितां कुंपिनीचा फौजाशीं सोडून द्याव्या.

१ दुयम कलम धोंडोपंत लोहोगडचा सुभेदार यानीं कुंपिनीचा आसरेंत येऊन त्यानी कोठें राहावें ह्मणून अपेक्षितील कीं तेथेंत्यांची चीजवस्तसुद्धां राहूंनये तरी श्रीमंत पेशवा साहेब राव पंडीत प्रधान बाहादूर यांचा अथवा इंग्लिश बाहादूर यांचे सरकारचे शत्रुवर्गाशीं समंध ठेऊंनये संमंध नठेवील तों पर्यंत इंग्लीश बाहादुरां कडून संरक्षण होईल) एकादेवेळेस शत्रुचा समंध ठेवील तरी इंग्लिश सरकारचें संरक्षण उडून जाईल

१ तिसरें कमल श्रीमन्मातोश्री जिऊबाई साहेब इंग्लीश बाहादुराच्या आश्रयाखालीं येऊन श्रीमंत पेशवा साहेब रावपंडीत प्रधान यांचे मुलुखांत कोठें पाहिजे तेथें राहावें तर त्यांचे पोषणास्तव सालिनाखर्चास बाराहजार रुपये कुंपिनी जामिनी कडन मुकरर करून मातोश्रीनीं वस्तवानी व आपल्ये चाकर लोकानिशी सुखी असुये यास कुंपिनी सरकार जामीन आहे- अभय असे कलम

१ चौथे कलम धोंडो पंताची मर्जी असल्यास श्रीमंत मातोश्री

याचे समागमे असूंये- मातोश्रीचे ठायीं जापरी इंग्लिश बाहादूर सरकारच संरक्षण आहे कीं पंत मशारनिल्हेचा ठायीं इंग्लिश बाहादूर सरकारचें संरक्षण असावें तरी मशारनिल्हेकडून उभय सरकारचे शत्रुवर्गाशीं संमंध असं नये एकादे समयीं संमंध जालियास हे करार निष्प्रयोजन होऊन जातील.

१ पांचवें कलम आजचा तारिखे पासून आठव्ये दिवसाशीं लोहगड किल्ला रिकामा करून व किल्ले केळंजाचा किल्लेदाराशीं किल्ले सोडून देण्या विषयीं ताकीद पत्र देऊन दोन्हीं किल्ले हीं कुंपिनी सरकारचे स्वाधीन करावे, असे करार राजश्री धोंडोपंत किल्लेदार यांजकडून कुल अखत्यारीनशीं आले ते कारकून राजश्री अंताजी पंतानीं केले तेसही सदरहू करार सिद्धीसपावे तों अंताजी पंतानी मुंबईत वोल असावे सही कलम

५ एकूण कलम पांच मरकूम तारीख २५ माहे मार्च सन १८०४ इसवी मुता बीक चंद्र १२ जिल्हेज दर मुकाम मुंबई